**(सभापतीस्थानी उपसभापती)**

**पृ.शी.** : मुंबई विद्यापीठाच्या दूरस्थ शिक्षण विभागाने वाणिज्य शाखेतील विषयाच्या प्रवेशपत्रिकेमध्ये अदलाबदल करणे

**मु.शी.** : मुंबई विद्यापीठाच्या दूरस्थ शिक्षण विभागाने वाणिज्य शाखेतील विषयाच्या प्रवेशपत्रिकेमध्ये अदलाबदल करणे या विषयावर डॉ. दीपक सावंत, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा

**उपसभापती** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेकरिता एक तासाचा अवधी असून त्यापैकी 40 मिनिटे चर्चेकरिता व 20 मिनिटे उत्तराच्या भाषणाकरिता देण्यात आलेली आहेत. सूचना देणारे सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी 10 मिनिटामध्ये समाधानकारक उत्तर दिले तर चालेल काय?

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, होय. आम्हाला चालेल.

सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर चर्चा उपस्थित करतो :-

"मुंबई विद्यापीठाच्या दूरस्थ विभागाने वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांच्या लेखाशास्त्र (अकाऊंटन्सी) आणि व्यवस्थापन (मॅनेजमेंट) या विषयाच्या प्रवेशपत्रिकेमध्ये (हॉल तिकिट) अदलाबदल होणे, या प्रकारामुळे अंदाजे तीन हजार विद्यार्थ्यांना या परीक्षेपासून वंचित रहावे लागणे, त्यामुळे सदर विद्यार्थ्यांचे एक वर्षांचे शैक्षणिक नुकसान होणे, त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये पसरलेला असंतोष, तसेच वाणिज्य शाखेच्या तृतीय वर्ष पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेची छपाई न झाल्यामुळे पेपर पुढे ढकलावा लागणे, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून संबंधितांना दक्षता घेणे आवश्यक असणे, याबाबत करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी"

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ D/

डॉ. दीपक सावंत.

सभापती महोदय, मी या विषयावर नियम 289 अन्वये प्रस्ताव दिला होता. त्यावेळी माननीय सभापतींनी नियम 97 अन्वये प्रस्तावावर चर्चा उपस्थित करण्यासाठी मला परवानगी दिल्याबद्दल प्रथमत: माननीय सभापतींचे आभार मानतो. या अधिवेशनामध्ये मुंबई विद्यापीठासंबंधी तीन वेळा चर्चा झाली असून आजची चर्चेची तिसरी वेळ आहे. मुंबई विद्यापीठाला 154 वर्षाची दीर्घ परंपरा आहे. या विद्यापीठाचे नाव केवळ महाराष्ट्रातच नव्हेतर जगभर प्रसिध्द आहे. पूर्वीचे बॉम्बे विद्यापीठ आणि आजचे मुंबई विद्यापीठ म्हटल्यानंतर लोकांना एक प्रकारे अभिमान वाटायचा. ईकडचा विद्यार्थी पदवी घेऊन परदेशामध्ये जायचा त्यावेळी त्याला एक विशेष दर्जा असायचा. परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी की, हे विद्यापीठ आज वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. गेल्या दोन-तीन अधिवेशनामध्ये या विद्यापीठाच्या वादाच्या अनेक गोष्टींवर वर्तमानपत्रांमध्ये ताशेरे ओढण्यात आले आहेत. माननीय कुलपतींनी विद्यापीठाच्या रजिस्ट्रारची तडकाफडकी बदली करण्याचे निर्देश दिले. कुलगुरुंच्या वादापासून, कुलगुरुंच्या निवडीपासून विद्यार्थ्यांच्या हॉल तिकिटापर्यंत हे विद्यापीठ गोंधळामध्ये सापडले आहे. प्रिटींग मिस्टेकमुळे या विद्यापीठाचा कॉमर्सचा पेपर पुढे ढकलावा लागणे ही दुर्दैवाची गोष्ट आहे. आज या विद्यापीठाची अवस्था पाहिल्यानंतर महाराष्ट्र शासन म्हणते की, हे विद्यापीठ ॲटॉनॉमस विद्यापीठ आहे. त्यावर शासनाचे नियंत्रण नाही, ते कुलपतींच्या अधिपत्याखाली आहे. मंत्रिमहोदय आपण संवेदनशील मंत्री आहात, आपण नेहमी विचारपूर्वक उत्तरे देता. पूर्वेतिहास असलेल्या या विद्यापीठाच्या गैरकारभाराकडे आपण लक्ष देणे आवश्यक आहे. माननीय कुलपतींवर जबाबदारी ढकलून आपल्याला हात झटकता येणार नाही असे मी सुरुवातीला सांगतो. हे विद्यापीठ ॲटोनॉमस आहे, परंतु ॲटोनॉमस जरी असले तरीदेखील शासनाचे त्यावर काहीच नियंत्रण नाही काय? हे आपण आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये सांगावे. मध्यंतरी नॅकच्या दर्जाबाबत लक्षवेधी सूचना आणि तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून या सभागृहामध्ये चर्चा उपस्थित करण्यात आली होती. त्यावेळी या विद्यापीठाला नॅकचा दर्जा नाही असे सांगण्यात आले. या विद्यापीठाला नॅकचे नामांकन मिळावे यासाठी आपण त्यांना सूचित केले होते असे आपण सांगितले. परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी की, या विद्यापीठाला नॅकचा दर्जा मिळू नये? हा दर्जा मिळविण्यासाठी विद्यापीठाच्या लक्षात आणून देण्यास सांगितले असता मंत्रिमहोदय त्यावेळी हतबल झाले, आणि त्यांनी याबाबत माननीय कुलपतींना सांगतो आणि याबाबत काय करता येईल हे पहातो असे सांगितले.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या विषयावर सभात्याग देखील करण्यात आला. माननीय मंत्री महोदय समर्थ आहेत आणि त्यांनी विद्यापीठातील आस्थापनाला, व्यवस्थापनाला विचारण्याची हिंमत ठेवली पाहिजे की, तुम्ही असे का करीत आहात ? मग ते कुलगुरु असतील किंवा अन्य कोणी असतील. कारण हा लाखो विद्यार्थ्यांचा प्रश्न आहे. हा प्रश्न केवळ महाराष्ट्राच्या अस्मितेचा नाही, तर देशाच्या अस्मितेचा प्रश्न असून ही बाब मुंबई विद्यापीठावर अवलंबून आहे. आपण असे सांगत आहात की, एकंदर जवळजवळ 136 कॉलेजनां नॅकचा दर्जा प्राप्त आहे. पण राज्यातील अर्धीअधिक कॉलेजेस नॅकच्या दर्जापासून वंचित आहेत. कारण त्या कॉलेजमधील प्रिन्सिपल्स्नी नॅकचा दर्जा मिळावा म्हणून प्रयत्नच केलेले नाहीत. के.वेंकटरामणी फाऊंडर प्रेसिडेंट ऑफ सोमय्या कॉलेजच्या प्रिन्सिपॉल यांनी सांगितले आहे की, आम्ही नवीन इमारतीमध्ये गेल्यानंतर नॅकचा दर्जा देणार आहोत. मुलुंड कॉलेजचे प्रिन्सिपॉल यांचे म्हणणे आहे की, आम्ही पेपर वर्क करीत आहोत. हे मी आपल्याला उदाहरणादाखल सांगत आहे. आणखीही काही कॉलेजेसचे असेच म्हणणे आहे, पण वेळेचे बंधन असल्यामुळे केवळ दोन उदाहरणे येथे दिली आहेत.अशा प्रकारे विविध कॉलेजेसचे प्रिन्सिपॉल महोदय हे बेजबाबदारपणाची स्टेटमेंट करीत आहेत. त्यामुळे विद्यापीठांकडे जी कॉलेजेस् आहेत, त्यांना नॅकचा दर्जा नाही. हा पूर्वइतिहास आहे. परंतु आपण स्वप्नामध्ये रमत आहोत की, आपल्याकडे 136 कॉलेजनां नॅकचा दर्जा प्राप्त झाला आहे आणि विद्यापीठाला तर हा दर्जाच नाही. म्हणजे याबाबतीत किती शोकांतिका आहे ते पहावे.

सभापती महोदय, जो विद्यार्थी रेग्युलर कॉलेजमध्ये जाऊ शकत नाही अशा विद्यार्थ्यांनी शिक्षण घ्यावे यासाठी विद्यापीठाचा दूरस्थ विभाग आहे. परंतु याची परिस्थिती अत्यंत वाईट आहे. मी याठिकाणी दिलेल्या प्रस्तावामध्ये म्हटलेले आहे की, "वाणिज्य शाखेच्या तृतीय वर्ष पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेची छापाई न झाल्यामुळे पेपर पुढे ढकलावा लागला आहे." या बाबतीत मी एक उदाहरण देऊ इच्छितो. सदरहू विद्यार्थीनीचे नाव कु.रश्मी पटेल आहे असून तिने अकाऊंटस् 1-2-3 असे विषय घेतलेले होते.अकाऊंटस्चे म्हणजे 1) फायनान्शिअल अकाऊंटस् 2) कॉस्ट ॲण्ड ऑडीट अकाऊंटस् असेल, अशा प्रकारे तिने अर्ज भरताना अकाऊंटस्मधील हे तीनही विषय नमूद केले होते. वास्तविक पाहता हॉल तिकीटमध्ये सुध्दा हेच तीन विषय येणे आवश्यक होते.पण दुर्दैवाने तसे झाले नाही. तिला जेव्हा हॉल तिकीट देण्यात आले, त्यामध्ये दुर्दैवाने .....

. . . .बी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . . .

अकाऊंटस्च्या ऐवजी मॅनेजमेंटचे तीन विषय होते. ही बातमी मराठी, इंग्रजी पेपरमध्ये आलेले आहे.तिच्या हॉल तिकीटमध्ये "मॅनेजमेंट" च्या विषयाची नोंद झाल्याचे दिसून आल्यानंतर,ती सदरहू हॉल तिकीट स्वत: विद्यापीठाच्या दूरस्थ विभागाकडे घेऊन गेली.त्यावेळी तिला असे सांगण्यात आले की, यामधील चूक ही योग्य वेळी दुरुस्त करुन, तुम्हाला तुमच्या तीन विषयांच्या परीक्षेसाठी बसता येईल. त्याप्रमाणे ज्यादिवशी ती विद्यार्थीनी विरारच्या महाविद्यालयामध्ये अकाऊंटस्-1 चा पेपर देण्यासाठी गेली, तेव्हा तिला परीक्षा केंद्रामध्ये मज्जाव करण्यात आला आणि असे सांगण्यात आले की, "तुमच्या हॉल तिकीटवर "मॅनेजमेंट" असे लिहीलेले असल्यामुळे "अकाऊंटस्-1 च्या परीक्षेसाठी तुम्हाला बसता येणार नाही. त्यावेळी "फायनान्शिअल अकाऊंटस्" चा पेपर होता. त्यानंतर तिने परीक्षा नियंत्रकाकडे तक्रार केली की, मला परीक्षेला बसण्याची परवानगी दिली जात नाही. यावर त्यांनी हतबलता दाखविली आणि असे सांगितले की, दुर्दैवाने मी याबाबतीत काहीच करु शकत नाही. त्यानंतर दुसऱ्या दिवशी ती "कॉस्ट ॲण्ड ऑडीट अकाऊंटस्च्या परीक्षेसाठी गेली, तेव्हाही असेच झाले. यासंबंधात श्री.डी.हरिचंदन नावाचे अधिकारी आहेत, ते असे सांगतात की, यामध्ये विद्यार्थीनीची चूक आहे. त्यांनी ही बाब आमच्या निदर्शनास आणून द्यावयास हवी होती. परंतु एकतर विद्यार्थ्यांना परीक्षेचे टेंशन असते, अभ्यास करावयाचा असतो. तसेच त्यांना हॉल तिकीट तीन-चार दिवस अगोदर किंवा फारतर आठवडाभर अगोदर मिळत असेल, पण अशा वेळी विद्यार्थी कुठे-कुठे जाणार ? ज्या विद्यार्थीनीच्या बाबतीत हा प्रकार घडलेला आहे, तिने विरारवरुन मुंबई विद्यापीठामध्ये येऊन परत विरार जावयाचे हे शक्य आहे काय? मुंबई विद्यापीठाचे नियंत्रक व रजिस्टार यांनी वर्तमानपत्रामध्ये असे स्टेटमेंट दिलेले आहे की, सदरहू विद्यार्थीनी जर आमच्याकडे आली असती . . . .

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

यानंतर कु.थोरात . . . .

डॉ. दीपक सावंत....

तर आम्ही तिला आयत्यावेळी देखील विषय बदलून दिले असते. एवढी मोठी जादूची कांडी त्यांच्याकडे आहे. सभापती महोदय, असे कधीच होत नाही, हा संगणक सिस्टिमचा दोष आहे हे मी देखील मानतो पण अधिकाऱ्याचां हा किती बेजबाबदारपणा आहे.? ही एक विद्यार्थीनी नाही मी फक्त एक उदाहरण याठिकाणी सांगितले आहे. सभापती महोदय, आपल्याला असे वाटेल की, मी श्री. विलास शिंदे यांचे नाव वारंवार कां घेतो? पण या श्री. विलास शिंदे याने पुढे जाऊन असे सांगितले की, अशा चुका तर होतच असतात. अशी नावे येतच असतात. आम्ही आयत्यावेळी 100 हून अधिक विद्यार्थ्यांच्या चुका दुरुस्त करुन दिल्या मग तू का आली नाहीस, असे त्या विद्यार्थीनीला विचारण्यात आले. सभापती महोदय, या फक्त 100 विद्यार्थ्यांच्या बाबतीत चुका झालेल्या नाहीत तर साधारणपणे अडीच ते तीन हजार विद्यार्थी या चुकांना बळी पडलेले आहेत.

सभापती महोदय, टॅक्सेशनच्या संदर्भातील विषय मी नियम 93 अन्वयेच्या सूचनेच्या माध्यमातून या सभागृहात आणला होता. टॅक्सेशनचा पेपर 100 गुणांचा होता. यासाठी दूरस्थ शिक्षण विभागात दोन सिलॅबस होते. विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमासाठी ज्यावेळी अर्जे केले त्यावेळी या विद्यार्थ्यांना सांगण्यात आले की,तुमची परीक्षा जुन्या सिलॅबसप्रमाणे घेण्यात येइल त्यानंतर काही दिवसांनी या विद्यार्थ्यांना पत्र आले की, आता जुना सिलॅबस बदललेला असल्यामुळे नवीन सिलॅबसप्रमाणे परीक्षा घेण्यात येईल. त्यामुळे विद्यार्थ्यांनी नवीन सिलॅबसप्रमाणे अभ्यास केला. त्यानंतर अचानकपणे असे सर्क्युलर काढण्यात आले की, आता परीक्षा जुन्या सिलॅबसप्रमाणे होईल. म्हणजे विद्यार्थ्यांनी अभ्यास कुठल्या सिलॅबसप्रमाणे करायचा? जुन्या सिलॅबसप्रमाणे करायचा की नवीन सिलॅबसप्रमाणे करायचा?

सभापती महोदय, टॅक्सेशनचा 100 गुणांचा पेपर 80 गुणांचा करण्यात आला. जे कॉलेजमधून परीक्षा देत होते त्यांच्यासाठी 20 गुणांची इंन्टर्नल परीक्षा ठेवली आणि 80 गुणांचा पेपर ठेवण्यात आला नवीन अभ्यासक्रमाप्रमाणे 80 गुणांचा पेपर आणि 20 गुणांची इंन्टर्नल परीक्षा ठेवण्यात आली. आणि जे विद्यापीठामार्फत परीक्षेला बसणार होते अशा विद्यार्थ्यांसाठी 100 गुणांचा पेपर ठेवण्यात आला. सभापती महोदय, इतका गोंधळ जर परीक्षेच्या काळात होत असेल तर विद्यार्थ्यांनी करायचे काय? आपण म्हणता की, मुंबई विद्यापीठाला कां टारगेट करता? पण हा

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावत....

सगळा विद्यापीठाचा घोळ आहे. परीक्षा नियंत्रकाचा घोळ आहे. मग त्यांनी सांगितले की, लोकांचे ऑब्जेक्शन्स आले म्हणून आम्ही जुन्या सिलॅबस प्रमाणे आणि नवीन सिलॅबसप्रमाणे देखील परीक्षा घेत आहोत. सभापती महोदय, हे पेपर कसे तपासण्यात येणार आहेत? हा मोठा प्रश्न आहे.

सभापती महोदय, एक तर सर्वांनी शिक्षण घ्यावे असे आपण प्रमोट करतो. जे विद्यार्थी रेग्युलर कॉलेजमध्ये जाऊ शकत नाहीत ते दूरस्थ शिक्षण विभागामार्फत परीक्षेला बसतात. पण यामध्ये असे होत असेल तर काय करायचे? सभापती महोदय, यामुळे 80 गुणांची आणि 100 गुणांची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड गोंधळ आहे. ज्यांनी 80 गुणांची परीक्षा दिली आहे त्यांचे गुण 100 गुणांमध्ये कसे कन्व्हर्ट करणार किंवा ज्यांनी 100 गुणांची परीक्षा दिलेली आहे त्यांच्यावर देखील अन्याय होणार कारण तुम्ही 20 गुण इन्टर्नल कॉलेज टेस्ट म्हणून पकडलेले आहेत. विद्यार्थ्यांना मानसिक ताण देण्यात येत आहे. माननीय मंत्रिमहोदय, आपण संवेदनशील आहात. आपणही अनेक परीक्षा दिलेल्या आहेत. परीक्षेच्यावेळी आई-वडिलांची काय परिस्थिती होते, विद्यार्थ्यांची काय परिस्थिती होते ? सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील आपण या सभागृहामध्ये विद्यार्थी आत्महत्या का करतात या विषयावर चर्चा करतो. हाच गोंधळ आवरला असता तर मग ते प्रायमरी एज्युकशन असो की, हायर एज्युकेशन असो विद्यार्थ्यांवर एवढा ताण आला नसता. विद्यार्थी ज्यावेळी परीक्षेला बसतात त्यावेळी त्यांना त्यांचे ध्येय्य माहीत असते, की
माझा अमुक तारखेला अमुक-अमुक पेपर आहे असत असताना ती परीक्षाच बदलण्यात येते.

सभापती महोदय, मी आपल्या परवानगीने या ठिकाणी वाचून दाखवितो. "मुंबई विद्यापीठाने तृतीय वर्ष् कला अभ्यासक्रमाची दि.6 मे रोजी असणारी अर्थशास्त्र क्रमांक 1 या विषयाची परीक्षा पुढे ढकलली." ती परीक्षा किती पुढे ढकलली? तर ती जूनपर्यंत पुढे ढकलली. कां ढकलली ? तर यांना आता साक्षात्कार झाला की, ज्या दिवशी ही परीक्षा आहे त्याच दिवशी सी.ई.टी.ची परीक्षा आहे. वैद्यकीय सी.ई.टी.ची परीक्षा आणि तंत्र शिक्षणाची सी.ई.टी.ची परीक्षा मार्चमध्ये डिक्लेअर झाली. सी.ई.टी.च्या परीक्षेचा आणि या परीक्षेचा काय संबंध आहे? श्री. शिंदे वाटेल ते सांगतील आणि शासन ते ऐकून घेणार काय? विद्यार्थ्यांना उन्हाळयाची सुट्टी कशासाठी असते?

यानंतर श्री. बरवड...

अशोधित प्रत / शोधनीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये विद्यार्थ्यांनी अभ्यास करावयाचा काय ? 2 जूनला परीक्षा होणार आहे. इतकी दुरवस्था या विद्यापीठामध्ये आहे. हे परीक्षेबद्दल झाले. आपल्याला अनेकदा विचारले. विद्यापीठामध्ये ज्या बेकायदेशीर नेमणुका झाल्या त्याची यादी आपल्याला वाचून दाखविली त्याबाबत काय केले याचे उत्तर माननीय मंत्रिमहोदयांकडून अपेक्षित आहे. नॅकच्या चर्चेच्या वेळी मी याबाबत सांगितले होते. आपण प्रोसिडींग काढून बघावे. मी नावानिशी सांगितले होते. माननीय मंत्रिमहोदयांना ते माहीत आहे पण ते माहीत नाही असे म्हणत आहेत.

सभापती महोदय, विद्यापीठाने 22 हजार मराठी लोकांना नोकरीला लावतो असे सांगितले. 461 पदांसाठी 22 हजार लोकांनी अर्ज केले. त्या अर्जाच्या फी पोटी 28 लाख रुपये जमा झाले. ते पैसे कोठे गेले ? सहा महिने झाले तरी विद्यापीठाने कोणालाही काही कळविलेले नाही. तुम्ही पात्र आहात किंवा अपात्र आहात याबाबत काहीही कळविलेले नाही. अशा प्रकारे मराठी तरुणांना चुना लावण्याचा प्रयत्न विद्यापीठ करीत आहे. या विद्यापीठामध्ये हंगामी कुलगुरु, हंगामी कुलसचिव, हंगामी विद्यापीठ व महाविद्यालय विकास अधिकारी असे सगळे हंगामी आहेत. मग निर्णय कोण घेणार ? माननीय मंत्रिमहोदय तरी परमनंट आहेत ना ? हा हंगामी शब्द तरी काढून टाकावा आणि विद्यापीठाची लाज राखावी. विद्यापीठ या कोणत्याच गोष्टीकडे का लक्ष देत नाही, हे कळत नाही. नॅकच्या दर्जाबाबत चर्चा झाल्यानंतर माझ्याकडे एक पत्र आले. मी आपल्या परवानगीने त्या पत्रातील काही ओळी वाचून दाखवितो. त्या पत्रामध्ये असे म्हटले आहे की, "शासकीय धोरणानुसार विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी विद्यापीठाने 1996-97 मध्ये रत्नागिरी येथे उपकेंद्र सुरु केले. सुरुवातीला थिबा पॅलेस आणि फिनोलेक्स आवार आणि आता मिरझोडे येथून उपकेंद्राचा कारभार चालतो. आजपर्यंत या उपकेंद्रावर 18 ते 20 कर्मचारी आणि अधिकारी कार्यरत आहेत. पण या पदांना अजून शासन मंजुरी नाही. गेल्या 12 ते 15 वर्षात अनेक दिग्गज कुलगुरु झाले पण या उपकेंद्राच्या सेवकवर्गासाठी शासनाची मान्यता अद्याप मिळालेली नाही" परवा आपण डोंबिवलीला एक उपकेंद्र सुरु केले. या उपकेंद्रामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची पदे तरी आहेत काय ? या पत्रात पुढे असे म्हटले आहे की, "गेल्या 10-12 वर्षात शासनाने या विद्यापीठासाठी एकही नवीन



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

पद मंजूर केलेले नाही. ज्यांच्याकडे नॅकचे कम दिले आहे ते संचालक बीसीयुडी हे पद शासन मान्य आहे. परंतु त्यासाठी लागणारे स्वीय सहाय्यक, लिपिक, शिपाई ही पदे शासन मान्य करीत नाही. संचालक, बहि:शाल विभाग हे पद शासन मान्य आहे परंतु त्या ठिकाणी सहाय्यक पदासाठी कोणीच नाही. विद्यापीठाचा निवडणूक विभाग सुध्दा हंगामीच आहे." अशा प्रकारच्या अनेक गोष्टी यामध्ये म्हटलेल्या आहेत. याबाबतीत जितके सांगावे तितके कमी आहे.

सभापती महोदय, दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे या विद्यापीठाने मध्यंतरी ऑक्टोबरमध्ये मोठी फी वाढ केली. विद्यापीठाने पदव्यूत्तर अभ्यासक्रमाच्या शुल्कात भरमसाठ वाढ केली. एम.एससी. बायोटेक्नॉलॉजीची फी 39 हजार रुपये केली. एम.एससी इन केमिस्ट्री, मायक्रोबायोलॉजी याची फी 34 हजार रुपये केली. एम.एससी इन कॉम्प्युटर सायन्स, आय.टी. याची फी 33 हजार रुपये केली. एवढी फी वाढ आपण केली. नंतर ती मागे घेतली. परंतु फी वाढ कोणाच्या आदेशानुसार केली होती ? आपण विनाकारण प्रभारी कुलगुरुंचा सर्व भार आपल्याकडे घेत आहात. त्या कुलगुरु मॅडम एसएनडीटी कडून पगार घेत आहेत आणि आपल्याकडून सुध्दा पगार घेत आहेत. त्या आपल्या निवासस्थानामध्ये राहतात. आपल्याकडून निवासस्थानाची रंगरंगोटी करुन घेतात. नवीन पडदे, नवीन कॉम्प्युटर, सर्व गोष्टी नवीन घेत आहेत. त्यांना विचारले तर त्यांनी सांगितले की, पूर्वीचे जे कुलगुरु होते त्यांनी सगळे पडदे वगैरे काढून नेले.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

त्यांनी अशाप्रकारचे स्टेटमेंट केले आहे, पाहिजे असेल तर ते मंत्री महोदयांकडे पाठवितो. सभापती महोदय, असा प्रकार जर खरोखर झाला असेल तर त्याची मला खूप लाज वाटते. 15 हजार रुपयांची लाच मागण्यांचा येथील कर्मचाऱ्यांवर आरोप आहे. अल्पवयीन विद्यार्थीनींचे लैंगिक शोषण व शैक्षणिकदृष्टया अपात्र असणा-यांची नेमणूक या दोन प्रकरणांसाठी व गैरप्रकारांसाठी शिंदे यांनी आजपर्यंत अनेक समित्या स्थापन केल्या. या समित्यांचा अहवाल मंत्री महोदयांकडे प्राप्त झाला आहे काय ? आपल्याकडून खूप अपेक्षा आहेत. मी आपल्याला सांगितले होते की, या विद्यापीठामध्ये बेकायदेशीररित्या कोण कोण काम करीत आहेत. अल्केश दिनेश मोदी इन्स्टिटयूट फॉर फायनांस ॲण्ड मॅनेजमेंट स्टडीजमध्ये असलेल्या श्रीमती अरुणा देशपांडे यांची रिडरपदी झालेली नियुक्ती. त्याचबरोबर त्यांच्याकडे पीएचडी डिग्री नसताना त्यांना त्या पदावर नेमलेले आहे. अशा अनेक गोष्टी या विद्यापीठात घडत आहेत. मंत्री महोदयांच्या उत्तरातून मला कारवाई अपेक्षित आहे. दुर्दैवाने आपण गेल्या वेळी जे उत्तर रिपीट केले होते ते कृपा करुन यावेळीही देऊ नका. हे सर्व अधिकार कुलपतींना आहेत, कुलपती याबाबत ॲक्शन घेतील. मी त्यांना ॲक्शन घेण्याबाबत शिफारस करीन, अशाप्रकारची उत्तरे देऊ नका. (अडथळा) मला उत्तर काय अपेक्षित आहे ते मी सांगत नाही, परंतु उत्तराची पुनरावत्ती नको. या प्रश्नाबाबत सभागृहात तीन वेळा चर्चा झालेली आहे. मी सिनेटवर काम केलेले असल्यामुळे मला कायदा माहीत आहे. सिनेटच्या लोकांनी सुध्दा या विषयाबाबत उपोषण केलेले आहे. शासनाने कमीत कमी गैरव्यवहारासाठी ज्या समित्या नेमल्या आहेत त्याचे अहवाल शासनाकडे प्राप्त झालेले आहेत. ते अहवाल बासनात का बांधून ठेवले आहेत ? त्यावर शासन कारवाई करणार का ? दुसरे मला अपेक्षित असे आहे की, आपण सध्या सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत आहोत. त्यामुळे या विद्यापीठासाठी मराठी व्यक्तीची कुलगुरुपदी नियुक्ती करावी. कारण साऊथ इंडियन लॉबी आपल्यासाठी महत्वाची असली तरी पण मराठी कुलगुरु आपल्याला कसे मिळतील त्याकडे लक्ष द्यावे. त्याचप्रमाणे या विद्यापीठात कुलगुरुंपासून ते कुलसचिवांपर्यंत जे अनेक पदांवर हंगामी म्हणून कार्यरत आहेत, त्या पदांवर

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

कायम स्वरुपी नेमणूका करण्यात याव्या. त्या केल्या जाणार आहेत आणि या 2500 ते 3000 दूरस्थ विद्यार्थ्यांना शासन कसा न्याय देणार आहे, प्रिंटिंगची चूक असेल, परीक्षेच्या पेपरची चूक असेल, हॉल तिकिटांची चूक असेल त्याबाबत संबंधितांवर शासन कोणती कारवाई करणार आहे ते सांगावे. तिसरी महत्वाची गोष्ट आपल्याकडून अपेक्षित आहे की, डोंबिवली येथे मुंबई विद्यापीठाचे उपकेंद्र सुरु करणार आहे, तो आपला विकासाचा भाग आहे. या उपकेंद्राच्या माध्यमातून ज्या नियुक्त्या केल्या जाणार आहेत त्या कधीपर्यंत केल्या जाणार आहेत आणि हे उपकेंद्र कधीपर्यंत कार्यान्वित होणार आहे ? रश्मी पटेलला न्याय मिळणार का आणि 100 मार्कांचा पेपर 80 मार्कांचा झाला त्याबाबत शासन कोणती कारवाई करणार आहे ते सांगण्यात यावे. आपण मला वेळ दिला त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देऊन मी माझे भाषण संपवितो.

---

3....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/

श्री.संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, नियम 97 अन्वये या सभागृहाचे सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी विद्यापीठाचा कारभार, विद्यार्थ्यांचे होत असलेले नुकसान, प्रश्नपत्रिकांतील चुका अशा विविध विषयाबाबत चर्चा उपस्थित केलेली आहे. मला केवळ दोनच विषय मांडावयाचे आहेत. मुंबई विद्यापीठाचे उपकेंद्र डोंबिवली येथे सुरु होणार आहे. त्या उपकेंद्राचे तेथे भूमिपूजन झाले. त्यावेळी सन्माननीय मंत्री महोदय श्री.राजेश टोपे हे आपले होते, त्यांनी चांगले मार्गदर्शन केले होते. ते या कामात अतिशय रस घेत आहेत. या महानगरपालिकेने जागा दिली आहे. तसेच ठाणे महानगरपालिकेच्या संपूर्ण सभागृहाने एक रुपया नाममात्र दराने उपकेंद्रासाठी 99 वर्षासाठी जागा देऊ असा ठराव केला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेने तसा ठराव केला आहे. विद्यापीठाने दोन वर्षापूर्वी घाई करुन सांगितले की, आम्हाला दोन दिवसात जागा उपलब्ध करुन द्यावी. त्यामुळे 20 दिवसात जागा सूचित केली. मंत्री महोदयांकडे त्यावेळी नगरविकास खाते होते. त्यावेळी आपण चेंज ऑफ यूजबाबत निर्णय घेतला, त्यामुळे कल्याणच्या केंद्राचे भूमिपूजन झाले.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. संजय केळकर....

विद्यापीठाने याकरिता निधी उपलब्ध केलेला आहे काय ? अजून ठाणे येथील उपकेन्द्राचे भूमिपूजन झालेले नाही. हे अधिवेशन संपल्यानंतर 30 तारखेच्या आत ते करण्यात येईल असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितलेले आहे. परंतु केवळ भूमिपूजन करुन काही होणार नाही. आधीच दोन वर्षाचा कालावधी लोटलेला आहे. तत्कालीन कुलगुरुंनी असे सांगितलेले आहे की, यासाठी 50 लाख रुपये बाजूला काढून ठेवलेले आहेत, आमच्या ताब्यात फक्त जागा द्या .ठाण्याचे उपकेन्द्र मुंबई विद्यापीठाच्या ताब्यात गेलेले आहे. कल्याणच्या उपकेन्द्राचे भूमिपूजन झालेले आहे. ही दोन्ही उपकेन्द्रे प्रत्यक्ष केव्हा सुरु होणार आहेत ? या उपकेन्द्रासाठी केव्हा निधी उपलब्ध करुन दिला जाईल ?

सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी रत्नागिरी उपकेन्द्राचा विषय उपस्थित केला. रत्नागिरी येथे अनेक वर्षापासून उपकेन्द्र आहे. परंतु ते असून नसल्यासारखेच आहे अशी स्थिती आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या तोंडाला पाने फुसण्याचे काम होऊ नये. या उपकेन्द्राचा शंभर टक्के उपयोग होत नाही. वाढत्या नागरीकरणाचा विचार करता या उपकेन्द्राचा तेथील लोकांना शंभर टक्के उपयोग कसा होईल या दृष्टीने माननीय मंत्री महोदयांनी माहिती द्यावी. कारण मुंबई विद्यापीठ हे या सगळया विषयामध्ये उदासीन आहे. त्यांनी याबाबतीत कोणतीही ठोस अशा प्रकारची भूमिका घेतलेली नाही. आता ही जागा परत घ्यायची की काय असे ठाणे महानगरपालिका म्हणू लागली आहे. ही सोन्यासारखी जागा महापालिकेने सगळयांच्या आग्रहाखातर मुंबई विद्यापीठाच्या उपकेन्द्रासाठी दिली. याबाबतीत तातडीने कारवाई होण्याची गरज आहे. या ठिकाणी विद्यार्थ्यांच्या झालेल्या नुकसानी संदर्भात सन्माननीय सदस्यांनी उहापोह केलेला आहे. परवा बी.कॉम.ची परीक्षा झाली. कल्याण मधील नेतिवली येथे एक कॉलेज आहे. त्या कॉलेजला दोन वर्षापूर्वी मान्यता दिली. त्या कॉलेजमधील विद्यार्थ्यांना त्या कॉलेजला लागून असलेल्या दुकानांच्या रिकाम्या गाळयामध्ये परीक्षेला बसविण्यात आले होते. त्या ठिकाणी पंख्याची सोय नव्हती, लाईटची व्यवस्था नव्हती. अशा ठिकाणी 400 विद्यार्थ्यांना परीक्षेला बसविण्यात आले होते. ज्यांनी या जागेची परीक्षा केन्द्रासाठी निवड केली त्यांनी, विद्यार्थ्यांना कोणत्या ठिकाणी कोणत्या परिस्थितीमध्ये परीक्षा



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. संजय केळकर...

द्यावी लागेल हे पाहिले नव्हते काय ? तेव्हा याही बाबतीत ज्यांची जबाबदारी आहे त्यांच्यावर देखील कारवाई झाली पाहिजे. तेव्हा मी उपस्थित केलेल्या दोन विषयाच्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी माहिती द्यावी, एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी "मुंबई विद्यापीठाच्या दूरस्थ शिक्षण विभागाने वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांच्या लेखाशास्त्र आणि व्यवस्थापन या विषयाच्या प्रवेशपत्रिकेमध्ये अदलाबदल केल्यामुळे हजारो विद्यार्थ्यांना परीक्षापासून वंचित रहावे लागणे" या विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे. खरे म्हणजे या सदनामध्ये मागील दोन आठवड्यापासून प्रश्नाच्या माध्यमातून आणि लक्षवेधीच्या माध्यमातून मुंबई विद्यापीठाची वस्तुस्थिती बाहेर आलेली आहे. याबाबत सन्माननीय सदस्य आणि विद्यापीठाचे अधिकारी यांची बैठक घेण्यात येईल. त्या बैठकीचे मिनिटही होईल. ते झाल्यानंतर विद्यापीठाच्या बाबतीत काय करायचे ते पाहतो असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. आपण केस टू केस, प्रॉब्लेम आला की सोल्यूशन असे जे करतो त्या ऐवजी मुंबई विद्यापीठाच्या प्रशासनाच्या ताब्यातून आता परीक्षा सुटत चालल्या आहेत. सुमारे 1000 परीक्षा मुंबई विद्यापीठा तर्फे घेतल्या जातात. वर्षभराचे टाईमटेबल करायचे झाले तर दिवसाला 3 परीक्षा असे होऊ शकेल. या परीक्षा घेण्यासाठी विद्यापीठाकडे आवश्यक तेवढा स्टाफ आहे काय ? आवश्यक तेवढा स्टाफ असला तरी त्यातील ॲडहॉक किती आणि टेम्पररी किती याचा आढावा घेतलेला आहे काय ? ज्या ज्या वेळी गरज लागेल त्या त्या वेळी माणसांची भरती होते. मग त्यामध्ये ओळखीच्या माणसांचीही भरती होते. जर कायमस्वरुपी लोक सेवेमध्ये घेतले नाहीत तर ते जबाबदारीने काम करीत नाहीत. कामामध्ये चालढकल करतात. मुंबई विद्यापीठाच्या नावारुपाप्रमाणे परीक्षांचे पावित्र्य टिकविणे आवश्यक आहे.

...नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / परिशिष्ट पाठ नाही

श्री.विनोद तावडे.....

आताचा जो काही स्टाफिंग पॅटर्नचा स्ट्रक्चर आहे त्याला हे झेपणारे नाही. त्यामुळे महाराष्ट्र शासनाला बेसिकली स्टाफिंग पॅटर्नचा आढावा घ्यावा लागेल. नव्याने केव्हा कर्मचारी नियुक्त केले याचा आढावा घ्यावा लागेल. ज्यावेळी विद्यार्थी आणि कॉलेजांची संख्या आजच्यापेक्षा निम्मी होती त्यावेळी जो स्टाफ होता तोच आता कार्यरत आहे. विद्यापीठाच्या अंतर्गत राजकारणामुळे अडचण निर्माण झाली आहे. विद्यापीठाची स्वतंत्र प्रेस आहे. त्या प्रेसकडून विद्यापीठाला महत्व दिले जात नाही. अकाऊंटचा पेपर तयार केला. एक्झामिनरने तो उशिरा तयार करुन दिला. पेपर तयार झाल्यानंतर प्रिंटिंग प्रेसकडे अर्जंटली छापून द्या म्हणून कळविण्यात आल्यानंतर त्यांनी तो अर्जंटली छापून देण्यास नकार दिला. कुलगुरुंना विचारले की, बाहेरुन पेपर छापून घ्यायचा का? त्यांनी बाहेरुन छापून घेण्यास अनुमती दिली नाही. कारण बाहेरुन पेपर छापून घेतल्यास तो फुटण्याची शक्यता असते म्हणून तसे करता येत नाही. अकाऊंटच्या विषयाची परीक्षा उद्या आहे म्हणून ताबडतोब छापून द्या असे सांगूनही तो छापून दिला जात नाही आणि बाहेरुनही छापून घेता येत नाही. कारण पेपर फुटण्याची शक्यता असते. विद्यापीठाचा परीक्षा विभाग, प्रिंटिंग प्रेस आणि राजाबाई टॉवर येथील प्रशासन व कालीना कॅम्पसमधील परीक्षा नियंत्रक विभाग यांच्या त्रांगड्यामध्ये मुंबई विद्यापीठाच्या परीक्षांचा बोजवारा उडाला आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी नेतिवली येथील विषय मांडला. मुलांना परीक्षेसाठी कॉरिडॉरमध्ये बसविण्यात आले. लेट फी आकारुन फॉर्म स्वीकारायची काय हौस आहे? मुलांचे वर्ष फुकट जाऊ नये म्हणून ही सुविधा देण्यात येते. परंतु अंतिमत: किती कॉलेजांमधून कोणत्या विषयाचे किती फॉर्म आले याची माहिती विचारली तर विद्यापीठ त्याचे उत्तर देऊ शकत नाही ही फॅक्ट आहे. कॉम्प्युटरायझेशन झाले आहे. अमुक तारखेला किती फॉर्म प्राप्त झाले याची शासनाने विद्यापीठाकडून माहिती मागवावी. विद्यापीठ ही माहिती शासनाला देऊ शकत नाही. मी याची तंतोतंत माहिती दुसऱ्या दिवशी देऊ शकतो. त्यांचा दोष किती? इनचार्ज आहेत म्हणून हा प्रशासनाचा दोष असतो. परीक्षेचा बोजा त्यांच्या आवाक्याबाहेर गेलेला आहे. यासाठी स्टाफिंग पॅटर्नचा विचार करुन मार्ग काढावा लागेल. मंत्रीमहोदय म्हणतील की, सेक्शन 8(अ) नुसार आम्ही पत्र पाठवित आहोत, यापेक्षा जास्त अधिकार सरकारला नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

सभापती महोदय, मुंबई विद्यापीठामध्ये एकेकाळी श्री.टी.के.टोपे हे कुलगुरु होते. त्यांच्या कार्यकाळात पहिल्यांदा एटीकेटी पध्दत सुरु झाली. आम्ही गंमतीने म्हणत होतो की, Allowed by T.K.Tope. तत्कालीन राज्यपाल महोदय आणि राज्य शासनाने त्या काळात परीक्षांच्या विषयामध्ये असाच प्रचंड गोंधळ झाला म्हणून श्री.डी.टी.जोसेफ नावाच्या आय.ए.एस.अधिकाऱ्याची मुंबई विद्यापीठामध्ये नेमणूक केली. आयएएस अधिकारी शहाणे असतात, त्यांच्याकडून काही चुका होत नाहीत असे मला म्हणायचे नाही. श्री.जोसेफ त्यांच्या कामात इतके लोकप्रिय होते की, त्यांनी पुढील दीड वर्षाच्या काळात विद्यापीठाच्या कारभाराला लौकिक प्राप्त करुन दिला. एवढे अधिकार राज्य शासनाला आहेत. मंत्रीमहोदय म्हणतात, आमच्याकडे काही अधिकार नाही. विद्यापीठ स्वायत्त आहे. मुंबई विद्यापीठाला ॲकॅडमिक स्वायत्तता जरुर दिली पाहिजे. अमुक विषय शिकवा, माझ्या मुलीला एम.डी.ला प्रवेश द्या असे कोणी सांगितले तर ते चुकीचे आहे. त्याला आम्ही विरोध करणारच. ॲकॅडमिक स्वायत्तेमध्ये तुम्ही शिरु नका. व्यवस्थापनामध्ये जो गोंधळ चालला आहे त्याबाबत राज्य सरकारला लक्ष घालावेच लागेल. राज्य शासनाकडून कोट्यवधी रुपये विद्यापीठाला दिले जातात. सर्वसामान्य माणसाला मुंबई विद्यापीठाच्या कारभाराबाबत शासनाकडून खूप अपेक्षा असतात. सिनेट बैठकीमध्ये कुलगुरु विरुध्द सिनेट सदस्य असा गोंधळ सदैव चालू असतो. तुम्ही त्यांचे अकाऊंट मागवा. अकाऊंट सिनेटमध्ये कसे पास होतात बघा? कोणत्या कॉलेजांकडून किती ॲफिलिएशन फी आली, किती यायची बाकी आहे याचा हिशोब मुंबई विद्यापीठाकडे नाही. मुंबई विद्यापीठामध्ये सगळा कारभार सरकारभरोसे चालला आहे ही वस्तुस्थिती आहे.

(नंतर एच.1...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापाठ नाही

श्री. विनोद तावडे .....

यामध्ये कोणती दुरुस्ती करावयाची असेल तर थातुरमातूर उत्तर देऊन हा विषय संपवू नये. नॉर्मली मंत्री महोदय सांगतील की तो अधिकारच नाही म्हणून आपण हे करु शकत नाही. पण असे न सांगता याप्रकरणी खोलात शिरुन विचार करणे आवश्यक आहे. परीक्षा नियंत्रणाच्या बाबतीत विचार केला तर सर्व पॅटर्नबाबत सविस्तर चौश्की केली तर असे दिसून येईल की, कोणत्याही व्यक्तिला हे चालविणे म्हणजे त्याच्या ताकदीचा विचार करता तसे अवघडच आहे. म्हणून या सर्व बाबतीत सखोल चौकशी करुन यातून लॉंग टर्म मार्ग काढणे आवश्यक आहे. आज राजाबाई टॉवरची काय अवस्था झालेली आहे ही बाब विचार करण्यासारखीच आहे. पूर्वी राजाबाई टॉवर हे मंत्रालयासमोर नेहमी वाकूनच असायचे अशा या राजाबाई टॉवरचा प्रशासकीय हस्तक्षेपाचा टेकू कशा पध्दतीने देता येईल याचा विचार होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे मुंबई विद्यापीठाचे परीक्षा केंद्र यासंबंधीचा विचार केला तर परीक्षेच्या बाहेरील अभ्यासकांनी सुध्दा अहवाल द्यायला सांगितले पाहिजे. त्यानंतर ज्या आवश्यक गोष्टी आहेत त्या पूर्ण केल्या पाहिजेत. आपण उत्तरात कदाचित हे सांगणार की, मुंबई विद्यापीठाच्या अखत्यारित पूर्वी 100 कॉलेजेस होती, आता ही संख्या 250 वर गेली आहे आणि नंतर हा विषय निघून जाईल. परंतु हे म्हणजे 40 लिटर दूध देणारी एक गाय आणि 20-20 लिटर दूध देणाऱ्या दोन गायी असा प्रकार झाला आहे. पण यातून प्रश्न सुटणार नाही तर हा गोंधळ मुळात कशामुळे निर्माण होतो याच्या खोलात शिरणे आवश्यक आहे. संगणकामुळे बरेच काही ॲडव्हान्स झालेले असतना यासंबंधीचा सायंटिफिक अहवाल प्राप्त करुन घ्यावा व पुढील दोन वर्षाच्या काळात कसा टिकाव धरता येईल याचा विचार करणे आवश्यक आहे. अशा प्रकारे सुधारणा झाली तर ज्याप्रमाणे माननीय राज्यमंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांचे फोटो बऱ्याच वेळेस धारावीला दिसतात तसे ते आताही दिसतील, माननीय मंत्री महोदयांचे फोटो कदाचित जालन्याला दिसतील. शेवटी मी एवढीच सूचना करणार आहे की, ज्याप्रमाणे डी.टी.जोसेफ यांनी विद्यापीठात सुधारणा केली होती तो रेफरन्स आपण विचारात घ्यावा आणि मुंबई विद्यापीठात सुधारणा घडवून आणण्याबाबत विचार करावा अशी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

---

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : महोदय, या चर्चेच्या माध्यमातून मी फक्त दोन-तीन सूचना करणार आहे.

महोदय, मूळ प्रश्न म्हणजे विद्यापीठावरील प्रशासकीय भार वाढतो आहे हा असून त्यावरील उपाययोजना म्हणजे प्रशासकीय कामकाज व ॲकेडमिक काम वेगळे करावे. अलिकडच्या काळात विद्यापीठ कायद्यात शासनाने दुरुस्ती केली त्यामुळे विद्यापीठाचे कुलगुरु कोण असावे यासंबंधीचे निकष बदलून त्याचे डिग्रेडेशन झालेले आहे व त्यामुळे चांगले कुलगुरु सुध्दा मिळण्याची शक्यता यापुढील काळात नाही. म्हणून जी सुधारणा केली त्यात पुन्हा दुरुस्ती करुन बाहेरचाच कुलगुरु विद्यापीठाला मिळावा आणि तो उत्तम प्रशासक असला पाहिजे.

दुसरी सूचना अशी आहे की, मुंबई विद्यापीठाचा कारभार पाहता या विद्यापीठाच्या विभाजनाशिवाय पर्याय नाही. असे विभाजन करुन त्यात ठाणे आणि कोकणसाठी वेगळे केंद्र तयार करावे. कारण यामध्ये जवळजवळ सर्वच अभ्यासक्रम जोडलेले आहेत, अशा अभ्यासक्रमांकसाठी ज्याप्रमाणे राज्यात मेडिकल युनिव्हर्सिटीची स्थापना झाली त्याच धर्तीवर स्वतंत्र विद्यापीठ निर्माण करता येईल काय याचाही विचार करावा अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

---

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवानराव साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, विद्यापीठाच्या गैरकारभारामुळे ज्या विद्यार्थ्यांवर अन्याय झाला आहे त्यांना कसा रिलीफ देता येईल, यासंदर्भात तातडीने विचार केला पाहिजे तसेच ज्या विद्यार्थ्यांवर अन्याय होण्याची शक्यता आहे, त्याबाबतही तातडीने उपाययोजना करण्याची शक्यता आहे. नाही तर या ठिकाणी चर्चा करुनही त्यातून काहीही निष्पन्न निघणार नाही. असे होता कामा नये. एवढे बोलून मी माझे विचार थांबवतो.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंतराव पवार (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था ): सभापती महोदय, विद्यापीठाचे कामकाज वाढलेले असून ॲफिलिएट कॉलेजची संख्या देखील वाढलेली आहे. या कॉलेजमध्ये जवळ जवळ 8-8,10-10 लक्ष विद्यार्थी शिक्षण घेतात त्यामुळे एकाच वेळेस 400-500 परीक्षा घ्याव्या लागतात. पुणे तसेच मुंबई विद्यापीठाचे विभाजन करण्यात येईल, असे मध्यंतरी सरकारने जाहीर केले होते. त्यामुळे मुंबई आणि पुणे विद्यापीठाचे विभाजन केव्हा करण्यात येणार आहे ? त्याच बरोबर पुणे विद्यापीठाचे विभाजन करुन नाशिक येथे स्वतंत्र विद्यापीठाची घोषणा मंत्री महोदयांनी करावी, अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित): सभापती महोदय, विद्वानांचा विषय असल्यामुळे या विषयावर अनाडी लोक जास्त काही बोलत नसतात. या चर्चेला सुरुवात झाल्यापासून शिंदेच्या नावाने घोष सुरु आहे. त्यामुळे हे शिंदे कोण आहेत त्यांना प्रथम धडा शिकवा. सभापती महोदय, मला असे म्हणावयाचे आहे की, माननीय राज्यपाल हे कुलपती असतात त्यामुळे सर्व विद्यापीठांचे नियंत्रण कुलपतींकडे असते त्यामुळे ते झोपले आहेत काय ? युतीच्या काळात माननीय अलेक्झांडर साहेब राज्यपाल होते त्यावेळेस अशी काही घटना घडली की, तेव्हाचे विरोधीपक्ष या बाबत सरकारकडे खुलासा मागत असत. हे राज्यपाल काही मंत्रीमंडळाच्या निर्णयावर शिक्के मारण्यासाठी नाहीत. कुलपती म्हणून त्यांच्याही काही जबाबदा-या आहेत. सभागृहाची ऑफिसर लॉबी सायलेंट असते. त्यामुळे या चर्चेसाठी माननीय राज्यपालांचा प्रतिनिधी ही चर्चा एकावयास हजर पाहिजे होते. माननीय राज्यपाल महोदयांनी सरकारला विचारले पाहिजे की, या विषयाच्या बाबत तुमचे काय चालले आहे ? कुलपती म्हणून माननीय राज्यपालांची काहीच जबाबदारी नाही काय ? त्यामुळे यासंदर्भात माननीय राज्यपालांनी तातडीने लक्ष घालण्याची आवश्यकता आहे. मी तर सन्माननीय सदस्य श्री. दीपक सावंत यांना सांगू इच्छितो की, आज या विषयावर जी काही चर्चा झालेली आहे त्या चर्चेचे सर्व प्रोसिडींग त्यांनी माननीय राज्यपाल महोदयांकडे पाठविले पाहिजे. या शासनाने भ्रष्टाचाराला पाठीशी घालू नये. व्हीजेटीआयमधील भ्रष्टाचाराच्या संदर्भात या सदनात अहवाल आलेला असतांनाही त्याबाबत शासनाने काही देखील कारवाई केलेली नाही. मी मंत्रीमहोदयांना सांगू इच्छितो की, तुम्हाला खाते बदलावयाचे असेल तर ते नंतर बदला परंतु आपण या पदावर आहात तेथपर्यंत संबंधितांवर कारवाई करा, अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

---

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे (उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, महाराष्ट्र विधान परिषद नियम 97 अन्वये उपस्थित केलेल्या चर्चेवर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत तसेच सर्वश्री संजय केळकर, विनोद तावडे, कपिल पाटील, भगवानराव साळुंखे, डॉ. वसंतराव पवार तसेच ज्येष्ठ सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आपले विचार मांडलेले आहेत. मुंबई विद्यापीठाच्या कारभाराच्या संदर्भात या ठिकाणी सदस्यांनी विचार व्यक्त केले तसेच चांगली माहिती दिली तसेच आमच्या ज्ञानातही भर पाडली व चांगल्या सूचना, व चांगले मार्गदर्शनही केलेले असल्यामुळे मी सर्व सन्माननीय सदस्यांचा आभ्ांरी आहे. या ठिक्ाणी सन्माननीय सदस्यांनी जो काही घटनाक्रम सांगितला तसेच ज्या काही उणीवा सांगितल्या, त्याबाबतीत मी थोडक्यात माहिती सांगतो. सन्माननीय सदस्यांनी या विषयावर विचार मांडतांना परीक्षेच्या संदर्भात, प्रशासनाच्या संदर्भातील विचार मांडलेले आहेत. त्यामुळे यासंदर्भात तातडीने कारवाई होणे अपेक्षित आहे. तसेच रिक्त जागांच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी विचार मांडलेले आहेत. तसेच ॲक्रीडीटेशनच्या संदर्भात विचार मांडलेले आहेत, नियुक्त्यांच्या संदर्भात विचार मांडलेले आहेत. अशा अनेक बाबींवर सन्माननीय सदस्यांनी प्रकाश टाकलेला आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे.....

त्या संदर्भातील काही धोरणात्मक बाबीसंबंधाने मी नंतर खुलासा करणार आहे.सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत आणि इतर सन्माननीय सदस्यांनी अनेक मुद्दे मांडलेले आहेत. त्यामध्ये विद्यीठाच्या कारभाराबद्दल कोर्टाने ताशेरे ओढले होते, रजिस्टारांना सस्पेन्ड करण्यात आले होते, इतरही काही कारवाई करण्यात आली होती तसेच नॅकचे फाईव्ह स्टार ॲक्रिडीटेशन नसतांना त्याचा वापर करण्यात आला होता इत्यादी मुद्दे त्यांनी मांडले आहेत. त्याचबरोबर कलम 97च्या संदर्भात दोन प्रश्न उपस्थित करण्यात आले होते त्या बाबतीत मी अगोदर खुलासा करतो दुरस्थ शिक्षण विभागाच्या अंतर्गत कुमारी पटेल यांच्या हॉल तिकीटाची अदलाबदल झाल्यामुळे त्यांना परीक्षा देण्या पासून वचित रहावे लागले होते याबद्दल मी प्रथम सांगू इच्छितो की, सदरहू विद्यार्थिनीकडून ॲडमिशन फॉर्म भरत असतांना एक चूक झाली होती. ऑप्शनल तीन विषय असतात व त्या पैकी त्यांना अकाऊन्टन्सी विषय घ्यावयाचा होता त्या विषया ऐवजी त्यांनी मॅनेजमेन्ट हा विषय त्या फॉर्ममध्ये लिहिला होता. दूरस्थ शिक्षण विभागामार्फत जे कोसेर्स सुरु करण्यात आलेले आहेत त्या कोर्सकरिता प्रत्येक विषयाला कोड देण्यात आलेले आहेत .त्या फॉर्मवर "पाच" कोड लिहिला होता. दूरस्थ शिक्षण विभागाची कार्यपध्दती अशी आहे की, ॲडमिशन फॉर्म आणि एक्झॅमिनिशन फॉर्म एकाच दिवशी भरुन घेण्यात येत असतात. सदरहू विद्यार्थिनीकडून ॲडमिशन फॉर्म भरत असतांना मोठी चूक झाली होती. त्याचबरोबर एक्झॅमिनिशन फॉर्म मात्र अकाऊन्टन्सीचे विषय घेऊन भरला होता..तो फॉर्म देखील मी सभागृहाला दाखवू इच्छितो. त्या फॉर्मच्या बाजूला प्रत्येक विषयाचे कोड असतात. तो कोड मात्र त्या भरु शकल्या नाहीत. ॲडमिशन हा विषय दूरस्थ शिक्षण विभागाचे प्रशासन विभाग सांभाळत असते आणि एक्झॅमिनिशन फॉर्मचा विषय एक्झॅमिनिशन डिपार्टमेट सांभाळत असते. संबंधित फॉर्म एक्झामिनेशन डिपार्टमेन्टकडे गेला असता त्या फॉर्ममध्ये अकाऊन्टन्सीचे विषय लिहिण्यात आले होते मात्र त्याच्या समोर कोड लिहिण्यात आले नव्हते असे आढळून आले होते. डाटा फिडींग करणा-या ऑपरेटरला असे वाटले की ती विद्यार्थीनी कोड लिहिण्याचे विसरली असावी म्हणून त्याने पाच हा कोड लिहिण्याचा प्रयत्न केला होता या फॉर्मवर फक्त .कोड नंबरच भरण्याची

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे.....

पध्दत असल्यामुळे ॲडमिशन फॉर्मच्या अनुषंगाने जो कोड पाच नबरचा टाकला होता तो मॅनेजमेन्टचा होता. तोच कोड या विषयाच्या संदर्भात टाकण्यात आला होता व त्यानुसार हॉल तिकीट जनरेट झाले होते..याचे विश्लेषण केले तर काही प्रमाणात त्या विद्यार्थिनीची चूक झालेली आहे. जरी अशा प्रकारची चूक झालेली असली तरी ती अशी सिस्टीम आपल्याकडे असली पाहिजे की ती चूक डिटेक्ट होऊन त्यामध्ये सुधारणा करता आली पाहिजे. आठ ते दहा दिवस अगोदर हॉल तिकीट देण्याची पध्दत आहे.आठ दहा दिवसात दुरुस्ती करण्याचे ठरविले तर त्यामध्ये वेळ जातो तसेच मानसिक त्रास होतो या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी जी भावना व्यक्त केली होती त्याच्याशी मी 100 टक्के सहमत आहे.त्या अनुषंगाने एक्झॅमिनिशेनमध्ये मोठे रिफॉर्म्स आणणे आवश्यक आहे. त्यामुळे मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, डाटा फिलीगचा विषय लवकर व्हावा त्याचबरोबर हॉल तिकीट केवळ सात आठ दिवसापूर्वीच न देता त्यासंबंधीची सर्व माहिती सर्व कॉलेजेसना त्या अगोदरही कशी उपलब्ध होईल यासंबंधीची व्यवस्थ्ा करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, मी या ठिकाणी संगू इच्छितो की, पूर्वी मुंबई विद्यापीठामध्ये जी सिस्टीम होती ती नंतर बंद करण्यात आली होती. त्या सिस्टीमला आयसीआर टेक्नॉलॉजी म्हणजे इन्टलेक्चुअल्स कॅरेक्टर रिकग्नीशन टेक्नॉलॉजी म्हटले जाते. ही सर्व कामे जर आपण कॉम्प्युटरच्या सहाय्याने केली तर आयसीआर टेक्नॉलॉजीच्या सिस्टीममुळे हे फॉर्म्स स्कॅनिग केले जाईल व एखाद्या विद्यार्थ्याने विषय लिहिले असतील आणि कोड जर चुकीचा लिहिला असेल तर येथे चूक झालेली आहे असे कॉम्प्युटरने आपल्याला सांगितले असते.

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.राजेश टोपे...

आणि आय.स.आर. सिस्टीम सक्तीची करुन ती अंमलात आणणे आवश्यक आहे, याबाबत राज्य सरकारच्यावतीने केवळ मुंबई विद्यापीठाला नव्हेतर सर्वच विद्यापीठांना कळविण्यात येईल. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना हॉल तिकिट दहा दिवस अगोदर देण्याऐवजी प्रत्येक कॉलेजला दीड ते दोन महिने अगोदर या संदर्भात सविस्तरपणे माहिती मिळाली पाहिजे. सर्वच विद्यापीठांच्या नोटिस बोर्डावर विद्यार्थ्याचे नाव लिहिले जाईल, तसेच कोणत्या केंद्रावर त्याचा नंबर आलेला आहे याचा उल्लेख असेल. अशाप्रकारे हॉल तिकिटशी संबंधित सर्व माहिती त्याठिकाणी डिस्प्ले केली जाईल. व तशाप्रकारची सिस्टीम अंमलात आणली जाईल. एक्झामिनेशन रिफॉर्म करण्याच्या दृष्टीकोनातून अशाप्रकारचे मोठे बदल करण्याकरिता निश्चितपणे विद्यापीठांना सूचना दिल्या जातील. हे मी याठिकाणी आपल्या माध्यमातून सांगू इच्छितो.

सभापती महोदय, या विषयाच्या अनुषंगाने आणखी एक महत्वाचा विषय उपस्थित करण्यात आला की, काही विषयांची परीक्षा पुढे ढकलण्यात आली. यामध्ये काही लूप होल्स आहेत हे मी मान्य करतो. दिनांक 12 एप्रिल रोजी कॉमर्स या विषयाची होणारी परीक्षा पुढे ढकलण्यात आली. सभापती महोदय, या परीक्षा घेण्याचे काम ज्या प्रकारे केले जाते त्यामध्ये पेपर प्रिंट करण्यापर्यंतच्या स्टेजेस आहेत. पहिल्यांदा प्रत्येक विषयाचे पेपर सेटर असतात, ज्याला "प्राश्निक" म्हणतात, ते पेपर सेटींग करीत असतात. उदा. कॉमर्स या विषयाच्या पेपरचे सेटींग प्राश्निकांकडून उशिरा झाल्यामुळे पुढील सर्व गोष्टींना उशीर झाला. पेपर सेटर्सची एक कमिटी असते त्यामध्ये 3-4 जण असतात, ते पेपर सेटींग करीत असतात. त्यांना पेपर सेटींगचे वेळापत्रक ठरवून दिलेले असते, त्या वेळेमध्ये त्यांनी पेपर सेट करुन दिला पाहिजे. त्यानंतर मॅन्युस्क्रीप्ट नावाची एक कमिटी असते, त्या कमिटीपुढे ही प्रश्नपत्रिका तपासणीकरिता नेली जाते. त्यामध्ये काही प्रुफ करेक्शन्स केल्या जातात.आणि त्यानंतर ती प्रश्नपत्रिका डिपार्टमेंटकडे छपाईसाठी दिली जाते. ज्यावेळी विद्यार्थी प्रत्येक विषयाची परीक्षा देतो त्यावेळी प्रत्येक विभागाचे काम हे ठरलेल्या वेळेमध्ये होण्यासाठी त्यांनी टाईम टेबल पाळले पाहिजे. यामध्ये पेपर सेटरकडून उशीर झाल्यानंतर पुढील सर्व गोष्टी दोन-तीन दिवसात करुन देणे शक्य नाही. त्यामुळे संबंधित विषयाची परीक्षा पुढे ढकलण्याचे काम परीक्षा मंडळाला आपल्या अधिकारामध्ये करावे लागले. परीक्षा मंडळाचे अध्यक्ष हे कुलगुरु आहेत, सर्व कॉलेजचे डीन हे परीक्षा मंडळाचे सदस्य आहेत, तसेच कंट्रोलर ऑफ एक्झामिनेशन हे मेंबर सेक्रेटरी आहेत. त्यामुळे हा विषय परीक्षा मंडळापुढे गेल्यानंतर मंडळाने



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ D/

श्री.राजेश टोपे...

परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला. कारण त्यांच्यापुढे दुसरा पर्याय नव्हता. त्यानंतर याबाबत अकाऊंटॅबिलिटी फिक्स करण्याकरिता संबंधित पेपर सेटर्सना नोटीस दिली. व त्यानंतर त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. त्यामुळे अशाप्रकारे निष्काळजीपणे काम करणारे जे पेपर सेटर्स असतील त्यांना पेपर सेटींगच्या पॅनेलवर ठेवता कामा नये अशाप्रकारची खबरदारी घेण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे या दृष्टीकोनातून केलेली कारवाई आपणास सागत आहे. परंतु त्याचबरोबर आजचे अस्तित्वात असलेले जे प्रोसिजर आहे त्यामध्ये मोठे बदल करण्याची आवश्यकता आहे. आज मुंबई विद्यापीठाकडे जे प्रिंटींग प्रेस आहे ते खूप जुन्या काळातील आहे. त्यामधून ताशी 2 हजार पेपर प्रिंट होऊन निघतात. अलिकडेच आपण एक नवीन मशीन पाहिले आहे त्यामधून यापेक्षा 5 पट गतीने पेपर प्रिंट होऊन निघतात. तशाप्रकारचे नवीन मशीन आपण घेतले आहे. त्याबाबतची माहिती संबंधितांना कळविली आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

परंतु या पध्दतीमध्ये सुध्दा म्हणजेच परीक्षा विभागामध्ये अमुलाग्र बदल करण्याच्या दृष्टीने जसजशी परिस्थिती येईल, त्यानुसार ज्या अधुनिक स्वरुपाच्या मशिन्स् आहेत, त्या घेण्याच्या बाबतीत देखील सूचना देण्यात येतील आणि या अनुषंगाने आऊट डेटेड आणि ज्याला अप्रचलित म्हणता येईल, अशा टेक्नॉलॉजीच्या मशिन बदलण्याच्या बाबतीत सेक्शन 8 (4) खाली जो अधिकार आहे, त्या अनुषंगाने निश्चितपणे सूचना देण्यात येतील. खऱ्या अर्थाने या दोन महत्वाच्या सूचनांच्या संदर्भात नियम 97 अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या सूचनेचा विषय होता. परंतु या चर्चेच्या अनुषंगाने ज्या काही अनेक गोष्टी उपस्थित करण्यात आलेल्या आहेत, त्यामध्ये अर्थशास्त्राची परीक्षा जूनमध्ये पुढे ढकलण्यात आल्याबाबत उल्लेख करण्यात आला. यासंबंधात मी एवढीच माहिती सांगू इच्छितो की, हा साधारणपणे सी.ई.टी.च्या संबंधातील विषय असला तरी देखील परीक्षेचे वेळापत्रक हे नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये प्रकाशित झाल्यामुळे संचालनालयाच्या पत्रानुसार 8 एप्रिल रोजी 5 व 6 मे राजी होणाऱ्या परीक्षा पुढे ढकलण्यात आलेल्या आहेत असे कळविलेले आहे. त्याची पुनरावृत्ती होऊ नये यादृष्टीने निश्चितपणे काळजी घेण्यात येईल.

सभापती महोदय, याठिकाणी 80 आणि 100 मार्कांच्या पेपरचा जो विषय आहे, त्याबाबत मी एवढेच सांगू इच्छितो की, विद्यापीठातील दूरस्थ शिक्षण संस्थेचे जे सिलॅबस असते, ते रिव्हाईज् झ ाल्यानंतर साधारणपणे 1 वर्षानंतर सुरु होत असते. त्यामुळे त्याचे स्टडी मटेरिअल वगैरे बनवावे लागते. पण 250 विद्यार्थ्यांना जुने सिलॅबस पुढे सुरु रहाण्याची अपेक्षा होती, तर त्या अनुषंगाने 80 आणि 100 या मार्कांचे जे पेपर झालेले आहेत, त्याबाबत सांगावयाचे तर 80 मार्क झाले तरी ते 100 च्या स्केलवर केले जाईल आणि ही बाब नेहमीच होणार नाही. तसेच पुढच्या काळामध्ये अशा गोष्टी टाळण्याच्या दृष्टीने व्यवस्था केली जाईल.

सभापती महोदय, काही सन्माननीय सदस्य तसेच सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी असे सांगितले की,संकल्प कॉलेज, कल्याण याठिकाणी 400 विद्यार्थ्यांचे परीक्षा केंद्र हे गाळ्यांमध्ये होते आणि तेथे त्यांना पेपर लिहीण्यासाठी बसविण्यात आले. परंतु ते केंद्र योग्य नव्हते. ही गोष्ट नक्की आहे की, या सर्व गोष्टींचा अभ्यास करुनच परीक्षा केंद्र ठरविण्याची अपेक्षा जरुर होती. पण याठिकाणी जी घटना घडलेली आहे, त्याच्या अनुषंगाने मी एवढेच सांगू इच्छितो की, या विद्यार्थ्यांना ताबडतोब दुसरीकडे शिफ्ट करण्यात आले आणि त्यासाठी स्पेशल गाड्या ....

. . . .एल-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे . . . .

सुध्दा ठेवण्यात आल्या होत्या. परंतु एक गोष्ट नक्की आहे की, ही घटना गंभीर आहे. त्यामुळे परीक्षेपूर्वी सर्व परीक्षा केंद्रांचा नीट अभ्यास करुनच परीक्षा केंद्र निवडण्याच्या बाबतीत काळजी घेण्याची गरज आहे अशी सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेली अपेक्षा निश्चितपणे योग्य आहे.

सभापती महोदय, मी याठिकाणी सांगू इच्छितो की, अनेक पदाधिकारी परमनंन्ट नाहीत, तर हंगामी आहेत. ही वस्तुस्थिती आहे की, अनेक महत्वाचे ऑफीस कर्मचारी हे हंगामी आहेत. आज तेथील व्हाईस चान्सलर सुध्दा प्रभारी आहेत. या सर्व पदांची निवड समितीच्या माध्यमातून नियुक्ती किंवा निवड करावयाची असते. याच अनुषंगाने जी बिगर शैक्षणिक पदे आहेत, खास करुन तेथील क्लेरिकल पदे आहेत ती देखील भरणे आवश्यक आहेत. याठिकाणी मी माहिती म्हणून एवढेच सांगतो की, मुंबई विद्यापीठाने राज्य शासनाकडे जवळजवळ 1319 पदांची मागणी केलेली आहे. त्यामध्ये वर्ग-1 ची 92, वर्ग-2 चे 79, वर्ग-3 चे 725 आणि वर्ग-4 ची 427 अशी एकंदर 1319 पदे आहेत आणि मुंबई विद्यापीठाकडून तशा प्रकारचा प्रस्ताव राज्य शासनाला प्राप्त झालेला आहे. आम्ही त्याबाबतीत पूर्ण पाठपुरावा करुन वित्त विभागाकडून या सर्व पदांसाठी मंजुरी घेतलेली आहे आणि आमच्या विभागाकडेही मंजुरीबाबतचा विषय आलेला आहे. कोणत्याही परिस्थितीत या आठ दिवसांच्या आत सर्व पदांना मंजुरी देऊन, विहित मार्गाने जी.आर.च्या माध्यमातून या पदांना मान्यता देण्याच्या संदर्भातील कार्यवाही तातडीने केली जाईल. याठिकाणी बी.सी.ओ.डी.ची सबॉर्डीनेट पदे किंवा निवडणूक विभागाच्या सबॉर्डीनेट पदांच्या बाबतीत सांगण्यात आले. त्या सर्वांचा अंतर्भाव 1319 पदांमध्ये आहे.तसेच सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी फी वाढीच्या बाबतीत सांगितले की,एम.एस्सी.बायो-टेक्नॉलॉजीला 39 हजार, एम.एस्सी-आय.टी.ला 33 हजार फी घेतली जाते.

अशुध्दीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

यानंतर कु.थोरात . . ..

**उपसभापती** : माननीय मंत्रिमहोदय, आपल्याला आणखी किती वेळ लागणार आहे?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मला आणखी पाच ते सात मिनिटे लागतील.

**उपसभापती** : ठीक आहे. सभागृहाची वेळ 5 मिनिटे वाढविण्यात येत आहे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, शिक्षण शुल्क समिती विद्यापीठ स्तरावर असते आणि ती यासंदर्भात्ील निर्णय घेते. परंतु तो निर्णय योग्य पध्दतीचा वाटला नव्हता म्हणून तो निर्णय ताबडतोबीने मागे सुध्दा घेण्यात आला, एवढेच मला याठिकाणी सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, श्रीमती अरुणा देशपांडे यांची नियुक्ती बेकायदेशीर झालेली आहे अशा प्रकारचे याठिकाणी उदाहरण देण्यात आले. या सगळया नियुक्त्यांच्या संदर्भात समिती असते ती नियमाप्रमाणे जाहीरात देते, रोस्टर ठरविते. त्या त्या पदांना लागणारी अर्हता काय असावी? उदा. रिडर कसा असावा? किती अनुभव असावा? शैक्षणिक अर्हता काय असावी? या सगळया संदर्भात नियम आहेत त्यामुळे कुठेही तशा पध्दतीचे चुकीचे काम झालेले नाही परंतु जर समजा असे झाले तर ताबडतोबीने त्यामध्ये त्या त्या कायद्याच्या अनुषंगाने दुरुस्ती करण्याची तरतूद आहे.

डॉ. दीपक सावंत : यासंदर्भात उदाहरण दिले, तसे पत्र दिले तर कारवाई करणार काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, निश्चितपणे कारवाई करण्यात येईल. सभापती महोदय, श्रीमती अरुणा देशपांडे यांच्या नियुक्तीच्या संदर्भात तशी काही चूक झालेली नाही, अशी माझ्या जवळ माहिती आहे. त्यामुळे मी याठिकाणी सांगू इच्छितो की, तसा कुठलाही विषय त्यांच्या नियुक्तीच्या संदर्भात झालेला नाही. मी याठिकाणी जाहीरपणे सांगू इच्छितो की, आपण मला कुठलेही उदाहरण दिले तरी त्यासंदर्भात कारवाई करण्याची शासनाची तयारी आहे.

सभापती महोदय, खास करुन उपकेंद्राच्या संदर्भात अनेक सन्मानीय सदस्य बोलले. उप केंद्राच्या बाबतीत अशी अपेक्षा करण्यात आली की, यासाठी बजेट प्रोव्हिजन असावी आणि पदांना मान्यता असावी. पदांच्या मान्यतेच्या संदर्भात मी भाष्य केलेले आहे. 1319 उप केंद्रासाठी आणि इनजनरल विद्यापीठासाठी स्टाफिंग पॅटर्न पध्दतीने लागणार जो स्टाफ आहे त्यासंदर्भात मी सांगितलेले आहे. त्यामुळे उप केंद्रामध्ये असो अथवा मूळ विद्यापीठामध्ये असो जी जी पदे लागणार असतील त्या पदांना मान्यता देण्याची राज्य शासनाच्या वतीने तातडीने कार्यवाही केली जाईल.

सभापती महोदय, डोंबिवलीच्या उपकेंद्राचे भूमीपूजन आम्ही केले त्यासाठी लागणारा नियतव्यवय किंवा जे ॲलोकेशन आहे ते विद्यापीठाच्या बजेटमध्ये करण्यात आलेले आहे आणि

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे....

त्यासंदर्भात मी जाहीरपणे सांगितलेले आहे. त्यामुळे त्याचे बांधकाम तातडीने चालू होईल आणि त्याठिकाणी शिक्षण आणि इतर जे काम आहे ते चालू केले जाईल. जेणेकरुन ठाणे जिल्हयातील खास करुन डोंबिवली कल्याण या भागात मोठया प्रमाणात शिक्षण संस्था व विद्यार्थी आहेत त्यांना प्रशासनाच्या दृष्टिकोनातून मुंबईला येण्याची गरज पडणार नाही. डोंबिवली कल्याणचे जे उपकेंद्र सुरु केलेले आहे त्याच्या माध्यमातून प्रशासकीय सेवा देण्यात येइल तसेच शिक्षणाच्या दृष्टिकोनातून तेथे बरेचसे पोस्ट ग्रॅज्युएशन कोर्सेस सुरु करण्याच्या दृष्टिकोनातून निर्णय घेण्यात आलेला आहे.

सभापती महोदय, कुलगुरु मराठी घेण्यात यावा असे याठिकाणी सांगण्यात आलेले आहे. सभापती महोदय, या सगळया गोष्टी कायद्याला धरुन करणे आवश्यक आहे. हे कायद्याचे राज्य आहे आणि कायद्याप्रमाणे सगळया गोष्टी चालातात. त्यामुळे शेवटी आपल्याला भाषिकवाद करता येईल काय? कुलगुरुची निवड कशा पध्दतीने करण्यात यावी या संदर्भात याच सभागृहाने कायदा पास केलेला आहे. त्याचा अनुभव पंधरा वर्षांचा असावा. पाच वर्षाचा किमान प्रशासकीय अनुभव असावा. त्यांची शैक्षणिक अर्हता किमान पी.एच.डी. असावी अशा प्रकारच्या सगळया अर्हतेची तरतूद केलेली आहे.

श्री. दिवाकर रावते : या महाराष्ट्रात एकही मराठी भाषिक लायक उमेदवार मिळत नाहीत असे माननीय मंत्रिमहोदयांना म्हणावयाचे आहे काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मराठी भाषा आली पाहिजे. मराठी भाषा येत नसेल तर त्यांनी ती शिकावी परंतु तो महाराष्ट्रातलाच असावा, तो मराठी भाषा येणाराच असावा.(अडथळा) सभापती महोदय, आपल्याला कायद्याच्या तरतुदीपुढे जाता येईल काय? हा महत्वाचा विषय मी याठिकाणी सांगितलेला आहे.

श्री. दिवाकर रावते : राजकीय इच्छाशक्ती असायला पाहिजे.

श्री. राजेश टोपे : राजकीय इच्छाशक्तीच्या बाबतीत मला येथे जाहीरपणे कसे सांगता येईल? ती व्यक्त करता येईल. त्याला वेगळी पध्दत असते. सभापती महोदय, मी याठिकाणी एवढेच सांगेन की, कायदेशीर तरतुदीप्रमाणे कार्यवाही केली जाईल. सन्मानीय सदस्यांच्या भावना मनात ठेऊन त्या लक्षात ठेऊ आणि त्या भावनाचा योग्य पध्दतीने वापर करु.

यानंतर श्री. बरवड...

अशुद्धीत पत्र / शीघ्रलेखापाठी नाही

श्री. राजेश टोपे ....

ठाण्याच्या संदर्भात पूर्ण बजेट तरतूद करण्यात आलेली आहे. ठाण्याच्या बाबतीत आर्किटेक्चर प्लॅन आणि सर्व गोष्टी तयार झालेल्या आहेत. टेंडर सुध्दा काढलेले आहे. ते टेंडर आपण स्वीकारत आहोत आणि लवकरच टेंडर फायनल करुन ठाणे उपकेंद्र सुध्दा ठरलेल्या वेळेत म्हणजे मी सांगितल्याप्रमाणे अधिवेशन संपल्यानंतर साधारणपणे एप्रिल अखेरपर्यंत होईल. एक दोन दिवस इकडेतिकडे होतील पण एप्रिल अखेरपर्यंत ते केंद्र होईल. सन्माननीय सदस्य डॉ. वसंत पवार यांचे असे म्हणणे आहे की, मुंबई, पुणे या सारख्या अनमॅनेजेबल विद्यापीठांचे विभाजन करणार काय आणि ते कधी करणार ? याबाबतीत मी खात्रीने सांगेन की, यासंदर्भात जी समिती नेमलेली आहे ती फक्त विभाजनाच्या संदर्भात अभ्यास करील. त्या समितीला तीन महिन्यांचा कालावधी दिलेला आहे. त्या विद्यापीठांमध्ये, त्या कॉलेजेसमध्ये जाऊन प्रत्यक्ष भेट देऊन, भौगोलिक दृष्टया सर्व गोष्टी तपासून त्या ठिकाणी कॅम्पस करावे की वेगळे स्वतंत्र विद्यापीठ करावे या सगळ्या संदर्भात त्यांच्याकडून तीन महिन्यात अहवाल येईल. परंतु एक गोष्ट नक्की आहे की, विद्यापीठाचे नवीन कॅम्पस असो किंवा विभाजन असो, ते होण्याची आवश्यकता आहे अशी भावना राज्य शासनाच्या वतीने व्यक्त केलेली आहे. येत्या तीन महिन्यांच्या आत ती कार्यवाही केली जाईल.

सभापती महोदय, सर्व सन्माननीय सदस्यांची अशी भावना आहे की, पदे भरली पाहिजेत. ती पदे तातडीने आठ दिवसात भरत आहोत. परीक्षा रिफॉर्मच्या बाबतीत सुध्दा कोणत्याही परिस्थितीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन आणि परीक्षा पध्दतीमध्ये असलेले सर्व लूप होल्स किंवा ज्या उणिवा असतील त्या तातडीने दुरुस्ती केल्या जातील आणि मुंबई विद्यापीठ जे खऱ्या अर्थाने ज्या फाईव्ह स्टार कॅटेकरीमध्ये होते त्या कॅटेगरीमध्ये ते कसे राहील याबाबतीत निश्चितपणे कार्यवाही केली जाईल. ज्या काही घटना घडल्या त्याबाबतीत या सभागृहाच्या भावना लक्षात घेता निश्चितपणे त्याची पूर्णपणे चौकशी करुन त्या चौकशीमध्ये जे लोक दोषी असतील त्या दोषी लोकांवर कारवाई करण्याचे अधिकार शासनाला नाहीत असे नाही. आम्ही असे कधी म्हणत नाही. या कायद्याच्या अनुषंगाने असलेल्या तरतुदी आणि शासनाने दिलेल्या डायरेक्शन्स हे त्यांना बंधनकारक असतात. त्यामुळे वेगवेगळ्या समित्या जो अहवाल देतील, ज्या काही घडलेल्या घटना



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे ....

असतील, हॉल तिकीट चुकीचे दिले असल्याची घटना असेल त्याची चौकशी करु, परीक्षा पुढे ढकलल्या असतील त्याची चौकशी करु. या सर्व चौकशीचे अहवाल महिनाभरात येतील आणि त्यामध्ये जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करण्याच्या संदर्भात राज्य शासनाकडून निदेश दिले जातील. ते त्यांच्यावर बंधनकारक असतील आणि कोणत्याही परिस्थितीमध्ये ते पाळले जातात की नाही हे राज्य शासनाकडून निश्चितपणे पाहण्यात येईल. विद्यापीठ कायद्यामध्ये सुध्दा अनेक गोष्टीत बदल करण्याची आवश्यकता आहे. मी बऱ्याचदा सांगितले आहे की, येत्या सहा महिन्यात निश्चितपणे अनेक तरतुदींमध्ये बदल करु. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांना मी सांगू इच्छितो की, मी जे खाते सांभाळतो ते मन लावून सांभाळतो आणि आतापर्यंत आमच्या नेत्यांनी आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी माझ्याकडे दिलेली सात आठ खाती किंवा दिलेले जे जे काम असेल ते मी अतिशय गांभीर्याने आणि इमानदारीने करतो. सगळी खाती महत्वाची आहेत परंतु माझ्या दृष्टीने उच्च शिक्षण खाते उद्याची पिढी घडविण्याच्या दृष्टीने महत्वाचे आहे या अँगलने बघणारा मी कार्यकर्ता आहे. मी मनापासून सांगू इच्छितो की, उच्च शिक्षण आणि तंत्रशिक्षण विभागामध्ये मी ज्या पध्दतीने काम करीत आहे त्यामुळे येत्या सहा महिन्यामध्ये चांगल्या पध्दतीचे बदल करुन दाखवीन हा विश्वास मी या ठिकाणी देतो आणि माझे भाषण संपवितो.

**उपसभापती** : अल्पकालीन चर्चा आता संपली आहे.

आता सभागृहाची विशेष बैठक स्थगित होईल. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.15 वाजता सुरु होईल.

( सभागृहाची बैठक दुपारी 1.09 ते 1.15 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याची सूचना

**सभापती** : माझ्याकडे नियम 289 अन्वये एकूण 4 सूचना आलेल्या आहेत. पहिली सूचना सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, परशुराम उपरकर, रामदास कदम, ॲड.अनिल परब, डॉ.नीलम गोऱ्हे, सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी "दिनांक 16 एप्रिल, 2010 रोजीच्या सुमारास कोकणातील कणकवली, वैभववाडी, कुडाळ, सावंतवाडी, राजापूर यासह कोकणातील बहुतेक जिल्हयात वादळी वारा, विजेच्या कडकडाटासह पडलेला पाऊस, यामुळे आंबा, काजू यांचे मोठया प्रमाणावर झालेले नुकसान, यापूर्वीही झालेल्या अवेळी पावसामुळे बदलत्या हवामानामुळे व 36 अंश सेल्सीअस उष्म्यामुळे उत्पादनात 75 टक्के घट होऊन या बदलत्या वातावरणामुळे झाडावरुन आंबे गळू जाणे, त्यातच आता पडलेल्या पावसाने आंबा बागायतदारांमध्ये निर्माण झालेले चिंतेचे वातावरण, झालेले आर्थिक नुकसान, त्याचप्रमाणे सन 2008 मध्ये झालेल्या 50 टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान झालेले 6000 रुपयाप्रमाणे प्रति हेक्टर निविष्ठा स्वरुपात अनुदान वाटप करण्यास 9 महिन्यांचा कालावधी लागला आहे. आंबा नुकसान भरपाईकरिता मागील वर्षी 27.43 कोटी पैकी 11.51 कोटी रुपयांचे खत आणि कीटकनाशके देण्यास झालेला उशीर, त्यातच भर म्हणून काजूवरील व्हॅट 4 टक्क्यावरुन साडेबारा टक्क्यांवर नेल्याने हजारो टन काजू बी पडून राहिले आहे. अशाप्रकारे वारंवार येणा-या नैसर्गिक आपत्ती व शासनाच्या उदासिनतेच्या धोरणामुळे कोकणातील शेतक-यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, परिणामी कोकणातील शेतकऱ्यांनाही आत्महत्येसारखा पर्याय शोधावा लागण्याची शक्यता, याकरिता शासनाने आंबा बागायतदारांना तातडीने नुकसान भरपाई देण्याची आवश्यकता, तसेच काजूवरील व्हॅट पूर्वीप्रमाणे 4 टक्के करण्याबाबत निर्णय घेण्याची नितांत गरज, याबाबत चर्चा करण्यासाठी प्रश्नोत्तरांचा तास स्थगित करण्यात यावा." या विषयावर दिलेली आहे. या अनुषंगाने मी जरुर निर्णय घेईन.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .....

दुसरी सूचना सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी "राज्यातील शिक्षकांचे गेल्या 3 महिन्यांपासून पगार झालेले नाहीत त्यामुळे त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागणे" या विषयावर दिलेली आहे. यासंदर्भात मी सन्माननीय शिक्षण मंत्र्यांना निवेदन करण्यास सांगतो. येत्या दोन दिवसामध्ये याबाबतचे निवेदन करण्यात येईल.

तिसरी सूचना सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी राज्यात ज्येष्ठ नागरिकांच्या हत्या दिवसेंदिवस वाढत असून पुण्यामध्ये कर्वे नगरमधील गिरीजाशंकर विहार परिसरातील रघुकूल सोसायटीतील नणंद-भावजयचा भरदिवसा झालेला खून, तसेच पुण्यातील कुटुंब परळी येथील वैजनाथचे दर्शन करुन परतत असताना त्यांच्या गाडीवर धानोरा गावाजवळ दरोडेखोरांनी पाठलाग करुन गाडी अडवून चाकूचा धाक दाखवून टाकलेला दरोडा, त्याचबरोबर या गाडीतील महिलेचे अपहरण करुन तिच्यावर सामूहिक बलात्कार करण्यात येणे, या गंभीर व चिंताजनक विषयाची सूचना दिली आहे.

चौथी सूचना सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे व चंद्रकांत पाटील यांनी देखील पुण्यातील कुटंब परळी वैजनाथ येथे दर्शनावरुन येताना त्यांच्या गाडीवर पडलेला दरोडा व त्या गाडीतील महिलेवर झालेला सामूहिक बलात्कार यासंबंधी दिलेली आहे.

सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी स्त्रियांवरील वाढते अत्याचार या विषयाच्या संदर्भात दिलेल्या प्रस्तावावरील चर्चेला मी परवानगी दिलेली आहे. पुण्यामध्ये जो घृणास्पद प्रकार झाला आहे त्याबाबत या चर्चेच्या वेळी आपले म्हणणे मांडता येईल. ती चर्चा तितकीच महत्वाची आहे. त्यामुळे उद्या सकाळी 10.30 ते 12.00 वाजेपर्यंत ती चर्चा होईल. त्यावेळी दोन्ही बाजूच्या महिला सदस्यांनी प्रामुख्याने चर्चेत भाग घ्यावा. त्याचप्रमाणे आज सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी नियम 289 ची सूचना दिलेली असल्यामुळे त्यांनीही त्या चर्चेत भाग घ्यावा, तसेच आणखी काही सन्माननीयसदस्यांना या चर्चेत भाग घेऊन आपले म्हणणे मांडता येईल.

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी नियम 289 अन्वये सूचना दिलेली आहे. पुण्याचे आयपीएस अधिका-याचे कुटुंबिय मराठवाडयातील परळी वैजनाथच्या दर्शनासाठी गेले होते. दर्शन घेऊन ते परत येत होते.

यानंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर....

जामखेड जवळच्या एका धाब्यावर या कुटुंबाने जेवण घेतले. तेथून ते कुटुंब निघाल्यानंतर 30-32 कि.मी.वर त्यांची गाडी अडविली. जो गुंड जेलमध्ये होता आणि ज्याची चार-पाच तास आधीच सुटका झाली होती त्याने या कुटुंबला धाब्यावर जेवत असताना पाहिले आणि कुटुंब तेथून निघाल्यावर त्यांच्या गाडीचा पाठलाग करुन 35 कि.मी.वर त्याची गाडी अडविली. त्या महिला आयपीएस अधिका-याच्या नव-याला आणि तिच्या मुलाला त्या गुंडाने मारले आणि त्या महिलेला गाडीत जबरदस्तीने बसवून बाजूच्या शिवारात नेऊन 5-6 लोकांनी अमानुष बलात्कार केला. इतकेच नव्हे तर त्या महिलेचे कपडे काडून तिला विवस्त्र अवस्थेत रस्त्यावर टाकून निघून गेले. एका बाजूला माननीय गृहमंत्री सांगतात की राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था फार चांगली आहे आणि दुस-या बाजूला छत्रपती शिवरायांच्या या महाराष्ट्रामध्ये दिनदहाडे क्रूर अत्याचार होतात. सभापती महोदय, ही फार गंभीर बाब आहे. महाराष्ट्राच्या दृष्टीने अत्यंत लाजिरवाणी अशी बाब आहे. असे प्रकार वारंवार घडत आहेत. महिलांच्या शीलाच्या दृष्टीने हा प्रश्न अत्यंत महत्वाचा असल्यामुळे यावर चर्चा घडवून आणली पाहिजे. या प्रकरणी शासनाची काय प्रतिक्रिया आहे आणि पुढच्या काळामध्ये असे प्रकार होऊ नयेत म्हणून शासन काय बंदोबस्त करणार आहे हे महाराष्ट्राला समजले पाहिजे.

डॉ.नीलम गो-हे: 10 एप्रिलला ही घटना घडली आणि 15 एप्रिलला बलात्काराचा गुन्हा नोंदविण्यात आला. आरोपींना पकडलेले आहे. आरोपींच्या कबुली जबाबामध्ये त्यांनी बलात्कार केलेला असल्याचे स्पष्ट झालेले आहे. ज्या धानोर गावामध्ये महिलेला विचित्र अवस्थेमध्ये सोडले त्या गावातील सर्वांना हा प्रकार घडल्याचे समजले होते. असे असताना बलात्कारचा गुन्हा नोंदविण्यासाठी 5 दिवस लागले. 30-35 कि.मी. पाठलाग करुन अशा त-हेने गुंडांनी एका महिलेवर आणि तिच्या कुटुंबावर केलेल्या निघृण अत्याचाराच्या बाबतीत सत्शील नागरिक या विधानसभा आणि विधानपरिषदेकडे खूप मोठया अपेक्षेने पहात आहेत. या कुटुंबाच्या पाठीशी आपण सर्वजण आहोत. पोलिसांना कसे कार्यक्षम बनविता येईल हे आपल्यापुढे आव्हान आहे. सभापती महोदय, आपण चर्चेसाठी परवानगी दिली त्याबद्दल धन्यवाद. या बाबतीत तात्काळ कारवाई व्हावी.

श्री. विनोद तावडे : या बाबतीत पोलीस कारवाई काय झालेली आहे ते माननीय मंत्री महोदयांनी सांगावे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश बागवे : या ठिकाणी माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी उपस्थित केलेला मुद्दा अत्यंत गंभीर आणि भयानक आहे. ज्या नराधमांनी हे भयानक कृत्य केलेले आहे त्याना अटक केलेली असून गुन्हा दाखल केलेला आहे. याबाबतीत शासन अतिशय गंभीरतेने पाहून अशा गुन्हेगारावर मोक्का कारवाई करण्यात येणार आहे. त्या पीडित महिलेने हतबल होऊ नये. हा प्रकार फार भयानक आहे. तुमच्या आमच्या घरामध्ये हा प्रकार झाला असता तर आपण काय केले असते. या अरोपीला जास्तीत जास्त कडक शासन करण्यात येईल, मोक्का कारवाई देखील करण्यात येईल.

**सभापती** : अत्यंत घृणास्पद पध्दतीने झालेला हा गुन्हा आहे. मी मघाशी सांगितलेले आहे की, उद्या सकाळी 10.30 ते 12.00 वाजेपर्यन्त या विषयावर चर्चा होईल. मला खात्री आहे की, शासन सुध्दा अत्यंत गांभीर्याने या प्रकाराबाबत कारवाई करील. अशा गुन्हेगाराला मोक्का लावण्याची गरज आहे असे मंत्री महोदयांनी सांगितलेले आहेच

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, आपण या विषयावर चर्चा दिली त्याबद्दल धन्यवाद.

---

...नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीपूर्वी नाही

**पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे**

**बुलढाणा जिल्ह्यातील लोणार सरोवराच्या देखभालीकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष**

**(१) * २७०७ श्री.पांडुरंग फुंडकर, श्री.नितीन गडकरी, श्री.चंद्रकांत पाटील :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जगातील शास्त्रज्ञांमध्ये आकर्षणाचे केंद्र असलेल्या बुलढाणा जिल्ह्यातील लोणार विवराच्या ५०० मिटर परिसरात कोणतेही बांधकाम करण्यास केंद्र शासनाने बंदी घातलेली असतांना ५०० मिटर परिसरातच शेती करण्यात येते तसेच अलीकडे तेथे काही प्रमाणात बांधकामेही झालेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपालिकेच्या वतीने सोडण्यात येणारे सांडपाणीही या जगविख्यात विवरात सोडण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने वस्तुस्थिती जाणून घेऊन कोणत्या स्वरुपाची कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

**प्रा.वर्षा गायकवाड, डॉ.विजयकुमार गावित यांच्याकरिता** : (१) लोणार विवराच्या तीन बाजूस ५०० मीटर अंतराच्या आत खाजगी मालकीच्या वर्ग १ जमिनी असल्यामुळे तेथे शेती करण्यात येते हे खरे आहे. तथापि, विवराच्या बाजुने गोलाकार रस्त्याचे आत बांधकाम करण्यास तसेच विवराच्या पूर्व बाजूस (शहराकडील बाजू) सोडून तीनही बाजूस ५०० मीटर अंतरापर्यंत बांधकाम व उत्खनन करण्यास बंदी आहे.

(२) नाही. नगरपालिकेच्या वतीने विवरात सांडपाणी सोडण्यात येत नाही.

विवराच्या उताराच्या दिशेने गावातील वस्ती वसलेली असल्यामुळे सरोवराच्या दिशेने नैसर्गिक रित्या वाहून येणारे सांडपाणी नबीच्या तलावाजवळ भिंत बांधून अडविण्यात येते. तथापि, पावसाळ्याच्या दिवसात अतिप्रवाह (overflow) झाल्यास पाणी विवरात जाते.

तसेच नबीचा तलाव पुरातत्व विभागाच्या अखत्यारीतील परिसरात येत असल्यामुळे नगरपरिषदेमार्फत अधिक्षक, पुरातत्व विभाग, औरंगाबाद यांचे ना-हरकत प्रमाणपत्र घेऊन सुधारीत रु.४०.५० लक्ष रकमेचा सांडपाणी प्रक्रीया प्रकल्प अहवाल महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण, अमरावती यांचेमार्फत त्यांचे पत्र क्रमांक १८२१, दिनांक ७/१२/२००९ अन्वये मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण, मुंबई यांचेकडे मंजुरीसाठी सादर केलेला आहे. ही मंजुरी व शासनाकडून निधी प्राप्त होताच सांडपाणी प्रक्रीया प्रकल्प उभारणे शक्य होणार आहे.

(३) लोणार सरोवराच्या जतन व संवर्धनासाठी लोणार विवर हे वन्यजीव अभयारण्य म्हणून घोषित केले असून सरोवराच्या आतील खाजगी जमिनी संपादन करण्याची कार्यवाही सुरु आहे.

लोणार संवर्धन बाबत मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे जनहित याचिका न्यायप्रविष्ट असून मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन लोणार संवर्धन कार्यवाही करण्यात येणार आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ता.प्र.क्र.२७०७.

...२..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.२७०७.....

प्रा.वर्षा गायकवाड : छापल्याप्रमाणे. सभापती महोदय, मला आपल्या अनुमतीने उत्तरामध्ये दुरुस्ती करावयाची आहे. पहिल्या प्रश्नाला जे उत्तर देण्यात आले आहे त्या उत्तराऐवजी "केंद्र शासनाने बंदी घातलेली नाही" असे वाचावे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. बुलढाणा जिल्हयातील लोणार सरोवर जे जगातील शास्त्रज्ञांचे आकर्षण केंद्र बनले आहे. जगभरात उल्कापातामुळे १५० अश्वविवरे तयार झाली. त्यातील हे ४ हजार वर्षापूर्वीचे लोणार सरोवर आहे. हे शास्त्रीय अभ्यासाअंती आढळून आले आहे. अशा सरोवराची पर्यटकांना माहिती होण्यासाठी तेथे एकही माहिती फलक लावलेला नाही. शासनाच्या पुरातत्व विभागाने आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाने डिसेंबर, २००९ मध्ये तेथील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाचा अहवाल तयार केला. तसेच सरोवराच्या जवळपासची खाजगी जमीन संपादनाची प्रक्रिया सुरु आहे. त्या कामाला विलंब लागण्याची कारणे काय आहेत? सभापती महोदय, १६ एप्रिल, २०१० रोजी लोकसत्ता दैनिकामध्ये एक बातमी प्रसिध्द झाली. ग्लोबल वॉर्मिंगच्या संकटावर मात करणारे संशोधन प्रसिध्द झाले. या लोणार विवरात मिथेन वायू खाणारे जिवाणू आढळून आले आहेत. मिथेन वायू ग्लोबल वॉर्मिंगला कारणीभूत ठरणारा दुसऱ्या क्रमांकाचा वायू असल्याचे समजले जाते. लोणार सरोवरात आढळून येणाऱ्या जिवाणूंचा वापर करुन ग्लोबल वॉर्मिंगच्या संकटावर मात करता येणे शक्य आहे. त्यासाठी शासनाकडून कार्यवाही होणे अपेक्षित आहे. म्हणून हा प्रश्न उपस्थित केला आहे. लोणार सरोवर जगप्रसिध्द सरोवर आहे. त्याच्या आजूबाजूला अतिक्रमणे होत आहेत. लोणार सरोवराचे पाणी समुद्राच्या पाण्यापेक्षा दहापट खारे आहे. लोणार गावामधील सांडपाणी त्या सरोवरामध्ये मिसळत आहे. विवराच्या बाजूला तलाव आहे. त्या तलावाचे पाणी या सरोवरामध्ये पाझरते. त्यामुळे या सरोवराच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे. तेथे भिंत घालून पाणी अडविण्यात आले आहे असे उत्तरामध्ये म्हटले आहे. मी प्रत्यक्ष त्या सरोवराला भेट दिली, अनेकदा पाहणी केली आहे. भिंत बांधण्यात आली आहे. परंतु भिंतीच्या खालच्या बाजूला छिद्र असल्यामुळे सांडपाणी सरोवरात वाहून येत आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, या जगप्रसिध्द सरोवराचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने शासनाने ज्या उपाययोजना केल्या पाहिजेत त्या केलेल्या नाहीत. गावातील सांडपाणी या सरोवरामध्ये वाहून येत आहे ते थांबविण्यासाठी आणि वरच्या

..३....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बाजूला असलेल्या तलावातील पाणी सरोवरामध्ये वाहून येते ते थांबविण्यासाठी तातडीने उपाययोजना केली जाणार आहे का? सरोवराच्या आजूबाजूला घरे बांधली जात आहेत, शेती केली जात आहे. जमीन संपादन करण्याचे काम सुरु आहे असे सांगितले आहे. ते काम केव्हा सुरु झाले? वाहून येणारे सांडपाणी अडविण्यासाठी भिंत आता बांधण्यात आली. वर्षानुवर्षे सांडपाणी वाहून येत आहे. लोकसत्ता वृत्तपत्रामध्ये मिथेन वायू खाणारे जिवाणू आढळून आल्याची बातमी आली. त्या जिवाणूंचे संरक्षण करण्यासाठी शासन स्तरावर तातडीने कोणती उपाययोजना केली जाणार आहे?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, लोणार सरोवराचे जागतिक स्थान ओळखून राज्य शासनाने १५ फेब्रुवारी, २००० च्या जी.आर.नुसार लोणार सरोवर अ वर्ग पर्यटनस्थळ घोषित केले आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी तीन प्रश्न उपस्थित केले आहेत. भिंत केव्हा बांधण्यात आली? ती भिंत कशी आहे? सभापती महोदय, नवाब काळापासून तेथे नबी तलाव आहे त्या तलावाच्या बाजूला नवाब काळातच भिंती बांधली गेली. बाजूला असलेल्या गावातील ८० टक्के पाण्याचा फ्लो डायरेक्ट त्या विवरामध्ये जातो. ते पाणी थांबविण्यासाठी म्हणून भिंत बांधली. ती फार जूनी आहे. एमटीडीसीमार्फत एक कोटी रुपयाचा निधी दिला, त्यातील ३५ लाख रुपये जलसंपदा विभागाला दिले. त्या अंतर्गत भिंतीचे मजबुतीकरणाचे काम झाले. प्रयत्न असा आहे की, जास्तीत जास्त पाणी दुसरीकडे वळवायचे. पाऊस जास्त पडला तर ओव्हर फ्लो होऊन पाणी विवरात येते. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की, पाणी शुध्दीकरण करण्यात यावे. पाणी वळविण्याची प्रोसेस प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सुरु आहे. नबी तलावातील पाणी लिफ्ट करुन लेंडी तलावात टाकण्याचा प्रयत्न करीत आहोत.

नंतर आर.१...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखी नोंदी

ता. प्र. क्र. 2707 ..... प्रा. वर्षा गायकवाड .....

हे करीत असताना यासंबंधीचा एक खुला प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करण्यास सांगितले होते. त्या प्रस्तावाला प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून 3 कोटीची मान्यता दिली होती परंतु त्यापैकी फक्त 1.5 कोटी एवढाच निधी दिला. त्यातून बरीच कामे करणे आवश्यक आहे. म्हणून पुन्हा असा प्रस्ताव नव्याने तयार करण्यास सांगितले असून ते काम चालू आहे व हा अहवाल नगरपरिषदेने अमरावती रिजनल ऑफिसला दि. 22.11.2009 रोजी दिला व त्यानंतर तो एमपीसीबीला 7/12/2009 रोजी प्राप्त झाला आहे.

श्री. अरुण गुजराथी : महोदय, लोणार सरोवर म्हणजे एक निसर्गाचा चमत्कारच म्हणावा लागेल. मागील काळात उल्कापात झाला व त्याचे सरोवरात रुपांतर झाले असे म्हणतात. अशा सरोवराच्या विकासासाठी तसेच तेथील विविध कामांसाठी केवळ 40 ते 50 लाख रुपये देऊन चालणार नाही किंवा सांडपाण्यावर प्रक्रिया वगैरे लहान प्रकल्प घेऊन चालणार नाही तर यासाठी केंद्रशासन आणि राज्य शासनाच्या माध्यमातून एकत्रितपणे विचार करुन एक प्रकल्प तयार करणे आवश्यक आहे. मग अशा प्रकल्पासाठी 50-60 कोटी रुपये लागले तरी हरकत नाही. कारण लोणार हे एक जागतिक पर्यटन स्थळ असून त्याचा शास्त्रीय दृष्टीकोनातून विकास करण्याबाबत शासन विचार करणार काय ?

प्रा. वर्षा गायकवाड : महोदय, माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेचा जरुर विचार करण्यात येईल. त्यादृष्टीने दि. 21.11.2000 चा जो जी.आर. आहे त्यानुसार लोणार सरोवरासाठी 99.68 लाख एवढा निधी सुध्दा दिलेला आहे. त्या माध्यमातून विविध कामे तेथे चालू झालेली आहेत. याव्यतिरिक्त जो निधी आवश्यक आहे तो सुध्दा दिला जाईल.

प्रा.बी.टी.देशमुख : महोदय, लोणार सरोवराच्या विकासासाठी मोठमोठ्या रकमांचा निधी शासन देणार याबद्दल मी धन्यवाद देतो, पण त्यासाठी कालबध्द कार्यक्रम घेणे आवश्यक आहे. किती कालावधीत हा निधी उपलब्ध करुन देणार हे स्पष्टपणे सांगण्याची गरज आहे. येथे सुरु असलेल्या सांडपाण्यावरील प्रक्रिया प्रोजेक्टसाठी औरंगाबाद प्रदूषण नियंत्रण मंडळाने मान्यता दिली आहे व ते प्रपोझल शासनाकडे आलेले आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची त्याला मान्यता मिळाली नाही म्हणून त्यासाठी निधी प्राप्त झालेला नाही. या दान्ही गोष्टींच्या बाबतीत टाईम



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 2707 ..... प्रा. बी.टी.देशमुख .....

बाऊंड कार्यक्रम घेत असल्याचे मंत्री महोदयांनी सांगावे. तसेच स्थानिक एमपीसीबीची मान्यता 15 दिवसात दिली जाईल व त्यासाठी आवश्यक निधी सुध्दा 15 दिवसात दिला जाईल अशा प्रकारची कालमर्यादा ठरवून शासन या कामासाठी निधी उपलब्ध करुन देणार काय ?

डॉ. विजयकुमार गावित : महोदय, या प्रकल्पाच्या माध्यमातून नबी तलावातील पाणी लेंडी तलावात टाकण्यात येत आहे व त्यासाठी नगरपालिकेने प्रस्ताव तयार करुन एमपीसीबीने तयार केला होता परंतु त्यात क्वेरिज निघाल्या व पुन्हा तो प्रस्ताव परत आला आहे. तो ताबडतोब मंजूर करुन निधी उपलब्ध करण्याच्या दृष्टीने विचार करता येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी आणि प्रा.बी.टी.देशमुख यांनी दोन महत्वाचे प्रश्न विचारलेले आहेत. त्यात नबी तलावाचे पाणी लेंडी तलावामध्ये लिफ्ट करुन टाकण्यासंबंधीचा एक प्रकल्प आहे. लोणार सरोवर हे एक अप्रतिम सरोवर असून जागतिक पातळीवर प्रसिध्द आहे. या तलावातील पाण्याचे संरक्षण करण्यासंबंधीचा मी उल्लेख केला. कारण दि. 16 एप्रिल, 2010 च्या लोकसत्ता पेपरमध्ये बातमी आली आहे की, लोणार सरोवरमध्ये मिथेन खाणारे जिवाणू आढळून आले असून या संशोधनामुळे ग्लोबल वॉर्मिंगचे संकट जे सध्या आहे त्यातून मार्ग निघण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ग्लोबल वॉर्मिंगची चिंता आज संपूर्ण जगभर व्यक्त होत आहे त्याचा नायनाट करणारे जिवाणू येथे सापडले पण त्या जिवाणुंचे संरक्षण करण्याची जबाबदारी शासन घेणार काय ? या ठिकाणी शासनाने आठ सूट बांधले असल्याचे म्हटले आहे परंतु एवढ्या महत्वाच्या ठिकाणी फक्त आठ सूट बांधून शासनाने उपकार केलेले नाही तर अशा मोठ्या व प्रसिध्द सरोवराचे जतन करणे, त्यातील पाण्याचे जतन करण्याच्या दृष्टीने ज्या ज्या उपाययोजना करायला पाहिजे त्या शासन लवकरात लवकर करणार काय ? त्याचबरोबर या ठिकाणी आजुबाजूला जे बांधकाम होत आहे ते थांबविणे आवश्यक आहे, आवश्यक तेथे जमिनीचे संपादन करण्याची गरज आहे ही सर्व काम शासन ताबडतोब करणार काय ?

यानतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :2707....

श्री. पांडुरंग फुंडकर ...

सभापती महोदय, चंद्रावरील दगडांचे तुकडे तसेच तरंगणा-या विटा या ठिकाणी आहेत. या ठिकाणी कोणीही बघावयास गेला की, त्या ठिकाणचे चंद्रावरील दगड आणि तरंगणा-या विटा घेऊन जातो. या महत्वाच्या वस्तुचे जतन शासनाकडून केले जात नसल्यामुळे या वस्तु चोरीला जात आहेत. त्यामुळे लोणार सरोवराचे जतन करण्यासाठी प्लॅन तयार करुन या सरोवराचे जतन करण्याची आवश्यकता आहे. या सरोवराचे जतन करण्यासाठी एखादे मंडळ किंवा प्राधिकरण तयार करुन त्यांना 50-60 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले पाहिजे. महाराष्ट्राचे स्वाभिमान असावे, असे हे लोणार सरोवर आहे. त्यामुळे या सरोवराचे जतन करण्यासाठी प्राधिकरण किंवा एखादे मंडळ तयार केले जाणार आहे काय ?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, लोणार सरोवर हे जगातील चांगले सरोवर आहे.सरोवराच्या लगतची जमीन ही उतरती असल्यामुळे गावातील सांडपाणी पावसाळयात या सरोवरात उतरते, हे मी अगोदरच सांगितले आहे. या सांडपाण्यामुळे या ठिकाणी प्रदुषण होते ही बाब खरी आहे. त्यामुळे या तलावात सांडपाणी येणार नाही यासाठी शासनातर्फे व्यवस्था केली जाणार आहे. सन 2008 साली या सरोवराच्या लगतच्या सात कि.मी.चा परिसर हा बर्ड सेंच्यूरी म्हणून जाहीर झालेले आहे. या सरोवराच्या लगत ज्या शेतक-यांची जमीन आहे ती जमीन विकत घेण्याची प्रोसेस शासनातर्फे सुरु झाली असून यासाठी 5 कोटी रुपये खर्च येणार असून हे 5 कोटी रुपये वन विभागाकडून उपलब्ध करुन दिले जाणार आहे. लोणार सरोवर हे जगातील प्रसिध्द ठिकाण असल्यामुळे या सरोवराचे जनत होणे गरजेचे आहे त्यामुळे यासंदर्भात जी काही सोय करावी लागणार आहे ती राज्य सरकार निश्चितपणे करेन. हे सरोवर वर्ल्ड हेरीटेज व्हावे यासाठी शासन निश्तिपणे प्रयत्न करेन.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी माझ्या दोन्ही प्रश्नांना सकारात्मक उत्तर दिलेले आहे. प्रदुषण मंडळाची मान्यता दिली जाईल काय तसेच निधी उपलब्ध करुन दिला जाईल काय या प्रश्नांना मंत्रीमहोदयांनी "होय"असे उत्तर दिलेले आहे. त्यामुळे प्रदुषण नियंत्रण मंडळाची मान्यता 8 दिवसात किंवा 15 दिवसात मिळवली जाईल काय तसेच लोणार सरोवरासाठी निधी किती दिवसात उपलब्ध करुन दिला जाणार आहे ?

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, यामध्ये काही त्रुटी निघाल्यामुळे हा विषय नगरपालिकेकडे पाठविलेला आहे. त्यामुळे 6 महिन्याच्या आत प्रदुषण मंडळाची मान्यता घेऊ तसेच नगरपालिकेकडून माहिती आल्याबरोबर निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय मंत्रीमहोदयांनी लोणारच्या संदर्भात उत्तरे दिलेली आहेत . लोणार सरोवर हा केवळ पर्यटनाचा विषय न ठेवता वैज्ञानिक दृष्टीकोनातील पर्यटन तसेच शैक्षणिक मार्गदर्शन असे पर्यटनाचे धोरण ठेवले गेले पाहिजे. इतर पर्यटन स्थळे आणि हे लोणार सरोवर यामध्ये मूलभूत फरक असल्यामुळे त्या ठिकाणी योग्य अशा वैज्ञानिकांची नेमणूक करुन कशा प्रकारे पर्यटन करतांना या ठिकाणची वैज्ञानिक माहिती पर्यटकांना होईल यासाठी या ठिकाणी तज्ञांची नेमणूक करुन या लोणार सरोवराचे जतन शास्त्रीय पध्दतीने होईल यासाठी शासन काही विशेष उपाययोजना करेल काय ?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना चांगली असल्यामुळे सन्माननीय सदस्यांच्या सूचनेची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला जाईल.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## राज्य सरकारच्या जीवनदायी योजनेनुसार झालेल्या उपचाराची २१ कोटी रुपयांची थकबाकी

**(२) * ५३६५ श्री.किरण पावसकर, डॉ.दीपक सावंत, श्री.अनिल परब, सवश्री परशुराम उपरकर, श्री.रामदास कदम :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील द्रारिद्रय रेषेखालील रुग्णांसाठी सरकारने १९९७ साली जीवनदायी योजना सुरु केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेनुसार राज्यातील १४ शासकीय व ५१ खाजगी रुग्णालयात रुग्णांवर ह्दय विकार, मुत्रपिंड व कर्करोगावर झालेल्या उपचाराची एकूण २१ कोटी रुपये थकबाकी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या रुग्णालयांना उक्त पैसे का दिले नाहीत, ही योजना बंद करण्याचा निर्णय शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास सदर थकबाकीची रक्कम तातडीने देण्याबाबत शासनाने काही उपाययोजना केली आहे काय?

**प्रा.फौजिया खान, श्री.सुरेश शेट्टी यांच्या करिता** : (१) होय.

(२) होय.

(३) या योजनेंतर्गत सन २००९-२०१० साठी पुरेशी तरतूद उपलब्ध नव्हती. विमा कंपनीच्या सहभागाने नविन योजना प्रस्तावित आहे.

(४) सदर थकबाकीची रक्कम अदा करण्यासाठी निधी उपलब्ध करुन दिला असून तसा शासन निर्णय निर्गमित केला आहे.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, 1997 पासून महाराष्ट्र शासनाने दारिद्रय रेषेखालील रुग्णांसाठी जीवनदायी योजना सुरु केलेली आहे. या योजनेमुळे आजपर्यंत जवळ जवळ 6500 रुग्णांवर शस्त्रक्रिया करण्यात आली. 14 शासकीय रुग्णालये तसेच 51 खाजगी रुग्णालयातून उपचार केले जातात. या योजनेवर आतापर्यंत 42 कोटी रुपये खर्च झालेला आहे. या 42 कोटी रुपयांमध्ये अजूनपर्यंत 21 कोटी रुपये देण्याचे राहिलेले आहे. उत्तरात म्हटले आहे की, 21 कोटी रुपये अजून द्यावयाचे बाकी आहे. त्यामुळे माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, ही जीवनदायी योजना बंद करण्यात येणार आहे काय ? आपण उत्तरात म्हटले आहे की, विमा कंपनीच्या सहभागाने नवीन योजना प्रस्तावित आहे. मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की,

यानंतर श्री. गायकवाड....

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र.5365 श्री.किरण पावसकर..

जीवनदायी योजनेत झालेल्या भ्रष्टाचारासंबंधी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने आरोग्य भवनावर अचानक धाडी टाकून सर्व फाईल्स सील केल्या आहेत काय ? जर त्यांनी सर्व फाईल्स सील केलेल्या असतील तर 21 कोटी रुपयांचा जो निधी रुग्णालयाना द्यावयाचा आहे तो किती दिवसात देण्यात येणार आहे ? ही योजना गोरगरिबांच्या दृष्टीने उपयोगाची असूनही काही भ्रष्ट अधिका-यामुळे शासन ही योजना गुंडाळत आहे हे खरे आहे काय ?

श्रीमती फौजिया खान :सभापती महोदय, शासन जीवनदायी योजना गुंडाळत आहे हे खरे नाही.उलट ही योजना जास्त लोकप्रिय झाल्यामुळे व लोकांची मागणी वाढल्यामुळे निधीची कमतरता निर्माण झाली होती. योजनेसाठी सी.एफ.मधून 27 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. 18.35 कोटी रुपयांची बिले ट्रेझरीकडे सादर करण्यात आलेली आहेत. 8.65 कोटी रुपयांची बिले सादर करण्याच्या प्रोसेसमध्ये आहेत. दिनांक 30 एप्रिल 2010 पर्यत सर्व बिले मंजूर होतील. एकूण 27 कोटी रुपयांची बिले थकीत राहिली होती ती सर्व बिले देण्यात येतील ही योजना गुंडाळण्याचा शासनाचा प्रस्ताव नाही. उलट शासन नवीन सुधारित योजना आणत असून त्याचा उल्लेख उत्तरामध्ये करण्यात आला आहे. राजीव गांधी आरोग्य श्री नावाची योजना सुरु करण्यात येणार असून त्यासंबंधीची माहिती लेखी उत्तरात देण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी भ्रष्टाचारांसबंधी एक प्रश्न विचारला असून त्याबाबतीत मी खुलासा करु इच्छिते की, त्या प्रकरणाची तपासणी ए.सी.बी.कडून होत असून. सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न वेगळा आहे त्याप्रश्नाचा आणि ही योजना बंद करण्याचा काहीही सबंध नाही.ही योजना सुरुच राहणार आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य श्री किरण पावसकर यांनी एक प्रश्न विचारला होता. मध्यतरी "लोकमत" या वर्तमानपत्रात या विषयावरील खास लेख लिहिण्यास सुरुवात केली होती .व त्या लेखामध्ये भ्रष्टाचाराची माहिती लिहिली होती. या भ्रष्टाचाराच्या प्रकरणातील फाईल्स सील करण्यात आल्या होत्या काय ? त्यानतर माझा दुसरा प्रश्न असा आहे क, पाच जिल्हयामध्ये विमा हेल्थ कार्ड ही योजना राबविणार आहे असे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात म्हटलेले आहे. तेव्हा बाकीच्या जिल्हयामध्ये ही योजना केव्हा राबविण्यात येणार आहे ?तेथील रुग्णांनी कोठे जावयाचे ? ही कार्डस अस्तित्वात येईपर्यत जीवनदायी योजना पूर्वीप्रमाणे सुरु राहणार आहे काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान :सभापती महोदय, सहा जिल्हयामध्ये .राजीव गांधी आरोग्य श्री योजना पायलट बेसिसवर राबविण्यात येणार आहे बाकीच्या ठिकाणी जी योजना सुरु आहे ती मात्र चालूच राहणार आहे. भ्रष्टाचाराच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला आहे त्या बाबतीत मी त्यांना सांगू इच्छिते की , ए.सी.बी.कडून तसेच सचिव पातळीवरील समितीकडून तपासणी होत आहे. सचिव समितीने तसेच ए.सी.बी.ने अद्याप अहवाल दिलेला नाही त्यांनी अहवाल सादर केल्यानंतर तो सभागृहाच्या पटलावर येईल.

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, राज्य सरकारची जीवनदायी योजना अत्यत चांगली असून 14 शासकीय आणि 51 खाजगी रुग्णालयात ही योजना सुरु आहे. नाशिकमध्ये सुपर स्पेशॅलिटी रुग्णालय सुरु करण्यात आलेले आहे व त्यामध्ये ही योजना राबविली जाते. तेथील अनेक डॉक्टरांची गेल्या अकरा महिन्यापासून थकबाकी राहिलेली आहे. ती अजूनही दिली गेली नाही त्यामुळे तेथे संप सुरु असून रुग्णांना जीवनदायी योजनेचा लाभ मिळत नाही. तेव्हा सबंधितांना या रक्कमेची पूर्तता केव्हा देण्यात येणार आहे आणि रुग्णांना जीवनदायी योजनेचा लाभ मिळणे केव्हा सुरु होणार आहे. जीवनदायी योजनेच्या देयकासाठी जो रेट ठरवावयाचा असतो तो रेट ठरविण्यात आला आहे काय ?

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, एकूण 27 कोटी 36 लाखाचे देयक होते त्यापैकी 27 कोटींचे देयक 30 एप्रिलपर्यंत देण्यात येईल. सदरचे देयक ट्रेझरीकडे पाठविण्यात आले आहे. अशाप्रकारे सर्व प्रलंबित देयके अदा करण्यात येतील. त्याचप्रमाणे नव्याने 125 कोटींची तरतूद करण्यात आली असल्यामुळे देयके प्रलंबित राहणार नाहीत. त्याचप्रमाणे नाशिक येथील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमधील तज्ज्ञांचे दर निश्चित करण्याबाबतची कारवाई सुरु आहे. त्यानुसार त्यांना देयक दिले जाईल.

**सभापती** : ॲटीकरप्शन ब्यूरो यांनी आपल्या ताब्यात रेकॉर्ड घेतले आहे काय? त्याबाबत आपण निश्चित माहिती सांगावी.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, होय.

(गोंधळ)

डॉ.दीपक सावंत : "होय" म्हणजे काय?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, मला रेकॉर्ड पाहून सांगावे लागेल...

(गोंधळ)

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांच्या उत्तराबद्दल निषेध व्यक्त करुन आम्ही सभात्याग करीत आहोत.

(विरोधी पक्षाचे माननीय सदस्य सभात्याग करतात.)

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**रायगड जिल्हा वार्षिक योजना संदर्भातील बैठका**

**(३) * २७२७ श्री.जयंत प्र.पाटील, श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा वार्षिक योजना २०१०-११ विभागवार राज्यस्तरीय बैठका घेण्यासंबधी शासनाच्या नियोजन विभागाने दि. २१ जानेवारी २०१० रोजी सर्व जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती यांना कळविले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दि. २१-१-२०१० च्या नियोजन विभागाच्या पत्रामध्ये राज्यस्तरीय बैठकीच्या कार्यक्रमापूर्वी जिल्ह्याची प्रारुप योजना तयार करुन त्यास जिल्हा नियोजन समितीची मान्यता प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही करावी अशा सूचनाही देण्यात आल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हाधिकारी, रायगड तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, रायगड यांनी जिल्ह्याची प्रारुप योजना तयार करुन त्यास जिल्हा नियोजन समितीची मान्यता घेतली होती काय,

(४) असल्यास, मान्यता केंव्हा घेण्यात आली, नसल्यास, मान्यता न घेण्याची कारणे कोणती आहेत?

**श्री.सुनील तटकरे** : (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) जिल्हाधिकारी, रायगड तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, रायगड यांनी जिल्ह्याची प्रारुप योजना तयार करुन त्यास जिल्हा नियोजन समितीची दि.९/२/२०१० च्या बैठकीत मान्यता घेतली आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठकीमध्ये माननीय मंत्रिमहोदयांनी दिलगीरी व्यक्त केली व आमचे समाधान केले. परंतु ७३ व्या घटना दुरुस्तीच्या माध्यमातून आमदारांना आणि जिल्हा नियोजन मंडळाला अधिकार मिळाले आहेत, ते अधिकार कोणताही जी.आर. काढून शासन घेऊ शकत नाही. याची पुनरावृत्ती शासनाकडून होणार नाही याची आपण खात्री देणार काय?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, ७३ व्या घटना दुरुस्तीनंतर जिल्हा नियोजन समिती अधिनियम तयार केले गेले. त्या अधिनियमानुसार जिल्हा नियोजन समितीला जे अधिकार दिले आहेत ते पूर्णपणे शाबित राहतील. त्या अनुषंगाने सर्व जिल्हा नियोजन मंडळांचा कारभार केला जाईल.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तारांकित प्रश्न क्रमांक 5107 - माननीय सदस्य अनुपस्थित

---

तारांकित प्रश्न क्रमांक 5727 - माननीय सदस्य अनुपस्थित

---

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील (जि.यवतमाळ) येथे रुग्णांवर प्रशिक्षणार्थी डॉक्टरच उपचार करत असल्याबाबत**

**(६) * ५९१० डॉ.दीपक सावंत** : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील वरिष्ठ डॉक्टर खाजगी प्रॅक्टिस करीत असल्याने येथील रुग्णांवर प्रशिक्षणार्थी डॉक्टरच तपासणीपासून शस्त्रक्रियेपर्यंतचे उपचार करीत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१० च्या सुमारास उघडकीस आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महाविद्यालयाच्या रुग्णांची स्वच्छता, अन्य सोई सुविधांचीही दयनीय अवस्था आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची चौकशी शासनाने केली आहे काय,

(४) असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबधितांवर पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**प्रा. वर्षा गायकवाड, डॉ.विजयकुमार गावित यांच्याकरिता** : (१) हे अंशत: खरे आहे. रुग्णांवर शस्त्रक्रिया आणि अन्य उपचार करण्यासाठी नियुक्त वैद्यकीय पथकात वरिष्ठ अध्यापकांबरोबरच पदवीपूर्व व पदव्युत्तर प्रशिक्षणाची विद्यार्थ्यांचा सहभाग असतो. त्यामुळे रुग्णांवर प्रशिक्षणार्थी डॉक्टरच तपासणीपासून शस्त्रक्रियेपर्यंतचे उपचार करीत असतात हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) होय.

(४) खाजगी वैद्यक व्यवसाय करीत असल्याचे आढळून आलेल्या अध्यापकांच्या व्यवसायरोध भत्ता बंद करण्यात आला आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, यवतमाळ येथील वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे रुग्णालय २१ वर्षे जुने आहे. सदर रुग्णालय २८८ खाटांचे आहे. माझा पहिला प्रश्न असा की, या रुग्णालमध्ये एका दिवसामध्ये किती शस्त्रक्रिया केल्या जातात? दुसरा प्रश्न असा की, या रुग्णालयामध्ये कोणत्या विषयातील तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध नाहीत?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, या रुग्णालयामध्ये दररोज १० शस्त्रक्रिया केल्या जातात. या महाविद्यालयामध्ये प्राध्यापकांची १० पदे मंजूर असून ती सर्व पदे भरली आहेत. सहयोगी प्राध्यापकांची २० पदे मंजूर असून त्यापैकी १० पदे भरली आहेत व १० पदे रिक्त आहेत. लेक्चररच्या एकूण २९ मंजूर पदांपैकी २२ पदे भरली आहेत व ७ पदे रिक्त आहेत.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5910 . . . .

श्री.राम पडांगळे : सभापती महोदय, आमच्याकडे देखील आपले लक्ष असू द्यावे.

**सभापती** : आपल्याकडे कायमच लक्ष असते.

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत व सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर साहेबांनी विचारलेल्या प्रश्नाशी संबंधित असा प्रश्न आहे. आजच वर्तमानपत्रामध्येच बातमी आलेली आहे की, सायन हॉस्पिटलमध्ये काम करणाऱ्याचा वॉर्ड बॉयचा केवळ त्याच्याकडे ऑपरेशनसाठी पैसे नाहीत म्हणून तडफडून मृत्यू झालेला आहे. तेव्हा सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी विचारलेला जो प्रश्न आहे त्या अनुषंगाने विचारावयाचे आहे की, ही जीवनदायी योजना हॉस्पिटलमधील कर्मचाऱ्यांना लागू होत नाही काय ? म्हणजेच शासन एका कर्मचाऱ्याचा तडफडून मृत्यू झाल्याचे पाहू शकते काय ? याबाबतीत शासनाने कोणती खबरदारी घेतलेली आहे आणि शासकीय रुग्णालयामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत शासनाचे धोरण काय आहे?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राम पडांगळे यांनी वेगळा प्रश्न विचारलेला आहे. परंतु आमची कर्मचाऱ्यांच्या बाबतीत हीच भावना आहे. तसेच तेथील कर्मचाऱ्यांवर उपचार होत नाहीत असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे. तर अशा कर्मचाऱ्यांवर कसे उपचार होतील यादृष्टीकोनातून प्रयत्न केले जातील.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी माझ्या प्रश्नाचे उत्तर दिलेले नाही. माननीय मंत्री महोदयांनी प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घ्यावे. सदरहू हॉस्पिटल 288 कॉटस्चे आहे आणि त्याठिकाणी फक्त दहा शस्त्रक्रिया होतात. या हॉस्पिटलमध्ये हजारो पेशंट उपचारासाठी येत असतात. मी असा प्रश्न विचारला होता की, या हॉस्पिटलमध्ये कोणत्या विषयाचे शिक्षक व कोणत्या विषयाचे तज्ज्ञ डॉक्टर किती आहेत ? परंतु माननीय मंत्री महोदयांनी याचे उत्तर न देता, बाकीचे सर्वकाही सांगितले. या प्रश्नांची उत्तरे द्यावीत. हॉस्पिटलमध्ये 288 कॉटस् असून, 10 ऑपरेशन्स् होतात हे समीकरण बरोबर आहे काय ? म्हणजेच हॉस्पिटलमधील बेडची संख्या आणि तेथे होणाऱ्या ऑपरेशन्स्ची संख्या हे प्रमाण व्यस्त आहे असे माझे म्हणणे आहे. याबद्दल आपल्याला काय सांगावयाचे आहे ? दुसरा प्रश्न असा आहे की, याठिकाणी घेण्यात आलेले एक कोटी रुपयांचे सिटी-स्कॅन मशीन बंद आहे. कारण येथे पदे मंजूर नाहीत. या हॉस्पिटलमध्ये जे डॉक्टर येतात,...

. . . .व्ही-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यांना व्यवसाय रोज भत्ता मंजूर करण्यात आलेला आहे, तो भत्ता हॉस्पिटल चांगल्या प्रकारे सुरु रहाण्यासाठी पुन्हा देण्यात येणार आहात काय ?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी असा प्रश्न विचारला आहे की, हे हॉस्पिटल किती खाटांचे आहे ? आमच्याकडील माहितीनुसार एकूण खाटांची संख्या 594 आहे आणि सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे प्रत्येक महिन्यातील बाह्य रुग्णांची संख्या पाहिली तर ती 24,562 इतकी आहे. त्या व्यतिरिक्त दररोज जुने आणि नवीन असे जे बाह्य रुग्ण येतात ते 983 आहेत. तसेच सन्माननीय सदस्यांनी विचारले आहे की, याठिकाणी छोट्या-मोठ्या शस्त्रक्रिया किती होतात ? तर सरासरी महिन्यातील मोठ्या शस्त्रक्रियांची संख्या 309 असून, दररोज ज्या मोठ्या शस्त्रक्रिया होतात ती संख्या मघाशी सांगितल्याप्रमाणे 10 आहे. तसेच प्रत्येक महिन्यातील लहान शस्त्रक्रियांच्या संख्येबाबतही सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे. तर लहान शस्त्रक्रियांची संख्या 114 आहे आणि दररोजच्या लहान शस्त्रक्रियांची संख्या 4 आहे. तसेच सन्माननीय सदस्यांनी दुसरा असा प्रश्न विचारला की, या हॉस्पिटलमध्ये सुपर स्पेशालिटी तज्ज्ञ सोडून किती डॉक्टर आहेत ? तर त्यासंबंधीची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी सिटी-स्कॅनच्या बाबतीत प्रश्न विचारलेला आहे, तर तेथील सिटी-स्कॅन सुरु करण्यात आलेले आहे.

---

व्ही-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## बीड जिल्ह्यातील राज्य विद्युत वितरण कंपनीच्या कार्यकारी अभियंत्यांनी केलेला गैरव्यवहार

**(७) * ४८८५ श्री. एस. क्यू. ज़मा, श्री.संजय दत्त, प्रा.सुरेश नवले, श्री.मोहन जोशी :** सन्माननीय **ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील राज्य विद्युत वितरण कंपनीतील कार्यकारी अभियंता श्री.फकीर व बीड शहर विभागाचे उपअभियंता श्री.चौरे यांनी गेल्या २ वर्षात शेतकऱ्यांना घरगुती व शेतीसाठी वीज जोडणी देताना त्यांच्याकडून मोठया प्रमाणात पैसे घेतले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीड जिल्ह्यात व शहरात पुरवठा करण्यात येणारा माल अनेक वर्षापासून एकाच एजन्सीकडून घेण्यात येऊन त्यात त्यांनी लाखो रुपयांचा गैरव्यवहार केलेला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास,भंडारा कार्यालयात पुरवठा करावयाचा माल कमी असूनही संबंधित एजन्सीकडून माल जास्त घेतल्याच्या पावत्या दाखवून लाखो रुपयांचा गैरव्यहार केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले, तद्नुसार शासनाने दोषी असणाऱ्या व्यक्तींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री विजय वडेट्टीवार, श्री.अजित पवार** यांच्याकरिता : (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. सय्यद ज़मा : सभापति महोदय, प्रश्न क्रमांक १,२ तथा ३ का उत्तर " हे खरे नाही " ऐसा दिया है. मैं माननीय मंत्री जी से यह सवाल पूछना चाहता हूं कि ये जो अधिकारी है, जिनके बारे में प्रश्न पूछा गया था, वे बीड जिले में राज्य विद्युत वितरण कंपनी में कितने सालों से कार्यरत है ? दूसरा प्रश्न यह है कि उच्च पद के अधिकारियों का फिक्स टेन्युअर है अथवा नहीं और करप्शन और चोरी पकड़ने के लिए क्या राज्य विद्युत वितरण कंपनी के पास अपनी खुद की यंत्रणा (मॅकेनिज़्म ) है ?

यानंतर कु.थोरात . . . .

अशुद्धारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, ज्यांच्या संदर्भात याठिकाणी प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे ते कार्यकारी अभियंता श्री. ए.बी.फकीर हे दिनांक 18-2-2009 पासून कार्यरत आहेत म्हणजे साधारणत: एक वर्ष दोन महिन्याचा कालावधी त्यांना तेथे झालेला आहे. दुसरे उप कार्यकारी अभियंता श्री. जी.डी.चौरे हे दिनांक 27-8-2009 पासून कार्यरत आहेत म्हणजे आताच अलीकडच्या आठ महिन्यापूर्वी ते या ठिकाणी आलेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला आहे की, उच्च पदावरील अधिकाऱ्यांचा फिक्स टेन्युअर असायला पाहिजे तो निश्चितपणे आहे. साधारणत: या अधिकाऱ्यांच्या बदल्या दोन वर्षापेक्षा जास्त काधावधी झाल्यानंतर करीत असतो पण त्यांच्या विरोधात तक्रार प्राप्त झाली आणि त्या तक्रारीमध्ये तथ्य आढळून आल्यास त्यांना बदलण्याचा निर्णय सुध्दा शासन वारंवार घेत असते.

त्यानंतर सन्माननीय सदस्यांनी हे जे सगळे गैरप्रकार होतात त्यांच्या तपासासाठी काही यंत्रणा आहे काय? असा प्रश्न विचारलेला आहे. निश्चितपणे यासाठी यंत्रणा आहे. ज्या ज्यावेळी अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त होतात त्या त्या वेळी एखाद्या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन किंवा ते प्रकरण मोठे असल्यास त्या त्या प्रकरणाची समितीकडून किंवा वरिष्ठ अधिकाऱ्याकडून शहानिशा आणि चौकशी केली जाते.

श्री. सय्यद ज़मा :सभापति महोदय, शिकायत आने पर जांच की जाती है. लेकिन हमारा यह कहना है कि कार्यालय में जो मटेरियल आता है, उसकी जानकारी रखने के लिए, उस मटेरियल को चेक करने के लिए विभाग के पास कोई सिस्टम/विभाग है अथवा नहीं ? कार्यालय में आया हुआ माल जमा हुआ या नहीं तथा अन्य कार्य के बारे में चेक करने के लिए कोई विभाग है अथवा नहीं ?

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय,खरेदी करणारे जे अधिकारी असतात ते वेगळे आहेत हा जो माल किंवा वस्तू खरेदी केल्या जातात, त्या वस्तू ज्यावेळी भांडारामध्ये ठेवल्या जातात त्यावेळी त्या वस्तू स्पेसिफिकेशन्सप्रमाणे आहेत की नाहीत हे तपासून ठेवण्यात येतात. कोणत्याही वस्तू न तपासता स्वीकारल्या जात नाहीत. स्पेसिफिकेशन तपासूनच त्या घेतल्या जातात.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.4885...

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. ज़मा यांचा असा आक्षेप असा होता की, बीड जिल्हयातील अधिकारी शेतकऱ्यांना घरगुती आणि शेतीसाठी वीज जोडणी घेताना पैसे देतात. आणि पैसे घेतल्याशिवाय वीज जोडणी देत नाहीत. सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, अशा प्रकारचे काही घडलेले नाही. या अनुषंगाने माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, गेल्या दोन वर्षात किती शेतकऱ्यांनी घरगुती आणि शेतीसाठी वीज जोडणीसाठी शासनाकडे अर्ज केले आणि त्यापैकी किती शेतकऱ्यांना व लोकांना शासनाने शेतीसाठी आणि घरगुती वापरासाठी वीजजोडणी दिलेली आहे?

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. ज़मा यांचा दुसरा आक्षेप असा होता की, वर्षानुवर्षे एकाच एजन्सीकडून माल घेतला जातो त्यामुळे त्यामध्ये प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे. या प्रश्नालाही शासनाने नकारात्मक उत्तर दिलेले आहे. सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, गेल्या तीन वर्षापासून या जिल्हयामध्ये लागणारे साहित्य कोणत्या एजन्सीकडून घेतले जात आहे?

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, वीज जोडणीच्या संदर्भात एकूण किती अर्ज आले, किती विद्युत जोडण्या केल्या आणि किती पेंन्डिंग आहेत यासंबंधीची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल. त्यानंतर याठिकाणी मालाची एकूण किती खरेदी झाली असा प्रश्न विचारण्यात आलेला आहे. यासंदर्भात दिनांक 1-4-2008 ते 2010 या 23 महिन्यांच्या कालावधीमध्ये 26 कार्यादेश देण्यात आले. 17 लाख 10 हजार रुपयाची खरेदी करण्यात आली. त्यामध्ये जैन एजन्सीला दहा कार्यादेश देण्यात आले त्यांना 7 लाख 23 हजार रुपयाचे भुगतान करण्यात आले. मे. गौतम एजन्सीला तीन कार्यादेश देण्यात आले तसेच इतर सहा एजन्सींजना छोटे-छोटे कार्यादेश देऊन जवळपास अडीच वर्षाच्या कालावधीमध्ये 17 लाख 10 हजार रुपये खर्च झालेले आहेत. कार्यकारी अभियंत्यांना फक्त 30 लाख रुपयापर्यंतच खरेदीचे अधिकार आहेत. त्याच्या पलीकडचे अधिकार त्या त्या टप्प्यानुसार वरिष्ठ अधिकाऱ्यांना आहेत.

---

यानंतर श्री. बरवड...

अशुद्धीत प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**मराठवाड्यातील तेलगाव विद्युत उपकेंद्राअंतर्गत (ता.दिंद्रुड) गावातील कृषी पंपाचा वीजपुरवठा खंडीत केल्याप्रकरणाची चौकशी**

**(८) * ३९३५ ॲड. उषाताई दराडे** : सन्माननीय **ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात टंचाईग्रस्त परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकऱ्यांना वीज दरात सवलत तसेच शासनाच्या आदेशात बाधित कृषी पंप ग्राहकांचा वीज पुरवठा खंडीत करु नये असे आदेश असताना मराठवाड्यातील दिंद्रुड तालुक्यातील तेलगाव विद्युत उपकेंद्राअंतर्गत असलेल्या गावांमधील कृषी पंपाचा विद्युत पुरवठा थेट उपकेंद्रातून बंद करण्यात आल्याचे दिनांक २५ जानेवारी, २०१० रोजी त्यासुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कोणती कडक कारवाई केली वा करण्यांत येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार, श्री.अजित पवार यांच्याकरिता** : (१) हे खरे नाही. अंबाजोगाई विभागीय कार्यालयाअंतर्गत तेलगाव उपविभागातील कुप्पा, लवूळ व वांगी या गावांना अनुक्रमे तेलगाव १३२ के.व्ही.उपकेंद्र, लवूळ ३३ के.व्ही. उपकेंद्र व सिरसाळा ३३ के.व्ही.उपकेंद्रातून वीज पुरवठा करण्यात येतो. या गावातील कृषी पंप ग्राहकांचा विद्युत पुरवठा वैयक्तिक त्यांच्या कृषीपंपाच्या जागेवरुन दि.१५.०१.२०१० ते १७.१.२०१० या कालावधीदरम्यान तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात आला होता. त्या गावातील कोणत्याही कृषी पंप ग्राहकांचा विद्युत पुरवठा थेट उपकेंद्रातून बंद करण्यात आलेला नव्हता. तथापि, शासनाच्या आदेशानुसार व महावितरण कंपनीच्या सदरहू बाबीचे वाणिज्य परिपत्रक क्र.१०९ दि.१३/०१/२०१० हे उपविभागीय कार्यालय तेलगाव येथे दि.२१.०१.२०१० रोजी प्राप्त झाल्यानंतर सदरचा वीज पुरवठा तात्काळ दि.२२.०१.२०१० ते २४.०१.२०१० रोजी पुर्ववत जोडून देण्यात आला आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, शेतकऱ्यांची कशा पध्दतीने चेष्टा केली जाते हे या प्रश्नाच्या उत्तरातून आपल्या लक्षात येईल. त्या ठिकाणी कोणतेही कारण नसताना वीज कनेक्शन तोडलेले आहेत. उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, 15 जानेवारी, 2010 ते 17 जानेवारी 2010 या कालावधीदरम्यान विद्युत पुरवठा तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात आला होता. 13 जानेवारी, 2010 चे आदेश 21 जानेवारीला पोहोचले. म्हणजे तालुक्याच्या तालुक्यात आदेश मिळण्यास आठ दिवस लागले. त्यानंतर 22 तारखेला वीज पुरवठा जोडलेला आहे. हा वीज पुरवठा कोणी तोडला होता ? कोणाच्या आदेशाने तोडला होता ? आदेश नसताना वीज पुरवठा खंडित केल्यामुळे शेतकऱ्यांचे जे नुकसान झाले त्याबाबतीत दोषी अधिकाऱ्यांवर शासन कारवाई करणार काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 3935 .....

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, ज्यावेळी ग्राहकांकडे थकबाकी असते त्याबाबतीत वीज मंडळाचे असे स्थायी आदेश आहेत की, थकबाकी असल्यामुळे वीज जोडणी खंडित करावयास पाहिजे. शासनाने असे सर्क्युलर काढले की, त्यांच्या चालू बिलामध्ये 33 टक्के सूट द्यावयाची आणि उर्वरित रक्कम ग्राहकाने भरली पाहिजे. 15 जानेवारी, 2010 ते 17 जानेवारी, 2010 या कालावधीदरम्यान वीज पुरवठा खंडित करण्याची मोहीम राबविण्यात आली. शासनाचे टंचाईग्रस्त गावांच्या संदर्भातील सर्क्युलर 21.1.2010 ला प्राप्त झाले आणि 22 जानेवारी ते 24 जानेवारी 2010 च्या दरम्यान सर्व कनेक्शन त्यांना जोडून देण्यात आले. हे कनेक्शन जोडून देत असताना 33 टक्के सूट देऊन उर्वरित रक्कम शेतकऱ्यांनी अजूनही भरलेली नाही तरीही शेतकरी अडचणीत येऊ नयेत म्हणून मंडळाने वीज पुरवठा जोडण्याचे काम केलेले आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या कृषी पंपाना अग्रहक्काने कनेक्शन देण्याचा शासनाचा जो नियम होता तो शासनाने खंडित केलेला आहे. शासनाने त्वरित आदेश देऊन शेतकऱ्यांच्या कृषी पंपासाठी वीज कनेक्शन पाहिजे असेल तर ते देण्याची कार्यवाही शासन करणार काय ?

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, कृषी पंपासाठी प्रायोरिटी आहे याबद्दल दुमत नाही. जेवढे अर्ज प्राप्त झाले होते त्या सगळ्या अर्जांची छाननी केल्यानंतर, त्यांचे टेस्ट रिपोर्ट प्राप्त झाल्यानंतर त्याप्रमाणे जोडणी केली जाते. या प्रश्नाच्या संदर्भामध्ये जवळपास 1 लाख 5 हजार 132 अर्ज फेब्रुवारी, 2009 अखेर प्रलंबित होते. त्यापैकी 58 हजार 585 पंपांना वीज जोडण्या दिलेल्या आहेत. ज्यांचे टेस्ट रिपोर्ट प्राप्त झाले नाहीत त्यांची जोडणी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ SBT/

**बोर्डी नाला प्रकल्पाचे काम बंद पाडण्याच्या प्रकल्पग्रस्तांनी दिलेला इशारा**

**(९) * ६२४९ ॲड. अनिल परब, श्री.दिवाकर रावते :** सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोर्डीचा नाला (जि. अमरावती) प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला अद्याप मिळाला नाही म्हणून प्रकल्पग्रस्तांनी बोर्डी नाल्याचे काम बंद पाडण्याचा इशारा दिनांक ११ जानेवारी, २०१० रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, अमरावती यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या जमिनीचा मोबदला देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. विजय वडेट्टीवार, श्री.अजित पवार यांच्याकरिता** : (१) होय.

(२) नाही.

(३) शासनाच्या प्रचलित नियमानुसार भूसंपादन व पुनर्वसन कार्यवाही करण्यात येत आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, निवेदन दिले आहे हे शासनाने मान्य केले आहे. परंतु शासनाकडून त्यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली याचे उत्तर अपेक्षित आहे. चांदूरबाजार तालुक्यातील तळेगाव, मोहना, बोरगाव मोहना, कोंडवर्धा, पिंपरी, अमृलार यासह परिसरातील शेतकऱ्यांच्या जमिनी या प्रकल्पाकरिता अधिग्रहीत केल्या. परंतु अद्यापपर्यंत त्यांना मोबदला दिलेला नाही अशी तक्रार आहे. अमरावती जिल्ह्यामध्ये प्रकल्पाकरिता अधिग्रहीत केलेल्या जमिनीला कोणता भाव दिला आणि इकडच्या शेतकऱ्यांना कोणता भाव देणार ?

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी बोर्डी नाला प्रकल्पाच्या संदर्भात प्रश्न विचारलेला आहे. त्या ठिकाणी एकूण बुडित क्षेत्र 627.16 हेक्टर होते. त्यामध्ये खाजगी जमीन 588.59 हेक्टर होती. त्यामध्ये 422.34 हेक्टर जमिनीच्या बाबतीत पूर्णपणे मोबदला दिलेला आहे. 104 हेक्टर जमीन अजून ताब्यात घेतलेली नाही. त्याची कार्यवाही सुरु आहे. त्यासाठी पैसे उपलब्ध करुन दिलेले आहेत. ज्या दिवशी जमीन ताब्यात घेण्यात येईल त्या दिवशी पैसे देण्यात येतील.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.6249..... श्री.विजय वडेट्टीवार.....

त्यांचा दुसरा प्रश्न असा आहे की, जिराईत जमीन घेत असताना 1 लाख ते 1 लाख 20 हजार पर्यंत भाव देतो. हंगामी ओलितासाठी आतापर्यंत जो भाव दिला आहे तो 1 लाख 5 हजार, 50 हजार ते 1 लाख 80 हजारपर्यंत दिलेला आहे. संत्रा झाडांसाठी ज्या झाडाचे वय 8 ते 10 वर्षे आहे त्याला 3500 ते 4400 प्रति झाड याप्रमाणे मोबदला दिलेला आहे. या प्रकल्पासाठी 422 हेक्टर संपादित केलेली आहे. त्यांना सुध्दा याप्रमाणे पैसे दिलेले आहेत.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, ही अतिशय दुर्दैवी अशी गोष्ट आहे. महाराष्ट्राच्या विकसित भागामध्ये सरळ खरेदी पध्दतीने प्रकल्पासाठी जमिनी खरेदी करण्यात आल्या. गेल्या एक दोन वर्षापासून विदर्भामध्ये सुध्दा तो प्रकार लागू करण्यात आला. या भागामध्ये लोकांनी शासनाला सरळ खरेदी पध्दतीने स्वेच्छेने 422 हेक्टर जमिनी सरळ खरेदी करुन दिल्या. परंतु शासनाने आता स्वेच्छेने सरळ खरेदी पध्दत बंद केली, त्यामुळे लोकांची तीव्र नाराजी आहे, तसे त्यांनी निवेदनात म्हटलेले आहे. माझे स्पष्टपणे असे म्हणणे आहे की, विदर्भातील अनुशेषग्रस्त जिल्हे आहेत. त्यामध्ये स्वेच्छेने सरळ खरेदी पध्दतीबंद पाडणे म्हणजे हे अत्यंत हीन असे कृत्य आहे. त्यामुळे अनुशेषग्रस्त जिल्हयात सरळ खरेदी पध्दतीने तेथील जमिनी खरेदी कराव्यात अशाप्रकारचे आदेश शासन देईल काय ?

श्री.विजय वडेट्टीवार : होय.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांच्या उत्तराबाबत मी आभारी आहे. शासनाने लेखी उत्तर दिले होते की, आम्ही प्रचलित नियमाप्रमाणे भूसंपादन करु. मंत्री महोदयांनी चांगले उत्तर दिले आहे त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. "ज्यावेळी जमिनी ताब्यात घेईल त्यावेळी पैसे दिले जातील" असे थोडया वेळापूर्वी सन्माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे, म्हणून मी तो प्रश्न विचारला होता, त्याला आपण होय असे उत्तर दिले आहे. म्हणून मग आता माझा प्रश्न असा आहे की, आज, उद्या, परवा याबाबतचे आदेश निर्गमित होतील काय ?

श्री.विजय वडेट्टीवार : यासंबंधीचे आदेश दिले गेले होते. परंतु मध्यंतरी निधीची कमतरता होती. खाजगी वाटाघाटीने जमिनी खरेदी करण्याचे अधिकार खालच्या स्तरावर दिले होते. त्यावेळी त्यामध्ये थोडीशी अनियमितता झाली. ज्यांच्या जमिनी प्राधान्याने घ्यावयाच्या होत्या त्या न

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

घेता इतर जमिनी घेतल्या. त्यामुळे अधीक्षक अभियंत्यांनी या जमिनी घेण्याचे थांबवावे असे परिपत्रक काढले होते. यासंदर्भात कार्यकारी संचालकांना बोलवून त्यांना त्वरित आदेश देण्यात आले आहेत की, अधीक्षक अभियंत्यांनी जे परिपत्रक काढले आहे ते त्वरित रद्द करण्यात यावे. पूर्ववत वाटाघाटीने जमिनी घ्याव्यात.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. निधी कमी असल्यामुळे त्या शेतकऱ्यांना 2-2, 4-4 वर्षे ताटकळत ठेवणे किंवा थांबविणे बरोबर नाही. अधीक्षक अभियंत्यांनी शासनाच्या आदेशाच्या उलट आदेश काढले होते. त्यांना ताकीद दिली याबद्दल मी आभारी आहे. जेव्हा आम्हाला जमिनीची गरज पडेल तेव्हा म्हणजे 2-4 वर्षांनी जमीन घेणार ही गोष्ट बरोबर नाही. सरळ खरेदी पध्दतीने इतरांच्या जमिनी खरेदी केल्या तशा याच प्रकल्पासाठीच नाही तर अनुशेषग्रस्त जिल्हयातील सर्व प्रकल्पांच्या बाबतीत सरळ खरेदीचे सक्त आदेश तीन दिवसात दिले जातील काय ?

श्री.विजय वडेट्टीवार : होय.

---



अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लातूर येथे विद्युत निर्मितीसाठी भेल कंपनी यांची संयुक्त उपक्रम कंपनी स्थापन करण्याबाबतची कार्यवाही**

**(१०) * ६७११ श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्र.१३७८ ला दिनांक ११ डिसेंबर, २००९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर येथे उभारावयाच्या विद्युत निर्मिती प्रकल्पासाठी महानिर्मिती व भेल यांची संयुक्त उपक्रम कंपनी स्थापन झालेली आहे काय,

(२) असल्यास, शासनस्तरावरुन प्रकल्प उभारणीबाबत करण्यांत आलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(३) सदर प्रकल्पाची पायाभरणी केंव्हा होणार आहे?

**श्री.विजय वडेट्टीवार, श्री.अजित पवार यांच्याकरिता :** (१) नाही. मे.भेल व महानिर्मिती यांच्यात दिनांक १२ ऑगस्ट, २००९ रोजी संयुक्त उपक्रम कंपनी स्थापन करण्यासाठी सामंजस्य करार झाला. सदर कंपनी स्थापन करण्याच्या करारामध्ये अंतर्भूत करावयाच्या अटींना योग्य प्रारुप देण्याची प्रक्रिया सुरु आहे. संयुक्त उपक्रम करार झाल्यानंतर कंपनी स्थापन करण्यात येईल.

(२) महानिर्मिती व भेल यांची संयुक्त समिती स्थापन करावयाची प्रक्रिया सुरु आहे. तथापि, सदर प्रकल्पास लागणारी मुख्य संयंत्रे व सहाय्यकारी यंत्रणा मे.भेल यांच्याकडून नामनिर्देशन तत्वावर पुरवठा व उभारणी करण्यात येणार आहे. मे.भेल यांना सदर प्रकल्पास केंद्र शासनाच्या प्रचलित मेगा पॉवर प्रोजेक्ट पॉलिसीनुसार कर सवलती मिळाल्यास प्रकल्पाचा खर्च कमी होणार आहे. मेगा पॉवर प्रोजेक्ट करसवलती बाबत निश्चित धारणा झाल्यावर संयुक्त उपक्रम कंपनी करारास अंतिम स्वरुप देण्यात येईल.

प्रस्तावित प्रकल्पासाठी लातूर जिल्ह्यात संभाव्य दोन प्रकल्पस्थळांची (१) कोळश्यावर आधारित प्रकल्पांसाठी रोहीना (चाकूर) व (२) वायु विद्युत प्रकल्पासाठी टेंबी (औसा), प्राथमिक पाहाणी केली आहे.त्यास अनुसरुन जलसंपदा विभागामार्फत पाणी पुरवठ्याबाबत पडताळणी करण्यांत येत आहे. महानिर्मितीकडून कोळसा मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडे सदर प्रकल्पासाठी कोळसा खाण (ब्लॉक) मिळण्यासाठी प्रस्ताव सादर केला आहे. तसेच सदर प्रकल्पासाठी इंधनवायू मिळण्यासाठी मे. भेलकडून तेल व नैसर्गिक वायू मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) मेगापॉवर प्रोजेक्टची मंजुरी मिळाल्यानंतर संयुक्त उपक्रम कंपनी कार्यरत होईल. प्रकल्पांसाठी लागणाऱ्या जागेची निश्चिती व पाण्याची उपलब्धता आणि कोळसा किंवा परवडणाऱ्या किंमतीत वायू इंधनाची उपलब्धता निश्चित झाल्यावर, त्यासअनुसरुन प्रकल्पाच्या कामाचा आरखडा तयार करण्यात येईल. मुख्य संयत्राचे पुरवठा आदेश दिल्यानंतर प्रकल्पाचा पायाभरणी कार्यक्रम ठरविण्यात येईल.

४....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.6711...

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, लातूर जिल्हयाच्या विकासाला चालना देणारा प्रकल्प आहे. दिनांक १२.८.२००९ रोजी भेल कंपनी आणि महानिर्मिती यांच्या माध्यमातून संयुक्त कंपनी स्थापन करण्याबाबत करार झाला. त्याला ९ ते १० महिने होत आहेत. आज असे उत्तर आले आहे की, अशी कंपनी स्थापन झालेली नाही. म्हणून दोन तीन महत्वाचे प्रश्न आहेत. हा प्रकल्प महाराष्ट्र शासन उभा करणार आहे की केंद्र शासन उभा करणार आहे ? ही संयुक्त कंपनी स्थापन करण्याचे उत्तर गेल्या अधिवेशनात आणि याही अधिवेशनात दिलेले आहे. ही कंपनी केव्हा स्थापन केली जाणार आहे ? हा प्रकल्प कोळशावर आधारित असेल की गॅसवर आधारित असेल, या प्रकल्पासाठी जागेची निश्चिती झाली आहे काय ?

श्री.विजय वडेट्टीवार : यासंदर्भात दिनांक २६.६.२००९ रोजी भेल कंपनी व महानिर्मिती कंपनी यांची संयुक्त उपक्रम कंपनी स्थापन करुन लातूर येथे औष्णिक प्रकल्प उभा करण्याचा प्रस्ताव पाठविला होता.

यानंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

भेलने पत्रात नमूद केलेले आहे की, तामिळनाडू येथे आणि रायचूर येथे ज्या प्रमाणे प्रकल्प उभारण्यात आला त्याप्रमाणे प्रकल्प स्थापित करण्याचा प्रस्ताव आहे. यासंदर्भात 10.7.2009 रोजी नागपूर मधील कोराडी येथे बैठक झाली. हा प्रकल्प उभारण्याबाबत दिनांक 12.8.2009 रोजी महानिर्मिती आणि भेल यांच्यामध्ये सामंजस्य करार झाला. कोळश्यावर आधारित 13230 मे.वॅ.चा प्रकल्प करावयाचा आहे आणि इंधन उपलब्ध झाले तर 1800 मे.वॅ.चा प्रकल्प करावयाचा आहे. जॉईण्ट व्हेन्चरने हा प्रकल्प करावयाचा आहे. प्रकल्पाची किंमत 7920 कोटी. रु. आहे. प्रकल्पासाठी लागणारा निधी 80 टक्के कर्जरुपाने आणि 20 टक्के भागभांडवल या प्रमाणे उभारण्यात येणार आहे. भागभांडवलाचे प्रमाण महानिर्मिती 26 टक्के आणि भेल 26 टक्के आणि वित्तीय संस्था 48 टक्के या प्रमाणे असेल. या प्रकल्प उभारणीसाठी कच्च्या मालाची म्हणजे कोळशाची किंवा गॅसची आवश्यकता आहे. कोळशाची मागणी राज्य सरकार करणार आहे आणि गॅसची मागणी भेल करणार आहे. त्यासाठी राज्य सरकारने दिनांक 25.2.2010 रोजी कोळसा मंत्रालयाशी कोळसा उपलब्ध करुन देण्यासंबंधी पत्रव्यवहार केलेला आह. भेलने दिनांक 25.2.2010 रोजी गॅसची मागणी गॅस आणि पेट्रोलियम मंत्रालयाकडे केलेली आहे. प्रस्तावित प्रकल्पासाठी लातूर जिल्ह्यात संभाव्य दोन प्रकल्पस्थळांची (1) कोळश्यावर आधारित प्रकल्पासाठी रोहीना (चाकूर व (2) वायू विद्युत प्रकल्पासाठी टेंबी (औसा), प्राथमिक पाहणी केली आहे. कच्चा माल उपलब्ध झाल्यानंतर जागा अधिग्रहीत करण्याचे काम सुरु होईल.

श्री. विक्रम काळे : मी विचारलेल्या प्रश्नांना बगल देऊन माननीय मंत्री महोदयांनी अधिकची माहिती दिली. हा प्रकल्प केन्द्र शासन की राज्य शासन स्थापन करणार आहे ? हा प्रकल्प कोळशावर की गॅसवर आधारित आहे ? प्रकल्पासाठी गॅस लागणार असेल तर गॅसची पाईप लाईन केलेली आहे काय ? अजूनही कंपनी स्थापन केलेली नसताना पुढच्या कामाला लागून कोळसा आणि गॅस मंत्रालयांना पत्रव्यवहार केलेला आहे.

श्री. विजय वडेट्टीवार : कंपनी स्थापायची की नाही हे कच्च्या मालाच्या उपलब्धतेवर अवलंबून आहे. कच्चा मालच मिळाला नाही तर कंपनी स्थापून काही उपयोग होणार नाही. म्हणून पत्रव्यवहार सुरु आहे. कोळसा आणि गॅस मिळाला की कंपनी स्थापन करता येईल. महानिर्मिती आणि भेल यांचा हा संयुक्त प्रकल्प होणार आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## सातारा जिल्ह्यात रोगाच्या प्रादुर्भावामुळे द्राक्ष बागायतदारांचे होत असलेले नुकसान

**(११) * ६६७९ श्री.दिवाकर रावते, श्री.गोपीकिसन बाजोरिया, श्री.किसनचंद तनवाणी :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील जानेवारी-फेब्रुवारी, २०१० मध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे भुरी व डाऊनीचा प्रादुर्भाव झाल्यामुळे द्राक्ष बागायतदारांचे करोडो रुपयांचे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शेतकऱ्यांना मदत करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे?

**श्री. रणजित कांबळे, डॉ.विजयकुमार गावीत यांच्याकरिता** : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. दिवाकर रावते : प्रश्न भाग (१) ला " हे खरे नाही" असे उत्तर दिलेले आहे. सातारा जिल्ह्यामध्ये अवकाळी पावसामुळे भुरी व डाऊनी या रोगाचा प्रादुर्भाव झाल्याचे कृषी अधिका-यांचे सर्टिफिकेट आहे. तेव्हा त्याठिकाणी या रोगाचा प्रादुर्भाव झालेला नाही असे माननीय मंत्री महोदयांचे म्हणणे आहे काय ?

श्री. रणजित कांबळे : उत्तर बरोबर दिलेले आहे. प्रश्न जानेवारी आणि फेब्रुवारी महिन्यातील विचारलेला आहे. नुकसान नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्यामध्ये झालेले आहे. नोव्हेंबरमध्ये चक्रीवादळात सातारा जिल्ह्यामध्ये जे नुकसान झाले त्याबाबत द्राक्ष बागायतदारांना नुकसान भरपाई दिलेली आहे. शासनाने जे अनुदान द्यावयाचे आहे ते शंभर टक्के दिलेले आहे.

---

....नंतर श्री. भोगले....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अंबाजोगाई (जि.बीड) येथील अंबासागर परिसरातील शिवाजी चौकात शनेश्वर दूध डेअरी केंद्रात कृत्रिम दूध तयार करण्याचे केमिकलजप्त केल्याबाबत**

**(१२) * ४४७३ प्रा.सुरेश नवले, श्री.राजन तेली :** सन्माननीय **अन्न व औषधे प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई, (जि.बीड) शहरापासून ७ कि.मी. अंतरावर असणाऱ्या अंबासागर परिसरातील शिवाजी चौकात शनेश्वर दूध डेअरी केंद्र असून तेथे कृत्रिम दूध तयार करणाऱ्या व्यक्तीला पोलीसांनी रंगेहाथ पकडून त्यावेळी दूध तयार करण्याचे केमिकल जप्त केल्याची घटना दिनांक १ फेब्रुवारी, २०१० रोजी वा त्यासुमारास उघडकीस आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, अशा वारंवार होणाऱ्या घटनेस आळा बसणेबाबत शासनाने कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रमेश बागवे, श्री. मनोहर नाईक यांच्याकरिता :** (१) हे खरे नाही.

तथापि अंबा साखर कारखाना परिसरात शनिशक्ती महिला दूध व्यावसायिक सहकारी संस्था, वाघाळा, संचलित दूध संकलन केंद्र येथे दि. १/१२/२००९ रोजी पोलीसांसमवेत धाड घालण्यात आली.

(२) होय.

दिनांक १/१२/२००९ रोजी पोलीसांसमवेत प्रशासनातील अन्न निरीक्षक यांनी अंबासागर कारखाना टी पॉईट परिसर शनिशक्ती महिला दूध व्यावसायिक सहकारी संस्था, वाघाळा संचलित दूध संकलन केंद्र येथे धाड टाकण्यात आली घटनास्थळावरुन दूध व आईस्क्रीम पावडरचा (अपमिश्रक) साठा १०७ कि.ग्रॅ. व गाईचे दूध ४८.५ लिटर साठा जप्त करण्यात आला. भेसाळीच्या संशयावरुन गाईच्या दूधाचा उर्वरित साठा नष्ट करण्यात आला. लोकविश्लेषक राज्य आरोग्य प्रयोगशाळा, पुणे यांनी सदर गाईच्या दूधामध्ये ग्लुकोज पावडरची भेसळ केली असल्याचे अहवालात नमूद केले आहे. दुधात भेसळ करण्यात येण्यासाठी वापरण्यात येणारे आईस्क्रीम पावडरचा अहवाल अपमिश्रक म्हणून प्राप्त झाला आहे.

सदर घटनेची अंबेजोगाई ग्रामीण पोलीस ठाणे येथे पोलीस स्टेशन डायरीमध्ये ३३५/२००९ दि.१/१२/२००९ अशी नोंद घेंतली आहे.

सदर प्रकरणी पुढील तपास चालू असून, तपास पुर्ण होताच संबंधितावर खटले दाखल करण्यात येतील.

(३) दुध भेसळ रोखण्यासाठी प्रशासनामार्फत केलेल्या उपाययोजना.

१) डेअरीच्या १५ अधिकाऱ्यांना अन्न निरीक्षकांचे अधिकार देण्यात आले असून, त्यांना फक्त दूध व दुग्धजन्य पदार्थांचे काम देण्यात आले आहे.

२) दूधातील भेसळीवर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय समिती गठण करण्यात आल्या आहेत. राज्यस्तरीय समितीचे अध्यक्ष, सचिव, पशु, दुग्ध व मत्स विभाग, मंत्रालय व जिल्हास्तरीय समितीचे अध्यक्ष, जिल्हाधिकारी हे आहेत.

३) अन्न भेसळ प्रतिबंधक कायदयात महाराष्ट्र राज्याने केंद्राच्या मान्यतेने सुधारणा करुन कलम २० खालील गुन्हे अजामिनपात्र व दखलपात्र करण्यात आले आहेत.

...२..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

४) पोलीसांना भेसळखोरांना विना वॉरंट अटक करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.
५) भा.द.वि. कायद्याचे कलम २७२ ते २७६ मध्ये सुधारणा प्रस्तावित करण्यात आली असून सदर कायद्याखालील सर्व गुन्हे अजामिनपात्र व दखलपात्र करुन शिक्षेत दंडद्रव्यासमवेत जन्मठेपेची शिक्षा प्रस्तावित करण्यात आली आहे.
(४) लागू नाही.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, दुधामध्ये भेसळ झाली. या प्रकरणातील तपासणी अहवाल आला. जी धाड घालण्यात आली तेथे अपमिश्रक साठा आढळून आला. अपमिश्रक संकल्पना काय आहे हे मंत्रीमहोदय सांगू शकतील काय? तपास चालू आहे असे म्हटले आहे. तपास कुठपर्यंत चालणार आणि केव्हा पूर्ण होणार आहे?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, अपमिश्रक म्हणजे भेसळ करण्यासाठी वापरण्यात येणारा जो पदार्थ असतो त्याला अपमिश्रक म्हटले जाते. आंबेजोगाई परिसरामध्ये शनिशक्ती महिला दूध व्यावसायिक सहकारी संस्थेतील दुधाचे नमुने तपासण्यात आले. ते नमुने प्रमाणित आढळून आले. दुसऱ्या वेळी नमुने फेरतपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले ते नमुने अप्रमाणित आढळून आले. त्या नमुन्यामध्ये ग्लुकोज आढळून आल्यामुळे गुन्हा दाखल केला आहे. संस्थेच्या संचालकांवर अन्न भेसळ प्रतिबंधक कायदा, १९५४ च्या अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे, त्या गुन्हयाचा तपास चालू आहे.

---



अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील जीवनदायी योजनेतील औषधांचा दर बाजारभावापेक्षा कमी करण्यासाठी करावयाची कार्यवाही**

**(१३) * ५५८२ श्री.राजन तेली, प्रा.सुरेश नवले, श्री. एस. क्यू. ज़मा, श्री.सुभाष चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जीवनदायी योजनेत खरेदी करण्यात येणाऱ्या औषधाचा दर बाजारभावापेक्षा जास्त असल्याचे माहे जानेवारी २०१० च्या सुमारास आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जीवनदायी योजनेतील औषधाच्या दरसूचीमध्ये तफावत असल्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन कारवाई करण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, त्यामागील कारणे काय आहेत ?

**श्री. सुरेश शेट्टी** : (१) अशा आशयाची बातमी दैनिक लोकमत मध्ये जानेवारी, २०१० मध्ये आलेली आहे.

(२), (३) व (४) यासंबंधात लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत माहे जानेवारी, २०१० पासून आजतागायत चौकशी सुरु आहे. तसेच सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांच्या एक सदस्यीय समितीमार्फत सुध्दा चौकशी चालू आहे. सदर चौकशी पूर्ण झाल्यानंतर त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, ता.प्र.क्र.५५८२.

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, छापल्याप्रमाणे.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, जीवनदायी योजनेच्या संदर्भातील प्रश्न आहे. उत्तरामध्ये म्हटले आहे की, एक सदस्यीय समिती नेमली आहे. पहिल्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये म्हटले आहे की, अशा आशयाची बातमी दैनिक लोकमत वृत्तपत्रामध्ये आलेली आहे. लोकमत वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झालेली बातमी खरी होती का? असल्यास त्या संदर्भात काय कारवाई केली?

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, वृत्तपत्रातील बातमीच्या अनुषंगाने बऱ्याच गोष्टी शासनाच्या निदर्शनास येत असतात. ज्याअर्थी सभागृहात सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी प्रश्न उपस्थित केला त्याअर्थी त्यांच्याकडे अधिक माहिती असावी. जे लेखी उत्तर देण्यात आले त्यानुसार चौकशी सुरु आहे. चौकशीअंती जी माहिती समोर येईल त्यानुसार कारवाई करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद जमा : माननीय सभापति जी, यह अच्छी बात है कि माननीय मुख्यमंत्री जी यहां पर उपस्थित हैं. जीवनदायी योजना के बारे में एक प्रश्न आया था. इस बारे में अभी नयी योजना आनी है और पुरानी योजना अभी चालू है. मुझे कहना है कि यह योजना दारिद्रय रेखा से नीचे के लोगों के लिए है. इस योजना में जो त्रुटियां हैं, वह एक अलग विषय है. लेकिन इसमें जो चोरी होती है और बेईमानी होती है उससे संबंधित जो जांच प्रक्रिया है और एक्शन प्रक्रिया होती है उस प्रक्रिया को जल्द से जल्द पूरा करने के लिए कोई कोशिश सरकार की ओर से की जाएगी. क्या इस संबंध में कोई विशेष आदेश सरकार की ओर से निकाला जाएगा ?

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, त्याकरिता काही वेगळ्या आदेशाची आवश्यकता नाही. ज्या ठिकाणी असे प्रकार आढळतात त्या ठिकाणी संबंधित विभागाच्या प्रमुखाने कारवाई करणे अपेक्षित आहे. त्यासाठी वेगळे आदेश काढण्याची आवश्यकता नाही.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यात महावितरण कंपनीच्या ग्राहकांच्या वीज दरात झालेली वाढ**

**(१४) * ४०१६ श्री.संजय दत्त, प्रा.सुरेश नवले, श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १५१५ ला दिनांक ११ डिसेंबर, २००९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरण कंपनीच्या ग्राहकांना दिनांक १ ऑगस्ट, २००९ पासून अंमलात आलेल्या सुधारित वीज दरानुसार लागू होणाऱ्या सरासरी वीज दरात साधारणत: १ ते ८ टक्के इतकी वाढ झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने विद्युत अधिनियम २००३ मधील कलम १०८ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन सुधारित वीज दराबाबत पुनर्विचार करण्याबाबत आयोगास निर्देश दिलेले असून याबाबतचे आयोगाने आपले उत्तर राज्य शासनास सादर केले आहे काय व ते कोणत्या स्वरुपात आहे,

(३) तसेच राज्यातील ग्राहकांना वीजदर कमी करण्यासाठी शासनाने कोणता ठोस निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(४) अद्याप, निर्णय झाला नसल्यास त्याची कारणे काय आहेत?

**श्री.विजय वडेट्टीवार, श्री.अजित पवार यांच्याकरिता** : (१) होय हे खरे आहे.

(२) राज्य शासनाने विद्युत अधिनियम २००३ मधील कलम १०८ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन मा.आयोगास पुढील निर्देश दिले होते.

अ) आयोगाने क्रॉस सबसिडी कमी करण्याबाबतचे धोरण व कार्यपद्धती स्पष्ट करावी. त्याचवेळी विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ६१ मधील तरतुदीनुसार सध्या असलेल्या विजेच्या तुटवड्याच्या परिस्थितीमध्ये साधन संपत्तीच्या काटकसरीने वापर करण्याबाबत उत्तेजन देण्यात यावे.

ब) क्रॉस सबसिडी कमी करण्याबाबतचे धोरण स्पष्ट होईपर्यंतच्या कालावधीसाठी आयोगाने दि.१७/०८/२००९ च्या दरपत्रक आदेशान्वये क्रॉस सबसिडी कमी करण्याबाबतचा निर्णय संस्थगित ठेवावा. त्याचप्रमाणे वीजेचा चैनीसाठी वापर करणाऱ्या ग्राहकांची सबसिडी पृथकपणे कमी करण्याबाबतच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येऊ नये.

त्यानुसार उपरोक्त "अ" येथील राज्यशासनाचे निर्देश आयोगाने मान्य केले तथापि काही विशिष्ट ग्राहकांची कमी केलेल्या क्रॉस सबसिडी मागची तार्कीक भूमिका स्पष्ट करुन "ब" येथील निदेश स्वीकारण्यास असमर्थता व्यक्त केली आहे.

(३) वीज खरेदीचा खर्च व अन्य सामुग्री खर्चात होणाऱ्या वाढीमुळे वीजदर वाढ अपरिहार्य ठरत असली तरी वीज वितरण हानी कमी करणे, योग्य मीटर वाचन करुन सर्व वीज वापराचे अचूक बिलींग करणे, वसुलीची कार्यक्षमता वाढविणे, संचलन व सुव्यवस्थेवरील खर्च कमी करणे व कार्यक्षम व्यवस्थापन इत्यादी योजनांचा अवलंब करुन वीजदर वाढ कमीत कमी राहिल या बाबत महावितरण कंपनी आवश्यक दक्षता बाळगत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, समाधानकारक उत्तर दिल्याबद्दल धन्यवाद.

...६..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.४०१६.....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, राज्याच्या वीज वितरण कंपनीने गेल्या सात महिन्यामध्ये आठपट दरवाढ केली हे खरे आहे काय? ही दरवाढ करताना राज्य वीज नियामक आयोगाची परवानगी घेतली होती का? या दरवाढीमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे कर लावून राज्य शासन राज्य वीज नियामक आयोगाने ठरवून दिलेल्या दरापेक्षा जास्त दर आकारते हे खरे आहे काय?

नंतर २बी.१....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 4016.....

श्री. विजय वडेट्टीवार : महोदय, विद्युत अधिनियम, 2003 नुसार एमईआरसीकडे वीज दरवाढीचा प्रस्ताव शासनाकडून पाठविला जातो आणि त्यांची मान्यता घेतल्याशिवाय अशा प्रकारे कोणतीही दरवाढ केली जात नाही.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : महोदय, एमईआरसी मध्ये सुपर बॉडी नाही. Is MERC going to decide the fate of electricity in Maharashtra ? मंत्री महोदयांनी जे उत्तर दिलेले आहे ते सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाचे उत्तर नाही. सन्माननीय सदस्यांचा प्रश्न असा होता की, ही भाववाढ शासनाने योग्य वेळेत केलेली आहे काय ?

श्री. विजय वडेट्टीवार : महोदय, एमईआरसीचे गठन केंद्रशासनाच्या डायरेक्शन्सप्रमाणे आपल्या राज्यात करण्यात आलेले आहे. मागील काळात देशातील विविध सरकारे आपापल्या मनाप्रमाणे विजेची दरवाढ करीत होते म्हणून एमईआरसीची स्थापना करण्यात आली आहे. या सर्व परिस्थितीत निर्णय घेत असताना सर्व राज्यांमध्ये विजेसंबंधी समान धोरण असावे अशा प्रकारचा निर्णय एमईआरसीने घेतला आहे. ज्यावेळेस शासनाला दरवाढ करावयाची असते त्यानुसार प्रस्ताव एमईआरसीकडे पाठविला जातो. अशी दरवाढ करण्याची प्रमुख कारणे म्हणजे कच्च्या मालामध्ये झालेली वाढ, वीज खरेदी करीत असताना मोठ्या प्रमाणावर होत असलेला भांडवली खर्च तसेच कर्मचाऱ्यांवरील खर्चात झालेली वाढ अशा सर्व परिस्थितीत वीज दरवाढ करणे क्रमप्राप्त ठरते. त्यानुसार प्रस्ताव मान्य होऊन आल्यानंतरच अशी दरवाढ शासनाकडून घोषित करण्यात येते.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

---

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: शोक प्रस्ताव

**मु.शी.**: श्री. अण्णासाहेब गणपतराव गिते, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल व क्रांतिवीर शहीद अनंत कान्हेरे, विनायक देशपांडे आणि गोपाळ उर्फ अण्णा कर्वे यांच्या स्मृतीस सभागृहाच्या वतीने विनम्र अभिवादनाचा प्रस्ताव

श्री. अशोक चव्हाण (मुख्यमंत्री) : महोदय, श्री. अण्णासाहेब गणपतराव गिते, माजी विधान परिषद सदस्य यांच्या निधनाबद्दल मी खालील शोक प्रस्ताव मांडतो :--

"श्री. अण्णासाहेब गणपतराव गिते, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते."

महोदय, कै. अण्णासाहेब गणपतराव गिते यांचा जन्म 5 जानेवारी, 1930 रोजी बीड जिल्ह्यात नंदागौळ येथे झाला. त्यांचे शिक्षण मॅट्रिकपर्यंत झाले होते. के गिते यांनी संयुक्त महाराष्ट्र लढ्यात तसेच गोवा मुक्ती सत्यागृहात भाग घेतला होता. सुरुवातीच्या काळात तालुका कम्युनिस्ट पार्टीचे चिटणीस म्हणून त्यांनी कार्य केले. चीन आक्रमणानंतर त्यांनी काँग्रेस पक्षाचे कार्य केले. कै. गिते यांनी परळी-वैजनाथ येथील श्रीकृष्ण भांडारचे अध्यक्ष, अंबाजोगाई येथील वंजारी वसतिगृहाचे सदस्य व अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याचे संचालक म्हणूनही त्यांनी कार्य केले. कै. गिते यांनी सन 1957-60 मध्ये बीड जिल्हा लोकल बोर्डाचे सदस्य म्हणून कार्य केले. सन 1980 मध्ये महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारे विधानपरिषदेवर तसेच सन 1962 व 1967 असे दोन वेळा बीड जिल्ह्यातील रेणापूर मतदार संघातून महाराष्ट्र विधानसभेवरही ते निर्वाचित झाले होते. अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे बुधवार, दिनांक 7 ऑक्टोबर, 2009 रोजी दु:खद निधन झाले.

महोदय, अजून एका महत्वाच्या घटनेचा प्रकर्षाने उल्लेख केला पाहिजे. तो म्हणजे ब्रिटीश जिल्हाधिकारी क्रुरकर्मा श्री. जॅक्सन याचा, निधड्या छातीचे क्रांतिकारी शहीद अनंत कान्हेरे, विनायक देशपांडे आणि अण्णा कर्वे यांनी वध केला. त्यानंतर तत्कालीन ब्रिटीश सरकारने त्यांना दि. 19 एप्रिल, 1910 रोजी ठाणे कारागृहात फाशी दिली. या घटनेला आज दि. 19 एप्रिल, 2010 रोजी 100 वर्षे पूर्ण झाली आहेत. त्याबद्दल त्यांच्या स्मृतिस मी विनम्र अभिवादन करीत आहे.

(यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : ( विरोधी पक्ष नेता ) सभापती महोदय, राज्याचे मुख्यमंत्री श्री. अशोकराव चव्हाण यांनी या ठिकाणी जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्यास समर्थन देण्यासाठी मी उभा आहे. कै. अण्णासाहेब गिते हे 1980 पासून या सभागृहाचे सदस्य होते. 1962 व 1967 मध्ये बीड जिल्हयाच्या रेणापूर मतदार संघातून महाराष्ट्र विधासभेवर ते निवडून गेले होते. त्यांनी सुरुवातीस कम्युनिस्ट पक्षाचे काम केले होते त्यामुळे त्यांनी शेतमजूर व ऊसतोड कामगारांचे प्रश्न विधानमंडळात हिरीरीने मांडले होते. परळी -वैजनाथ येथे भटक्या व विमुक्त जमातीचे तांडे गोळा करुन त्याच्यासाठी त्यांनी नवीन गाव वसवले होते. त्यांनी 4 सहकारी संस्थांची स्थापना करुन त्यामधून अनेक तरुणांना काम उपलब्ध करुन दिले होते. त्यांनी बीड जिल्हयातील 22 गावच्या नळयोजना कार्यान्वित करण्याचे महत्वाचे काम आपल्या कारकिर्दीत केले होते. अशा या समाज सेवकाचे दिनांक 7 ऑक्टोबर, 2009 रोजी निधन झाले. या ठिकाणी माननीय मुख्यमंत्रीमहोदयांनी जो शोक प्रस्ताव आणला त्याचे मी समर्थन करतो.

सभापती महोदय, सर्वश्री क्रांतीवीर अनंत कान्हेरे, विनायक देशपांडे व गोपाळ ऊर्फ अण्णा कर्वे यांनी भारत मातेच्या स्वातंत्र्यांसाठी जीवाची बाजी लावली होती. ब्रिटीश कालावधीतील क्रुरकर्मा जॅक्सन, तत्कालीन जिल्हाधिकारी यांचा त्यांनी वध केला होता. त्यामुळे ब्रिटीश सरकारने या 3 क्रांतिकारकांना 19 एप्रिल,1910 रोजी ठाणे कारागृहात फाशीची शिक्षा दिली होती. या क्रांतिकारकांच्या फाशीला आज 100 वर्ष पूर्ण होत आहेत. देशाच्या स्वातंत्र्यांसाठी ज्यांनी जीवाची बाजी लावली, अशा महाराष्ट्रातील क्रांतिवीरांना सभागृहाच्या वतीने विनम्र अभिवादनाचा प्रस्ताव माननीय मुख्यमंत्र्यांनी मांडला आहे, त्यास मी पाठिंबा देतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : ( विधानसभेने निवडलेले ) सभापती महोदय, या सदनाचे तत्कालीन सदस्य कै. अण्णासाहेब गणपतराव गिते यांचा शोक प्रस्ताव माननीय मुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी मांडलेला आहे त्यास मी पाठिंबा देण्यासाठी उभा आहे. त्यांनी मराठवाडयातील बीड जिल्हयातील कम्यूनिस्ट पार्टीचे नेतृत्व केले होते. त्यांनी बीड जिल्हयात अनेक आंदोलने केली होती. कै. गिते हे या सदनाचे 1980 मध्ये सदस्य होते. 1962 व 1967 या काळात ते बीड जिल्हयाच्या रेणापूर मतदारसंघातून विधानसभेवर निवडून गेले होते. मराठवाडयातील अशा ज्येष्ठ समाजसेवकाचे 7 ऑक्टोबर,2009 रोजी दु:खद निधन झाले. माननीय मुख्यमंत्र्यांनी जो शोक प्रस्ताव मांडला त्यास मी पाठींबा व्यक्त करतो.

सभापती महोदय, मी या सदनात क्रांतिवीरांच्या संदर्भात विशेष उल्लेख मांडला होता. ठाणे येथील तुरुंगाच्या प्रांगणात सर्वश्री. अनंत कान्हेरे, विनायक देशपांडे आणि अण्णा कर्वे यांना फाशी देऊन 100 र्षे पूर्ण होत आहेत. या घटनेला 100 वर्षे होत असतांना या ठिकाणी शासनाने समाधीला पुष्पचक्र अर्पण करावे यासंदर्भात विशेष उल्लेख मांडला होता. मी आज सकाळीसच ठाणे तुरुंगात यासंदर्भात चौकशी केली होती. या ठिकाणी सकाळी 7.00 वाजता शासनाच्या वतीने पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. या घटनेला 100 वर्षे पूर्ण होत असतांना प्रथमताच अशा प्रकारे स्वातंत्र्य सैनिकांच्या समाधीला पुष्पचक्र अर्पण करण्यात आले आहे. या ठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांनी जो विषय येथे मांडला त्यास मी मनापासून धन्यवाद देतो.

सभापती महोदय, स्मृतीमध्ये नसलेली समाधी मी मुंबईचा महापौर असतांना शोधून काढली होती. यासंदर्भात मला अज्ञात व्यक्तीचे पत्र आले होते. ठाणे तुरुंगात क्रांतिवीरांना फाशी दिली होती त्या ठिकाणी मी स्वत: गेलो होतो. त्या समाधीवर धूळ वगैरे पडलेली होती. त्यावेळचे आमचे ठाणे जिल्हा प्रमुख कै. आनंद दिघे आणि त्यांचे सर्व सहकारी त्या ठिकाणी या कार्यक्रमाला उपस्थित होते. क्रांतिवीरांच्या संदर्भातील ही माहिती जेव्हा ठाणे जिल्हयाच्या जेलरला समजली तेव्हा त्या जेलरने ती समाधी शोधून काढली व त्या ठिकाणी साफसफाई-रंगरंगोटी केली होती. त्या कार्यक्रमाला मी माननीय डावखरे साहेबांना सुध्दा बोलावले होते. त्यांना फाशी ज्या ठिकाणी दिली गेली होती ते ठिकाण सुध्दा मी बघितले आहे.

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

फाशीचे तक्त बघितले. ते आजही तेथे आहे. अनंत कान्हेरे, विनायक देशपांडे, अण्णा कर्वे यांना दिलेली फाशी ही शवेटची आहे. त्यानंतर तेथे कोणालाही फाशी देण्यात आली नाही. त्यांना फाशीवर चढवून 100 वर्षे पूर्ण झालेली आहेत. फाशीचे तक्त लोकांना माहिती व्हावे, या क्रांतीवीरांच्या त्यागाचा सन्मान व्हावा म्हणून स्थानिक विकास निधीतून मी दहा लाख रूपये दिले, तर सन्माननीय उपसभापती श्री.वसंत डावखरे यांनी याकडे लक्ष देऊन सदर कामासाठी कमी पडलेले पैसे आपल्या निधीतून दिलेले आहेत. अशा प्रकारे त्यांचा सन्मान राखण्याचा प्रयत्न केला. आज या क्रांतीकाराच्या त्यागाला 100 वर्षे पूर्ण झालेली आहेत. त्या निमित्ताने आज आपण सभागृहात त्यांना आदरांजली अर्पण करीत आहोत हे फार महत्त्वाचे. त्यामुळे मी माननीय मुख्यमंत्र्यांना मनापासून धन्यवाद देतो. ज्यावेळी आपले विधिमंडळाचे कामकाज सुरू असेल त्यावेळी क्रांतीकारांना आदरांजली वाहिली गेली पाहिजे, असा आग्रह धरतो. क्रूरकर्मा जॅक्सन याचा निधड्या छातीने स्वत: बॉम्बस्फोटामध्ये वध करून अनंत कान्हेरे, विनायक देशपांडे, गोपाळ ऊर्फ अण्णा कर्वे यांनी जो त्याग केला आणि या देशाकरिता फाशीच्या तक्तावर सन्मानाने चढले त्यांना विनम्रपूर्वक अभिवादन करतो. धन्यवाद.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, या सदनाचे माजी सदस्य श्री.अण्णासाहेब गणपतराव गिते यांच्या दु:खद निधानाबद्दल जो शोक प्रस्ताव माननीय मुख्यमंत्र्यांनी मांडला आहे, त्यांच्याशी सहभावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सन 1980 साली आम्ही या सभागृहात आलो. त्यावेळी अतिशय रोबस्ट कॉमनसेन्स असलेली आणि डाव्या चळवळीची पार्श्वभूमी असलेली एक व्यक्ती म्हणून श्री.अण्णासाहेब गिते यांचा आम्हाला त्या पाच सहा वर्षामध्ये आम्हाला परिचय झाला. एक कार्यकाळ ते या सदनाचे सदस्य होते. त्यापूर्वी दोन कार्यकाळ ते विधान सभेचे सदस्य होते. लोकल बोर्डाच्या कामाचा देखील त्यांना अनुभव होतो. मुख्यत्वे डाव्या चळवळीतून त्यांचे राजकीय व्यक्तिमत्त्व विस्तारीत झाले. त्यामुळे लोकांच्या प्रश्नाकडे पाहण्याची दृष्टी त्यांना लाभली होती. जवळ जवळ 80 वर्षे त्यांना चांगल्या प्रकारे आयुष्य जगून त्यांनी इहलोकीचा निरोप घेतला आहे. मी मनापासून शोक व्यक्त करतो.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी दुसरा प्रस्ताव मांडला आहे. महात्मा गांधीचे नेतृत्त्व स्वातंत्र्य आंदोलनाला मिळण्याच्या पूर्वीच्या काळात ब्रिटिश राज्यकर्त्यांकडे हिंसात्मक कृत्याची विधिमय मोनोपॉली होती. ते शासनकर्ते होते आणि शासनकर्ते असल्यामुळे हिंसा करण्याचा कायदेशीर अधिकार होता. त्यामुळे हिंसेला हिंसेने तोड देता येणार नाही त्याला जर तोंड द्यायचे असेल तर ते आत्मक्लेषाच्या मार्गाने द्यावे लागेल ही जी भूमिका म.गांधीजींनी घेतली, तिचा प्रभाव पडून लोकांना कळायला तो बराच काळ लागला. पण गांधीजींची ही भूमिका घेण्याच्या अगोदरच्या कालखंडामध्ये लोकांमध्ये ही भावना तीव्र होती की, जशासतसे उत्तर द्यायचे. They were all sincere about it. त्याविषयी दुमत असण्याचे कारण नाही. त्या काळामध्ये राज्यकर्त्यांचा विरोधातला अत्यंत तीव्र अशा प्रकारचा संताप व्यक्त करण्यासाठी म्हणून जॅक्सन नावाच्या जिल्हाधिकाऱ्याची हत्या करण्यात आली. ते थोर स्वातंत्र्येसनानी अनंत कान्हेरे, विनायक देशपांडे, गोपाळराव कर्वे यांना 10 एप्रिल 1910 रोजी म्हणजे 100 वर्षापूर्वी शिक्षा सुनावण्यात आली. आज या गोष्टीला शंभर वर्षे पूर्ण झालेली आहेत. त्याची आठवण ठेवून सभागृहामध्ये भावना व्यक्त करण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी प्रस्ताव मांडला त्याला मी पाठिंबा देतो आणि स्वातंत्र्यसेनानीं विषयी मनापासून आदरभाव व्यक्त करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.वसंत पवार (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी श्री.अण्णासाहेब गणपतराव गिते यांच्या दु:खद निधनानिमित्त जो शोक प्रस्ताव मांडला आहे, त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

दिवंगत श्री.अण्णासाहेब गणपतराव गिते यांनी विधान परिषद सदस्य आणि विधान सभा सदस्य म्हणून सभागृहाच्या माध्यमातून अत्यंत चांगल्या प्रकारची समाजसेवा केली आहे.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यामुळे त्यांचे नाव अजरामर झालेले आहे पक्षाच्या वतीने मी त्यांना आदराजंली अर्पण करतो.

सभापती महोदय,नाशिकच्या विजयानंद थिएटरमध्ये किर्लोस्कर नाटक कंपनीच्या "संगीत शारदा" या नाटकाचा प्रयोग सुरु असतांना हुतात्मा अनंत कान्हेरे यांनी त्यावेळचे जिल्हाधिकारी जॅक्सन यांचा वध केला होता व स्वत: हुतात्मा झाले होते त्याला आज 100 वर्षे पूर्ण झालेली आहेत. इतिहास हा तर्काने तोलावयाचा असतो आणि बुध्दीने मापावयाचा असतो. इतिहासापासून शिकवणूकसुध्दा घ्यावयाची असते. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास अत्यंत देदिप्यमान , स्वाभिमान जागविणारा , संस्कृतीची जपणूक करणारा आहे यासबंधी नवीन पिढीला आणि नवीन विद्यार्थ्यांना माहिती असणे फार गरजेचे आहे. स्वातंत्र्याची ओढ प्रत्येकाला असणे आवश्यक आहे. एखादी व्यक्ती स्वातंत्र्यात जन्माला आलेली असल्यामुळे पारतंत्र्य काय आहे हे त्याला माहीत असत नाही परतु जोपर्यंत पारतंत्र्य काय आहे हे कळत नाही तोपर्यंत स्वातंत्र्याची ओढ लागत नाही.अशा ऐतिहासिक बाबी नवीन पिढीच्या समोर ठेवण्याचे काम शासनाने करावे असे मला सांगावयाचे आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी स्वत: या हुतात्म्यांचे स्मरण केलेले असल्यामुळे मी माननीय मुख्यमंत्र्यांना धन्यवाद देतो .अनंत कान्हेरे हे कोकणातील होते .कोकणातील माणूस अत्यंत नेटका आणि चांगला असतो इतकेच नव्हे तर तो स्वाभिमानी, स्वातंत्र्यप्रेमी आणि मातृप्रेम दाखविणारा असतो. अनंत कान्हेरे यांनी नाशिकमध्ये येऊन सिन्नर तालुक्यातील ठाणगाव येथील विनायक देशपांडे यांना त्याचबरोबर गोपाळ कृष्णजी कर्वे यांना बरोबर घेऊन जॅक्सनचा वध केला होता. नाशिकमध्ये जॅक्सन यांनी अत्याचार केले होते त्याचबरोबर तात्याराव सावरकर यांना जी शिक्षा देण्यात आली होती त्यामध्ये जॅक्सनचा मोठा रोल होता त्यामुळे तरुणांचे रक्त सळसळले होते आणि् या तरुणांनी जॅक्सनचा वध केला होता. नाशिकमधील प्रा.रामदास बरकले,डॉ.प्राची पवार यांनी "यज्ञ" नावाचा एक लघूपट तयार केला असून तो लघूपट आज लोकार्पण होणार आहे. मातीला फार महत्व असते त्यामुळे या तीन जणांच्या गावातील माती नाशिकला आणून उद्या मिरवणुकीने विसर्जन करण्यात येणार आहे. सर्व शाळा कॉलेजमध्ये व सर्व सामाजिक संस्थामध्ये दर वर्षी 19 एप्रिल या दिवशी पुण्यस्मरण करण्याचे आदेश शासनाने द्यावेत अशी मी शासनाला विनंती करतो. त्याचबरोबर हुतात्मा अनंत कान्हेरे,हुतात्मा विनायक देशपांडे, हुतात्मा गोपाळ



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.वसंत पवार..

कृष्णाजी कर्वे यांच्या पवित्र स्मृतीस मानाचा मुजरा करतो आणि आपल्याला जे स्वातंत्र्य मिळालेले आहे ते आपण जपून ठेवू या आणि नवीन पिढीच्या विकासासाठी तसेच समृध्दीसाठी प्रयत्न करु या एवढीच मी या निमित्ताने विनंती करतो व माझे दोन शब्द संपवितो.

--------.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, श्री अण्णासाहेब गणपतराव शिंदे माजी वि.प.स. याच्या दु:ख निधनाबद्दल माननीय मुख्यमंत्री श्री अशोक चव्हाण जो शोक प्रस्ताव माडलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, हुतात्मा अनंत कान्हेरे, हुतात्मा विनायक देशपांडे आणि हुतात्मा गोपाळ उर्फ कर्वे यांना 100 वर्षापूर्वी आजच्या दिवशी फाशी देण्यात आले होते. सभापती महोदय, ज्या खेड मतदारसंघाचे गेली 20 वर्षे मी प्रतिनिधित्व केले होते त्या खेड मतदारसंघातील कान्हेरेऐनी नावाचे गाव असून त्या गावात अनंत कान्हेरे यांचा जन्म झाला होता. मला माननीय मुख्यमंत्र्यांचे आभार मानावयाचे आहेत.

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

आज त्यांना फाशी दिल्याला 100 वर्षे झाली. त्या अनुषंगाने हा प्रस्ताव सभागृहासमोर मांडण्यात आला आहे. सभापती महोदय, या सभागृहाच्या वतीने माननीय मुख्यमंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, मध्यंतरीच्या काळात अनेक हुतात्मा स्मारके या राज्यामध्ये उभारण्यात आली. हुतात्मा अनंत कान्हेरे यांच्या जन्मगावामध्ये हुतात्मा स्मारक बांधण्याकडे शासनाचे दुर्लक्ष झाले आहे. शिवशाहीचे सरकार असतांना माजी मुख्यमंत्री माननीय श्री. मनोहर जोशी यांनी या स्मारकासाठी 5 लाख रुपयांचा निधी दिला होता. त्या निधीमध्ये जेवढे काम व्हावयास पाहिजे तेवढे काम झाले, बाकीचे काम अपूर्ण आहे. मी यानिमित्ताने शासनाला सांगू इच्छितो की, हुतात्मा अनंत कान्हेरे यांच्या कान्हेरे या जन्मगावी अपूर्ण असलेले हुतात्मा स्मारक पूर्ण होण्यासाठी आपण वैयक्तिक लक्ष घालून संबंधितांना सूचना द्याव्यात अशी विनंती करतो. आणि पुन्हा एकदा तिन्ही हुतात्म्यांना आदरांजली वाहून माझे भाषण संपवितो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, श्री. अणासाहेब गणपतराव गिते, माजी विधानपरिषद सदस्य यांच्या दु:खद निधनाबद्दल मांडण्यात आलेल्या शोकप्रस्तावावर मी मन:पूर्वक शोक व्यक्त करीत आहे. त्याचप्रमाणे आजच्या ऐतिहासिक दिवसाच्या निमित्ताने माननीय मुख्यमंत्र्यांनी हुतात्म्यांना अभिवादन करण्याचा ठराव मांडला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, आज या तिन्ही क्रांतिकारकांना ठाणे येथील मध्यवर्ती कारागृहामध्ये फाशी दिल्याला 100 वर्षे पूर्ण झाली आहेत. ठाणे शहरामध्ये 1857 साली मध्यवर्ती कारागृह बांधण्यात आले. त्याठिकाणी आज सकाळी साडे पाच वाजता आयोजित करण्यात आलेल्या अभिवादनाच्या कार्यक्रमासाठी शेकडो लोक जमा झाले होते. या ऐतिहासिक दिवसाचे औचित्य साधून मी देखील त्याठिक्राणी उपस्थित होतो. कारागृहामध्ये क्रांतिकारकांना ज्याठिकाणी आज फाशी देण्यात आले त्याठिकाण्ी जलाभिषेक व पुष्प अर्पण करुन हुतात्म्यांना अभिवादन कले व आदरांजली वाहिली. त्यावेळी अनेक संस्थांची मंडळी त्याठिक्राणी उपस्थित होती. माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितल्याप्रमाणे 1910 साली ज्यावेळी त्यांना फाशी देण्यात आले त्यावेळी जसे वातावरण होते, तसेच वातावरण ठेवलेले आपल्याला दिसले. या थोर क्रांतिकारकांचा इतिहास आपणा सर्वांना अतिशय प्रेरणादायी असल्यामुळे त्याठिकाणी अनेक राष्ट्रप्रेमी नागरीक आज जमले होते. प्रत्यक्ष ज्याठिकाणी हुतात्म्यांना फाशी देण्यात आले त्याठिकाणी उपस्थित राहून हुतात्म्यांना अभिवादन करण्यासाठी प्रवेश मिळावा अशी त्यांची इच्छा होती. परंतु फक्त 10 लोकांना त्याठिकाणी उपस्थित रहाण्यास परवानगी दिली होती. म्हणून मी यानिमित्ताने शासनाला विनंती करतो की, हा इतिहास विद्यार्थ्यांच्या आणि तरुणांच्या लक्षात राहिला पाहिजे. त्यामधून त्यांना बोध घेता आला पाहिजे. याकरिता 15 ऑगस्ट, 26 जानेवारी, 19 एप्रिल या दिवसांचे औचित्य साधून वर्षातील काही दिवस ज्याठिकाणी फाशी देण्यात आले त्या जागेला भेट देण्यासाठी सर्व लोकांना मुक्त प्रवेश असला पाहिजे. ज्यामधून आजच्या तरुणांना अनुभव आणि अनुभूती मिळेल. आजच्या दिवशी या क्रांतिकारकांनी तरुण वयामध्ये हसत हसत बलिदान दिले, तो इतिहास लोकांना आठविता येईल, आणि त्याठिकाणी सर्व नागरीक जाऊन पाहू शकतील. असे जर केले तर शासनाला ते प्रेरणादायी ठरले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर....

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी सांगितल्याप्रमाणे हुतात्मा अनंत कान्हेरे यांच्या स्मारकाचे काम 1991 सालापासून अपूर्णावस्थेत आहे. युती सरकारने त्या कामासाठी 5 लाखांचा निधी दिला होता. परंतु नंतर निधी न मिळाल्यामुळे ते काम अपूर्ण आहे. मी स्वत: त्या गावी जावून आलो आहे. तेव्हा क्रांतिकारकांच्या बलिदानाला झालेल्या 100 वर्षाचे औचित्य साधून शासनाने निधीची तरतूद तातडीने करुन ते स्मारक पूर्ण करावे. त्यामधून तरुणांना निश्चितपणे प्रेरणा मिळेल. दुसरी गोष्ट अशी की, राज्य सरकारने ज्या क्रांतिकारकांची स्मारके निर्माण केली आहेत त्या क्रांतिकारकांचे नाव त्या गावाला देण्याचा ठराव केला. महाराष्ट्रामध्ये अनेक क्रांतिकारक होऊन गेले, त्यांच्या जन्मगावाला त्या क्रांतिकारकांचे नाव देण्यात यावे अशी मी मागणी करतो. जेणेकरुन त्यांची स्मृती चिरंतन काळ टिकून राहील. पुन्हा एकदा माननीय मुख्यमंत्र्यांनी मांडलेल्या अभिवादनाच्या ठरावाला पाठिंबा देऊन माझे भाषण संपवितो.

---

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, संपूर्ण भारत देशाला स्वातंत्र्य मिळाले आणि स्वातंत्र्यांच्या संपूर्ण इतिहासामध्ये अनेक जणांनी आपल्या प्राणांची आहुती दिली आणि यासंबंधीचा फार मोठा इतिहास स्वातंत्र्यप्राप्तीच्या संपूर्ण घटनांमध्ये आहे. तसेच या सदनामध्ये स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्यांच्या स्मृतीला अभिवादन करण्याच्या संबंधात देखील विषय आहे. देशाच्या स्वातंत्र्यासाठी जे हुतात्मे झाले, त्यांना आज 100 वर्षे झाली आहेत. अशा महान हुतात्म्यांना याठिकाणी श्रध्दांजली द्यावी आणि सर्व सभागृहाने यानिमित्ताने त्यांची आठवण करावी या उद्देशाने त्यांना अभिवादन करण्यासंबंधीचा अत्यंत महत्वपूर्ण अशा प्रकारचा ठराव येथे मांडण्यात आलेला आहे. भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये तत्कालीन ब्रिटीश जिल्हाधिकारी जॅक्सन यांचा निधडया छातीचे क्रांतीकारक सर्वश्री. अनंत कान्हेरेजी, विनायक देशपांडेजी व गोपाळ उर्फ अण्णा कर्वेजी यांनी वध केला आणि ज्यांनी स्वातंत्र्यांच्या चळवळीमध्ये देशातील संपूर्ण जनतेला प्रेरणा देण्याचे काम केले. त्या घटनेला आज 19 एप्रिल 2010 रोजी 100 वर्षे पूर्ण झालेली आहेत. अशा वेळी त्यांच्या पवित्र स्मृतीला सभागृहाच्यावतीने आणि आपल्या सर्वांच्यावतीने मी विनम्र अभिवादन करतो.

---

... .2 जी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाणसाहेबांनी कै.अण्णासाहेब गणपतराव गिते, या सदनाचे माजी सन्माननीय सदस्य यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे, त्याला सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर आणि सर्व गटनेत्यांनी याठिकाणी आपापल्या भावना व्यक्त करुन आपला पाठिंबा दिलेला आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या लढयामध्ये आणि गोवा मुक्ती आंदोलनामध्ये स्व.अण्णासाहेब गणपतराव गिते यांनी हिरिरीने भाग घेतला. ते सुरवाती पासूनच कम्युनिस्ट पक्षाचे एक सक्रिय कार्यकर्ता होते. चिनी आक्रमणानंतर त्यांनी काँग्रेस पक्षाचे कार्य सुरु केले. सन 1957 ते 1960 या कालावधीत ते बीड जिल्हा लोकल बोर्डाचे ते सन्माननीय सदस्य होते. 1962 व 1967 या दोन्ही वेळेस ते बीड जिल्ह्यातील रेणापूर मतदार संघातून विधान सभेमध्ये निवडून आले होते. 1980 मध्ये महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारे निर्वाचित म्हणून ते विधान परिषदेवर निवडून आले होते. अशा या समाजसेवकाचे दिनांक 7 ऑक्टोबर 2009 रोजी दु:खद निधन झाले.

भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या काळात तत्कालीन ब्रिटीश जिल्हाधिकारी क्रुरकर्मा जॅक्सन यांचा निधड्या छातीचे क्रांतीकारक सर्वश्री.अनंत कान्हेरे, विनायक देशपांडे व गोपाळ उर्फ अण्णा कर्वे यांनी वध केला. त्यामुळे तत्कालीन ब्रिटीश सरकारने या क्रांतीकारांना दि.19 एप्रिल 1910 रोजी ठाणे कारागृहात फाशीची शिक्षा दिली.

भारतमातेच्या स्वातंत्र्यासाठी जीवाची बाजी लावलेल्या क्रांतीकारकांच्या बलिदानाच्या या घटनेला दि.19 एप्रिल 2010 रोजी 100 वर्षे पूर्ण झाली आहेत. त्या निमित्ताने त्यांच्या पवित्र स्मृतीस सभागृहाच्यावतीने मी विनम्र अभिवादन करीत आहे. या राज्याचे सन्माननीय मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण यांनी जो प्रस्ताव मांडला आहे, तो आपण या सभागृहाच्यावतीने एकमताने मान्य करु या.

स्व.अण्णासाहेब गणपतराव गिते, माजी वि.प.स.यांच्या स्मृतीला वंदन करुन आपण त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहू या आणि त्याकरता आपण सर्वांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा अशी माझी विनंती आहे.

(सदस्य उभे रहातात.)

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकूल कुटुंबियांकडे पाठविण्यात येईल.

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .....

आता मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांकरिता तहकूब करीत आहे.

( सभागृहाची बैठक 2.50 ते 3.05 वाजेपर्यंत तहकूब झाली )

---

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**पृ.शी./मु.शी.** : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. भास्कर जाधव ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समितीचा सन 2007-08 चा एकविसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा सन 2008-09 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

श्री. विजय वडेट्टीवार ( जलसंपदा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचा सन 2005-2006, 2006-2007 व 2007-2008 चा वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

---

श्री. सचिन अहिर ( उद्योग राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचा सन 2006-2007 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : औचित्याचे मुद्दे

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. पुण्यातील प्रथमश्रेणी महिला अधिकारी परळी वैजनाथ येथे दर्शनाकरिता सहकुटुंब जाऊन देवदर्शन करुन परत येत असताना बीड-नगर रस्त्यावर कुख्यात गुंड दीपक जावळे आणि त्यांच्या 4 साथीदारांनी 35 किलोमीटर त्या महिला अधिकाऱ्याचा पाठलाग करुन शिवारामध्ये त्यांच्या गाडीला रोखून तिचे पती आणि मुले यांना जबर मारहाण करुन त्या महिलेला गाडीतून खेचून आपल्या गाडीत बसविले आणि शिवारामध्ये नेऊन तिच्यावर सामूहिक बलात्कार केला आणि नंतर त्या महिलेला अंगावर कोणतेही कापड नसताना रस्त्यावर सोडून दिले. सभापती महोदय, या अधिवेशनामध्ये यापूर्वी सुध्दा पुण्यामध्ये घडलेल्या अशा दोन चार घटनांच्या बाबतीत चर्चा झाली.. हिंजवडी येथे घडलेले सामूहिक बलात्काराचे प्रकरण असेल किंवा इतर तीन चार प्रकरणे असतील त्यासंदर्भात सभागृहामध्ये चर्चा झाली.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी....

सन्माननीय गृहमंत्र्यांनी यावर उत्तर दिले. परंतु आजही अशा पध्दतीचे नराधम आहेत. त्यांना अशा पध्दतीचा सामुदायिक गुन्हा करीत असताना काही वाटत नाही. त्याच्या पाठीमागचे कारण शोधून काढणे आवश्यक आहे. पूर्वी गुन्हेगारांना पोलिसांचा धाक वाटत होता, दहशत वाटत होती. परंतु आपली न्यायिक व्यवस्था, सीआयडीचे रिपोर्ट पाहिले तर या राज्यातील फौजदारी घटनांमध्ये अनेक गुन्हेगार निर्दोष सुटतात. म्हणून दीपक जावळे याच्यासारखे कुख्यात गुंड व त्याचे साथीदार असे गुन्हे करण्यासाठी धजावतात. म्हणून बलात्काराच्या ज्या केसेस असतील त्याचा निकाल लवकर लागण्यासाठी जलद गती न्यायालयाच्या माध्यमातून, मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडीपीठाकडून 6 महिन्यात निकाल लावण्यासाठी एका विशिष्ट सरकारी अधिका-याची नेमणूक करावी तसेच या चारही आरोपींना मोक्का लावला जाईल काय असे मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला विचारु इच्छितो. सभागृहात सन्माननीय गृहराज्यमंत्री उपस्थित आहेत. त्यांनी याबाबत उत्तर दिले तर बरे होईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या विषयाचा उल्लेख असलेली नियम 289 ची सूचना आम्ही दिलेली आहे. माननीय सभापती महोदयांनी या विषयाची चर्चा मान्य केलेली आहे.

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी मांडलेला विषय अतिशय भयानक व गंभीर स्वरुपाचा आहे. या गुन्हेगारांनी सुशिक्षित महिलेवर सामूहिक बलात्कार करुन अत्यंत घृणास्पद प्रकार केला आहे. या विषयाचे गांभीर्य ओळखून अशा गुन्हेगारांना शासन कधीही पाठिशी घालणार नाही. अशाप्रकारे महिलांवर अत्याचार करणा-या गुन्हेगारांना जरब बसविण्यासाठी सन्माननीय सदस्यांनी सूचित केल्याप्रमाणे या गुन्हेगारांना मोक्का लावून कारवाई केली जाईल.

---

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ SBT/

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. कोकणातील काजू, रातंबा, जांभूळ या फळांचे पीक कमी आलेले आहे. सध्याच्या हवामानामुळे आंबे गळून पडत आहेत. दिनांक 16.4.2010 रोजी पडलेल्या पावसामुळे आंब्याचे पीक नष्ट झाले आहे. आधीच पीक कमी होते त्यात आता पडलेल्या पावसामुळे केवळ 10 टक्के आंब्याचे पीक शिल्लक राहिले आहे. याबाबतची चर्चा माननीय सभापतींनी मान्य केलेली आहे. या पावसामुळे सिंधुदुर्ग जिल्हयातील 380 घरांचे नुकसान झाले, वैभववाडी तालुक्यातील 215 घरांचे नुकसान झाले व एक घर पूर्णपणे जमीनदोस्त झाले. अनेक गोठयांचे नुकसान झाले, अनेक ठिकाणच्या झाडांचे नुकसान झाले. या वाईट हवामानामुळे व पावसामुळे या शेतक-यांचे नुकसान झाले आहे त्याबाबत चर्चा करण्यात यावी असे मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाचे लक्ष वेधत आहे.

---

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार प.पू.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे चैत्यभूमी परिसराजवळील इंदू मिलच्या जागेवर आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक जलद गतीने व्हावे.

यानंतर श्री.शिगम.....

अशुद्धीत प्रत / अशुद्धीपत्रक नाही

(श्री.सुभाष चव्हाण ...

या दृष्टीने माननीय मुख्यमंत्री यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील ज्येष्ठ आणि श्रेष्ठ दलित नेते तसेच विधिमंडळातील दलित लोकप्रतिनिधी यांच्या शिष्टमंडळाने माननीय पंतप्रधानांची भेट घेऊन मिलची जमीन तातडीने आणि त्वरित ताब्यात मिळावी तसेच पुढील कार्यास गती मिळण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत. या राज्यातील सर्व दलित वर्गातील जनतेच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. त्यामुळे त्यांच्यात तीव्र असंतोष व संतापाची भावना पसरलेली असल्यामुळे हा औचित्याचा मुद्दा मी मांडत आहे.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>कोठारी प्रकरणाबाबत</u>**

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, 90 वर्षाच्या कोठारी नावाच्या....

**उपसभापती** : या प्रकरणामध्ये शासनाची भूमिका ब-याच वेळा विशद करण्यात आलेली आहे.या बाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांकडे मिटींग झालेली आहे. मला असे वाटते की, तो विषय ज्या पध्दतीने जायला पाहिजे त्या पध्दतीने गेलेला आहे.

--

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. गोपिकिसन बाजोरिया व दिवाकर रावते यांनी "अकोला जिल्ह्यातील पातूर, बाळापूर तसेच अन्य तालुक्यातील कोल्हापुरी पध्दतीच्या बंधा-याच्या बांधकामामध्ये झालेल्या गैरव्यवहाराच्या संदर्भात चौकशी अधिकारी यांनी केलेल्या चौकशीत कोणताही गैरव्यवहार झाला नसल्याचा बनावट अहवाल सादर करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री किरण पावसकर व परशुराम उपरकर यांनी "ठाणे जिल्हयातील कोपरी, कळवा, खारेगाव ते बाळकुंभ आणि गायमुख पर्यंतच्या भागात असलेल्या तिवरांची झाडे नवी मुंबई सेझ, जेएनपिटी तसेच खाजगी क्षेत्रातील कंटेनर फेट स्टेशनकरिता तसेच उरण तालुक्यातील भरावाकरिता अडथळा निर्माण होत असल्याच्या कारणावरुन तिवरांच्या झाडांची मोठया प्रमाणात होत असलेली कत्तल " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र. पाटील व कपिल पाटील यांनी "जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीमध्ये तसेच पेट्रोल व डिझेलमध्ये मोठ्या प्रमाणात भाववाढ झाल्या प्रकारणी ज्येष्ठ सामाजिक नेते डॉ. बाबा आढाव आणि सामाजिक नेते, भाई वैद्य यांच्या नेतृत्वाखाली पुण्यात व राज्यात बेमुदत सत्याग्रह सुरु असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते व विनोद तावडे यांनी "शासनाने सन 1996मध्ये ठाणे जिल्हा व सत्र न्यायालयाचे विभाजन करुन कल्याण येथे कल्याण, शहापूर, मुरबाड तालुक्यासाठी तसेच पालघर येथे पालघर, वसई, डहाणू व तलासरी या तालुक्यांसाठी जिल्हा व सत्र न्यायालय स्थापन केले आहे. त्याच धर्तीवर सन 2010 मध्ये भिवंडी येथे स्वतंत्र जिल्हा व सत्र न्यायालय स्थापन करण्याबाबत काढलेल्या अधिसूचनेच्या विरोधात जिल्हा

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

न्यायालयातील वकिलांनी दि. 3.4.2010 रोजीपासून साखळी उपाषण सुरु केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते व संजय केळकर यांनी "दिनांक 18 एप्रिल 2010 रोजी धारावी येथील कामराज हौसिंग सोसायटीच्या लिप्टमध्ये चिरडून सात वर्षाच्या मुलीचा झालेला मृत्यू" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री परशुराम उपरकर व किरण पावसकर यांनी "दिनांक 13.4.2010 रोजी वा त्या सुमारास कुडाळ शहरातील जीवन विद्या मंदिर शाळा नं. 1 मध्ये शिकणारे राकेश केसरकर, सुनील राठोड, सुभाष नाईक या विद्यार्थ्यांना शाळेवर दगडफेक केली या गैरसमजापोटी तालुका मास्तरांनी केलेल्या फोनवरुन पोलिसांनी पोलीस स्टेशनमध्ये नेऊन केस कापल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

अन्य सूचनांना मी दालनातच अनुमती नाकारलेली आहे.

---

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**<u>हरकतीच्या मुद्याबाबत</u>**

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, नियम 93च्या सूचना दिलेल्या सन्माननीय सदस्यांची नावे आपण वाचून दाखविली. सन्माननीय सदस्य श्री. जगदीश गुप्ता यांनी देखील 93ची सूचना दिलेली असून त्यांच्या नावाचा आपण उल्लेख केला. परंतु सन्माननीय सदस्य श्री. जगदीश गुप्ता हे सभागृहामध्ये हजर नाहीत. ते हजर नसताना त्यांचे नाव येणे अप्रस्तुत आहे. साधनशुचितेचा आग्रह धरणा-या भारतीय जनता पक्षाच्या साधनशुचितेमध्ये हे बसत नाही.

**उपासभापती** : मी काही वेळा सन्माननीय सदस्य श्री. जगदिश गुप्ता यांना सभागृहामध्ये बसलेले पाहिलेले आहे आणि काही वेळा नाही.

--

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी.** : तिलारी धरण प्रकल्पात झालेला भ्रष्टाचार

**मु.शी.** : तिलारी धरण प्रकल्पात झालेला भ्रष्टाचार याबाबत श्री परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी नियम 93अन्वये दिलेली सूचना

श्री. विजय वडेट्टीवार (जलसंपदा राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्री. परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी "तिलारी धरण प्रकल्पात झालेला भ्रष्टाचार" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

....नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्रमांक-1.....

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, हे अधिकारी 10 ते 12 वर्षापासून एकाच ठिकाणी कार्यरत आहेत. त्यामुळे मुख्य धरणाच्या कामात मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे. तिलारी घाट दुरुस्ती करताना जे डांबरीकरण करण्यात आले ते डांबरीकरणाचे काम वाहून गेले. यामध्ये सुध्दा मोठा भ्रष्टाचार झालेला आहे. त्याठिकाणी श्री.चौगुले नावाचे शाखा अभियंता दहा वर्षापासून कार्यरत होते. दोन वर्षापासून ते उपअभियंता म्हणून कार्यरत आहेत. कालव्याच्या कामासाठी श्री.पंतगे, श्री.जाधव व श्री.मुळीक हे दहा वर्षापासून एकाच ठिकाणी शाखा अभियंता म्हणून कार्यरत आहेत. हे अधिकारी सर्व कामे स्वत:च करीत असतात. दहा वर्षे एकाच ठिकाणी कार्यरत असल्यामुळे या अधिकाऱ्यांची बदली करणार आहात काय? जो भ्रष्टाचार झाला त्याची चौकशी करण्यात येईल काय?

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे जर एखाद्या शाखा अभियंत्याला दहा वर्षे एकाच ठिकाणी झाली असतील तर नक्की बदली केली जाईल. या प्रकरणात गैरप्रकार झाला असे सन्माननीय सदस्यांनी म्हटले आहे. अशा प्रकारची तक्रार शासनाकडे प्राप्त झालेली नाही, त्यामुळे भ्रष्टाचार झाला असे म्हणण्यात अर्थ नाही.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतन निश्चितीबाबत होत असलेला अक्षम्य विलंब

**मु. शी.** : शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतन निश्चितीबाबत होत असलेला अक्षम्य विलंब याबाबत प्रा.बी.टी.देशमुख, सर्वश्री वसंतराव खोटरे, दिलीपराव सोनवणे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा.वर्षा गायकवाड (उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, प्रा.बी.देशमुख, सर्वश्री वसंतराव खोटरे, दिलीपराव सोनवणे यांनी "शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतननिश्चितीबाबत होत असलेला अक्षम्य विलंब" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्रमांक-2.....

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, जे निवेदन वितरीत करण्यात आले आहे हे अतिशय दुर्दैवी अशा प्रकारचे निवेदन आहे. 20 मार्च, 2010 रोजी सभागृहामध्ये नियम 93 अन्वये सूचना उपस्थित केली होती. फेब्रुवारीचे वेतन महाराष्ट्रभर झालेले नव्हते. आपण आदेश दिले होते की, 31 मार्चपर्यंत या संदर्भात निवेदन करावे. सभापती महोदय, आपण चेअरवरुन आदेश दिल्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात फेब्रुवारीचे जे वेतन अदा झाले नव्हते, ते वेतन आपण आदेश दिल्यामुळे पुढच्या पाच-सात दिवसांमध्ये दिले गेले. मार्च पेड इन एप्रिलच्या वेतनाबाबत आम्ही मुद्दा उपस्थित केला आहे. पण निवेदनामध्ये काहीही म्हटलेले नाही. फेब्रुवारी महिन्याचे वेतन आपण आदेश दिल्यानंतर दिले गेले. हा महाराष्ट्रव्यापी विषय आहे. मार्च पेड इन एप्रिलचे वेतन का दिले गेले नाही? या संदर्भात निवेदनामध्ये उत्तर येणे अपेक्षित होते. पण मी आता महाराष्ट्रव्यापी प्रश्नाबाबत न विचारता मी फक्त मुंबईबाबत विचारु इच्छितो. मुंबईमध्ये अत्यंत गंभीर अशा प्रकारची परिस्थिती निर्माण झालेली आहे. मुंबईचे स्वतंत्र राज्य आपण निर्माण केले आहे का? मुंबईचे जे उच्च शिक्षण सहसंचालक आहेत त्यांना असे काही कळविले आहे का? संपूर्ण महाराष्ट्रामध्ये जो शासन निर्णय लागू आहे, तो निर्णय बाजूला ठेवून फक्त मुंबईमध्ये वेगळे नियम केले. नियम 93 च्या सूचनेमध्ये असा आरोप केला होता की, सहसंचालक हे अंमलबजावणी अधिकारी आहेत, ते विधीविधान करणारे अधिकारी नाहीत. डेलिगेटेड लजिस्लेशनचे अधिकार त्यांना दिलेले नाहीत. शासन निर्णयामध्ये जे प्रोफॉर्मे दिलेले आहेत. त्यापेक्षा त्यांनी वेगळा प्रोफॉर्मा त्यांच्या स्तरावर काढला. निवेदनात म्हटले आहे की, "शासन निर्णयापेक्षा वेगळा कोणताही प्रोफॉर्मा वापरल्याचे आढळून आलेले नाही." त्यांनी वेगळा प्रोफॉर्मा वापरल्याचे आढळून आले आहे हे मी आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो. निवेदनात शेवटच्या दोन ओळीत म्हटले आहे की, दि.26 मार्च, 2010 रोजी दिलेले निवेदन शासनास प्राप्त झालेले आहे. त्या निवेदनामध्ये सहावे इन्क्लोजर म्हणजे तो सहसंचालक निर्मित प्रोफॉर्मा आहे. फक्त मुंबईसाठी नवीन प्रोफॉर्मा केला आहे का? जी.आर.मध्ये तीन प्रोफॉर्मे दिले आहेत. त्याबाबत कोणाची काही हरकत नाही. संपूर्ण महाराष्ट्रासाठी तीन प्रोफॉर्म्याप्रमाणे काम झाले आणि या सहसंचालकांनी हा वेगळा प्रोफॉर्मा त्यांच्या स्तरावर काढला. शासनाने असे आढळून आले नसल्याचे म्हटले आहे. याचा अर्थ सहसंचालकांनी तसे लिहून दिले असले पाहिजे. तो प्रोफॉर्मा मा.राज्यमंत्र्यांच्या टेबलवर आहे. किती हास्यास्पद आणि पोरकट व

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्रमांक-2..... प्रा.बी.टी.देशमुख.....

भ्रष्ट हेतूने काढलेला हा प्रोफॉर्मा आहे. फक्त मुंबईबाबत पदव्युत्तर पदवीचे प्रमाणपत्र मागितले आहे. 25 वर्षे प्राध्यापक म्हणून जो इसम काम करीत आहे त्यांच्याकडे गुणपत्रिका मागितली आहे. डेप्युटी कलेक्टर आणि कलेक्टर यांचे फिक्सेशन करताना गुणपत्रिका मागितलेली आहे का आपण? शासनाने दिलेल्या आदेशाप्रमाणे जे प्रोफॉर्मे आहेत त्या प्रोफॉर्म्यामध्ये गुणपत्रिका मागितलेली नाही. पोरकट अशा अटी घातल्या आहेत. "महाविद्यालय 100 टक्के अनुदानावर केव्हापासून आले आहे" याची माहिती मागितली आहे. 100 टक्के अनुदानाचा प्रश्न त्या संस्थेला अनुदान मंजूर करताना उद्भवतो. शिक्षकांचा त्याच्याशी काय संबंध? असा आगाऊपणा यांनी का करावा? हास्यास्पद अशा 17 अटी मुंबईच्या सहसंचालकांनी नमूद केलेल्या आहेत. मुंबईमध्ये अशाप्रकारे काम सुरु आहे. त्यांनी शासन निर्णयाचा भंग केलेला आहे. संचालकांच्या आदेशाची अवहेलना केलेली आहे. संचालकांनी त्यांना स्पष्ट आदेश दिले होते आणि हे आदेश.....

नंतर 2एम..1...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख .....

3 ऑक्टोबर, 2009 रोजी दिलेले हे आदेश आहेत. "विद्यापीठाने सादर केलेल्या वेतन निश्चिती प्रस्तावासंबंधी उपरोक्त नमूद केलेली सर्व प्रमाणपत्रे तपासून ती योग्य असल्याची खात्री करुन संबंधित वेतन निश्चिती प्रमाणित करावी" असे आदेश दिल्यानंतर या सह संचालकांनी उलट काम केले आणि विद्यापीठालाही सह संचालकांनी आदेश दिले आहेत. असे आदेश देण्याचे अधिकार या सह संचालकांना आहेत काय ? अशा प्रकारे डेलिगेटेड लेजिस्लेशन, अशा प्रकारची हुकूमशाही करुन सह संचालकांनी 12 ऑगस्ट, 2009 च्या शासन निर्णयाचा भंग केलेला आहे, संचालकांच्या 3.10.2009 च्या आदेशांचा भंग केला आहे. निवेदनात म्हटले आहे की, "दि. 15 जानेवारी, 2010 पर्यंत हे काम पूर्ण करावे" असे त्यांना आदेश होते. त्यांनी त्या आदेशाचे पालन केले नाही. यासाठी मुदत मागवून घ्यावयास पाहिजे होती ती सुध्दा घेतली नाही.. अशा प्रकारे या सह संचालकांनी शासनाच्या निर्णयाचाच भंग केला आहे, संचालकांच्या आदेशांचा भंग केला म्हणून सह संचालकांनी त्यांच्या स्तरावर जे आदेश काढले ते मागे घेऊन शासन निर्णयानुसारच वेतन निश्चिती होणे आवश्यक आहे. तसेच याप्रकरणी सह संचालकांची चौकशी होऊन त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. ते शासन करणार काय ? तसेच शासन निर्णयातील परिच्छेद 12 (1) व (2) प्रमाणे तसेच संचालकांच्या 3.10.2003 आदेशानुसार संपूर्ण राज्यात ज्याप्रमाणे वेतन निश्चिती झाली त्याप्रमाणे मुंबई विभागात पुढील 10 दिवसात अशी वेतननिश्चिती करण्याबाबतचे सक्त आदेश देण्यात येतील काय ?

प्रा. वर्षा गायकवाड : महोदय, दि. 12.8.2009 च्या शासन निर्णयाप्रमाणे हा प्रोफॉर्म तयार केलेला असून परिपत्रकातील क्र. 8 (ई)(1) नुसार त्यांना हे अधिकार दिलेले आहेत. यामागे उद्देश असाच आहे की, प्रकरणे लवकरात लवकर निकाली निघावीत तसेच अधिकची माहिती व टिप्पणी मिळावी म्हणून हा प्रो-फॉर्म काढलेला आहे.....

प्रा.बी.टी.देशमुख : महोदय, शासन निर्णय स्पष्टपणे असताना सह संचालकांना अशा प्रकारचा प्रोफॉर्म काढण्याचा अधिकार पुन्हा शासनाने दिलेला आहे काय ? असे असेल तर मी त्यातील सर्वचे सर्व मुद्दे सभागृहाला वाचून दाखविणार आहे. तसेच मुंबईकरिता स्वतंत्र प्रोफार्म काढलेला आहे तर महाराष्ट्रापासून मुंबई वेगळी झालेली आहे काय ? या मुद्यांची उत्तरे त्यांनी द्यावीत. मंत्री महोदया मुद्देसूद उत्तरे देत नाहीत.....

....2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड : महोदय, हा प्रोफार्म अधिकची माहिती यावी तसेच टिप्पणी मिळावी म्हणून काढलेला आहे, तो प्रोफॉर्म आता शासनाने बंद केलेला आहे.....

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात)

श्री. दिवाकर रावते : ज्या सह संचालकांनी अशा प्रकारे शासन निर्णयाचा भंग करुन स्वतंत्र आदेश काढले आहेत, नवीन प्रोफार्म काढलेला आहे त्यांना निलंबित केले पाहिजे. कारण अशा प्रकारे मुंबईसाठी स्वतंत्र प्रोफॉर्म काढून त्यांनी एक प्रकारे मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी करण्याचे काम केलेले आहे.

श्री. रामदास कदम : जो सह संचालक मुंबई राज्यापासून वेगळी करु पाहत आहे त्याला आजच्या आज निलंबित केले पाहिजे.....अडथळा.....महाराष्ट्रासाठी वेगळा नियम आणि मुंबईसाठी वेगळा नियम करणारा जो अधिकारी आहे त्याला निलंबित केलेच पाहिजे.

प्रा.वर्षा गायकवाड : महोदय, सह संचालकांनी जो प्रोफार्म तयार केलेला आहे तो अधिकची माहिती घेण्यासाठी तयार केला असून त्याला स्थगिती दिलेली आहे. तसेच वेतन निश्चितीची प्रकरणे एक महिन्यात पूर्ण केली जातील.....अडथळा.....

प्रा.बी.टी.देशमुख : केवळ स्थगिती देऊन चालणार नाही तर सह संचालकांनी काढलेले प्रोफॉर्म व आदेश शासनाने आजच्या आज रद्द केले पाहिजे आणि या सह संचालकांना निलंबित केले पाहिजे.

प्रा.वर्षा गायकवाड : महोदय, यासंबंधीची चौकशी करुन कारवाई करण्यात येईल.....अडथळा.....मला कोणालाही पाठीशी घालावयाचे नाही तर याबाबतची चौकशी करुन कारवाई केली जाईल असे मी सभागृहाला सांगू इच्छिते.

प्रा.बी.टी.देशमुख : या सह संचालकांनी मुंबईसाठी काढलेल्या आदेशांमध्ये हास्यास्पद अशा एकूण 17 सूचना समाविष्ट केल्या आहेत. महाराष्ट्रात इतरत्र कोठेही असे झालेले नाही, अशा प्रकारे त्यांनी राज्यापासून फक्त मुंबईला वेगळे काढण्याचे काम केलेले आहे, ही बाब गंभीर आहे.

अशुद्ध प्रत / शोधनासाठी नाही

यानंतर श्री. जुन्नरे .....

श्री. रामदास कदम :सभापती महोदय, हा विषय गंभीर आहे त्यामुळे माननीय मंत्रीमहोदय संबंधितांना आजच्या आज निलंबित करणार आहेत काय ? शासनापेक्षा हा अधिकारी मोठा आहे काय ?

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, अधिकची माहिती मिळावी व या प्रोसेसला स्पीड मिळावा म्हणून हे सर्व केलेले आहे. त्यामुळे संबंधितांची चौकशी करुन त्यानंतर कारवाई करण्यात येईल व बाकीची जी प्रकरणे आहेत ती एक महिन्यात निकाली लावण्यात येतील.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न मांडल्यावर माननीय मंत्रीमहोदय उत्तर देत असतांना त्यांचे उत्तर सुध्दा पूर्ण न होऊ देणे हे बरोबर नाही. त्यामुळे माननीय मंत्रीमहोदयांचे उत्तर पूर्ण झाल्यानंतर सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्याची संधी दिली जाईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आमचा प्रश्न काय आहे तो प्रथम आपण ऐकून घ्यावा. " मुळात सहसंचालकांनी वेगळा प्रोफार्मा काढलेला नाही " असे या ठिकाणी लेखी उत्तरात सांगण्यात आले. परंतु हा प्रोफार्मा आपल्या टेबलावर आहे कारण या संदर्भातील 26 मार्च, 2010 चे निवेदन आपल्याला मिळाले आहे असा त्याचा अर्थ होतो. हा प्रोफार्मा अतिशय घाणेरडा आहे. भ्रष्टाचाराचा हेतु आहे. महाराष्ट्राला लाज वाटावी असा हा प्रोफार्मा आहे. हा प्रोफार्मा वाचला तर आपले हसून हसून पोट दुखेल असा हा प्रोफार्मा आहे. हा प्रोफार्मा स्थगित केला असे आपण म्हणता म्हणजे त्याला प्रोटेक्शन देता. त्यामुळेच असे म्हणणे बरोबर नाही. माझे असे म्हणणे आहे की, जी वागणूक आपण महाराष्ट्राला दिली त्यापेक्षा आपल्याला वेगळी वागणूक मुंबईतील शिक्षकांना देता कामा नये. सहसंचालकांचा प्रोफार्मा व त्यांनी दिलेल्या सूचना आहेत त्या हस्यास्पद आहेत. 25 वर्षापूर्वी जे प्राध्यापक झाले होते त्यांना पदव्यांचे प्रमाणपत्र या ठिकाणी मागण्यात आलेले आहे. त्यामुळे त्या सूचना रद्द केल्या पाहिजेत. दुसरी गोष्ट अशी की, डायरेक्टरांच्या सूचनेची अवहेलना त्यांनी केल्यामुळे संबंधितांची चौकशी झाली पाहिजे. जीआरच्या 12(1),12 (2) ची अवहेलना का करण्यात आली ? हे कळले पाहिजे 15 जानेवारी, 2010 पर्यंत हे काम करा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख...

असे आदेश त्यांना देण्यात आले होते परंतु संबंधितांनी ते काम केले नाही. " माझ्याकडे अशा अशा अडचणी आहेत त्यामुळे आपल्या आदेशाचे पालन करता आले नाही मला मुदत वाढवून द्या " असे त्यांनी डायरेक्टरला सांगावयास पाहिजे होते. संचालकांची परवानगी घ्यायला हवी होती त्यांनी ते काही केले नाही, ही तर बेबंदशाही झाली. त्यामुळे संबंधिताला सस्पेंड करुन नंतर त्याची चौकशी करावी व त्या ठिकाणी दुस-या व्यक्तीची नेमणूक करण्यात यावी. कारण या माणसाकडून काम होत नाही, हे सिध्द झाले आहे.

**उपसभापती** : निवेदनावर एकावेळी एकच प्रश्न विचारता येतो परंतु या निवेदनावर आता दोन चार प्रश्न विचारण्यात आलेले आहेत.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, त्यामुळे या सर्व जाचक अटी रद्द करण्यात येतील काय ? हा एक प्रश्न तसेच संबंधितांना आजच्या आज सस्पेंड करुन नंतर चौकशी करण्यात येईल काय ? हा दूसरा प्रश्न. महाराष्ट्रातील बाकीच्या अधिका-यांनी काम संपवलेले आहे. डायरेक्टरांच्या सूचनेप्रमाणे व शासन निर्णयाच्या तरतुदी प्रमाणे 15 दिवसामध्ये म्हणजे एप्रिल पेड इन मे मध्ये सुधारित वेतन अदा करण्यात येईल काय ? महाराष्ट्रात आपण फेब्रुवारी पेड इन मार्च केलेले आहे. त्यामुळे मुंबईत निदान एप्रिल पेड इन मे करा. या तीन प्रश्नांची उत्तरे माननीय मंत्रीमहोदयांनी देण्याची आवश्यकता आहे.

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी 15 दिवसात काम केले जाईल काय असा जो प्रश्न विचारला आहे त्यास "होय" असे उत्तर आहे. सन्माननीय सदस्यांनी प्रोफार्मा बद्दल प्रश्न विचारलेला आहे. आपण हे काम आता पूर्णत: बंद केलेले आहे. महाराष्ट्रा व्यतिरिक्त त्यांनी काम केले असेल तर संबंधितांची चौकशी करुन कारवाई केली जाईल. माझ्याकडे प्रोफार्माची कॉपी आहे. त्यामुळे संबंधितांवर नक्कीच ॲक्शन घेतली जाईल. प्रोफार्मा रद्द केलेला असून तो बंद आहे असे उत्तर मी दिलेले आहे. त्यांनी प्रोफार्मा घेतला नव्हता तर ती अधिकची माहिती होती.

( विरोधीपक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात.)

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, महाराष्ट्रासाठी वेगळा नियम. मुंबईसाठी वेगळा नियम. मुंबईला महाराष्ट्रापासून वेगळे करणाऱ्या अधिकाऱ्याला शासन तात्काळ निलंबित करणार आहे काय ? एवढेच उत्तर आम्हाला हवे आहे. शासनाच्या जी.आर.पेक्षा अधिकारी मोठा आहे काय? अशा अधिकाऱ्याला शासन पाठीशी का घालत आहे ? त्या अधिकाऱ्याला निलंबित करून चौकशी करण्यात यावी अशी आमची मागणी आहे. त्या अधिकाऱ्याला शासनाने आजच्या आज निलंबित करावे अशी आमची मागणी आहे.

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, चौकशी करून संबंधितांवर ॲक्शन घेणार आहोत. शासनाची कोणालाही पाठीशी घालण्याची भूमिका नाही.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, त्या अधिकाऱ्याने शासनाच्या आदेशाची अवहेलना केलेली आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, शासन त्या अधिकाऱ्याला पाठीशी का घालत आहे ?

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, त्या अधिकाऱ्याला आजच्या आज निलंबित करण्यामध्ये काय अडचण आहे ?

**उप सभापती** :मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, माननीय मंत्रिमहोदयांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, चौकशी करून योग्य ती कारवाई करण्यात येईल.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, शासन त्या अधिकाऱ्याला कशासाठी प्रोटेक्ट करीत आहे ? अत्यंत भ्रष्ट हेतूने काम करणारा अधिकारी आहे. त्याला संचालकांनी आदेश व शासनाने निदेश देऊन सुद्धा आदेशाचे पालन केले नाही म्हणून त्याला आजच्या आज आपण निलंबित करावे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मंत्रिमहोदय या प्रश्नाला न्याय देत नसल्यामुळे आम्ही आपल्याकडून न्याय मागत आहोत.

**उप सभापती** :मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, निलंबित करण्याचे अधिकार मला नाहीत. ते शासनाला आहेत. त्यामुळे मी काहीही बोलणार नाही. सन्माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, चौकशी करून कारवाई करण्यात येईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, त्या अधिकाऱ्याला आजच्या आज निलंबित करण्यामध्ये शासनाला कोणती अडचण आहे ? ..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**उप सभापती** : सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन ह्या खात्याचे मंत्री येई पर्यंत हे निवेदन राखून ठेवतो. मंत्रिमहोदय आपण उत्तर चांगले दिले होते. आपल्या उत्तराबद्दल माझा आक्षेप नाही.

प्रा.बी.टी.देशमुख : ठीक आहे.

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, मला एकच गोष्ट सांगायची होती. म्हणून मी हात वर केला होता. हे काम युनिव्हर्सिटीचे आहे. त्यांनी स्टॅम्प मारायचा होता. स्टॅम्प करून ते फॉर्म त्यांनी डायरेक्टर ऑफिसला द्यायचे होते. मधल्या काळात युनिव्हर्सिटीने स्टॅम्पिंग न केल्यामुळे पेपरवर पेन्सिलने फक्त ओके लिहिले. यामुळे दोन अडीच महिने उशीर झाला. त्यामुळे मुंबई विद्यापीठाला पुन्हा फॉर्म पाठविण्यात आले. पुन्हा त्यांच्याकडून स्टॅम्पिंग करून आणण्यात आले. त्यामुळे मधल्या कालावधीत दोन-तीन महिने विलंब झाला.....

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

**उप सभापती** : या निवेदनावर मी माझा निर्णय दिलेला आहे. आता पुढील निवेदन घेतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, दरम्यानच्या काळात माननीय राज्य मंत्रिमहोदयांनी हा विषय नीट समजून घ्यावा आणि मग निर्णय घ्यावा. शिक्के मारायला गेले असे उत्तर देणे योग्य नाही. इथे आम्हाला शिक्का मारायचा आहे.

.....

निवेदन क्रमांक 3 व 4 एकत्रित घेण्याबाबत.

श्री.गोपीकिशन बाजोरीया : माननीय सभापती महोदय,म.वि.प.नियम 93 अन्वये घेण्यात येणारे निवेदन क्रमांक 3 व 4 सभागृहाच्या अनुमतीने आपण एकत्रित चर्चेला घ्यावे अशी मी आपणास नम्र विनंती करीत आहे.

**उप सभापती** :ठीक आहे. निवेदन क्रमांक 3 व 4 एकत्रित चर्चेला घेण्यात येतील.

..3

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अकोला महानगरपालका आयुक्त श्री.कुर्वे यांच्यावर शासनाचे कुठलेही नियंत्रण नसणे.

**मु. शी.** : अकोला महानगरपालका आयुक्त श्री.कुर्वे यांच्यावर शासनाचे कुठलेही नियंत्रण नसणे याबाबत सर्वश्री गोपीकिशन बाजोरिया, दिवाकर रावते,परशुराम उपरकर,किरण पावसकर,ॲड.अनिल परब,श्री.किशनचंद तनवाणी वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.भास्कर जाधव (नगरविकास मंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री गोपीकिशन बाजोरिया, दिवाकर रावते,परशुराम उपरकर,किरण पावसकर,ॲड.अनिल परब,श्री.किशनचंद तनवाणी यांनी अकोला महानगरपालका आयुक्त श्री.कुर्वे यांच्यावर शासनाचे कुठलेही नियंत्रण नसणे. या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गोपीकिशन बाजोरीया : सभापती महोदय, अकोला महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट असताना शिक्षकांचे पगार चार-चार महिने होत नाही. निवृत्त शिक्षकांचे पेन्शन चार-चार महिने होत नाही. कर्मचाऱ्यांचे पगार होत नाही. असे असताना शासनाने "क"वर्ग नगरपालिकेच्या सीओंची आयुक्त म्हणून नेमणूक केली. त्यामुळे अकोला महानगरपालिकेमध्ये तीन मोठ-मोठी प्रकरणे घडली. म्हाडाकडून रूपये 8.12 कोटी निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. हा निधी IHSDP आणि UIDSSMT अशा महत्त्वाकांक्षी योजनेमध्ये खर्च करायचा असताना तत्कालीन आयुक्तांनी रूपये 78.00 लाख दुसऱ्या खात्यामध्ये वळविले. लेखी निवेदनामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, "केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार प्रस्तुत एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास योजनेत घरकुल बांधणी व अनुषंगिक मूलभूत सुविधा पुरविण्यासाठी सविस्तर अहवाल तयार करण्याकरिता प्रकल्प किंमतीच्या 1 टक्के किंवा जास्तीत जास्त 40 लक्ष निधी केंद्र शासनाकडून प्रतिपूर्ती स्वरूपात देय आहे."

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गोपीकिसन बाजोरिया ...

सभापती महोदय,सर्व्हेअरला एक टक्का कमिशन देण्याऐवजी अडीच टक्के कमिशन देण्यात आले होते त्यासाठी कोणत्याही प्रकारचा ठराव न करता आणि शासनाची परवानगी न घेता 35 लाख रुपये सर्व्हेअरला देण्यात आले होते .यानंतर मला तिसरा मुद्दा असा मांडावयाचा आहे की,विदर्भ अर्बन को ऑपरेटीव्ह बॅक ही पाच वर्षापासून बुडीत असताना शासनाची कोणतीही परवानगी न घेता, महानगरपालिकेचा कोणताही ठराव न घेता 1 कोटी 30 लाख रुपये विदर्भ को ऑपरेटीव्ह अर्बन बैकेत टाकले होते जिल्हाधिका-यांनी यासबंधीची चौकशी केली होती व त्यांनी अहवाल सादर केला होता ...

**उपसभापती** :सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात प्रश्न विचारावा

श्री.गोपीकिसन बाजोरिया :सभापती महोदय, मला एकच प्रश्न विचारावयाचा आहे.दोन नियम 93 च्या सूचनावरील निवेदने आपण एकत्रित घेतली असल्यामुळे मला प्रश्न विचारण्यासाठी आपण पुरेसा वेळ द्यावा अशी माझी आपणास विनंती आहे. या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करुन अहवाल सादर करण्यास जिल्हाधिका-यांना कळविले होते जिल्हाधिकारी अकोला यांचा अहवाल शासनास प्राप्त झालेला आहे. त्यानुसार अकोला महानगरपालिकेचे आयुक्त कार्यवाहीस पात्र आहेत तेव्हा अकोला महानगरपालिकेचे आयुक्त श्री. कुर्वे यांना निलंबित करण्यात येणार आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, नियम 93 च्या दोन सूचनांवरील निवेदने एकत्रित घेण्याचे ठरविले आहे या दोन्ही निवेदनातील विषय वेगवेगळे आहेत. आयएचएसडीपी योजनेतून बांधावयाच्या 65 लाख रुपयाच्या घरकूलाच्या कामासबंधीचा एक विषय असून त्या विषयासबंधी तत्कालीन आयुक्तानी निश्चितपणे चूक केलेली आहे त्यामुळे त्यांच्याविरुध्द शिस्तभंग आणि अपील नियमातील नियम 189 मधील तरतुदीनुसार त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांशी सबंधित हा विषय अल्यामुळे व वेळ कमी मिळेल म्हणून घाई घाईने त्यांनी हा विषय माडण्याचा प्रयत्न केला आहे. हा विषय मांडण्यामागे त्यांचा हेतू चांगला होता. बॅकेत एक कोटी रुपये ठेवण्यासबंधीचा दुसरा विषय आहे . ठेदाराकडून सिक्युरिटी रक्कम घेण्यात येत असते ती रक्कम विदर्भ अर्बन को ऑपरेटीव्ह बॅकेमध्ये ठेवण्यात आली होती ज्या बॅकेत पैसे ठेवण्यात येणार आहे ती तोटयात जाणार आहे काय किंवा त्या बॅकेवर लिक्विडेटर नेमण्यात येणार आहे काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या बाबीची तपासणी करणे आवश्यक होते. एवढेच नव्हे तर महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 92(1) आणि 92 (2) नुसार शासनाकडून परवानगी घेणे देखील आवश्यक होते परंतु आयुक्तांनी ती परवानगी घेतली नव्हती म्हणून त्या बाबतीत जिल्हाधिकारी अकोला यांच्या मार्फत चौकशी करण्यात आली होती आणि त्यासबंधीचा अहवाल शासनाला नुकताच प्राप्त झाला आहे.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रमेश शेंडगे)**

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, नियम 93 च्या चौथ्या निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, " घरकूल योजनेच्या अंमलबजावणीकरिता वितरीत करण्यात आलेला निधी नियम बाहय पध्दतीने इतर बाबींवर वापरणे ही गंभीर बाब आहे." या निवेदनात पुढे असेही म्हटलेले आहे की, " योजनेच्या बांधकामा व्यतिरिक्त इतर प्रयोजनार्थ वापरलेली रक्कम व्याजासहीत एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास योजना खात्यात त्वरित जमा करण्याच्या सूचना शासनाने सर्व महानगरपालिकांना दिलेल्या आहेत तसेच नगर विकास विभागामार्फत तत्कालीन आयुक्तांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे. त्याबाबत त्यांनी दिलेल्या खुलाशाच्या अनुषंगाने कार्यवाही विचाराधीन आहे." या निवेदनामध्ये पुढे असेही म्हटलेले आहे की, "अकोला महानगरपालिकेची एक कोटी तीस लाख रुपये इतकी रक्कम विदर्भ अर्बन को-ऑप बॅकेत ठेवल्याबाबत शासनास प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी,अकोला यांना चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. जिल्हाधिकारी, अकोला यांचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून त्यानुसार आयुक्त, अकोला महानगरपालिका हे शिस्तंभंगाच्या कार्यवाहीस पात्र ठरत असल्याने आयुक्त तसेच या प्रकरणी जबाबदार असलेले उपायुक्त तसेच सहाय्यक आयुक्त तथा तत्कालीन प्रभारी मुख्य लेखापरीक्षक यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली असून त्यांचा खुलासा प्राप्त झाल्यानंतर त्यांच्याविरुध्द योगय ती कार्यवाही करण्यात येईल." अशा प्रकारे अकोला महानगरपालिकेमध्ये गैरव्यवहार झाले आहेत हे या निवेदनात तीन चार ठिकाणी मान्य करण्यात आलेले आहे.

अशासकीय मत / शासकीय नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

त्यांना शिस्तभंगाच्या कारवाईची नोटिस दिली. याठिकाणी प्रथमदर्शनी आयुक्तांसह 3 अधिकारी दोषी आढळले आहेत. तर मग त्यांना निलंबित न करण्याची कारणे काय आहेत? मंत्रिमहोदय, तुम्ही विरोधी पक्षामध्ये होता त्यावेळी आक्रमकपणे बोलत होता, सत्ताधारी पक्षामध्ये असतांना सुध्दा आक्रमकपणे बोलत होता. त्यामुळे आपण आता बचावात्मक पवित्रा घेऊ नका. ही महानगरपालिका आर्थिकदृष्टया अडचणीत असतांना हे अधिकारी मन मानेल त्यापध्दतीने निधीचा गैरवापर करीत असतांना आणि ते सिध्द झाले असतांना आपण त्यांना निलंबित करण्याचे कां टाळत आहात? जिल्हाधिकाऱ्यांच्या आलेल्या अहवालामध्ये शिस्तभंगाची कारवाई अपेक्षित असेल तर आयुक्तांसह या तिन्ही अधिकाऱ्यांना आजच्या आज निलंबित करण्याची घोषणा करणार काय?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, ही गंभीर बाब असल्यामुळे मी स्वत: याबाबत निषेध केला आहे. महानगरपालिकेमध्ये कमालीची आर्थिक बेशिस्त आहे. ही महानगरपालिका पाचव्या वेतन आयोगाची देणीसुध्दा कर्मचाऱ्यांना अजूनपर्यंत देऊ शकली नाही, तर मग सहावा वेतन आयोग दूरच राहिला, याची आपल्याला जाणीव आहे. म्हणून आमच्या विभागामार्फत अधिक खोलवर जाऊन वेगवेगळया पध्दतीने याची चौकशी केली त्यावेळी एक गोष्ट दिसून आली की, यामध्ये उपायुक्त श्री. उमेश खोरीकर हे सहभागी आहेत. बऱ्याच दिवसानंतर यामधील ब्रेन आमच्या विभागाच्या लक्षात आला आहे. त्यामुळे याकरिता आपण मला थोडासा अवधी द्यावा.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, फार मोठी चर्चा करण्याचा हा विषय नाही. अर्बन बँकेमधील बँक गॅरंटी आज कुणालाही वठविता येत नाही. बँक गॅरंटीला व्याज भरावे लागते. त्यामधून 1 कोटी 30 लाख रुपये त्यांनी वळते केले.ही बँक डुबलेली आहे, हे संपूर्ण अकोल्याला माहीत आहे. तरीसुध्दा त्या बँकेमध्ये जाणीवपूर्वक हे पैसे भरण्यात आले. त्यामधून किती टक्के व्याज घेतले ते आम्हाला सांगा. आपण आम्हाला हे कशासाठी सांगावयास लावता? या सर्व प्रकरणामध्ये केंद्र सरकारकडून आलेल्या बांधकामाचा निधी सुध्दा वापरला गेला. तो निधी दिवाळीचा बोनस म्हणून कर्मचाऱ्यांना देण्यासाठी वापरला. ज्या झोपडपट्टयांच्या ठिकाणी घरबांधणी करण्यासाठी हा निधी आला होता त्याचे आपण वाटोळे करुन टाकले. आज त्या झोपडया आहे त्याच ठिकाणी राहणार आहेत. आणि म्हणून ही गंभीर बाब आहे. 1 कोटी 35 लाख रुपये ठेकेदाराचे देणे लागते. महानगरपालिकेकडे पैसे नाहीत म्हणून बँकेच्या अकाऊंटमधून ठेकेदाराचे पैसे देण्याचा वाह्यातपणा आयुक्तांनी केला.म्हणून या प्रकरणाची निपक्षपातीपणे चौकशी व्हावी असे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ ST/

श्री. दिवाकर रावते....

आपणास वाटत असेल तर त्यांना निलंबित केले पाहिजे. निलंबित केले म्हणजे नोकरीवरुन काढून टाकले असे होत नाही. आता त्याठिकाणी प्रभारी लेखापाल आहेत, त्यापूर्वी श्री. राठी नावाचे लेखापाल होते त्यांना हा आर्थिक घोळ सहन झाला नाही म्हणून त्यांनी आत्महत्त्या केली. त्या आत्महत्त्येचे प्रकरण खूप गाजले, त्याचे पुढे काहीही झाले नाही. त्या आत्महत्त्येला प्रवृत्त करणाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल झाला. म्हणून माझी मागणी आहे की, आपण आम्हाला आरडा ओरड करावयास लावू नका. जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रकरणाची चौकशी करुन त्यामध्ये या लोकांना दोषी धरले आहे. तो अहवाल आपणाकडे आल्यानंतर तो या सभागृहामध्ये मांडण्याची आपण हिंमत दाखविल्याबद्दल मी आपणास मनापासून धन्यवाद देतो. तो अहवाल या सभागृहाच्या पटलावर आल्यानंतर पुढे काय कारवाई केली? हे लोकांना समजले पाहिजे. तेव्हा या विषयावर अधिक चर्चा न करता जिल्हाधिकाऱ्यांच्या अहवालाप्रमाणे आजच्या आज या सर्व अधिकाऱ्यांना निलंबित केले पाहिजे. चौकशी पुढे चालू राहील. त्या ठिकाणी प्रभारी आयुक्त म्हणून कुणाला नेमायचे आहे हे आपण संध्याकाळपर्यंत ठरवून टाका.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी याबाबत खुलासा करतो. आदरणीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितल्याप्रमाणे अगोदर जो आत्महत्त्येचा प्रकार घडला त्यावेळी प्रभारी आयुक्त श्री. पठाण होते.त्याची चौकशी सुरु झाली. त्यांनी केंद्र सरकारकडून आलेले घरबांधणीचे पैसे इतरत्र वळविले.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव . . . .

सभापती महोदय, त्यांचीही चौकशी होईल आणि दुसरी गोष्ट या सभागृहाच्या भावना लक्षात घेता आणि सातत्याने या महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती अत्यंत वाईट असताना सुध्दा येथील अधिकाऱ्यांनी सातत्याने चुकीचे आणि जाणीवपूर्वक वर्तन केलेले आहे याची आम्हाला देखील निश्चितपणे जाणीव झालेली आहे. म्हणून या महानगरपालिकेचे उप आयुक्त, तसेच सह आयुक्त आणि तत्कालीन मुख्य लेखा अधिकारी या तिघांनाही आजच्याआज निलंबित करण्यात येईल आणि श्री.कुर्वे नावाचे जे आयुक्त आहेत, त्यांना सक्तीच्या रजेवर पाठवून हा चार्ज कलेक्टरकडे देण्यात येईल.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, मुख्य आरोपीला सोडून देण्यात येत आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आयुक्तांना निलंबित करण्यात यावे.

(यानंतर विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य आपापल्या जागा सोडून पुढे येतात.)

**तालिका सभापती (श्री.रमेश शेंडगे)** : माननीय मंत्री महोदयांनी बरेचसे उत्तर दिलले आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, या सदनाच्या भावना आणि असलेली वस्तुस्थिती लक्षात घेता माननीय मंत्री महोदय अतिशय प्रामाणिकपणे सांगण्याचा प्रयत्न करीत आहेत.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मी तुम्हाला मदतच करीत आहे. जर अशा प्रकारे रक्षकच भक्षक झाले तर ते योग्य नाही. त्यामुळे यापुढे असे होऊ नये म्हणून आमची विनंती राहील की, माननीय मंत्री महोदयांनी सदनाच्या भावना लक्षात घेऊन तेथील आयुक्तांना तात्काळ सस्पेंड केले पाहिजे आणि त्याप्रमाणे करण्यात यावे.

(अनक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना काही बोलावयाचे आहे काय ?

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, याठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी सांगितल्या -

. . . .2 आर-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . ..

प्रमाणे कलेक्टर यांनी आयुक्तांची चौकशी केलेली आहे. या राज्यामध्ये कलेक्टर मोठा आहे की आयुक्त मोठा आहे ?

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : ते महापालिका आयुक्त आहेत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, महापालिका आयुक्त असले म्हणून काय झाले ? तो त्या जिल्ह्यातीलच आहे. त्यामुळे याठिकाणीच कुठेतरी रींग झाल्यासारखी मला वाटत आहे. म्हणून या आयुक्तांना ताबडतोब सस्पेंड करुन त्यांची इतरत्र बदली करावी. कारण त्यांना सस्पेंड केल्यानंतर ते तेथेच रहाणार आहेत. सस्पेंड केल्यानंतर त्यांना सहा महिन्यांनी परत कायद्याने हजर रहावे लागते. म्हणून शासन त्यांना सस्पेंड करुन त्यांची इतरत्र बदली करणार आहे काय ? त्यानुसार कारवाई करणार काय ? तसेच तेथील कलेक्टर यांनी त्यांची चौकशी केलेली आहे. त्याच्यापेक्षा त्यांच्यावर गंभीर आरोप आहेत. म्हणून याठिकाणी सभागृहाच्या भावना लक्षात घेतल्या पाहिजेत. सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिसन बाजोरिया यांनी अनेक वेळा . . . .

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी प्रश्न विचारावा.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मला दोन मिनिटे बोलू द्यावे. या सभागृहामध्ये अनेक वेळा चर्चा केलेली आहे. विधानसभेच्या आणि विधान परिषदेच्या सन्माननीय सदस्यांना त्यांनी अवमानास्पद वागणूक दिली. अनेक पत्रामध्ये त्यांनी अनेक वेळा हा विषय मांडला आहे. दुर्दैवाने सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिसन बाजोरिया यांचे मराठी भाषेवर प्रभूत्व नाही त्यामुळे त्यांनी येथे जो विषय मांडलेला आहे, तो आपण गंभीरपणे घेत नाही. परंतु मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करीन की, याठिकाणी लोकनियुक्त प्रतिनिधींना या लोकशाहीमध्ये हे अधिकारी याप्रमाणे वागणूक देणार असतील तर ते बरोबर होणार नाही. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांना ताबडतोब सस्पेंड करुन, त्यांची इतरत्र बदली करण्यात यावी अशी माझी मागणी आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

यानंतर कु.थोरात . . ..

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आयुक्तांना सस्पेंड करण्यात यावे. 700 पैकी 68 घरे बांधली आहेत. बाकीचे पैसे कुठे गेले?

श्री. भास्कर जाधव : मला याठिकाणी एवढेच सांगावयाचे आहे की, 700 पैकी 68 घरे बांधले ते आयुक्त दुसरे आहेत. आता असलेले आयुक्त त्यामध्ये नाहीत.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आता त्याठिकाणी असलेले आयुक्त याला जबाबदार आहेत तसेच मागचे आयुक्तही त्याला जबाबदार आहेत. या योजनेमध्ये मोठया प्रमाणात अपहार झालेला आहे. सभापती महोदय, निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, प्रस्तुत योजनेतील अकोला नगरपालिकेतील मंजूर 3 प्रकल्पापैकी टप्पा 1 अंतर्गत 803 घरकुले केंद्र शासनाने मंजूर केलेली असून सदर योजनेचे बांधकाम विहित कालावधीत (18 महिन्यांच्या कालावधीत) म्हणजेच दिनांक 22-06-2008 पर्यंत पूर्ण करणे आवश्यक असतांना सद्य:स्थितीत योजनेतील फक्त 69 घरकुलांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले." या घरकुलाचा पूर्ण पैसा दुसरीकडे वळविण्यात आला आहे. जसे मागचे आयुक्त यामध्ये दोषी आहेत तसे आताचे आयुक्तही जबाबदार आहेत. सभापती महोदय, केंद्र सरकारच्या या योजनेत पूर्ण अपहार झालेला आहे आणि पैसा दुसरीकडे खर्च केलेला आहे. सभापती महोदय, ही बाब गंभीर आहे. कलेक्टरचा अहवाल आहे. इतके सर्व प्रायमाफेसी असताना आयुक्तांना सस्पेंड कां करण्यात येत नाही? सभापती महोदय, आमची याठिकाणी अशी मागणी आहे की, ताबडतोब आयुक्तांच्या सस्पेन्शनची घोषणा माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी केली पाहिजे.

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सभापती महोदय, उप आयुक्त, सह आयुक्त तथा मी थोडया वेळापूर्वी म्हटल्याप्रमाणे मुख्यलेखा परीक्षक यांना जसे निलंबित करण्यात येईल तसे या आयुक्तांना देखील निलंबित करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, गरिबांची घरे बांधण्यासाठी जो निधी आलेला आहे त्या पैशाची अगोदरच्या आयुक्तांनी वाट लावलेली आहे. त्यामुळे त्यांची सुध्दा चौकशी झाली पाहिजे.

---

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सूतगिरणी, वस्त्रोद्योग व ऑईल मिलकडून वॅटची वसुली करणे.

**मु. शी.** : सूतगिरणी, वस्त्रोद्योग व ऑईल मिलकडून वॅटची वसुली करणे याबाबत सर्वश्री जगदिश गुप्ता,पांडुरंग फुंडकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. विजय वडेट्टीवार ( वित्त राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री जगदिश गुप्ता, पांडुरंग फुंडकर यांनी "सूतकगरणी,वस्त्रोद्योग व ऑईल मिलकडून वॅटची वसुली करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** (श्री. रमेश शेंडगे ) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3 ...

अशुद्धीरित प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, तेलबियापासून उत्पादित तेलावर वॅट लावला पाहिजे असा माझा नियम 93 नव्वये दिलेल्या सूचनेच्या संदर्भात उद्देश होता. दिनांक 1 एप्रिल, 2010 पूर्वी शासनाने वॅट लावलेला नव्हता आता शासनाने तो लावलेला आहे. यापूर्वी तेलगिरण्यावर आणि सूतगिरण्यांवर वॅट लावलेला नव्हता पण आता तेलगिरण्यांवर दिनांक 1 एप्रिल, 2010 पासून वॅट लावलेला आहे त्यामुळे माझे समाधान झालले आहे.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : रायगड जिल्हयात समुद्राला आलेल्या मोठया उधाणामुळे समुद्राचे पाणी भात शेतीमध्ये शिरुन झालेले नुकसान

**मु. शी.** : रायगड जिल्हयात समुद्राला आलेल्या मोठया उधाणामुळे समुद्राचे पणी भात शेतीमध्ये शिरुन झालेले नुकसान यासंबंधी सर्वश्री जयंत प्र.पाटील, कपिल पाटील वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.जयंत प्र.पाटील ( महाराष्ट्र विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय खार जमीन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"रायगड जिल्हयातील समुद्र किनाऱ्यालगत असलेल्या अलिबाग, पेण, मुरुड, रोहा, उरण, पनवेल, परिसरातील गावांमध्ये दिनांक ३१ जानेवारी, २०१० व १ फेब्रुवारी, २०१० रोजी समुद्राला आलेल्या मोठया उधाणामुळे समुद्राचे पाणी बांधबंदीस्तीला खिंडार पडून मोठया प्रमाणात भात शेतीमध्ये शिरल्याने नुकसान होणे, तसेच समुद्र किनारी मासे सुकविण्यासाठी तयार करण्यात आलेल्या खळी व ओटे यामध्ये प्रचंड प्रमाणात समुद्राचे पाणी शिरल्याने नुकसान होणे तसेच अचानक आलेल्या उधाणामुळे सुकविण्यात आलेले सोडे, बोंबील इत्यादी मच्छीचे लाखो रुपयांचे नुकसान होणे, खारभूमी संरक्षण बंधारे व सागरी धूप प्रतिबंधक बंधारे न बांधणे व ज्या ठिकाणी थोड्या प्रमाणात बांधण्यात आलेल्या खार भूमी सरंक्षण बंधाऱ्याचे काम करताना शासकीय यंत्रणेचे दुर्लक्ष झाल्याने शेतकरी व कोळी बांधवामध्ये शासकीय यंत्रणेमधील गैरव्यवहारासंबंधी संशयाचे वातावरण निर्माण होणे, सबब याप्रकरणी शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री.भास्कर जाधव ( खार जमीन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** :: निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, "चंद्र पृथ्वीच्या सर्वाधिक जवळ आल्यामुळे समुद्राला 5.49 मी. पातळी पर्यंत उधाणाची असाधारण भरती आली होती" असे निवेदनामध्ये म्हटले आहे. सभापती महोदय, चंद्र पृथ्वीच्या जवळ आली हे पाहण्याची कोणती यंत्रणा या शासनाकडे आहे आणि कुठल्या वेधशाळेतून ही माहिती उपलब्ध झालेली आहे? याचे पहिल्यांदा उत्तर द्यावे. तसेच उधाणाची भरती किती मीटर वरती आल्यानंतर मोठे उधाण म्हटले जाते याचे उत्तर या निवेदनामध्ये दिलेले नाही. माननीय मंत्रिमहोदय, आपण यासंदर्भात ब्रिफिंग घेता तेव्हा यापध्दतीची माहिती अपेक्षित नाही.

सभापती महोदय, यासभागृहात मागच्या वेळी मी यासंबंधात प्रश्न उपस्थित केला होता तेव्हा कबूल केले होते की, एकदा समुद्राचे खारे पाणी शेतीमध्ये शिरले की, पाच वर्षे शेती पिकत नाही. म्हणून या शेतीच्या नुकसानीसाठी शासन काय भरपाई देणार आहे? सभापती महोदय, यासंदर्भात केंद्र शासनाचे काय निकष आहेत हे मला माहीत नाही. राज्य शासन यासाठी खास निकष आणि खास नियम तयार करणार आहे काय?

यानंतर श्री. बरवड..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी पहिला प्रश्न मिष्किलपणे विचारलेला आहे. त्यांनाही माहीत आहे की, गेल्या 60 वर्षामध्ये अशा प्रकारचे उधाण कधी आले नव्हते. 60 वर्षापूर्वी असे उधाण आले होते. सन 2005 साली जो महापूर झाला तसा महापूर गेल्या 70 वर्षामध्ये झाला नव्हता तसेच आपल्याकडे जे फयान वादळ झाले ते सुध्दा पहिल्यांदाच झाले. तशाच प्रकारे सुनामी आली. समुद्राच्या खाली सुध्दा भूकंप होऊ शकतो याची कल्पना नव्हती. तसाच हा प्रकार झालेला आहे. गेल्या 60 वर्षामध्ये कधीही आले नव्हते एवढे उधाण आले. सन्माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे समुद्राच्या पाण्याची पातळी सुध्दा दिवसेंदिवस वाढत आहे त्याबद्दल आपण चिंता करीत आहोत. सन्माननीय सदस्यांनी जो पहिला प्रश्न विचारला त्याबाबत सांगू इच्छितो की, आपली जी नेहमीची माहिती आहे त्याप्रमाणे ती निवेदनामध्ये दिलेली आहे. तशाच प्रकारे हे उधाण अचानकपणे आलेले आहे. मागच्या वेळी सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी हा प्रश्न औचित्याच्या मुद्याव्दारे या सभागृहात लक्षात आणून दिला होता. सगळ्या सन्माननीय सदस्यांची अशी भावना होती की, अशा पध्दतीने शेतकऱ्यांचे जे नुकसान झालेले आहे त्यासंदर्भात विचार केला जावा. त्यासंदर्भात जे काही बंधारे बांधलेले आहेत त्याला त्या ठिकाणी खांडी म्हणतात. त्या खांडी शेतकऱ्यांच्या हाताशी धरुन, त्यांचे सहकार्य घेऊन बंद करण्याचे काम आमच्या विभागाने केलेले आहे. नैसर्गिक आपत्तीच्या संदर्भातील स्थायी आदेशामध्ये अशा प्रकारे नैसर्गिक आपत्ती आल्यानंतर शेतकऱ्यांना या कारणास्तव मदत करता येणार नाही असे जरी उत्तर निवेदनामध्ये दिले असले तरी ही एक प्रकारे नैसर्गिक आपत्तीच आहे. गेल्या 60 वर्षामध्ये अशा प्रकारचे एकही संकट न आल्यामुळे दुर्दैवाने त्याचा अंतर्भाव नैसर्गिक आपत्ती या विषयामध्ये करण्यात आलेला नसावा असे माझे मत आहे. परंतु केंद्र शासनाचे काहीही स्थायी आदेश असले तरी आपण काय मदत करणार असा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे. या निवेदनामध्ये सांगितल्याप्रमाणे सुक्या मच्छीचे किती नुकसान झाले त्यासंदर्भात माहिती नाही परंतु शेतकऱ्यांच्या शेतीमध्ये पाणी गेल्यामुळे काही ठिकाणी कडधान्ये तसेच काही ठिकाणी जो भाजीपाला लावलेला होता त्याचे पंचनाम्यानुसार 5 लाख 11 हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे शासनाच्या लक्षात आले आहे. मी सन्माननीय सदस्यांना सांगेन की, ही लक्षवेधी सूचना रायगड



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ....

जिल्ह्यापुरती विचारली असली तरी त्या संपूर्ण किनारपट्टीमध्ये त्यावेळी उधाण आले होते आणि त्या उधाणाच्या अनुषंगाने आपल्याला काही मदत करता येईल काय याची शासन स्तरावर चर्चा आणि थोडासा प्रयत्न सुरु आहे.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, समुद्र किनारपट्टीमध्ये खार बंधारे बांधण्यात आलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी उल्लेख केला त्याप्रमाणे हे उधाण आले त्यावेळी त्या ठिकाणी खळ्यात असलेले सुके मासे वाहून गेले आणि मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. आपण किनारट्टीतील खार जमिनीवर तेथील प्रत्येक शेतकऱ्यांकडून 40 रुपये प्रमाणे उपकर घेतो. त्या उपकराची पाच वर्षाची एकंदर रक्कम यासंदर्भात नुकसानभरपाई देण्यासाठी उपलब्ध करुन देणार काय ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, अशा प्रकारे खार भूमी अंतर्गत जे बंधारे बांधले जातात ते बांधल्यानंतर त्याचा लाभ शेतकऱ्यांना होतो म्हणून शेतकऱ्यांकडून प्रतिहेक्टर 40 रुपये उपकर घेतो ही वस्तुस्थिती आहे. परंतु यासंदर्भात काही तरी विचार करा असे सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील सातत्याने सांगत होते. नैसर्गिक आपत्तीच्या संदर्भातील स्थायी आदेशानुसार आपण यासंदर्भात मदत करु शकत नसलो तरी आपला विभाग त्यासंदर्भात विचार करीत आहे. या सदनाचे जेष्ठ सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी जो उल्लेख केला त्यासंदर्भात त्यांनी मघाशी अचानकपणे हा विषय लक्षात आणून दिला होता म्हणून त्या अनुषंगाने मी थोडीशी माहिती घेण्याचा प्रयत्न केला. आपण दोन अर्थाने याचा विचार करावयास पाहिजे. आमच्या निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, प्रत्यक्षात शेतामध्ये पीक नसल्यामुळे खाऱ्या पाण्यामुळे नुकसान झाल्याचे दिसत नसले तरी पीक कमी येऊ शकते हे नाकारता येणार नाही. हे मान्य केलेले असल्यामुळे पुढच्या तीन वर्षाकरिता आपण त्यांच्याकडून प्रतिहेक्टरी जो 40 रुपये प्रमाणे उपकर घेतो तो माफ करण्याचे आमच्या विभागातर्फे घोंषित करतो. तशा प्रकारचा निर्णय घेण्यात येईल.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव...

या शेतक-यांसाठी त्याच्याही एक पाऊल पुढे जाण्याची आवश्यकता आहे. त्याबाबत मी सांगू इच्छितो की, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी या जिल्हयातील सर्व शेतकऱ्यांकडून आमच्या विभागाला 2,77,62,001 रुपये येणे आहे. त्यामुळे या शेतकऱ्यांसाठी एक योजना जाहीर करता येईल. त्याला शेतक-यांनी प्रतिसाद दिला पाहिजे. ज्या शेतक-याकडून 20 हजार रुपये येणे आहे त्याने 10 हजार रुपये भरले तर त्याला उर्वरित 10 हजार रुपये माफ करता येतील. एखाद्याकडून 30 हजार रुपये येणे आहे त्यापैकी त्याने 15 हजार रुपये भरले तर उर्वरित 15 हजार रुपये माफ करता येतील. म्हणजे ज्या प्रमाणात ते पैसे भरतील त्या प्रमाणात त्यांचा पैसा माफ करुन शासनाला त्यांना मदत करता येईल. हा निर्णय नैसर्गिक आपत्ती म्हणून त्यामध्ये दाखल करुन राज्य सरकारच्या माध्यमातून त्यांना मदत देण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी या प्रश्नाला उत्तर देताना सर्व मागण्या मान्य केल्या आहेत. याच अधिवेशनामध्ये हा प्रश्न आला होता. कोकणामध्ये समुद्राच्या काठावर बंधारे बांधले जातात. समुद्राचे पाणी शेतीमध्ये शिरल्यामुळे नापिकी होते. त्यामुळे शेतक-यांचे मोठया प्रमाणावर नुकसान होते. आता त्यांनी शेतक-यांकडून येणे असलेल्या रकमेपैकी त्यांनी निम्मी रक्कम भरली तर उर्वरित रक्कम माफ करण्याचे जाहीर केले आहे. त्याचप्रमाणे 3 वर्षे शेती नापिकी झाली असेल तर त्यांच्याकडून जो हेक्टरी 40 रुपये कर घेतला जातो तो घेतला जाणार नाही. परंतु अगोदर जाहीर केलेल्या योजनेमध्ये याचा समावेश असेल की, पूर्वी ज्यांनी पैसे भरले असतील ते माफ करणार आहे ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी दोन्ही प्रश्नांची वेगवेगळी उत्तरे दिली आहेत. यापुढे 3 वर्षे कर घेतला जाणार नाही असे म्हटले आहे. तसेच शेतकरी ज्या प्रमाणात पैसे भरतील त्याप्रमाणात त्यांना माफी दिली जाईल असे सांगितले आहे, म्हणजे एकाच वेळी दोन्ही योजना शासन लागू करणार आहे.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.राजन तेली : सभापती महोदय, बऱ्याच वर्षांनी या प्रश्नाला न्याय दिलेला आहे. मंत्री महोदयांनी आताच सांगितल्याप्रमाणे ज्या शेतकऱ्याकडून 10 हजार रुपये येणे आहे त्यापैकी त्याने 5 हजार रुपये भरले तर 5 हजार रुपये माफ केले जातील. कोकणातील शेतकरी वेळोवेळी अडचणीमध्ये सापडलेला आहे. त्यामुळे शासन पूर्ण रक्कम माफ करणार आहे काय ? त्याचप्रमाणे कोकणातील चारही जिल्हयामधील बंधा-यांसाठी जी तरतूद केली जाते ती कमी आहे. कोकणातील अधिका-यांचे पगार या तरतूदीपेक्षा जास्त आहेत. त्यामुळे या बंधा-यांसाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन दिला जाईल काय ?

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, या चार जिल्हयामध्ये वारंवार आपत्तीजनक परिस्थिती उद्भवते, त्यामुळे मंत्री महोदयांनी सकारात्मक उत्तर दिलेले आहे. तेथील शेतक-यांकडून 2 कोटी 77 लाख रुपये येणे आहे. त्यापैकी शासन निम्मी रक्कम माफ करणार आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, ही संपूर्ण रक्कम माफ करावी. सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना पुढील 3 वर्षे कर घेतला जाणार नाही असे म्हटले आहे. त्याऐवजी पुढील 5 वर्षे कर न घेण्याचे जाहीर केले जाईल का ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी राज्याच्या तिजोरीतून बंधा-यांसाठी अत्यंत कमी निधी दिला जातो असे म्हटले आहे. या विभागाला अत्यल्प बजेट दिले जाते. या विभागासाठी केवळ 20 कोटी रुपयांचे बजेट दिले जाते. त्यापैकी 14 ते 16 कोटी रुपये आस्थापनावर खर्च होतो ही गोष्ट खरी आहे.

यानंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. भास्कर जाधव...

म्हणून बजेट वाढवून द्यावे याकरिता कोकण पॅकेज अंतर्गत जी तरतूद केलेली आहे ती तरतूद जास्तीत जास्त मिळावी यासाठी सभागृहाच्या भावना माननीय मुख्यमंत्री महोदय आणि माननीय अर्थमंत्री महोदय यांच्याकडे पोहोचविल्या जातील आणि बजेट वाढवून घेतले जाईल. दुसरी गोष्ट अशी आहे की, शेतक-यांना साततत्याने अशा प्रकारच्या संकटांना सामोरे जावे लागत असते आणि आपण त्यांना मदत करीत नाही. उधाणामुळे ज्यांच्या शेतजमिनीचे नुकसान झालेले आहे त्यांना मदत करण्याची ही पहिलीच वेळ आहे. या बाबतीत दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन मागचे येणे पूर्णपणे माफ केले जाईल आणि पुढच्या 5 वर्षात तरी त्यांच्याकडून हा उपकर वसूल केला जाणार नाही.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : जळगाव जिल्हयातील चोपडा नगरपरिषदेने अतिक्रमणे काढल्यामुळे टपरीधारकांचे व्यापार-व्यसाय बंद पडणे

**मु.शी.** : जळगाव जिल्हयातील चोपडा नगरपरिषदेने अतिक्रमणे काढल्यामुळे टपरीधारकांचे व्यापार-व्यसाय बंद पडणे

यासंबंधी सर्वश्री अरुण गुजराथी, रमेश शेंडगे, हेमंत टकले, सुभाष भोईर व ॲड. उषा दराडे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो अणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

जळगांव जिल्ह्यातील चोपडा नगरपरिषदेने दिनांक ११ जानेवारी, २०१० रोजी शहरातील अतिक्रमणे काढल्यामुळे साधारणत: ४०० ते ५०० टपरीधारकांचे व्यापार-व्यवसाय बंद पडणे व त्यांचे उदरनिर्वाहाचे साधन नष्ट होणे, नगरपरिषदेने ६० दिवसांत टपरीधारकांचे पुनर्वसन करण्यात येईल असे जाहीर करणे, तथापि अद्याप कोणतीही कार्यवाही न करणे, टपरीधारकांनी निवेदन व मोर्चाद्वारे नगरपरिषदेचे लक्ष वेधणे पुनर्वसनासाठी शहरातील सरकारी जमिन सर्वे क्रमांक ६० ११/ ब यांची नगरपरिषदेने मागणी करणे, तथापि या कामास चालना न मिळणे नगरपरिषदेच्या मालकीची सर्वे क्रमांक ६०११ वर देखील पुनर्वसनाबाबत नगरपरिषदेने कोणतीही कार्यवाही न करणे, परिणामी संबंधित टपरीधारक गरीब व्यवसायिकांवर उपासमारीचे संकट निर्माण होणे, त्यामुळे निर्माण झालेला असंतोष याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केलेल्या आहेत. सदर निवदनामध्ये मला आपल्या अनुमतीने पुढील दुरुस्ती करावयाची आहे.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. भास्कर जाधव.....

निवेदनाच्या परिच्छेद क्रमांक 3 मधील पहिल्या ओळीतील " नगर परिषदेने एकूण 62 टपरी दुकानांचे बांधकाम सुरु केले आहे" या ऐवजी " नगर परिषदेने उपलब्ध केलेल्या जागेवर एकूण 62 टपरी दुकानांचे बांधकाम सुरु झाले आहे" असे वाचावे.

निवदनाच्या परिच्छेद क्रमांक 3 मधील तिस-या ओळीतील "सि.स.नं. 6011/ब ही जागा खाजगी मालकीची असल्याने" या ऐवजी "सि.स.नं. 6011/ब ही जागा पुनर्वसनासाठी योग्य नसल्याने" असे वाचावे.

तसेच निवेदनाच्या परिच्छेद क्रमांक 3 मधील चौथ्या ओळीतील "2558 पैकी" या ऐवजी "2558अ पैकी" असे वाचावे. बाकी छापल्याप्रमाणे.

**तालिका सभापती** : दुरुस्त निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी : या विषयाच्या संदर्भात माननीय राज्यमंत्री महोदयांकडे एक बैठक झालेली होती. एक कार्यक्षम मंत्री म्हणून राज्यमंत्री महोदयांकडे पाहिले जाते. राज्यमंत्री महोदयांनी याबाबतीत बैठक घेतली, संबंधित अधिका-यांना फोन केले तरी देखील बैठकीच्या तारखेपासून आजपर्यन्त कोणतीही प्रगती झालेली नाही. प्रश्न पुनर्वसनाचा आहे. हे पुनर्वसन अत्यंत लवकर आणि चांगल्या पध्दतीने होण्यासाठी मी पुनश्च विनंती करतो की, ज्या सरकारी जागा आहेत, विशेषत स.नं. 6015 आणि 6016(1), 6016(2) यांचे नकाशे देखील माझ्याकडे आहेत. येथे पुनर्वसन चांगल्या पध्दतीने होऊ शकेल. परंतु पाटील दरवाजा येथे दुमजली इमारतीत विक्री होणार नाही, त्यांचा व्यापार होणार नाही. तेव्हा त्यांचे पुनर्वसन कसे होईल हा प्रश्न आहे. या बाबतीत महसूल खात्याचे संबंधित अधिकारी, पालिकेचे अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांची बैठक घेऊन सरकारी जागा त्वरेने नरपारिषदेला उपलब्ध करुन द्यावी आणि नगरपरिषदेने पुनर्वसनासाठी गाळे बांधून द्यावेत, असा हा प्रश्न आहे. हा प्रश्न किती दिवसात सोडविण्यात येईल ?

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सदस्य आदरणीय श्री. अरुण गुजराथी यांची नेहमी समन्वयाची आणि सामंजस्याची भूमिका असते. त्यांनी सांगितले की, 6015, 1598 अ/2 या बाबतीत सर्वसाधारणपणे 1 लाख 8 हजार रुपये पालिका निरीक्षक, भूमी अभिलेख या कार्यालयाकडे मोजणीसाठी भरलेले आहेत. सन्माननीय सदस्य आदरणीय श्री. अरुण गुजराथी यांनी सूचना केल्याप्रमाणे हे अधिवेशन संपल्याबरोबर 15 दिवसाच्या आत महसूल खाते, नगरपरिषदेच्या सर्व विभागाचे अधिकारी, नगरविकास विभागाचे सचिव, नगर आयुक्त, लोकप्रतिनिधी आणि सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांच्यासह, बैठक आयोजित केली जाईल आणि त्यामध्ये सर्वसंमतीने टपरीधारकाच्या पुनर्वसनाच्या दृष्टीने मार्ग काएण्यात येईल. पाटील दरवाजा येथील दुमजी इमारतीमध्ये ते कसे जाणार ? आम्हाला देखील ते पटत नाही.

...नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-2.. श्री.भास्कर जाधव....

चर्चा अशी समोर आली की, साधारणपणे जे व्यावसायिक स्वत: वरच्या मजल्यावर जाण्यास तयार आहेत, त्यामध्ये सलून असेल, ब्युटी पार्लर असेल, असा व्यवसाय करणारे स्वत:हून वरच्या मजल्यावर जाण्यास तयार असतील तर त्यांना प्राधान्य दिले जाईल आणि गाळे शक्यतो तळ मजल्यावर असावेत अशी जी आपली सूचना आहे त्या सूचनेप्रमाणे देखील त्यामध्ये गती आणण्यात येईल.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, जळगाव जिल्हयातील चोपडा नगरपरिषदेतील अतिक्रमणाचा हा विषय आहे. राज्यातील अनेक नगरपरिषदांमधील शहरामध्ये अतिक्रमणे हटविताना पुनर्वसनाचा प्रश्न निर्माण होत आहे. मी काल सोलापूर जिल्हयातील बार्शी तालुक्यात गेलो होतो. बार्शी शहरामध्ये देखील अतिक्रमणे हटविण्याचे काम सुरु आहे. काल त्याठिकाणी चर्चा सुरु होती की, आमच्या दुकानाचे काय होणार? आमचे पुढे कसे होणार? माझा प्रश्न असा आहे की, ज्या ज्या शहरांमध्ये अशा प्रकारची अतिक्रमणे झाली असतील तर ती हटविताना तेथील टपरीधारकांच्या दृष्टीने शासन धोरणात्मक निर्णय घेणार आहे का? अतिक्रमिकांच्या पुनर्वसनाच्या दृष्टीने शासन धोरण आखणार आहे काय?

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सभापती महोदय, काही वषापूर्वी शहरे फार वाढत नव्हती. त्यावेळी अतिक्रमणांची फारशी दखल घेतली गेली नाही. आता दळणवळणाच्या सोयी वाढत आहेत. अडचणी वाढत आहेत. रहदारी वाढत आहे. वाढत्या गरजा लक्षात घेऊन अतिक्रमणे काढण्याशिवाय पर्याय नाही. सर्व अतिक्रमणे काढत असताना नगरपरिषदांनी स्वत:हून बीओटी तत्वावर बांधकाम करावे. बांधकाम केल्यानंतर जे वर्षानुवर्षे त्याठिकाणी व्यवसाय करणारे व्यावसायिक आहेत त्यांना त्याठिकाणी सामावून घेण्याचा प्रयत्न करावा. परंतु हा प्रयत्न करीत असताना त्यामध्ये दोन/तीन अटी असतात. जे वर्षानुवर्षे व्यवसाय करतात त्यांना नगरपरिषदेचे ना हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे, व्यवसाय करीत असताना वीज पुरवठयाचे बिल सादर करणे, व्यवसायासाठी परवानगी घेणे आवश्यक आहे. जळगाव येथील प्रश्नाबाबत सन्माननीय सदस्य श्री.अरुणभाई गुजराथी यांनी विशेषकरुन पुढाकार घेतला. स्वत: 205 व्यावसायिकांनी अतिक्रमणे दूर केली. तशा पध्दतीने मार्ग निघत असेल तर निघेल. पुढील काळात शहरांचा नवीन विकास आराखडा तयार करीत असताना त्या विकास आराखड्यामध्ये आपण म्हटल्याप्रमाणे

....2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

धोरणात्मक निर्णय म्हणून सर्व गोष्टींचा विचार करण्याच्या दृष्टीने विचार करावा लागेल असे माझे मत आहे.

श्री.दिलीपराव सोनवणे : सभापती महोदय, चोपडा शहरातील अतिक्रमणे काढण्याच्या संदर्भात कोणाचाही विरोध नव्हता. त्याठिकाणी 205 लोकांनी स्वत:हून अतिक्रमणे हटविण्याचा निर्णय घेऊन मदत केली आहे. पुनर्वसनाचा विचार करुन अतिक्रमणे काढली असती तर हा प्रश्न निर्माण झाला नसता. 400-500 व्यावसायिकांचा व्यवसाय बंद झाला, धंदा बंद झाल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची पाळी आली आहे. शासनाने जो पर्याय दिला त्या पर्यायामध्ये त्यांना मार्केट गाळे दिले जातील काय? किती दिवसात त्यांचे पुनर्वसन होईल?

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी म्हटले की, यापूर्वी विचार केला असता तर अशा प्रकारची परिस्थिती उद्‌भवली नसती. अशा प्रकारची अतिक्रमणे काढण्यापूर्वी नियमानुसार नोटीस दिली जाते, वॉर्निंग दिली जाते, वृत्तपत्रात बातम्या प्रसिध्द होतात. व्यावसायिकांनी देखील कायदा काही असला तरी जायचे कुठे ही अडचण असते. प्रशासनाला आपली जबाबदारी पार पाडावी लागते. तरी देखील सन्माननीय सदस्य श्री.अरुणभाई गुजराथी यांनी सांगितल्याप्रमाणे एकत्रित बसून लवकरात लवकर निर्णय घेऊन सर्वांना जागा उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा, त्याठिकाणी आपल्याला देखील निमंत्रित केले जाईल. हा प्रश्न एकत्रितरित्या सोडविण्यासाठी तुम्ही आम्ही सर्वांनी पुढाकार घेऊ या.

---



अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

**पृ. शी.** : वसई (जि.ठाणे) येथील अर्नाळयापासून 15 कि.मी.अंतरावरील परुळेकर बीच येथे धूपप्रतिबंधक बंधारा बांधणे

**मु. शी.** : वसई (जि.ठाणे) येथील अर्नाळयापासून 15 कि.मी.अंतरावरील परुळेकर बीच येथे धूपप्रतिबंधक बंधारा बांधणे यासंबंधी सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"वसई (जिल्हा ठाणे) येथील अर्नाळापासून १५ कि.मी .अंतरावर असलेली परुळेकर बीचवरील सुरुची बागेला धूपप्रतिबंधक बंधाऱ्याची आवश्यकता असताना संबंधित शासकीय यंत्रणेच्या दुर्लक्षामुळे समुद्राचे खारे पाणी स्थानिक भागातील वस्त्यांमध्ये तसेच शेतजमिनीत सर्वत्र पसरल्याने शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात होत असलेले नुकसान, सदर बाब माहे नोव्हेंबर २००९ वा त्या सुमारास आढळून येणे, पावसाळयात उधाणात सतत येणाऱ्या जोरदार लाटांमुळे किनाऱ्यावरील अनेक झाडे उन्मळून पडल्यामुळे झाडांची राजरोसपणे होत असलेली कत्तल, तसेच किनाऱ्यावर बेकायदेशीरपणे होत असलेला वाळू उपसा तातडीने रोखण्यासाठी संबंधीत स्थानिक बागातील नागरीकांनी शासनाकडे वेळोवेळी केलेली मागणी व त्यासाठी केलेली प्रखर आंदोलने, सदर प्रकाराबाबत शासनाचे होत असलेले दुर्लक्ष त्यामुळे स्थानिक जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री.प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-3....

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, निवेदनात म्हटले आहे की, परुळेकर नावाचा बीच नाही. शासन दप्तरी असा उल्लेख नसेल, परंतु सर्वसामान्य जनतेकडून तो समुद्रकिनारा परुळेकर बीच म्हणूनच ओळखला जातो.

नंतर 2एक्स.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर .....

धूप प्रतिबंधक बंधाऱ्याचे काम सुरु झाल्याचे निवेदनात म्हटले आहे परंतु तेथील लोकांनी जी माहिती दिली त्यानुसार हे काम प्रत्यक्षात सुरु झालेले नाही. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, हे काम कधी सुरु झाले ? तसेच या कामासाठी एकूण किती निधीची तरतूद केली आहे ? कारण रायगड जिल्ह्यातील विषय नुकताच सभागृहात उपस्थित झाला होता. त्यानुसार येथील 41 बंधाऱ्यांपैकी 3 बंधारेच पूर्ण झालेले असून बाकीचे बंधारे प्रस्तावित आहेत अशी माहिती मिळाली. त्याचबरोबर कोणत्याही प्रकारे अनधिकृतपणे रेतीचे उत्खनन झाले नसल्याचे निवेदनात म्हटले आहे, परंतु खऱ्या अर्थाने अनधिकृतपणे रेतीचे उत्खनन मोठ्या प्रमाणात झाल्याची वस्तुस्थिती असून सन 2009-10 मध्ये किती लोकांवर कारवाई केली आहे ? तिसरा प्रश्न असा आहे की, डुबी मारुन रेती काढणारा जो समाज या भागात आहे त्या लोकांचे पोट या धंद्यावरच अवलंबून आहे. परंतु शासनाने रॉयल्टीमध्ये दुपटीने वाढ केल्यामुळे त्यांच्या धंद्यावर त्याचा परिणाम झालेला आहे. या डुबी जमातीच्या लोकांना सन 2003 पर्यंत वार्षिक भाडेपट्ट्यावर शासन हे काम करण्याची परवानगी देत होते त्याच धर्तीवर आताही निर्णय घेणार आहात काय ?

श्री. प्रकाश सोळंके : महोदय, सुरुचि बाग, भास्कर आळी तसेच परुळेकर बीचसंबंधीचा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारलेला आहे. या ठिकाणी कोकण विकास पॅकेजअंतर्गत हे काम चालू असून त्या कामाच्या 76,96,785/- एवढ्या रकमेला प्रशासकीय मान्यतादिलेली असून तांत्रिक मान्यता केंद्रीय जल व विद्युत संशोधन संस्था, खडकवासला यांनी 85 मीटर लांबीच्या कामासाठी मान्यता दिली असून ते काम चालू आहे. आतापर्यंत या कामावर 63 लाख रुपये खर्च झाले असून जवळपास 90 टक्के काम पूर्ण झाले असून मे, 2010 अखेर हे काम पूर्ण होईल. त्याचबरोबर वाळू उत्खननाच्या संदर्भात सांगावयाचे तर ज्या प्रश्नाबाबत सन्माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचना सभागृहात चर्चेला आणली आहे त्यानुसार कुठल्याही प्रकारचे वाळुचे उत्खनन येथे चालू नाही, याची निश्चितपणे खात्री करुन घेतली आहे. परंतु अर्नाळा बी आणि वैतरणा खाडी या ठिकाणी मात्र अनधिकृत वाळुचे उत्खनन चालू असल्याच्या काही घटना घडलेल्या आहेत आणि अर्नाळा बीचवरुन अशा प्रकारे वाळू वाहतूक करणारे दोन ट्रक दि. 28.1.2010 रोजी पकडले असून आयपीएल (371) द्वारे त्यांच्यावर केसेस दाखल केल्या आहेत. त्याचबरोबर अर्नाळा येथून



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके .....

अनधिकृत रेती वाहतूक केल्याप्रकरणी एकूण 18 वाहनांविरुध्द कारवाई केली आणि त्यांच्याकडून 1.22 लाख इतकी दंडाची रक्कम देखील वसूल केली आहे. वैतरणा खाडीमधून 32 सक्शन पंप्स जप्त केलेले आहेत....

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके....

या सक्शन पंपाची जप्ती करतांना त्या ठिकाणी काम करणा-या कामगारांवर केसेस दाखल केलेल्या आहेत. परंतु ही गोष्ट जेव्हा आमच्या निदर्शनास आली त्यावेळी आम्ही संबंधित मालकाविरुध्द केसेस दाखल करण्याच्या सूचना विभागाला देण्यात आलेल्या आहेत व येत्या दोन दिवसामध्ये संबंधित मालकांविरुध्द केसेस दाखल केल्या जातील. डुबी मारुन रेती काढतात त्यांच्या कडून रॉयल्टी वसूल केली जाते परंतु त्यांच्याकडून अशा प्रकारे रॉयल्टी वसूल न करता त्यांच्याकडून भाडेपट्टयाने कर वसूल करण्यात यावा यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे. त्यामुळे यांसदर्भात शासन निश्चितपणे सहानुभूतीने विचार करेल एवढे मी या प्रसंगी सांगू इच्छितो.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : विजेच्या दरात होणारी वाढ

**मु. शी.**: विजेच्या दरात होणारी वाढ यासंबंधी सर्वश्री प्रा. सुरेश नवले, सर्वश्री. संजय दत्त, सुभाष चव्हाण, एस.क्यू.जमा, एम.एम.शेख, जैनुद्दीन जव्हेरी ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

प्रा. सुरेश नवले (नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय ऊर्जा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"केंद्रीय अर्थसंकल्पात औष्णिक ऊर्जा निर्मितीवर कोळशासाठी क्लीन एनर्जी सेस करीता ५०/- रुपये प्रति टन असा दर माहे फेब्रुवारी, २०१० मध्ये लागू करण्यापूर्वी राज्याच्या ऊर्जा निर्मितीच्या वार्षिक खर्चात २०० कोटी रुपयांची संभाव्य वाढ, सदरहू वाढीचा बोजा सर्वसामान्य नागरिकांवर पडणे, राज्याच्या महानिर्मितीमध्ये होऊ घातलेली संभाव्य घट, सदर सेस वाढीचा अप्रत्यक्ष तोटा, राज्यातील सामान्य वीज ग्राहकांना सोसावा लागण्याची निर्माण झालेली भीती, राज्यात कोळशावर आधारित सात औष्णिक वीज निर्मिती प्रकल्पांना वीज निर्मिती क्षमता यासाठी सुमारे ४० दशलक्ष टन इतका कोळसा लागणार असल्याने व त्यासाठी राज्य महावितरण कंपनीमार्फत सामान्य वीज ग्राहकांना भविष्यात वीजेमध्ये होणारी दरवाढ सोसावी लागण्याची निर्माण झालेली भिती, परिणामी वीज ग्राहक हवालदिल होणे आणि याबाबत केंद्रीय औष्णिक वीज मंत्रालयाकडे राज्य शासनाने केलेला वा करावयाचा पाठपुरावा व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

श्री. विजय वडेट्टीवार ( ऊर्जा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, 50 रुपये सेस वाढल्यामुळे वीज ग्राहकाला महाग वीज खरेदी करावी लागेल त्यामुळे 50 रुपये सेसप्रमाणे किती महाग होईल? संशोधन करण्यासाठी सेसचे पैसे वापरले जाणार आहेत त्यामुळे आपण नेमके कोणते संशोधन करणार आहात याची माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी दिली तर आमच्या ज्ञानात भर पडू शकेल.

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, क्लीन एनर्जी सेसचा समावेश केंद्रिय अर्थसंकल्पात समाविष्ट आहे. केंद्राने यासंदर्भात निर्णय घेतल्याशिवाय हा सेस भारतामध्ये लागू होणार नाही. केंद्राने हा सेस लागू केला तर तो सेस संपूर्ण भारतभर लागू होईल. ज्यावेळेस हा सेस लागू होईल त्यावेळेस प्रती युनिट 4 पैसे खर्च येणार आहे.

प्रा.सुरेश नवले :सभापती महोदय, संशोधनावर हा खर्च होणार आहे. यामध्ये कसले संशोधन करणार आहात ?

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, यासंदर्भात आम्हाला केंद्राकडून कोणत्याही प्रकारची माहिती आलेली नाही. या फंडाचा उपयोग संशोधनासाठी करण्यात येणार आहे एवढीच माहिती आम्हाला केंद्राकडून प्राप्त झालेली आहे.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, उत्तरात असे म्हटले आहे की, 1.5 दशलक्ष टन कोळसा ई-ऑक्शन कोटयातून घेण्यात आहे आणि 3.35 दशलक्ष टन कोळसा आयात करण्यात येणार आहे." सभापती महोदय, हा कोळसा महाग असून महाराष्ट्रात अनेक ठिकाणी म्हणजे चंद्रपूर, वणी येथे मोठया प्रमाणात कोळशाच्या खाणी आहेत व तो कोळसा काढण्याची एनओसी खाजगी विद्युत कंपनीला देण्यात आलेली आहे. या ठिकाणावरुन कर्नाटक येथे कोळसा नेला जात आहे. यासाठी 2000 ते 3000 ट्रान्सपोर्टींगसाठी खर्च येणार आहे. कोळसा महाग पडल्यामुळे पर्यायाने ग्राहकांना महाग वीज खरेदी करावी लागणार आहे. त्यामुळे चंद्रपूर व वणी येथून कोळसा घेतला जाईल काय ?

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, कोळशाचे कोल लिंकेज तसेच कोल ब्लॅकेज देण्याचे अधिकार संपूर्णत: केंद्रशासनाचे आहेत. यामध्ये राज्यशासनाचा काही एक अधिकार नाही. कर्नाटक राज्याला जो कोळसा पुरवला जातो त्याला केंद्रसरकारने परवानगी दिलेली आहे. यामध्ये 1594 रुपये प्रती टन मग तो इम्पोर्ट कोल असेल,वॉश कोल किंवा रॉ कोल असेल असा सर्वांचा 1594 प्रती टन असा दर ठरलेला आहे. ...4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी सांगितले आहे की, हा प्रस्ताव केंद्राचा असून तो लागू झाला तर तो संपूर्ण भारतभर लागू होईल. यातून जे काही पैसे मिळणार आहेत त्याचा उपयोग संशोधनासाठी केला जाणार आहे. त्यामुळे प्रत्यक्ष बोजा ग्राहकांवर येणार आहे. मला एवढेच विचारावयाचे आहे की, ग्राहकाला यासंदर्भात अपिलात जावयाचे असेल तर त्याने कोणत्या ॲथोरिटीकडे जावे ?

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, यामुळे 4 पैसे प्रती युनिट इतका अधिभार पडणार आहे. ही सर्व माहिती प्राथमिक स्वरुपातच आहे. यासंदर्भात जर केंद्रसरकारने निर्णय घेतला तर तो निर्णय महाराष्ट्र शासनाला स्वीकारावा लागेल कारण तो संपूर्ण भारतभर लागू होईल. हा निर्णय फक्त आपल्या राज्यापुरता असणार नाही तर संपूर्ण भारतासाठी लागू राहणार आहे.

यानंतर श्री.भारवि.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, नियामक प्राधिकरण राज्य शासनाचे नसल्यामुळे राज्य शासन त्यात लक्ष घालणार नाही. मग आम्ही न्याय मागण्यासाठी कोणाकडे जायचे ? प्रारूप आहे. त्यामुळे ग्राहकांवर बोजा येणार आहे. यासंबंधी आम्हाला तक्रार करायची असेल तर मी केंद्र शासनाकडे जाऊ शकतो काय ? राज्य शासनाकडे नियामक प्राधिकरण नसल्यामुळे मी कुठल्या नियामक प्राधिकरणाकडे जायचे ?

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, ज्यावेळी लागू होईल तेव्हाची ही गोष्ट आहे. आज ते आपल्याला लागू केलेले नाही. त्यामुळे आपल्याला पुढे अपीलमध्ये न्याय मागण्यासाठी कुठे जायचे असे म्हणणे उचित होणार नाही.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, यासंबंधी आपल्याकडे काही तरी यंत्रणा असेलच ना.

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, केंद्र शासनाचा हा निर्णय संपूर्ण राज्यांना लागू होणार आहे. यामध्ये महाराष्ट्र ह्या एकमेव राज्याचा समावेश नाही. संपूर्ण देशपातळीवर या निर्णयाची अंमलबजावणी होणार आहे.

....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ठाकर समाजाचा अनुसूचित जमातीत समावेश न होणे.

**मु. शी.** : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ठाकर समाजाचा अनुसूचित जमातीत समावेश न होणे यासंबंधी सर्वश्री सुभाष चव्हाण,राजन तेली, भाई जगताप,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील सर्व ठाकर समाजातील लोकांना अनुसूचित जमातीच्या यादीत समाविष्ट केलेले असतानाही सिंधुदुर्ग जिल्हयातील ठाकर समाज बांधवांना अनुसूचित जमातीत समाविष्ट करण्यात न येणे, सिंधुदुर्ग जिल्हयातील ठाकर समाजातील लोक चालरिती व रूढी परंपरेने जगत असून अजूनही जाडे भरडे गुंडाळलेले कपडे, अंधश्रध्दा,भूत-पिशाच्छ इत्यादी गोष्टींवर विश्वास ठेवून जीवन जगत असणे, राज्यातील इतर ठाकर समाजाला सन १९७६ पासून क्षेत्र बंधन उठवून अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट करुन दाखले दिले जाणे, परंतु फक्त सिंधुदुर्ग जिल्हयातील ठाकर समाजाला अनुसूचित जाती मध्ये समाविष्ट न केल्याने त्यांच्यात पसरलेली असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

श्री.पद्माकर वळवी (आदिवासी विकास मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, ठाकर समाजासंबंधी एक महत्त्वाची लक्षवेधी सूचना आहे. ठाकर समाज हा मूळात आदिवासीमध्ये येतो. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ठाकर समाजातील लोक चालीरिती व रूढी परंपरेने जगत असून जाडे-भरडे गुंडळालेले कपडे,अंधश्रद्धा,भूत-पिशाच्च इ.गोष्टींवर विश्वास ठेवून जीवन जगत असतात. लेखी निवेदनात असे नमूद केले आहे की, महाराष्ट्र राज्यात अनुसूचित जमातीच्या यादीत क्र.44 वर "ठाकर" अशी नोंद आहे. पण सिंधुदुर्ग जिल्ह्यातील या समाजातील लोक शासकीय सवलतींपासून वंचित राहिलेले आहेत. तेव्हा सिंधुदुर्ग जिल्ह्याचे सर्वेक्षण झाले आहे काय ? नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ? तसेच हा समाज सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये किती आहे ?

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय,लक्षवेधी सूचनेत नमूद केलेला ठाकर समाज हा अनुसूचित जमातीच्या यादीमध्ये समाविष्ट नाही. हा ठाकर समाज तत्कालीन मुंबई सरकारच्या इतर मागासवर्गीय समाजाच्या यादीमध्ये अनुक्रमांक 111 वर होता. त्यानंतर अनुक्रमांक 116 वर त्याचा समावेश झाला. भारतीय संविधानाच्या 1950 च्या इतर मागासवर्गीयांच्या यादीमध्ये अनुक्रमांक 145 वर ठाकर समाज होता. 13 ऑक्टोबर 1967 रोजी ओबीसींची यादी बनविण्यात आली. त्यात या ठाकर समाजाचा अनुक्रमांक 156 वर होता. 9 डिसेंबर 1977 रोजी ओबीसींच्या यादीमध्ये हा ठाकर समाज वगळण्यात आला. पुन्हा 8 जुलै 1982 रोजी गॅझेटमध्ये पुन्हा हा समाज अनुक्रमांक 200 वर समाविष्ट करण्यात आला. माननीय उच्च न्यायालयाचा निर्णय माननीय सुप्रीम कोर्टाने कायम ठेवल्यानंतर शासन निर्णय 26 जुलै 2000 नुसार हा समाज पुन्हा ओबीसींच्या यादीतून वगळला गेला. ओबीसींच्या यादीमध्ये ज्याप्रमाणे हा ठाकर समाज होता तसा तो व्हीजेएनटीच्या यादीमध्ये देखील होता. शासन निर्णय 21 नोव्हेंबर 1961 मध्ये तत्कालीन रत्नागिरी जिल्ह्यातील ठाकर समाज आहे. हा यादीतील अनुक्रमांक 22 वर होता. परंतु, शासन निर्णय 2 जून 2000 नुसार विमुक्त जाती आणि भटक्या जमातीच्या यादीतून हा समाज वगळण्यात आला. लक्षवेधी सूचनेमध्ये जाडे-भरडे गुंडाळलेले कपडे,अंधश्रद्धा, भूत-पिशाच्च इ.गोष्टींवर विश्वास ठेवून हा समाज जगतो असे नमूद केले आहे. कोणत्याही अनुसूचित जमातीचे गॅझेट काढायचे असेल तर भारत सरकारला हा अधिकार आहे. संसदेला अधिकार आहे.

अशुद्धीत मत / शुद्धीसाठी नाही

श्री.पद्माकर वळवी.....

आर्टिकल 341, 342 नुसार भारत सरकारला संशोधन करण्याचा अधिकार आहे. यामध्ये भारत सरकारने मापदंड निश्चित केले आहेत. आदिम लक्षणे, विशिष्ट संस्कृती, भौगोलिक अलिप्तता, विशिष्ट भाषा,निर्वाह अर्थव्यवस्था, इतर व्यक्तींशी संपर्क साधण्यास लाजाळूपणा आणि मागासलेपणा, अशा प्रकारचे मापदंड आहेत. ह्या सर्व प्रक्रिया पूर्ण कराव्या लागतात. त्यानंतर केंद्र सरकार संसदेमध्ये बिल आणते आणि मग या जमातीचा समावेश अनुसूचित जमातीच्या यादी मध्ये होऊ शकतो. ही जमात ओबीसीमध्ये होती. त्यानंतर ती वगळण्यात आली. ही जमात व्हीजेएनटीमध्ये होती. त्यातून देखील वगळण्यात आली. त्यामुळे या जातीची स्टेटस ओपनमध्ये आहे.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पद्माकर वळवी ..

अनुसूचित जमातीमधील जो ठाकूर आणि ठाकर समाज आहे त्याचे व्हेरिअस स्टेटस स्पेसिफाईड झालेले आहेत त्यामुळे सिंधुदुर्ग जिल्हयातील जमातीच्या लोकांना आदिवासी ठाकूर आणि ठाकर समाजाचा म्हणून जातीचा दाखला मिळू शकत नाही ही वस्तुस्थिती आहे.

श्री.भाई जगताप :सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांना सरकारी अधिका-यांनी जे सांगितलेले आहे त्याप्रमाणे माननीय मंत्री महोदय उत्तर देत आहेत. वास्तविक पाहता माननीय मंत्री महोदय स्वत: संवेदनशील आहेत,त्या समाजातून ते येथ पर्यत पोहोचलेले आहेत त्यामुळे त्यांनी आमच्या वेदना समजावून घ्याव्यात. अशी माझी त्यांना विनंती आहे. 1950 सालापासून या समाजातील लोकांचा लढा सातत्याने सुरु आहे. हायकोर्ट आणि सुप्रीम कोर्ट यांच्या प्रक्रियेमधून हा लढा गेलेला आहे. मघाशी माननीय मंत्री महोदयांनी चालीरीतीचा उल्लेख केला होता त्या चालीरीतीच्या आधारावर ती व्यक्ती त्या जातीचा आहे किंवा नाही हे ठरविले जात असते. या समाजाच्या बाबतीत ती प्रक्रियासुध्दा झालेली आहे. सहयाद्री पर्वत रांगामधील जो ठाकर समाज आहे. त्यांच्या चालीरीती आणि सिंधुदूर्ग जिल्हयात राहत असलेल्या ठाकर समाजाच्या चालीरिती एकच आहे. अशा प्रकारचा अहवाल हायकोर्टात सादर करण्यात आला होता आणि हायकोर्टाने त्याला मान्यता दिली होती. माननीय मंत्री महोदयांनी मघाशी ज्या जातीचा आणि ज्या चालीरीतीचा मघाशी उल्लेख केला होता त्या चालीरीती आजही सिधुदुर्ग जिल्हयातील या समाजामध्ये आहे. या समाजातील लोक ठाकरी भाषा बोलतात, वाघ्या व हिरवा देव ही त्यांची दैवते आहेत. श्री. चाफेकरांच्या "सहयाद्रीतील ठाकर" या पुस्तकात वर्णन केल्याप्रमाणे ते राधा नृत्य करतात , होळी सणाच्या दिवशी विनोदी मुखवटे धारण करतात, स्त्री पुरुष एकत्र नृत्य करीत नाहीत, शेती, मजुरी, पोटापुरती मच्छिमारी यावर त्यांचा उदरनिर्वाह चालतो. त्यांची लोकसंख्या किती आहे हा प्रश्न नाही तर त्या समाजाला या लाभापासून वंचित ठेवणार आहात काय एवढाच मर्यादित प्रश्न आहे.पुणे येथील रिसर्च आणि डेव्हलपमेन्ट सेन्टरच्या माध्यमातून देखील या सबंधीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे तसेच यासाठी एक समिती स्थापन करुन त्यांच्या मार्फत देखील प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली आहे. मला माननीय मंत्री महोदयाना एकच प्रश्न असा विचारावयाचा आहे की या सर्व पक्रिया पूर्ण झाल्यानंतरसुध्दा या समाजाला वंचित ठेवणार आहात काय ? त्यांचा हक्क त्यांना देण्यात येणार आहे की नाही ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग इत्यादी मागासवर्गीय प्रवर्गातील जातींतील व्यक्तिना जातीचा दाखला देण्याची प्रक्रिया 23/2001 च्या कायद्यानुसार होत असते. या कायद्याची अंमलबजावणी 2003 सालापासून सुरु करण्यात आली असून त्या कायद्याप्रमाणे या समाजातील व्यक्तिांना जातीचे दाखल देण्यात येतात. उप विभागीय अधिकारी आणि उप जिल्हाधिकारी दर्जाचे अधिकारी सर्व कागदपत्रे तपासून पाहतात. सन्माननीय सदस्यांनी असा मुद्दा उपस्थित केला आहे की जे मूळ आदिवासी आहेत त्यांचे वैशिष्ट सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये राहत असलेल्या ठाकर समाजातील लोकांमध्ये सुध्दा आढळून येतात. जातचे दाखले देत असतांना या सर्व गोष्टी तपासून पाहिल्या जातात.....

ॲड.अनिल परब : पैसे घेऊन जातीचे सर्टिफिकेट दिले जाते.

श्री.पद्माकर वळवी : त्यासबंधीचे आपण स्पेसिफिक उदाहरण दिले तर ते प्रकरण तपासून पाहण्यात येईल. अनुसूचित जमातीतील जे ठाकर समाज आहेत, जे मूळ ठाकर समाज आहेत त्यांचा एरिया 1950 च्या कायद्यान्वये निश्चित करण्यात आला आहे. त्यामध्ये सिंधुदुर्ग जिल्हा नव्हता.

श्री.भाई जगताप : त्यावेळी रत्नागिरी जिल्हा होता.

श्री.पद्माकर वळवी : कुलाबा, पुणे, नाशिक , ठाणे या चार जिल्हयांतील स्पेसिफाईड तालुके त्यामध्ये होते.अनुसूचित जमतीची वैशिष्टये मी मघाशी सांगितली होती त्यातील क्रायटेरियाची जर एखाद्या समाजाकडून पूर्तता केली जात असेल तर राज्य सरकारकडून त्याबाबतीत केन्द्र सरकारकडे प्रस्ताव जातो . त्यानंतर संसदेमध्ये विधेयक पास केले जाते आणि त्यानंतरच तो समाज अनुसूचित जमातीचा आहे हे जाहीर केले जाऊ शकते.....

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मला हे सांगावयाचे आहे की.....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप..

यापूर्वी अशाप्रकारचे दाखले दिले गेले. त्यामुळे तुम्ही त्यांना नव्याने काही तरी द्या असे आम्ही म्हणत नाही. यापूर्वी सुध्दा दाखले दिले गेले आहेत. त्या दाखल्यांची पडताळणी झाल्यानंतर ते दाखले वैध असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यांना दिलेल्या दाखल्यांपैकी काही दाखले अवैध झाले, त्यानंतर त्यावर प्रक्रिया होऊन ते वैध ठरविण्यात आले. त्यामुळे केंद्र सरकारकडे पाठविण्याचा प्रश्न उद्भवत नाही. जेव्हा हा प्रश्न तयार होईल तेव्हा त्या समाजाला विशिष्ट गटामध्ये घाला, अशी मागणी केल्यानंतर हा प्रश्न निर्माण होईल. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, याबाबत पूर्वी दाखले दिले गेले आहेत, आता आपले अधिकारी अनाकानी करीत आहेत. म्हणून त्यांना पूर्वीप्रमाणे दाखले दिले जातील काय? आणि त्यांना त्या प्रवर्गाचे फायदे मिळतील काय?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, याठिकाणी ठाकर जमातीसंबंधी चर्चा सुरु आहे. त्यांना जातीचे प्रमाणपत्र मिळाले पाहिजेत अशी माननीय सदस्यांची मागणी आहे. त्यातील काही लोकांना जातीचे प्रमाणपत्र दिले असून त्याची जातपडताळणी सुरु आहे. हे दिलेले प्रमाणपत्र कोर्टाने दिलेल्या निर्णयापूर्वीचे असून कोर्टाच्या निर्णयानंतरचे नाहीत. या संदर्भात श्री. पांडुरंग रंगनाथ चव्हाण यांनी उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिका क्रमांक 1961-1991 च्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने पालघाट, जिल्हा खंडन समुदाय सर्व्हेक्षण समित्या आणि विरुध्द केरळ सरकार 1994 (1) केस 359 मध्यें नमूद केलेल्या याचिकेवरील निर्णयाचा आधार घेऊन निर्णय दिला की, अनुसूचित जाती-जमातीचे मूळ आदेश जसे आहेत तसे अंमलात आणावेत, त्यामध्ये कोणताही बदल करण्यात येऊ नये. तसेच, मिलिंद कटवारे विरुध्द महाराष्ट्र शासन या याचिकेचा निर्णय देतांना सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जाती-जमातीचे मूळ आदेश जसे आहेत तसे वाचावेत असे सांगितले. त्याप्रमाणे पुन्हा दाखले देण्यास सुरुवात झाली.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. जयप्रकाश छाजेड)**

त्यानंतर हा विषय अत्यंत गांभीर्याने घेण्याची आवश्यकता आहे. कारण 1967 सालापासून हा विषय सुरु आहे. यामध्ये वेगवेगळया पध्दतीने वेगवेगळे जी.आर. निघाले आहेत, 1967 चा जी.आर. आहे, त्यानंतर डिसेंबर 1977 चा जी.आर. आहे, त्यानंतर 1982 चा जी.आर. आहे, त्यानंतर 2002 चा जी. आर. आहे. म्हणजे या जी.आर.प्रमाणे् त्यांचा समावेश करण्यात आला व नंतर त्यांना वगळण्यात आले आहे. त्यांना ओ.बी.सी. मध्ये टाकण्यात आले आहे, व नंतर पुन्हा काढण्यात आले आहे. एकदा त्यांना भटक्या विमुक्तांमध्ये टाकण्यात आले आहे व नंतर काढण्यात



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते...

आले आहे. हा समाज भटक्या विमुक्तांमध्ये नाही, अनुसूचित जातीमध्ये नाही, आणि ओ.बी.सी. मध्येही नाही. परंतु माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे जातीचे प्रमाणपत्र देत असतांना आपण जर समितीसमोर त्यासंबंधीचे पुरावे सादर केले तर त्या समितीला अधिकार दिलेला असल्यामुळे त्यासंबंधीचे पुरावे पाहून समिती निर्णय देऊ शकते. त्यामुळे यामध्ये "ठाकर" हा समाज अंतर्भूत आहे. त्याबाबतीत नगरच्या न्यायालयामध्ये निर्णय देत असतांना कोणते "ठाकर" धरले आहेत?असे विचारण्यात आले. त्यामध्ये "क ठाकूर", "का ठाकूर", "मा ठाकूर" हे सर्व एकत्र आलेले आहेत. यामध्ये "क ठाकूर", "का ठाकूर", "म ठाकूर", "मा ठाकूर" यांच्यासह खालील जिल्हयांमध्ये विशिष्ट तालुक्यांचा समावेश करण्यात आलेला होता. त्यामध्ये अहमदनगरमध्ये अकोला, राहूरी आणि संगमनेर, रायगडमध्ये कर्जत, खालापूर,पेण, पनवेल, सुधागड आणि माथेरान, नाशिकमध्ये ईगतपूरी, नाशिक, सिन्नर, पुण्यामध्ये आंबेगाव, जुन्नर, खेड आणि मावळ, ठाण्यामध्ये कल्याण, मुरबाड, भिवंडी,वाडा, वसई, शहापूर, पालघर, जव्हार, मोखाडा एवढयाच तालुक्यांचा त्याठिक्राणी समावेश झ ालेला होता ही वस्तुस्थिती आहे. आमची जरी इच्छा असली व शासनाची इच्छा असली तरी न्यायालयाने हा प्रश्न निकालात काढला आहे. त्यामुळे या "ठाकर" समाजाच्या लोकांना प्रत्यक्षात जात पडताळणी समितीपुढे जाऊन त्यांचे प्रमाणपत्र सिध्द करण्याची किंवा "मी तो आहे" हे सिध्द करण्याची पूर्ण मुभा आहे. तशाप्रकारे त्यांनी सिध्द करावे. हा खूप लोकांचा नाही तर फक्त साडे चार ते पाच हजार लोकांचा प्रश्न आहे. यामध्ये दावे दाखल करण्यात आल्यानंतर 46 लोकांना सुनावणीसाठी बोलाविण्यात आले होते . त्यापैकी फक्त 18 लोकच हजर राहिले, आणि 28 लोक अनुपस्थित राहिले. सुनावणीसाठी न बोलाविता 10 लोक उपस्थित राहिले. त्यामुळे या सुनावणीबाबत सुध्दा एकत्रित विचार करण्याची आवश्यकता आहे. मी पुढे जाऊन असे सांगतो की, या संदर्भात संबंधित आमदार आणि त्यांच्याबरोबर असलेले वकील, शासनाच्या वतीने विभागीय सचिव, आम्ही, आणि जातपडताळणीचे आयुक्त यांच्याबरोबर एक संयुक्त बैठक घेण्याची माझी व शासनाची तयारी आहे. त्या बैठकीमध्ये आपण हा विषय उपस्थित करुन हा प्रश्न सोडविण्याचे काम करु या.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धीत प्रत / अशुद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले की, संबंधित सन्माननीय सदस्य आणि कमिशनर यांच्याबरोबर संयुक्त बैठक घेण्यास ते तयार आहेत. मी सांगू इच्छितो की, यापूर्वी या विषयाच्या संदर्भात बैठक झालेली आहे. या प्रश्नाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी उल्लेख केला की, 1950 साली संपूर्ण ठाकर समाज एस.टी.मध्ये होता. 1950 मध्ये जी सूची तयार झाली. त्यावेळी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जो ठाकर समाज आहे, तर त्याबाबतीत सांगावयाचे तर तेव्हा सिंधुदूर्ग जिल्हा नव्हता तर रत्नागिरी जिल्हा होता. त्यावेळी मघाशी सांगितल्याप्रमाणे हा ठाकर समाज एस.टी.मध्ये होता. सन्माननीय मंत्री महोदयांनी 1967 बाबत उल्लेख केला आहे. त्याबाबत सांगावयाचे तर त्यावेळी ठाकर समाजाला एस.टी.या प्रवर्गातून काढून ओ.बी.सी.मध्ये टाकल्यानंतर या लोकांनी हाय कोर्टामध्ये पिटीशन दाखल केली., ही माहिती चूक आहे की बरोबर आहे ते माननीय मंत्री महोदयांनी मला सांगावे. मग हाय कोर्टाने ही बाब कन्फर्म केली की, हा समाज एस.टी.या प्रवर्गामध्ये आहे आणि त्यांना एस.टी.या प्रवर्गाचे दाखले मिळावेत हाय कोर्टाच्या फूल बेंचने ते मान्य केले. मग त्याच्या विरुध्द सर्व सरकारी अधिकारी सुप्रीम कोर्टामध्ये गेले आणि हाय कोर्टामध्ये जो निर्णय झालेला होता, तो सुप्रीम कोर्टाने कन्फर्म केला. त्यानंतर सुप्रीम कोर्टाने पुण्याच्या जातपडताळणी कमिशनर यांना डायरेक्शन दिल्या. मग पुण्याच्या कमिशनर यांनी डिस्ट्रीक्ट कलेक्टरला आदेश काढले की, या समाजाला एस.टी.चे प्रमाणपत्र द्यावयाचे. प्रश्न असा उपस्थित होतो की, जेव्हा माननीय श्री.विजयकुमार गावित हे मंत्री होते आणि माननीय श्री.आर.आर.पाटील हे ग्रामविकास मंत्री होते. त्यावेळी सर्व सन्माननीय सदस्य, आदिवासी मंत्री आणि श्री.श्रीपाद कर्वे ज्यांचा माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरभाऊंनी केला . . . .

**तालिका सभापती (श्री.जयप्रकाश छाजेड)** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मी प्रश्नच विचारीत आहे. त्यावेळी आम्ही एक प्रश्न उपस्थित केला की, या समाजाला एस.टी.चे आरक्षण असून, याबाबतीत हाय कोर्टाचे, सुप्रीम कोर्टाचे अशा-अशा प्रकारचे निवाडे झालेले आहेत. त्यावेळी हाय कोर्टामध्ये रिट पिटीशन दाखल करण्यात आली होती. पण तुमच्या श्री.श्रीपाद कर्वे या शहाण्याने हाय कोर्टामध्ये ॲफीडेव्हीट फाईल केले की, माझ्यावर माननीय मंत्री श्री.आर.आर.पाटील, सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी आणि अन्य सन्माननीय सदस्य दबाव आणतात आणि मी त्याला बळी पडणार नाही. तुम्हाला या ...

. . . .3 सी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी . . . .

सभागृहाने दिलेले जे अधिकार आहेत, त्याचा तुम्ही दुरुपयोग करीत आहात. आज असा प्रश्न निर्माण झालेला आहे की, या समाजाला एस.टी.चे अधिकार दिलेले होते, ते शासन त्यांना परत देणार आहे काय ? तसेच तुम्ही ही बाब मान्य करणार आहात काय ? हा माझा स्पेसिफीक प्रश्न आहे.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी येथे बऱ्याच गोष्टींचा उल्लेख केला. ही गोष्ट खरी आहे की, 1950 जी यादी तयार करण्यात आली, त्यामध्ये या समाजाचा समावेश होता. ठाकर समाजाचा दि.13-10-1967 रोजी ओ.बी.सी.मध्ये समावेश झाला. त्यानंतर दि.09-12-1977 रोजी त्यांना ओ.बी.सी.मधून वगळण्यात आले. त्यानंतर पुन्हा दिनांक 08-07-1982 रोजी ठाकर समाजाचा ओ.बी.सी.मध्ये समावेश करण्यात आला. त्यानंतर दिनांक 26-07-2000 रोजी त्यांना ओ.बी.सी.मधून वगळण्यात आले. 1950 मध्ये यादी तयार करण्यात आली. त्यानंतर 1956 मध्ये पुन्हा यादी तयार आली, त्यामध्ये त्यांचा समावेश करण्यात आला. त्याच दरम्यान दि.21-11-1961 मध्ये ठाकर जातीचा भटक्या जमातीमध्ये समावेश करण्यात आला. त्यानंतर परत याबाबतीत चर्चा झाली आणि दि.2 जून 2004 रोजी भटक्या जमातीमधून या समाजाला वगळण्यात आले. हे समाजकल्याण विभागामधून झालेले आहे. 1956 ची जी यादी आहे, त्यामध्ये क्षेत्रबंधन बाबत मुद्दा होता आणि ते क्षेत्रबंधन मध्ये बसत नाहीत म्हणून परत त्यांना वगळण्यात आले. आजच्या मितीला कोर्टाने दिलेल्या निर्णयाप्रमाणे या समाजातील लोकांना जातपडताळणी समितीकडे जावे लागेल आणि जात पडताळणी अधिकाऱ्यांनी त्यांना वगळलेले आहे हे खरे आहे. दुसरा मुद्दा असा उपस्थित केला की, आम्ही जात पडताळणी अधिकाऱ्याकडे ही बाब देऊ शकत नाही. पण त्यांना तो अधिकार आहे. न्यायालयीन अधिकार असून त्याचा त्यांनी वापर करावयाचा आहे आणि आम्ही याच समाजाचेच आहोत हे सिध्द करण्याची जबाबदारी अर्ज करणाऱ्याची आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. राजन तेली : सभापती महोदय, ठाकर समाजाचा अनुसूचित जामातीत समावेश असेल तर त्यांचा वेगळया ठिकाणी अंतर्भाव करण्याचा प्रश्न येतो कुठे? केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्याच्या घोषित केलेल्या अनुसूचित जमातीच्या यादीत ठाकर समाज 44 नंबरवर दाखविलेला आहे. माहितीच्या अधिकारात महाराष्ट्र शासनाच्या अधिकाऱ्यांनीच ही माहिती दिलेली आहे.

सभापती महोदय, अनसूचित जमाती प्रमाणपत्र समितीचे उदाहरणच देऊन सांगायचे तर तपासणी समितीच्या निर्णयानुसार श्री.मनोज मोहन रणसिंग ठाकूर हे अनुसूचित जमातीत मोडतात त्यांचे वडील श्री. मोहन बाबली रणसिंग हे अनूसचित जमातीत मोडत नाहीत. श्री. नारायण भगवान वाक्कर हे ठाकर या अनूसूचित जमातीत मोडतात तर त्यांचा मुलगा अमोल नारायण वाक्कर हा अनुसूचित जमातीत मोडत नाही. श्री. रणधीर नाना रणसिंग हे ठाकर अनुसूचित जमातीत मोडतात तर त्यांचे बंधू श्री. रणजित नाना रणसिंग हे अनुसूचित जमातीत मोडत नाहीत. श्री. वल्लभ सदानंद मसके हे अनुसूचित जमातीमध्ये मोडतात तर त्यांची बहीण कु. हिरा सदानंद मसके हया अनुसूचित जमातीत मोडत नाहीत म्हणून त्यांना परवा पुण्यामध्ये पी.डब्लू.डी.च्या कार्यालयामधून काढून टाकण्यात आलेले आहे.

सभापती महोदय, याच सभागृहात तारांकित प्रश्न क्रमांक 14927/2001 रोजी सन्माननीय सदस्य श्री. आदिक साहेबांनी विचारला होता त्याला राज्य सरकारने असे उत्तर दिले होते की,"सिंधुदुर्ग जिल्हयातील ठाकर अनुसूचित जमातीच्या सवलतीपासून वंचित नाहीत" सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी याठिकाणी उत्तर देतांना संगितले की, या ठाकर समाजाच्या चालीरिती जुळत नाहीत. परंतु सुधीर जोशी समितीच्या 1997 च्या अहवालात स्पष्ट म्हटलेले आहे की, सिंधुदुर्ग जिल्हयातील ठाकर जमातीच्या चालीरिती हया ठाकर अनुसूचित जमातीच्या चालीरितींशी जुळतात." त्यानंतर मानव शास्त्रज्ञ प्रा. आर.आर.मुटाटकर यांनी देखील अभिप्राय दिलेला आहे की, सिंधुदुर्ग जिल्हयातील ठाकर अनुसूचित जमातीत मोडतात. सभापती महोदय, 2004 मधील हायकोर्टातील प्रकरणाच्या संदर्भात याठिकाणी उल्लेख करण्यात आला पण नंतर 2005, 2006 व 2009 मध्ये हायकोर्टात ज्या रीटपिटिशन दाखल झालेल्या आहेत त्यामध्ये हायकोर्टाने वेगवेगळे निर्णय दिलेले आहेत. त्यांच्यावर कोर्टही अन्याय करु शकत नाही आणि शासन देखील अन्याय करु शकत नाही.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली.....

सभापती महोदय, 1980 च्या सावंतवाडी गॅझेटिअरमध्ये व 1980 च्या रत्नागिरी जिल्हयातील गॅझेटिअरमध्ये चालीरिती जुळतत असे म्हटले आहे.

त्यामुळे सिंधुदुर्ग जिल्हयातील ठाकरसमाजाच्या चालीरीती अनुसूचित जमातीच्या ठाकर समाजाशी जुळत नाहीत असे म्हणणे चूकीचे, खोटे व दिशाभूल करणारे आहे.

सभापती महोदय, एवढे सगळे पुरावे याठिकाणी असताना त्या ठाकर समाजावर अन्याय कसा काय करता? सभापती माझी या निमित्ताने अशी विनंती आहे की, या समजावरचा अन्याय शासन दूर करणार आहे काय?माननीय मंत्रिमहोदय, एकदा म्हणतात की, ओ.बी.सी.मधून त्यांना वगळेलेले आहे. पुन्हा म्हणतात की, अनुसूचित जमातीमधून सुध्दा त्यांना वगळलेले आहे. मग ही जमात आहे तरी कुठे? या जमातीवर अन्याय कसा करता?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, या प्रश्नाचे उत्तर मी दिलेले आहे. सन्माननीय सदस्यांना जी अपेक्षित उत्तरे पाहिजेत तीच उत्तरे माझ्याकडून मिळतील किंवा तीच उत्तरे मी द्यावीत असे नाही. ही न्यायालयीन बाब आहे. तरी सुध्दा मी सांगितले की, या ठाकर समाजाला न्याय देण्यासाठी या संदर्भात बैठक घेऊन आणखी काही मार्ग मिळेल काय हे शोधण्याची शासनाची तयारी आहे. यामध्ये एकदा,दोनदा, तीनदा आणि अनेक वेळा कोर्टात केसेस गेलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितलेले पूर्वी जे जातपडताळणी प्रमाणपत्र दिलेले आहेत ते या निर्णयाच्या आधीचे आहेत. त्यामुळे आधीचे दिलेले सर्व पुरावे रद्द ठरवावेत, अशा प्रकारचा सुध्दा निर्णय झालेला आहे. पण त्याशिवाय या समितीचे कामकाज दिनांक 15-2-2001 पासून सुरु झाले असून महाराष्ट्र अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती इतर मागसवर्ग, व विशेष मागासवर्ग प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र देण्याचे, त्याच्या पडताळणीचे विनियमन अधिनियम 2000, महाराष्ट्र अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र देण्याचे नियम 2003 अंतर्गत कामकाज चालते. सदर निमयातील नियम क्रमांक 8 अनुसूचित जमातीचा दावा सिध्द करण्याची जबाबदारी दावा करणाऱ्या अनूसूचित जमातीच्या अर्जदाराची राहील अशी तरतूद आहे" त्यामुळे त्यांनी तेथे जाऊन सिध्द केले पाहिजे. येथून याबाबतीत निर्णय देता येत नाही. कारण यासाठी स्वतंत्र अशा न्यायालयाच्या चौकटीत बसवून समित्या तयार केलेल्या आहेत. मी त्यापुढे जाऊन संगितले की, जातपडताळणी

...3.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते....

समित्यांच्या आयुक्तांची आणि आपल्या सगळयांची एक बैठक बोलावून यातून काही मार्ग काढता येईल काय?यासंदर्भात सविस्तर चर्चा करण्याची शासनाची तयारी आहे. पण येथून एकतर्फी निर्णय होईल आणि येथून न्याय दिला जाईल असे होणार नाही. सध्या ही जमात ओ.बी.सी.मध्ये नाही आणि भटक्या विमुक्तांमध्येही नाही. आणि ट्रायबलमध्ये सुध्दा नाही अशी वस्तुस्थिती आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, आम्हाला अपेक्षित उत्तर माननीय मंत्रिमहोदयांनी द्यावे असे आम्ही म्हणतच नाही. शासनाने घेतलेले निर्णय जसेच्यातसे राबविण्यात यावेत असे आमचे म्हणणे आहे त्यामुळे आमचा त्यामध्ये काही स्वार्थ नाही.पण एक स्वार्थ नक्कीच आहे. या ठाकर समाजाला ट्रायबल मधून काढून टाकण्यात आले. ओ.बी.सी.मधून काढून टाकले मग आता ते आहेत तरी कुठे?

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप .....

आमचा प्रश्न असा राहील की, तो प्रवर्ग यादीमध्ये क्रमांक 44 वर आहे. त्या यादीमध्ये असताना त्यांच्या चालीरीती जुळतात. जे निकष लावावयाचे असतात ते सगळे जुळतात. आम्हाला अपेक्षित असलेले उत्तर द्यावे असे आम्ही म्हणत नाही पण त्यांना उपेक्षित ठेवले जाते. आपण जे म्हणालात तशा समित्या यापूर्वीही झालेल्या आहेत. त्यातून काय निष्पन्न झाले हे आपल्या समोर आहे. जे निर्णय याच्या अगोदर झाले तसेच ही उदाहरण इतकी बोलकी आहेत की, वडिलांना दाखला आहे पण मुलाला नाही, हे आपण कसे काय जस्टिफाय करु शकतो ? हे सर्वोच्च सभागृह आहे. शासन यावर निर्णय घेऊ शकेल असे आम्हाला वाटते. म्हणून आपण निर्णय घेऊन या वंचित राहिलेल्या लोकांना न्याय देणार काय ?

श्री. पद्माकर वळवी : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये अनुसूचित जमातीची जी यादी आहे त्यामध्ये क्रमांक 44 वर ज्या जमातींची नावे आहेत त्यामध्ये ठाकूर ऑर ठाकर ठाकूर इन्क्लुडींग का-ठाकूर, का-ठाकर, मा-ठाकूर, मा-ठाकर यांचा समोवश आहे. परंतु महाराष्ट्रामध्ये वेगवेगळ्या भागामध्ये अशा ठाकूर जातीचे बिगर आदिवासी आणि प्रस्थापित समाजाचे लोक आहेत. त्यामध्ये क्षत्रीय ठाकूर आहेत, भाट ठाकूर आहेत, ब्राम्हण ठाकूर आहेत. काही लोक राजस्थानातून आलेले आहेत. काही लोक मध्यप्रदेशमधून आलेले आहेत. अशा प्रकारे प्रस्थापित समाजाचे लोक ठाकूर, ठाकर या खऱ्या अनुसूचित जमातीच्या लोकांचा फायदा घेतात. या अनुषंगाने शिल्पा विष्णू ठाकूर विरुध्द स्टेट ऑफ महाराष्ट्र या प्रकरणामध्ये हायकोर्टाने निर्णय दिलेला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या पूर्ण खंडपीठाने 7 मे, 2009 रोजी निर्णय दिलेला आहे आणि त्या निर्णयामध्ये स्पष्ट म्हटले आहे की, ठाकूर दोन प्रकारचे लोक आहेत. एक बिगर आदिवासी मधील ठाकूर आहेत तर दुसरे खऱ्या आदिवासीमधील ठाकूर आहेत. म्हणून जो कोणी व्यक्ती ठाकूर जमातीचा दावा करतो त्या व्यक्तीने कायद्याप्रमाणे जात सिध्द केली पाहिजे. याबाबत हायकोर्टाचा निर्णय आहे.

( दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, आम्ही मध्यप्रदेश किंवा राजस्थानबद्दल बोलत नाही. आम्ही सिंधुदुर्ग जिल्हयापुरते मर्यादित बोलत आहोत.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पद्माकर वळवी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली साहेबांनी हायकोर्टाच्या निर्णयाचा संदर्भ दिला म्हणून मी सांगितले की, 7 मे, 2009 चा पूर्ण खंडपीठाचा निर्णय आहे. त्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने स्पेसिफिक मुंबई हायकोर्टाला खास डायरेक्शन्स दिल्या की, तुम्ही पूर्ण खंडपीठ निर्माण करावे आणि त्या पूर्ण खंडपीठाच्या माध्यमातून सर्वच ठाकूरांना ट्राईब म्हणावयाचे काय किंवा काही ठाकूर बिगर आदिवासी आणि काही ठाकूर आदिवासी मध्ये मानावयाचे अशा अफिलिएट टैस्ट पध्दतीने तपासणी करण्याचे सुप्रीम कोर्टाचे आदेश होते. म्हणून हायकोर्टात शिल्पा विष्णू ठाकूर यांच्या प्रकरणामध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या पूर्ण खंडपीठाने जो निर्णय दिलेला आहे त्यानुसार हे ठाकूर ट्राईबचा दावा करणारे जे लोक आहेत आणि कायदा 23/2001 च्या कलम 8 प्रमाणे जो दावा करतो त्या व्यक्तीला ठाकूर ट्राईब आहे किंवा नाही हे सिध्द करावे लागते. विधिमंडळातून आदेश दिले म्हणजे त्यांना व्हॅलिडिटी मिळेल असे नाही. जो खरा असेल तो खरा, जो खोटा असेल तो खोटा, हे तपासणी समिती ठरवील. म्हणून सिंधुदुर्गच्या लोकांनी समितीपुढे जावे. सिंधुदुर्गचे जे लोक ट्राईबचा दावा करतात त्यांनी एस.डी.एम.पुढे जावे आणि कायद्याप्रमाणे सिध्द करावे. विधिमंडळाने असा आदेश देऊन कोणाला दाखला मिळणार नाही ही सत्यस्थिती आहे.

( दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांच्या उत्तराला माझी हरकत आहे. त्यांनी असे सांगितले की, विधिमंडळाने आदेश देऊन कोणाला दाखला मिळणार नाही. आम्ही कोणाला आदेश देण्यासाठी उभे राहिलेलो नाही. ठाकूर समाजाच्या हितासाठी हे भांडण चालू आहे. पूर्वी ते एस.टी.मध्ये होते. व्हीजेएनटीमध्ये होते, ओबीसीमध्ये होते. आता ते कोठे आहेत ? ही शासनाची जबाबदारी नाही काय ? आम्ही त्यांची जात ठरविण्यासाठी उभे आहोत काय ?

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

विधिमंडळाने सांगितले तरी त्यांना दाखल मिळणार नाही. ही सभागृहात बोलण्याची कोणती पध्दत आहे ? माझे असे म्हणणे आहे की, जर वडिलांना प्रमाणपत्र मिळत असेल तर मुलाला का मिळत नाही.

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात. )

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, त्या समाजाला न्याय मिळण्यासाठी ही लक्षवेधी सूचना मांडलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी शासनाने आतापर्यंत काय केले ते विचारले आहे. शासनाने यासाठी अनेक जी.आर.काढले आहेत. शासन उच्च न्यायालयात, सर्वोच्च न्यायालयात गेले होते. सर्वोच्च न्यायालयाने असे आदेश दिले आहेत की, उच्च न्यायालयाच्या संपूर्ण खंडपीठासमोर हा विषय न्यावा. त्यानंतर खंडपीठाने निर्णय दिलेला आहे. त्यानुसार त्यांना प्रमाणपत्र दिले आहे. आता ते व्हॅलिड होऊ शकत नाही. यासंदर्भात ॲडव्होकेट जनरल, आदिवासी आयुक्त आणि लोकप्रतिनिधी यांची एक बैठक बोलवू. तशी बैठक घेण्याची शासनाची तयारी आहे. त्याबैठकीत सन्माननीय सदस्यांनी प्रश्न मांडावेत. परंतु ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्याची आवश्यकता नाही. हा प्रश्न आजचा नसून 50 वर्षापासूनचा आहे. केवळ आडनाव ठाकूर आहे म्हणून सगळयांना त्याचा लाभ घेता येणार नाही. उच्च न्यायालयाने या लोकांना यामध्ये घेता येत नाही असे सांगितले आहे. त्यामुळे जात पडताळणी समितीसमोर त्यांना सिध्द करावे लागेल. त्यासाठी रुढी, परंपरा,देव याची माहिती द्यावी लागेल, हे बंधनकारक आहे. (अडथळा) ते जर मान्य नसेल तर सभागृहासमोर कशासाठी येता ? त्या समितीसमोर जावे. एकदा त्यांनी निर्णय दिला असेल तर तो मानावा लागतो. हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतर तो मानावा लागतो. यातून मार्ग काढण्याची शासनाची तयारी आहे. या प्रश्नाला न्याय मिळाला पाहिजे. हा प्रश्न टांगत ठेवावयाचा आहे काय ?

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या लक्षवेधीमध्येच असे नमूद केले होते की, "राज्यातील सर्व ठाकर समाजातील लोकांना" त्यामुळे इतर विषयाची चर्चा करण्याची गरज नाही. सन्माननीय सदस्यांनी स्पेसिपिक प्रश्न विचारला आहे. वडिलांना प्रमाणपत्र दिले जाते पण मुलाला

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडु रंग फुंडकर....

दिले जात नाही. भावाला दिले जाते, पण बहिणीला दिले जात नाही. मग ज्यांना प्रमाणपत्र दिले आहे त्याला कोणता आधार घेतला ते सांगावे. मंत्री महोदय, गोलगोल उत्तर देत आहेत. त्यामुळे सन्माननीय सदस्यांचे समाधान होत नाही. त्यामुळे ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी. सुधारित निवेदनासह मंत्री महोदयांनी यावे. ते लोक ओबीसीमध्ये नसतील, एसटीमध्ये नसतील तर कोठे आहेत ते सांगितले पाहिजे.

**तालिका सभापती ( श्री.जयप्रकाश छाजेड )** : ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात येत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना राखून ठेवल्याबद्दल धन्यवाद. परंतु मघाशी सन्माननीय सदस्य श्री.अनिल परब यांनी प्रमाणपत्र पैसे घेऊन दिले जाते असे म्हटले होते, त्याबाबत मंत्री महोदय मघाशी असे म्हणाले की, मला असे उदाहरण द्यावे. माझ्याकडे उदाहरण आहे. अरुणा मनहरलाल शाह इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च या संस्थेतील मुलांच्या संदर्भात मी तेथे जाऊन आल्यामुळे त्या मुलांना परीक्षेला बसू दिले अशी त्यांनी माहिती दिली आहे. या संस्थेने 8 मुलांचा दाखला ताबडतोब द्यावा, कारण त्यांना परीक्षेला बसू देता येत नाही असे त्यांना सांगितले होते. सुरुवातीला त्यांनी 19 नोव्हेंबरला अर्ज केला होता. नंतर 1 डिसेंबरला स्मरणपत्र पाठविले, 19 जानेवारीला स्मरणपत्र दिले, त्यानंतर 24 मार्चला स्मरणपत्र दिले. त्यानंतर या 8 मुलांपैकी दोन मुलांना दाखला दिला आहे.

यानंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

(श्री. दिवाकर रावते ...

ती मुले दादर मधील आहेत. त्यांनी कसा दाखला मिळवला हे त्यांनी वर्णन करुन सांगितले. 8 मधील 6 मुलांची नावे अशी, 1) बिपीन गधारी 2) सागर पाष्टे 3) प्रणय नार्वेकर 4) शुभांगी बधाने 5) पंकज रहांगडाळे आणि 6) अभिजीत खंदारे यांना अजून दाखले दिले जात नाहीत. पैसे दिल्या शिवाय दाखले दिले जात नाहीत हे सर्वश्रुत आहे. सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना हे माहीत आहे. जातीचे दाखले देण्याच्या बाबतीत राजकारण्यांचे तुम्ही वाटोळे करा पण विद्यार्थ्यांना तरी यातून मोकळे करा. माननीय मंत्री महोदय श्री. शिवाजीराव मोघे यांनी असे सांगितले होते की, 2 महिन्यामध्ये जातीचे दाखले देण्यात येतील. जात पडताळणी समिती कार्यालयाला तसे सांगा.

श्री. बबनराव पाचपुते :सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी काढलेला विषय गंभीर आहे. माननीय मंत्री महोदय श्री. शिवाजीराव मोघे यांनी जेव्हा उत्तर दिले होते त्यावेळी मी सभागृहामध्ये होतो. सन्माननीय सांगितलेली वस्तुस्थिती आम्ही नाकारत नाही. ही सिस्टिम सुधारली पाहिजे. यासाठी वेगळया पध्दतीचा प्रयोग आम्ही करीत आहोत. दिनांक 19,20,21 आणि 22 जानेवारीला मोठी कार्यशाळा झाली. त्यामध्ये काही हायकोर्ट जजेस, काही वकील बोलावलेले होते. तसेच बाहेरच्या राज्यातील अधिकारीही बोलावले होते. या जात पडताळणी विषयी लवकरात लवकर मार्ग कसा काढावा हा विषय होता. दोन अडीच वर्षापासून 38 हजार अर्ज प्रलंबित आहेत. ही सिस्टिम सुधारावी लागेल. मी आणि माननीय मंत्री महोदय श्री. शिवाजीराव मोघे, आम्ही दोघांनी दुपारी या विषयी चर्चा केली. यामध्ये सुसूत्रता कशी आणता येईल, ऑन लाईन कसे करता येईल, अडचणी कशा दूर करता येईल, अर्ज दिल्यानंतर तो किती दिवसात निकाली काढला गेला पाहिजे, या गोष्टींवर आम्ही विचार केला. काही प्रकरणे दोन अडीच वर्षे चालू आहेत. काही लोक नोकरी घेऊन बसलेले आहेत. ते तारीख घेत आहेत. त्यांना माहीत आहे की त्यांची जात पडताळणी होणार नाही. म्हणून ते तारखा घेत आहेत. काही लोकांना मुद्दाम तारखा दिल्या जात नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. याबाबतीत सुधारणा करण्याच्या दृष्टीने लवकरच निर्णय घेण्यात येईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : माननीय मंत्री महोदयांनी मागे डीएनअेचा विषय काढला होता. हा विषय टीकाचा नाही. हा विषय गांभीर्याने घेतला पाहिजे. माननीय मंत्री महोदय हे त्यांच्या मतावर ठाम राहिले पाहिजेत. वडिलांना दाखला मिळतो आणि मुलाला मिळत नाही, भावाला मिळतो आणि बहिणीला मिळत नाही, हे फारच झाले. याबाबतीत माननीय मंत्री महोदयांचे मत काय आहे ?

श्री. बबनराव पाचपुते : दिनांक 19,20, 21 आणि 22 ला नागपूरमध्ये जी कार्यशाळा झाली त्यामध्ये काही गोष्टींवर उहापोह करण्यात आला. धुळयाची एक केस झाली होती. धुळयाच्या केसमध्ये कोर्टाने सांगितले होते की, हा हाच माणूस आहे हे तपासण्यासाठी त्याची डीएनअे चाचणी करा. त्यामुळे त्याची डीएनने चाचणी केल्यानंतर तो "नाही "म्हणून सिध्द झाला. आमच्या विभागाकडून हा निर्णय झालेला नाही. धुळयाच्या केसमध्ये डीएनअे चाचणी मान्य केलेली आहे. जातीचा दाखला देण्याच्या बाबतीत आम्ही असे सूत्र तयार करुन देतो की त्यामुळे रक्तच घेतले पाहिजे असे नाही तर त्या व्यक्तीचे नख घेतले तरी सूत्रानुसार तपासणी केली तर समजू शकेल. अशा प्रकारचे मत कार्यशाळेमध्ये एका शास्त्रज्ञाने मांडलेले आहे. जात पडताळणी व्यवस्थेमध्ये न्यायालयीन प्रक्रियेचा भाग असतो. त्याबाबतीत पुराव्या शिवाय निर्णय देता येत नाही. पुरावे दिल्यानंतर ते तपासले जातात. तेव्हा असे कोणी पुरावे दिले तर ते तपासले जातील.

---

....नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>विशेष उल्लेख</u>**

**पृ. शी.** : बेस्टच्या बस आगार व बस स्थानकातील उपहारगृह चालविताना कंत्राटदारांनी महापालिकेच्या आरोग्य खात्याची परवानगी न घेणे

**मु. शी.** : बेस्टच्या बस आगार व बस स्थानकातील उपहारगृह चालविताना कंत्राटदारांनी महापालिकेच्या आरोग्य खात्याची परवानगी न घेणे याबाबत श्रीमती मधु जैन, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** (श्री.जयप्रकाश छाजेड) : मा□□य सदस्या श्रीमती मधु जैन यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्रीमती मधु जैन (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, बेस्ट उपक्रमाच्या मुंबईतील 24 बस आगार व 42 बस स्थानकात चालविण्यात येणारी कर्मचाऱ्यांची उपाहारगृहे महापालिकेच्या आरोग्य खात्याच्या परवानगीशिवाय सुरु असल्याची बाब 15 एप्रिल, 2010 च्या सुमारास निदर्शनास आली आहे. फॅक्टरी ॲक्टनुसार कर्मचाऱ्यांसाठी उपाहारगृहे ही बंधनकारक असली तरी ती चालविण्यासाठी कंत्राटदारांनी पालिकेकडून परवानगी घेणे आवश्यक असते. परंतु मुंबईतील 24 बस आगार व 42 बस स्थानकांतील उपाहारगृह चालविणाऱ्या एकाही कंत्राटदाराने आरोग्य खात्याची परवानगी घेतलेली नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या थेट आरोग्याशी हे कंत्राटदार खेळत आहेत. कंत्राटदार परवानगी न घेता मोकळ्या जागेत बांधकाम करतात. बेस्टच्या जागेचा व्यापारी तत्वावर वापर करीत असताना बेस्टला या जागेच्या बाजारभावाच्या तुलनेत फार कमी भाडे मिळत आहे. अंधेरी येथील बस आगाराच्या व्यापारीकरणाची परवानगी पालिकेकडून घेण्यात आलेली नाही. 24 बस आगार व 42 बस स्थानातील उपाहारगृहांमध्ये परप्रांतीय कंत्राटदारांचा भरणा जास्त प्रमाणात आहे. स्थानिकांना यात डावलले जाते. फॅक्टरी ॲक्ट आणि मोटार ट्रान्स्पोर्ट वर्कर्स ॲक्ट, 1961 नुसार कर्मचाऱ्यांना उपाहारगृह बंधनकारक असले तरी आरोग्य खात्याच्या परवानगीशिवाय ते सुरु करणे हा गुन्हा आहे. याबाबत बेस्टद्वारे प्राप्त माहितीमध्ये बऱ्याच बाबी या संदिग्ध आढळून आलेल्या आहेत. 24 बस आगारांमध्ये फास्ट फूड सेंटरला परवानगी नसताना देखील त्या ठिकाणी फास्ट फूड सेंटर

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मधु जैन.....

चालू आहे. 42 बस आगारांपैकी महेश्वरी उद्यान, बांद्रा रिक्लेमेशन, समतानगर, मुलुंड (पश्चिम), बांद्रा (पश्चिम), ऑगस्ट क्रांती मैदान, अंधेरी (पूर्व) याठिकाणी कंत्राटदारांनी अनधिकृत शेड उभारली आहे. अशा प्रकारे बेस्टच्या बस आगारात व बस स्थानकात चालू असलेल्या बेकायदेशीर बाबी शासनाच्या निदर्शनास आणण्यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

---



अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : तालुकास्तरीय आमसभांचे आयोजन करण्यास होत असलेली टाळाटाळ

**मु. शी.** : तालुकास्तरीय आमसभांचे आयोजन करण्यास होत असलेली टाळाटाळ याबाबत श्री.भगवानराव साळुंखे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती** : मा□□□य सदस्य श्री.भगवानराव साळुंखे यां□□ विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ दिली आहे. त्यां□□ ती मांडावी.

श्री.भगवानराव साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ मांडतो.

सभापती महोदय, केंद्र शासनाने घटना दुरुस्ती करुन पंचायत राज व्यवस्था मजबूत करण्यासाठी प्रत्येक तालुक्यात दरवर्षी आमसभा घेण्याची पध्दत रुढ केली आहे. प्रांरभी अशा आमसभा वाजतगाजत व महोत्सवी स्वरुपात आयोजित केल्या गेल्या. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पातळीवर लोकप्रतिनिधींनी केलेल्या विधायक सूचनांचा स्वीकारही केला गेला. विरोधकांच्या मागण्यांची दखलही घेतली गेली. मात्र गेल्या पाच-सहा वर्षापासून काही सन्माननीय अपवाद वजा जाता अनेक तालुक्यांचे मा.गटविकास अधिकारी अशा तालुकास्तरीय आमसभांचे आयोजन करण्यास टाळाटाळ करीत असतात. काही तालुक्यांमध्ये गेल्या सहा-सात वर्षापासून आमसभा आयोजित केल्या गेलेल्या नाहीत. काही तालुक्याचे मा.गटविकास अधिकारी मा.आमदारांच्या कार्यमग्नतेचा गैरफायदा घेऊन एक दोन दिवसांच्या पूर्व सूचनेनुसार केवळ सोयीच्या मंडळींना निमंत्रित करुन अशा आमसभा आयोजित केल्याचा उपचार पार पाडतात. प्रामुख्याने विरोधकांचा आवाज दाबून ठेवला जातो. मी शासनाला विनंती करतो की, तालुकास्तरीय आमसभेचे आयोजन करण्याची जबाबदारी मा.गटविकास अधिकारी यांच्यावर निर्धारित करुन त्यांनी जर आमसभा आयोजित केली नाही तर ती कर्तव्यातील कसूर समजून त्यांच्या सेवापुस्तकात नोंद करण्यापासून पदोन्नती रोखण्यापर्यंत कारवाई करण्याची तरतूद करावी.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सिध्दपेठ तीर्थक्षेत्र विकासासाठी निधी उपलब्ध करुन देणे

**मु. शी.** : सिध्दपेठ तीर्थक्षेत्र विकासासाठी निधी उपलब्ध करुन देणे याबाबत श्री.गोपीकिसन बाजोरिया,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती** : मा□□य सदस्य श्री.गोपीकिसन बाजोरिया यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.गोपीकिसन बाजोरिया (अकोला-वाशिम-बुलढाणा स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, संपूर्ण वारकरी आणि महाराष्ट्राच्या जनतेचे आराध्य दैवत असलेले श्री क्षेत्र देहू आळंदीचे श्री संत ज्ञानेश्वर माऊली, ह्या माऊलीच्या स्मारकासाठी वारकरी संप्रदायाने अनेकदा आंदोलने केली. उपोषणे केली व मंत्रीमहोदयांना निवेदने दिली. तपोवन या खाजगी संस्थेकडून स्मारकाची जागा परत घेण्याबाबत माजी आमदार श्री.गुलाबराव गावंडे, तत्कालीन महसूल राज्यमंत्री डॉ.राजेंद्र शिंगणे, आमदार श्री.दिवाकर रावते, अनेक आमदार व जनप्रतिनिधी यांनी या स्मारकासाठी अथक प्रयत्न केले. तत्कालीन महसूल राज्यमंत्री यांनी या तीर्थक्षेत्र विकासासाठी अंदाजपत्रकात 434.73 कोटी रुपयांपैकी सिध्दपेठ विकासासाठी रु.25 कोटीची तरतूद केली. सन 2010-11 च्या अंदाजपत्रकात तीर्थक्षेत्र विकासासाठी अंदाजे.....

नंतर 3आय.1...

अशुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. गोपीकिसन बाजोरिया .....

रु. 654 कोटीची तरतूद असताना प्रत्यक्षात किती रक्कम दाखविली याचा बोध होत नाही, त्यामुळे वारकरी सांप्रदायाच्या लोकांच्या भावनांचा अनादर करणे, आजपावेतो फक्त शासनाद्वारे अंदाजपत्रकात तरतूद करणे व वाढीव रक्कम कागदावर राहणे व तथापि सिध्दपेठाच्या विकासासाठी निधी देण्यात आला नसणे, दोन वर्षाहून अधिक कालावधी होऊनही येथे कुठलेही बांधकाम सुरु करण्यात आलेले नाही. सिध्दबेट स्मारकाशी हजारो भाविकांच्या भावना निगडित असून त्या पायदळी तुडविल्या जाणे, यामुळे जनसामान्यात व वारकरी सांप्रदायामध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने आपली भूमिका स्पष्ट करावी.

---

.....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : उपचाराअभावी रुग्णालयातील कर्मचाऱ्याचाच मृत्यू ओढवणे

**मु. शी.** :उपचाराअभावी रुग्णालयातील कर्मचाऱ्याचाच मृत्यू ओढवणे याबाबत श्रीमती मंदा म्हात्रे,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती (श्री. जयप्रकाश छाजेड)** : मा□□य सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

आज दि. 19 एप्रिल, 2010 रोजी सर्व वर्तमानपत्रांमध्ये सायन रुग्णालयातील एक कर्मचारी श्री. राजेश सोनावणे या रुग्णाला पैसे नसल्यामुळे उपचाराअभावी प्राण गमवावे लागले, अशी बातमी प्रसिध्द झालेली आहे. महापालिकेच्या रुग्णालयात त्याच ठिकाणी काम करीत असलेल्या कर्मचा-याला पैसे भरल्याशिवाय उपचार होत नाही असे सांगून उपचार नाकारण्यात आला. या रुग्णाच्या नातेवाईकांनी काही रक्कम जमा केली परंतु तरीही उपचार करण्यास टाळाटाळ केली. कै. सोनावणे हे रुग्णालयात शिपाई या पदावर कायमस्वरुपी काम करीत होते. प्रत्यक्ष कामावर असताना त्यांची प्रकृती खराब झाली. अशा रुग्णावर उपचार न केल्यामुळे त्याला आपला जीव गमवावा लागला. म्हणून शासनाने त्या विभागाची चौकशी करुन सायन रुग्णालयातील संबंधित जे अधिकारी तसेच डॉक्टर असतील त्यांची चौकशी करुन जे या घटनेला जबाबदार असतील त्यांच्यावर तातडीने कडक करवाई करावी, अशी विनंती या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी करीत आहे.

---

....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक व ऐतिहासिक नोंद असलेल्या रचनांचा ग्रंथ निर्माण करणे

**मु. शी.** : वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक व ऐतिहासिक नोंद असलेल्या रचनांचा ग्रंथ निर्माण करणे याबाबत श्री. हेमंत टकले, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : मा□□य सदस्य श्री. हेमंत टकले यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

दिनांक 1 मे, 2010 रोजी महाराष्ट्र राज्याचे सुवर्ण महोत्सवी वर्ष सुरु होत आहे, महाराष्ट्राचे गुणगान करणारी वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक व ऐतिहासिक नोंद असलेल्या कविता व पोवाडे कवींनी व शाहिरांनी तयार केली आहेत. "**गर्जा महाराष्ट्रा**" पासून "**बहु असोत सुंदर संपन्न की महा, प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा**" सारख्या ह्या अलौकिक रचनांचा एक संपूर्ण ग्रंथ निर्माण करुन ह्या कवींच्या व शाहिरांच्या योगदानाला सुवर्ण महोत्सवी कोंदण करावे व हा स्मृती ग्रंथ महाराष्ट्रातील जनतेला उपलब्ध करुन द्यावा या बाबतीत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही".

---

**तालिका सभापती** : सभा□हाची बैठक आता मध्यंतरासाठी 5.45 पर्यंत स्थगित होत आहे.

( सभा□हाची बैठ□ 5.18 ते 5.45 पर्य□ स्था□ झाली )

---

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( मध्यंतरानंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. जयप्रकाश छाजेड )**

**तालिका सभापती ( श्री. जयप्रकाश छाजेड )** : सभागृहाच्या बेलमध्ये तांत्रिक बिघाड झालेला असल्यामुळे ती बरोबर वाजत नाही त्यामुळे लॉबीमध्ये बसलेल्या सन्माननीय सदस्यांना सभागृह सुरु झालेले आहे असा मॅसेज देण्याची सोय करण्यात यावी.

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगिती नंतर)

**<u>तालिका सभापती श्री.जयप्रकाश छाजेड</u>**

**पृ. शी.** : आमदार निवास येथील रोजंदारी पद्धतीने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत कायम करणे

**मु. शी.** : आमदार निवास येथील रोजंदारी पद्धतीने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत कायम करणे याबाबत श्री. रामदास कदम वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : मा□□य सदस्य श्री.रामदास कदम यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.रामदास कदम (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत येणाऱ्या आमदार निवास उप विभाग मुंबई येथील आमदार निवास,मनोरा इतर आमदार निवास येथे 1994 पासून 15-15 दिवसांच्या सेवाखंड पद्धतीने रोजंदारी पद्धतीने काम करणाऱ्या 94 कर्मचाऱ्यांना शासकीयसेवेत कायम स्वरूपी करण्याबाबत वित्त मंत्र्यांच्या दालनामध्ये दिनांक 25 जुलै 2008 व 29 जुलै 2009 रोजी तसेच 5 मार्च 2010 रोजी घेतल्या गेलेल्या बैठका, सदर बैठकातील निर्णयानुसार 94 कर्मचाऱ्यांचा प्रस्ताव वित्त विभागाकडे वेळोवेळी सादर करण्यात आला. परंतु, वित्त विभागाने त्रुटी काढून सदर प्रस्ताव नाकारण्यात आला.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

सदर 94 चतुर्थ श्रेणी कर्मचारी गेली 15-20 वर्षे शासन सेवेत रोजंदारी पद्धतीने काम करीत असून त्यांना शासनाने सेवेत तातडीने कायम स्वरूपी करण्याबाबत सभागृहामध्ये वेळोवेळी शासनाकडून देण्यात आलेली ठोस आश्वासने परंतु, सदर आश्वासनाची पूर्तता आज 15-20 वर्षे होत नसल्याने सदर 94 कर्मचाऱ्यांत पसरलेला तीव्र असंतोष व त्यांचे भवितव्य अधांतरी असल्याने त्यांना शासन सेवेत कायम स्वरूपी सामावून घेण्याबाबत त्यांच्या संघटनेने सातत्याने केलेला पाठपुरावा.

सदर 94 कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागही आग्रही असताना वित्त विभाग त्यांचा प्रस्ताव का नाकारत आहे. सदर प्रस्ताव वित्त विभागाकडून मंजूर करून घेऊन 94 कर्मचाऱ्यांना शासन सेवेत कायम स्वरूपी सामावून घेण्याबाबत शासनाने तातडीने निवेदन करावे.

सभापती महोदय, गेल्या 15-20 वर्षापासून हे कर्मचारी शासनाच्या निर्णयाची वाट पहात आहेत. सन्माननीय श्री.भुजबळ साहेब यांच्यापासून अन्य अधिकाऱ्यांबरोबर झालेल्या चर्चेचे इतिवृत्त माझ्याकडे आहे. 20 वर्षे त्यांनी सेवा केल्यामुळे त्यांचे वय देखील उलटत आले आहे. तेव्हा याबाबत आपण शासनाला तात्काळ सूचना द्याव्यात. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून हा प्रस्ताव वित्त विभागाकडे गेला असून त्यांच्याकडे हा प्रस्ताव पडून आहे. आमदार निवासात काम करणारी 94 मुले आहेत, त्यांना किमान आपल्याकडून न्याय मिळावा अशी अपेक्षा आहे. यासंबंधी आपण तातडीने निर्णय घ्यावा अशी माझी विनंती आहे.

....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : डेडीकेटेड फ्रेट कॉरिडॉर डोंबिवलीतून जात असल्याने प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे भरपाई देण्यासाठी केंद्र शासनाकडे करावयाची कार्यवाही

**मु. शी.** : डेडीकेटेड फ्रेट कॉरिडॉर डोंबिवलीतून जात असल्याने प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे भरपाई देण्यासाठी केंद्र शासनाकडे करावयाची कार्यवाही याबाबत श्री.संजय दत्त वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : मा□□य सदस्य श्री.संजय दत्त यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

देशांतर्गत उत्पादनांना बाजारपेठ वेळेत उपलब्ध व्हावी आणि या मालाची वाहतूक अधिक वेगाने करता यावी यासाठी केंद्र सरकारने आखलेल्या डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉरचे काम लवकरच सुरू होणार आहे. वीजनर्मितीसाठी लागणारा कोळसा आणि बांधकामाच्या साहित्याला असलेल्या मोठ्या प्रमाणावरील मागणीमुळे त्याची एका जागेवरून दुसरीकडे वाहतूक जलदगतीने होण्यासाठी अस्तित्त्वात असणारा मार्ग वापरण्यापेक्षा सरकारने डेडीकेटेड फ्रेट कॉरिडॉर हा नवा मार्ग सुरू करण्याचे ठरविले आहे. पश्चिम मार्ग हा दिल्ली ते मुंबई (जेएनपीटी) असा असून तो दिल्ली, हरयाणा, राजस्थान, गुजरात व महाराष्ट्र या राज्यांमधून जातो. हा माग डोंबिवलीतून जात असल्याने डोंबिवलीतील सुमारे दोन हजाराहून अधिक कुटुंबे बेघर होणार आहेत. या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी व त्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे करावयाची कार्यवाही.

.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभागृहाच्या कामकाजासंबंधी.**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, विधेयकावर चर्चा करण्यापूर्वी मी आपल्याला विनंती करणार आहे. हे तिसरे विधेयक आहे. आलेली विधेयक आम्ही मंजूर केलेली आहेत. आता अधिवेशन संपायला चार दिवस राहिलेले आहेत. मुंबई न्यायालयीन शुल्कासंबंधीचे विधेयक चर्चेसाठी येणार आहे. सावकारी कायदा आयत्यावेळी आणा आणि तो घाईत मंजूर करायला सांगितला तर तो आम्ही करणार नाही. हे मी आताच सांगतो आहे. यावर आम्हाला बोलावयाचे आहे. अशा प्रकारची महत्त्वाची विधेयके आपण आयत्या वेळेवर आणाला आणि आम्हाला काढायला सांगाल तर ते शक्य होणार नाही. काही विधेयके ही दूरगामी परिणाम करणारी आहेत. त्यामुळे ती वेळेवर आणावीत. ती येथे मांडल्यानंतर लगेच मंजूर करावीत असे आम्हाला सांगू नये. आमची चर्चेची तयारी असते. उद्या सत्तारूढ पक्षाचा प्रस्ताव आहे. परवा वैधानिक विकास महामंडळाचा प्रस्ताव आहे. त्यासंबंधी मी सांगितले आहे की, म.वि.प.नियम 93 ची निवेदन संपवून टाकावी आणि पूर्ण दिवस त्या प्रस्तावाला द्यावा.

यानंतर श्री.गायकवाड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ..

तो प्रस्ताव सर्व पक्षीय आहे.. त्याचबरोबर गुरुवारी विरोधी पक्षांचा एक प्रस्ताव घेण्यात येणार आहे. त्याच बरोबर निवृत्त होणा-या सदस्यांना निरोप द्यावयाचा आहे. त्यानंतर शुक्रवारी अधिवेशनाचा अंतिम दिवस आहे. अशा प्रकारे एकंदर दोन तीन दिवस कामकाज जास्त दाखविण्यात आलेले आहे. काही वेळेला शासकीय विधेयके न काढल्याबद्दल राग, रुसवे दाखविले जातात. मात्र तो दोष आमचा नाही. विधेयक पास करण्याच्या बाबतीत आम्ही कधीही नकार दिलेला नाही. परंतु चर्चा करण्याकरता तुम्ही आम्हाला अडवू शकत नाही. मी अत्यंत नम्रपणे आपल्याला सांगत असतो. परंतु त्याचा वेगळा अर्थ काढला जातो. या संदर्भात मी आपल्याला परवाचे उदाहरण देतो. गुरुवारच्या दिवशी विधेयक मंजूर करण्याच्या बाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांनी विनंती केली होती. तेव्हा आम्ही सांगितले की, हे विधेयक उद्या मंजूर करुन देतो. आमच्याकडे कोणतेही शासकीय कामकाज शिल्लक नाही. एकच विधेयक असल्यामुळे, ते उद्या मंजूर करु या. उद्या हे विधेयक मंजूर करु या, याचा अर्थ कामकाजाच्या दिवशी मंजूर करु. शुक्रवार हा अशासकीय कामकाजाचा दिवस असतो. शनिवार आणि रविवारी सुट्टी असल्यामुळे शुक्रवारी आपण सहजपणे असे म्हणतो की आपण हे काम उद्या करु म्हणजेच शनिवारी वा रविवारी काम न करता सोमवारी कार्यालय चालू झाल्यानंतर काम करावयाचे असा त्याचा अर्थ असतो. आम्ही कामकाज पूर्ण करण्याच्या बाबतीत शासनाला नेहमीच सहकार्य करीत असतो. मात्र त्याचा अर्थ आम्ही सरेंडर होतो, असा घेण्यात येऊ नये. विधेयकावरील चर्चा नीटनेटकी करण्याचा आम्ही प्रयत्न करीत असतो.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्मानीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्या विधेयकाच्या सद्भावनेबद्दल कोणालाही शंका असण्याचे कारण नाही. त्यांचे म्हणणे असे आहे की घाई गर्दीत विधेयक मंजूर होता कामा नये. विधेयकाचा चांगला वाईट असा दूरगामी परिणाम होत असतो. त्यामुळे विधेयकावर साधकबाधक चर्चा झाली पाहिजे, असे त्यांचे मत असून त्यांच्या मताशी मी सहमत आहे. न्यायालयीन फी सबंधीचे विधेयक क्रमांक 26 आज विधानसभेमध्ये चर्चेसाठी असून आजच ते मंजूर होईल, याची मला खात्री आहे. त्यानंतर उद्या ते विधेयक आपल्या सभागृहासमोर येईल. सावकारी प्रतिबंधक विधेयकाच्या संदर्भात मी या ठिकाणी काहीही भाष्य करु इच्छित नाही. सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांना मला असे सांगावयाचे आहे की, तुमच्या हेतूबद्दल आम्हाला यत्किचिंतही शंका नाही. उलट आपल्याबद्दल आम्हाला आदरच आहे. तेव्हा आपण 66 नंबरचे विधेयक देखील लवकर मंजूर करावे, अशी माझी आपल्याला विनंती आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुंबई प्रांतिक महानगरपालिका, नागपूर शहर महानगरपालिका,महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी,महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन आणि महाराष्ट्र ( मोठया निवासी जागा असलेल्या इमारतीवरील कर (पुन्हा अधिनियमित केलेला ) (सुधारणा) विधेयक

**L. A. BILL NO. LXVI OF 2009**

( A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949, THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948, THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965, THE MAHARASHTRA (URBAN AREAS) PROTECTION AND PRESERVATION OF TREES ACT, 1975 AND THE MAHARASHTRA TAX ON BUILDINGS (WITH LARGER RESIDENTIAL PREMISES) (RE-ENACTED) ACT, 1979. )

(विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न पुन: प्रस्तुत झाला)

श्री.दिवाकर रावते (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय नगरविकास राज्यमंत्री श्री.भास्कर जाधव यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम,1949, नागपूर श्हर महानगरपालिका अधिनियम,1948, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम,1965, महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, 1975 आणि महाराष्ट्र (मोठया निवासी जागा असलेल्या) इमारतीवरील कर ( पुन्हा अधिनियमित केलेला ) अधिनियम ,1979 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडलेले आहे. त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते .....

सभापती महोदय, महाराष्ट्रातील मोठया निवासी जागा असलेल्या इमारतीवरील कर हा या विधेयकातील महत्वाचा मुद्दा आहे. हे विधेयक या पूर्वी सभागृहात मांडण्यात आले होते. हे मला चांगले आठवते. सन्माननीय मंत्री महोदयांनी आताच सांगितल्याप्रमाणे संयुक्त चिकित्सा समोर हे विधेयक गेले होते. त्या ठिकाणी या विधेयकावर चर्चा चालू होती. हे विधेयक मुंबई शहरापुरते होते, असे त्यावेळी सांगण्यात आले होते. आता हे विधेयक राज्यातील सर्व भागासाठी लागू करण्यात यावयाचे आहे. तेव्हा या ठिकाणी बसलेल्या सर्व आमदारांना काय वाटत असेल ? पूर्वी या विधेयकाचा परिणाम फक्त मुंबई शहरापुरताच मर्यादित होता. तो पर्यंत इतरांना काहीही वाटत नव्हते त्यावेळी या विधेयकाचे गांभीर्य सांगण्याचा मी प्रयत्न करीत होतो. त्या विधेयकावर चर्चा करीत असतांना मी वांरवार सांगण्याचा प्रयत्न करीत होतो की, या विधेयकाच्या संदर्भात एक सुंदर अशी संकल्पना अधिकाऱ्यांनी निर्माण केली होती. त्यावेळी अधिका-यांनी संशयाचे पिल्लू सोडून दिले होते. शासनाने अशा प्रकारे करावे काय असा मुद्दा सुरुवातीला मुंबई महानगरपालिके पुढे आला होता .मुंबई महानगरपालिकेत असे सांगण्यात आले, की उपनगरामध्ये कर जास्त आहेत व शहरामध्ये कर कमी आहेत..

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

त्यामुळे उपनगरामधील कर कमी करण्यासाठी हे विधेयक आणले आहे. मुंबई महानगरपालिकेमध्ये 220 नगरसेवक आहेत.त्यातील मुंबई शहरातील नगरसेवक एका बाजूला आणि उपनगरातील नगरसेवक दुसऱ्या बाजूला . त्यामुळे हे असे पिल्लू सोडून दिल्याबरोबर त्यांनी ताबडतोब शासनाकडे हा विषय पाठवून दिला. आम्हाला जास्त पैसे भरावे लागतात त्यामुळे हे कर कमी करुन मिळावेत. त्यामधून हे विधेयक तयार होऊन याठिकाणी आले आहे. हे विधेयक विधानसभेमध्ये मांडण्यात आले, त्यावर खूप चर्चा झाली. त्यावर मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले. मंत्रिमहोदय, तुमच्याकडे ज्या खात्याचे मंत्रीपद आले आहे त्या खात्याशी तुम्ही प्रामाणिक असता. तुम्ही राज्यकर्ते आहात त्यामुळे हे विधेयक स्वीकारले पाहिजे असे आपण नेहमी सांगता, त्याबद्दल दुमत नाही. परंतु राज्यकर्त्यांचे कुठे चुकत आहे हे सांगण्यासाठी हा विरोधी पक्ष उभा आहे. त्यामुळे तुम्हाला ज्याठिकाणी नामोहरम करावयाचे असेल त्यावेळी आम्ही करु, ती राजनीती आहे. त्यामुळे एखादा कायदा या सभागृहामध्ये आणीत असतांना आपण तो बहुमताच्या जोरावर मंजूर करता, तो मंजूर होणारच आहे. तुमचा कायदा हाणून पाडण्याचे सामर्थ्य विरोधीपक्षामध्ये नाही. म्हणून आम्ही विरोधी पक्षामध्ये आहोत. फार तर आम्हाला मिळालेल्या अधिकाराचा वापर करुन तुमच्या विधेयकाबाबत मतप्रदर्शन करण्यासाठी वेळ घालवू. परंतु आम्ही ते नापास करु शकत नाही याची आम्हाला खात्री आहे. ते मंजूर होणार असल्यामुळे या विधेयकातील आम्हाला जे योग्य असलेल्या, नसलेल्या ज्या अनेक बाबी आम्ही तुमच्यापुढे मांडतो. माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी हे विधानसभेमध्ये होते. त्याठिकाणी अनेक विधेयके नंतर दुरुस्तीकरिता पुन्हा सभागृहामध्ये आणावी लागली. त्यावेळी विधीमंडळामध्ये कुणीही त्या विधेयकावर उपसूचना मांडली नाही तरी ते विधेयक मंजूर करण्याची जबाबदारी मंत्रिमहोदयांची असल्यामुळे ते मंजूर करुन घेतात. ती त्या खात्याची जबाबदारी असते. माननीय मुख्यमंत्री सांगतात की, हे तुमच्या खात्याचे काम आहे. सभागृहाला कसे सामोरे जायचे आणि सदस्यांना काय सांगायचे आहे ते तुम्ही सांगा, परंतु हे विधेयक मंजूर झाले पाहिजे. साधारणपणे ही पध्दत आहे. त्यामुळे आपल्या खात्याचे अधिकारी आपल्याला काय सांगतात ते आपण ऐकले पाहिजे.अधिकारी ज्यावेळी आपल्याला सांगत असतात त्यावेळी आपल्या मनामध्ये निर्माण होणाऱ्या प्रश्नांची उत्तरे त्यांच्याकडून शोधायची असतात.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ D/ ST/ KTG/

श्री.दिवाकर रावते...

कोणतेही विधेयक सभागृहापुढे मांडतांना किंवा कायदा मांडतांना त्या कायद्याविषयी त्याची कन्सेप्ट क्लिअर असली पाहिजे. मी हा कायदा कशासाठी आणला आहे?

एकदा कन्सेप्ट क्लिअर असली म्हणजे या सभागृहासमोर व्यवस्थितपणे मांडता येते. आज काल एक चांगली संवय मंत्रिमहोदयांना लागली आहे की, विधेयक मांडल्यानंतर त्यासंबंधी पाच-दहा मिनिटे मंत्रिमहोदय निवेदन करतात. नाहीतर विधेयक मांडले, ते आपण सर्वांनी वाचले, आता पुढे चला असे होते. आणि म्हणून तुम्हाला हिणवण्यासाठी आम्ही बोलत नाही. याठिकाणी कायदा आणीत असतांना त्याची जबाबदारी त्या खात्याच्या मंत्र्यांची आहे, त्याच्या मंत्रालयाची आहे. त्या कायद्याचे दूरगामी परिणाम काय होणार आहेत? हे मंत्र्यांना समजले पाहिजे अशी माझी भूमिका असते.. आपण हे विधेयक मांडीत असतांना एक चांगला शब्द वापरला,आपण रेकॉर्ड तपासून पहावे. अधिकाऱ्यांची बनवाबनवी कशी असते? तुम्हाला अधिकाऱ्यांनी सांगितले आणि तुम्ही याठिक्राणी विधेयक मांडले. 500 चौरस फूटाच्या सदनिकेला हा कर लागू होणार नाही असे तुमचे शब्द आहेत. आपण पाहिजे तर तपासून पहा. मी आपल्याला जाणीव करुन देतो की, तुमच्यासारख्या सजग मंत्र्यांकडून कधीही चुका होता कामा नये. अधिकारी ब्रिफींग करतांना किंवा माहिती देत असतांना कशापध्दतीने माहिती देतात हे आपल्याला समजले पाहिजे. Reading in between the lines या कायद्याच्या माहितीच्या रेषेच्या मधल्या फटीमध्ये जो बरोबर शिरतो त्यावर अधिकारी कधीही अधिकार गाजवू शकत नाही. मंत्रालयातील धोरणे त्याच्यावर अधिकार गाजवितात. हे विधेयक ज्यावेळी आले त्यावेळी ते समितीपुढे विचारार्थ होते. मी त्यावेळी दौऱ्यावर होतो. मी माननीय नामदार श्री. राजेश टोपे साहेबांना फोन केला.आणि त्यांना सांगितले की, या विधेयकाबाबत माझे म्हणणे मला मांडता आले नाही, मला आपण बोलू दिले नाही. त्यावेळी त्या समितीमध्ये उपनगरातील आमदारांचे बहुमत होते. मी एका बाजूला पडलो होतो.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

मी काही शहरांचा प्रतिनिधी म्हणून तेथे नव्हतो. मी त्या विधेयकामध्ये जी गडबड होती, त्यासाठी तेथे गेलो होतो. शेवटी माझ्या गैरहजेरीमध्ये त्या विधेयकावरील कार्यवाही पुढे जात असताना आणि मी दौऱ्यावर असल्याने, मला तेथून डिसेंट नोट पाठवावी लागली. त्यामुळे मी चर्चेसाठी उभा रहात होतो आणि विचारत होतो की, त्या विधेयकाच्या बाबतीत काय झाले ? मला त्याबद्दल खूप काही सांगावयाचे होते. आज या चर्चेच्या निमित्ताने मी खूप काही सांगणार नाही. पण मी त्यावेळी इतक्या इन-डिटेल मध्ये मांडले असते आणि मला खात्री आहे की, या सदनातील प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी सांगितले असते की, आता हे नको. मुंबईतील मराठी माणूस उद्ध्वस्त करणारे हे विधेयक आहे, ही एक चाल आहे आणि ते मी सांगणार होतो. त्यानंतर निवडणुकांमुळे आपले चार दिवसांचे अधिवेशन झाले. आमची कामकाज सल्लागार समितीची बैठक होती. चार दिवसांच्या अधिवेशनामध्ये अर्थसंकल्प मांडता येत नव्हता म्हणून खर्चाच्या विवरण पत्राला निवडणूक आयुक्तांनी मान्यता दिली होती आणि तेवढया पुरतेच ते अधिवेशन बोलविण्यात आले होते. आमचे संसदीय कार्यमंत्री माननीय श्री.हर्षवर्धन पाटीलसाहेब यांच्याकडे आज दु:खद घटना घडलेली असल्यामुळे ते सदनामध्ये उपस्थित नाहीत. त्यांनी तेव्हा सांगितले की, विधेयके दाखवू या, पण विधेयके दाखविण्याचा प्रश्नच येत नाही, कारण येथे चर्चा होऊच शकत नाही. फक्त माननीय राज्यपाल महोदयांचे अभिभाषण होईल.पण त्यावर देखील चार दिवसाच्या अधिवेशनामध्ये चर्चा होणार नव्हती. नंतर जेव्हा पुन्हा अधिवेशन भरेल, तेव्हा चर्चा होईल. त्यामुळे त्यावेळी आपण केवळ नावाला विधेयके दाखविली. मी त्यावर म्हटले की, हे बरोबर आहे का ? ते पहा. तेव्हा असे सांगण्यात आले की, कामकाज म्हणून विधेयके दाखवू, त्यावर चर्चा करावयाची नाही. त्यामुळे त्या अधिवेशनामध्ये या विधेयकावर फारशी चर्चा झाली नाही. ठीक आहे, मग मला माननीय सभापतींनी खास बोलावून विनंती केली की, हे पास करावयाचे आहे. त्यामागे तुमचे सचिव आहेत. ते विधेयक त्या चार दिवसामध्ये कमिटमेंट असताना मंजूर करुन घेतले. तुमचा अधिकार आहे. मी अधिकृतपणे सांगतो की, याबाबतीत पडद्यामागे काय घडलेले आहे हे मला सगळे माहिती आहे. पण माझ्या जीवनामध्ये मी असले वाभाडे कधी काढत नाही, तो माझा पिंड देखील नाही आणि मला ते आवडतही नाही. ते जे काही करतात, ते ज्याचे त्याला लखलाभ होऊ द्या. मला त्याची चिंता नसते. पण त्यादिवशी मी अत्यंत दु:खी होतो. मी रात्री 11.00 वाजता मी माननीय सभापतींना फोन

. . . .3 एन-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

करुन एवढेच सांगितले की, मी माझ्या सामाजिक जीवनामध्ये मुंबईचा महापौर होतो. मी आज अत्यंत दु:खी आहे, माझ्या डोळयामध्ये अश्रु आहेत. कारण माझ्याकडून जीवनामध्ये कोणाची तरी फसगत झाली. त्यावेळी मी या विधेयकावर चर्चा करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेचे रेडी रेकनर देखील विकत घेतले होते. ते आजही माझ्याकडे आहे. आमच्या मुंबई महानगरपालिकेचे ॲसेसमेंटचे अधिकारी एकत्र बसावयाचे.

सभापती महोदय, मी त्या ॲसेसमेंटच्या खात्यामध्ये दहा वर्षे नोकरी केलेली आहे. मला संधी मिळाली नाही. तसेच उपनगरातील आमदारांची अशी खात्री होती म्हणून तेथे सांगण्यात आले. हळूच एक प्रस्ताव आला की, गरीबांना, सामान्य माणसाला सांभाळले पाहिजे. त्यावेळी मी पहिला असा मुद्दा मांडण्याचा प्रयत्न केला की, मुंबई शहर हे मुळामध्येच छोटे शहर आहे. पूर्ण उपनगराचा जो भाग आहे, तो भरणी करुन, खड्डे भरुन निर्माण केलेला आहे. मुंबईची डेटम् लाईन म्हणजे झिरो असून, या लाईनच्या खाली जे काही असेल, ते पाण्यामध्ये बुडेल. समुद्राच्या पातळीची जी डेटम लाईन म्हणतो, ती म्हणजे ब्रिटीशांनी मेट्रो सिनेमाच्या समोर निर्माण केलेला टाऊन हॉल जो आहे त्याची जी डेटम लाईन आहे, त्याच्या सगळे वर असले पाहिजे, खाली नाही. उपनगर कसे वसलेले आहे ? आपण जर ही डेटम लाईन घेतली आणि त्या लाईनवरुन उपनगरापर्यंत गेलो तर तेथील आठवा व नववा मजला डेटम लाईनच्या वर आहे, बाकी सर्व खाली येतात. कारण आपण खाडी बुजवली, खड्डे बुजविले आणि त्यावर इमारती बांधण्यात आल्या. मग महापूर येतात. मुंबई पाण्याखाली बुडते याचा कधी कोणी विचार केला नाही. कारण हे सगळे मुळातच खड्यामध्ये आहे. मग पाणी भरणार नाही तर काय होणार ? पाणी भरणारच आहे. मुंबईमध्ये सात बेटे होती. पण आता त्यातील एकही बेट शोधून सुध्दा सापडणार नाही या मुंबई शहराचा जो सॅटलाईट सर्व्हे आहे, त्यामध्ये सर्व नाले दिसतात. आता त्यातील किती नाले शिल्लक आहेत ? कारण आता नाल्यांवरही इमारती उभ्या राहिल्या आहेत. त्यामुळे आता नालेच शिल्लक राहिलेले नाहीत.

अशुद्धलिखित प्रत / अशुद्धलिखित नाही

यानंतर कु.थोरात . . . . .

श्री. दिवाकर रावते....

तेथे इमारती झाल्यामुळे मुंबईमध्ये पाणी तुंबते अशी मुंबईची परिस्थिती आहे. मी मुंबईची भैगोलिक परिस्थिती सांगायला आणि इतिहास सांगायला उभा राहिलो नाही. पुरातत्व विभागाने आता अनेक जुन्या इमारती तोडता येणार नाहीत, त्या नव्याने बांधता येणार नाहीत असे जाहीर करुन टाकले आहे. त्या जुन्या इमारतींवरील होर्डिंग्स कोर्टाने काढायला लावले आहेत. या जुन्या इमारती आता आहेत तशाच जतन करायच्या आहेत एवढे हे जुने शहर आहे. सभापती महोदय, आपण आता या मुंबईत रहतो. पण शंभर-दोनशे वर्षापासून या मुंबईच्या बेटावर पिढयांपिढया राहणारे काही लोक आहेत. या मुंबई शहरात दिडसे ते दोनशे वर्षाच्या जुन्या भक्कम चाळी आहेत. पाच-पाच पिढया त्या चाळीमध्ये जन्माला आलेल्या आहेत आणि राहिल्या आहेत. त्या काळापासून ते मुंबईत रहातात. त्या काळामध्ये सोने बारा रुपये तोळा होते त्यावेळी सुध्दा ते भाडे भरत होते आज सुध्दा मुंबई घर दुरुस्ती मंडळाच्या नियमाप्रमाणे ते् दोनशे ते तीनशे रुपये भाडे भरीत आहेत.

सभापती महोदय, तेव्हा उपनगरामध्ये कोणी रहात नव्हते. हळूहळू उपनगरात इमारती व्हायला लागल्या आणि मुंबईतही इमारती व्हायला लागल्या हे मी आज येथे छातीठोकपणे सांगतो ती सगळी माहिती आज येथे आणलेली नाही. कारण मला त्यावर चर्चा करावयाची नाही. माझ्याकडे यासंदर्भातील सगळी माहिती आहे. हे विधयेक मांडताना एवढीच माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावी असे मी सांगितले होते. त्यावेळी श्री. राजेश टोपे साहेब मंत्री होते. त्यांना या मुंबईची माहिती नाही तसेच या विधेयकाची ग्रॅव्हिटी माहिती नव्हती त्यामुळे मी काय मागतो हेच त्यांना कळले नाही. मी त्यांना एवढेच सांगितले होते की, 1950,1960,1970,1980,1990 आणि 2000 या वर्षामध्ये एप्रिल महिन्यामध्ये ज्या इमारतींना निवासी राहण्याकरिता महापालिकेने मान्यता दिली आणि ज्या इमारतींचे कर निर्धारण झालले आहे त्या इमारतींची करनिर्धारण कार्यावली देण्यात यावी. त्याप्रमाणे तो सगळा तक्ता दिला. त्यावरुन आपल्या लक्षात घेईल की, मुंबई शहरामध्ये त्याच तारखेला झालेल्या इमारतीला लावलेला कर आणि उपनगरामध्ये त्याच तारखेला झालेल्या इमारतीला लावलेला कर याची तुलना केली तर मुंबई शहरातील कर जास्त आहे आणि उपनगरातील कर कमी आहे. ही सगळी माहिती तक्त्यामध्ये देण्यात आलेली आहे. असे सांगण्यात आले होते की, मुंबईतील लोकांना कर कमी आहे आणि उपनगरातील लोकांना कर जास्त आहे. हे

...2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

विधेयक रेटेबल व्हॅल्हयूवरुन कॅपिटल व्हॅल्यू करण्याकरिता आणलेले आहे. भाडेतत्वार जी कर आकारणी आहे ती भांडवली मूल्यवर आधिरित करण्यात येणार आहे. ती पारदर्शक होईल असे शासनाचे म्हणणे आहे. त्याप्रमाणे ती होईलही. पण याचा अर्थ काय? त्या त्या भागामध्ये त्या जागेचे जे भांडवली मूल्य असेल त्याप्रमाणे आता कर आकारला जाणार आहे. सभापती महोदय, साधी गोष्ट आहे. आजही दर शुक्रवारचा महाराष्ट्र टाईम्स उघडाला तर त्याममध्ये कुलाब्यापासून-बोरिवलीपर्यंत आणि बोरिवलीपासून मुलुंडपर्यंतच्या जागेचे दर दिलेले असतात. हे वर्तमानपत्र वाचल्यानंतर आपल्या लक्षात येते की, कुलाब्याला पर स्क्वेअर फुट 35 हजार रुपये दर आहेत. बोरिवलीला हे दर पाच हजार रुपये आहेत तर भांडूप-मुलुंडला आताही चार हजार रुपये दर आहेत मग आजही भांडवली मूल्य कुठे जास्त असेल? भांडवली मूल्य मुंबईतच जास्त आहे. महापालिकेत भांडवली मूल्यावर आधारित कर आकारणी व्हायची ती रेंटवर आधारित असायची. भांडवली मूल्यावर जो रेंट ठरावयाचा त्यावर आधारित असायची. मुंबईमधील रेंट जास्त ठरत होता. त्यामुळे मुंबई शहरात भांडवली मूल्याची माहिती आजही माझ्याकडे आहे. ती मी आज येथे आणलेली नाही आणि ती वाचण्याचा व या विधेयकावर मोठी चर्चा करण्याचा माझा उद्देशही नाही. "मेलेल्या माणसाला श्रध्दांजली वाहून त्याचा गौरव करायचा असतो."

सभापती महोदय, हे विधेयक मंजूर करताना फसवणूक झालेली आहे. हे विधेयक मंजूर झाल्यानंतर अत्यंत छुप्या पध्दतीने काम करण्यात आले. या विधेयकात काही अटी आहेत.

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखाची नाही

श्री. दिवाकर रावते ....

मी आता 1 हजार रुपये भरत असेन आणि भांडवली मूल्य आल्यानंतर माझा कर 3500 रुपये झाला, 4 हजार रुपये झाला, 5 हजार रुपये झाला तरी तो नवीन बांधलेल्या इमारतीकरिता होईल. पण जुन्या लोकांना फक्त 40 टक्के वाढ असेल. म्हणजे माझा कर 1400 होईल. कर वाढणार हे नक्की पण तो 1400 रुपये होईल. तो दर पाच वर्षानी 40-40 टक्के वाढत जाईल. म्हणजे 1400 च्या 40 टक्के याप्रमाणे कर वाढत जाईल. मी 1976 साली ज्या इमारतीमध्ये राहावयास आलो त्याची तुलना 1976 साली उपनगरामध्ये झालेल्या इमारतीच्या कराशी करावयास पाहिजे. पण आमच्या मुंबईच्या हुशार अधिकाऱ्यांनी नगरसेवकांना सांगितले हे बघा. तिकडच्या इमारतीमध्ये 500 चौ. फुटाला इतर कर आहे आणि आपण सुध्दा तेवढ्याच खोलीत राहता तरी तुम्हाला 1500 रुपये कर भरावा लागतो. ती कोणत्या वर्षातील इमारत आहे हे त्यांना सांगितले नाही. मी जर 500 रुपये कर भरत असेन तर मी 1976 साली बांधलेल्या इमारतीला 500 रुपये कर भरतो आणि 1980 साली, 1990 साली, 1995 साली, 2000 साली झालेल्या इमारतीमध्ये 1500 हजार रुपये कर आहे कारण तो कर आताच्या व्हॅल्यूएशनवर, आताच्या किमतीवर आहे. पण अधिका-यांनी नगरसेवकांना सांगितले की, तुम्हाला 1500 रुपये कर आहे आणि यांना 500 रुपये कर आहे. अशा प्रकारे अधिकाऱ्यांकडून वातावरण निर्माण करण्यात आले. याबाबत माझ्याकडे तंत्रशुध्द अशी माहिती आहे पण मला मांडण्याची संधीच मिळाली नाही. हे बिल चार दिवसाच्या अधिवेशनात मंजूर होऊन गेले. आज मुंबई शहराची परिस्थिती अत्यंत गंभीर करुन टाकली आहे. माझा जो मूळ कर असेल त्याच्या नंतर जर याचा विचार होणार असेल तर या सगळ्या मधल्या काळामध्ये मुंबई महानगरपालिकेने त्यांची आताची जी रेटेबल व्हॅल्यूची करप्रणाली आहे त्यामध्ये दर वाढवून टाकले. म्हणजे मी जुन्या पध्दतीप्रमाणे जर आता 1 हजार रुपये भरत असेन तर आता माझा 40 टक्के कर वाढेल आणि तो नवीन प्रणालीप्रमाणे वाढेल. त्यामध्ये आपण वाढ करुन टाकली आहे. इथपर्यंत ठीक आहे. त्यानंतर काय केले ? यामध्ये असहाय्यता निर्माण करण्यासारखी परिस्थिती आहे. 2009 मध्ये कोणताही बदल केला नाही पण 2010 मध्ये कर प्रणालीकरिता जे भांडवली मूल्य ठरणार आहे त्या भांडवली मूल्यामध्येच आपण वाढ करुन टाकली. 2010 मध्ये 15 ते 20



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

टक्के प्रती चौरस मीटरला रेडीरेकनरचा दर वाढविला. म्हणजे ज्या ठिकाणी 10 हजार रुपये रेडीरेकनरचा दर होता तो 12-13 हजार रुपये केला. म्हणजे आता याच्यापुढे भांडवली मूल्य ठरविताना हा वाढविलेला दर लागू होणार आहे. म्हणजे यामध्ये छुपी वाढ आलीच. विधेयक मंजूर करताना आपण आशा आकांक्षा निर्माण केल्या होत्या. या राज्य शासनाचे नक्की धोरण काय आहे हे कळत नाही. मला आठवते की, दोन वर्षापूर्वीच्या नागपूर अधिवेशनामध्ये आम्ही यापुढे मुंबई शहरामध्ये आणि महाराष्ट्रामध्ये, खासकरुन मुंबई शहराचा आणि ठाण्याचा किंबहुना मेट्रोपोलिटंनचा विषय असतो, ज्या ज्या ठिकाणी एमएमआरडीएचे क्षेत्र आहे त्याचा विषय असतो, त्या ठिकाणी या पुढची कोणत्याही जागेची विक्री बिल्टअप क्षेत्रावर होणार नाही तर ती चटईक्षेत्रावर, कार्पेट एरियावर होईल्. आपण निर्णय घेतला आणि तसा कायदा केला पण रेडीरेकनर बिल्टअपवर आहे. मला कळत नाही की, शासनच एक कायदा करते आणि शासनाने जे विक्रीचे दर जाहीर करावयाचे आहेत, ज्यावर आपल्याला स्टॅम्प ड्युटी मिळते, ज्याच्यावर आपले रजिस्ट्रेशन मिळते त्या रेडीरेकनरचा दर कार्पेटवर आधारित का केला नाही ? रेडीरेकनरचा दर बिल्टअपवर आहे आणि खरेदी कार्पेटवर आहे. म्हणजे खरेदीचा कायदा कार्पेटवर असताना आपण स्टॅम्प ड्युयटी बिल्टअपवर लावता. किंबहुना माझा अधिकृत आक्षेप आहे की, आपण आता जे म्हाडाचे फ्लॅट विकले ते बेकायदेशीर आहे. या सदनामध्ये माननीय मुख्यमंत्री महोदय स्वत: त्या विधेयकाकरिता आले होते. त्यांनी आग्रह धरला. या मुंबईमध्ये कशी फसवणूक होते हे स्वत: तत्कालीन मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी आपल्या त्या सुंदर शैलीमध्ये समजावून सांगितले. त्यांचा आवाज कसा असतो ?

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

त्यांचा आवाज त्याच टिपेत असतो, चांगले असो वाईट असो. त्यांचा आवाज कधी वर चढत नाही, कधी कमी होत नाही, सुंदर मुलायम आवाजात सांगत असतात. त्यावेळी कार्पेट एरियाप्रमाणे घरे घेण्याचा कायदा मंजूर झाल्यानंतर म्हाडाची घरे गोरगरीबांना विकली जातात, आमदारांना म्हाडाची घरे दिली आहेत ती सुध्दा कार्पेटनुसार का देत नाही ? कायदा केल्यानंतरही ती बिल्टअपप्रमाणे का देता ? शासनाने रेडिरेक्नर बिल्टअप एरियानुसार तयार केलेले आहे. त्यामुळे हे प्रमाण कळत नाही. भांडवली मूल्य काढत असताना तुम्ही रेडिरेक्नर समोर ठेवून काढणार. कायदा कार्पेट एरियाप्रमाणे टॅक्स घ्यावा असे सांगतो. त्यामुळे त्या जागेचे मूल्यांकन कसे करणार ? त्याचे उत्तर सापडत नाही. मग अशा परिस्थितीत मी कायद्याने भांडणार. मी सांगेन की, माझ्या घराचे मूल्यांकन कार्पेटनुसार करावे. त्यावर ते असे म्हणतील की, रेडिरेक्नरचा दर असा आहे. मग तो कार्पेटनुसार किती होईल, बिल्टअपचे लोडिंग कसे धरावयाचे ? 37 टक्के बिल्टअप धरावयाचे की 40 टक्के धरावयाचे की 20 टक्के धरावयाचे. याबाबत खूप वाद आहेत. ते सुध्दा ठरविता येत नाही अशी स्थिती आहे. बिल्टअप म्हणजे काय याचे गणित मला माहीत आहे. कारण कोणे एके काळी मी हा व्यवसाय करीत होतो. अशा परिस्थितीत भांडवली मूल्य कसे ठरवावयाचे याबाबत द्विधा मन:स्थिती सरकारी कागदपत्रामध्ये आहे. हे सर्व करत करत मुंबईच्या लोकप्रतिनिधींना बनवाबनवी करीत हे विधेयक मंजूर झाले. विधेयकामध्ये 500 चौ.फू.बाबत तरतूद केली आहे असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे, ती तरतूद काय आहे ते सांगतो. (अडथळा ) अधिकारी तुम्हाला कसे सांगतात त्याची मंत्री महोदयांना जाणीव करुन देत आहे. म्हणजे लोकप्रतिनिधींना बनविले आहे तसे आपल्यालाही बनविले आहे. कारण ब्रिफिंगमध्ये तसे आले आहे. (अडथळा) परंतु आपण स्वत:चे मत बनविण्यासाठी सक्षम आहात.

3 हजार रुपये दरमहा भाडे भरणारा जो भाडेकरु आहे त्याला आता नवीन दराप्रमाणे 6 हजार रुपये भाडे द्यावे लागणार आहे. मराठी माणूस मुंबईत यापुढे टिकणार नाही, अशी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. कारण आता नवीन घर घेणा-यांमध्ये मराठी माणूस दिसत नाही, ही चिंतेची बाब आहे. हा जातीयतेचा विषय नाही, की प्रांतियतेचा विषय नाही. परंतु या

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्री.दिवाकर रावते....

मातीमध्ये, भूमीमध्ये आपल्या भूमिपूत्राला आज घर घेता येत नाही. त्यावेळी मी देखील इमारती बांधल्या होत्या. मी एक कडवट शिवसैनिक आहे, त्यामुळे मी नफातोटा पाहिला नाही, अन्यथा बिल्डर म्हणून करोडपती झालो असतो. मराठी माणसांना घर देण्याचे डोक्यात वेड होते. त्यावेळी ज्यांनी घरे घेतली होती त्यापैकी आता केवळ औषधाला उरली आहेत, बाकीचे लोक घरे विकून गेले आहेत आणि ती कोणी घेतली आहेत हे मी सांगण्याची गरज नाही. त्यामुळे खूप दु:ख होते. एका बाजूला टॉवर उभे रहात आहेत. या योजनांकडे मी अत्यंत डोळसपणे पहात आहे. हे सर्व कशासाठी चालले आहे ते सांगतो ? मराठी माणसांची रितसरपणे मुंबईमधून हकालपट्टीची सोय केली जात आहे. शेवटी असहय झाले की माणूस रहात नाही. पूर्वी मला एका खोलीत रहायला लागायचे. माझा संसार वाढल्यामुळे माझ्या मुलांचे कसे होणार म्हणून ती खोली विकून डोंबिवलीला फ्लॅट घ्यावा लागला. कबुतराच्या खुराडयातील जागा अशक्य होते म्हणून मी मोठया जागेसाठी मुंबईतील घर विकून पलायन केले. आता परवडत नाही म्हणून पलायन करण्याची पाळी आली आहे ही परिस्थिती आहे. या मुंबईचा आता सर्व्हे केला तर जुन्या चाळीच्या योजना चांगल्या आहेत. लोक का टीका करतात ते समजत नाही, त्यातील बदमाशीवर जरुर टीका करावी. जे बदमाशी करतात त्यांना सोडावयाचे नाही. जे लबाडी करीत आहेत, शासनाला फसवत आहेत त्यांना माफ करावयाचे नाही. माननीय शिवसेनाप्रमुखांनी एसआरए योजना सांगितली, झोपडपट्टीला मोफत जागा द्यावी. ती बांधत असताना अर्ध्या जागेवर तुमचे लोक आणि अर्ध्या जागेवर त्यांचे लोक. त्यांना जेवढया प्रमाणात जागा द्याल त्याच्या पलिकडे तेवढया प्रमाणात तुम्ही घरे बनवावीत आणि विकावीत अशी कल्पना होती.

यानंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...

सरकारकडे पैसे नाहीत. जुन्या इमारतीच्या बाबतीत सुध्दा तेच झाले. माननीय मुख्यमंत्र्यांनी विधानसभेमध्ये एफएसआय वाढवून देतो असे म्हणाले. किती वाढवून दिला हे माहीत नाही. आताचे मंत्री महोदय श्री. राजेश टोपे हे जेव्हा नगरविकास राज्यमंत्री होते त्यावेळी एक गोष्ट मी करुन घेतली होती. त्यानी मान्य केले. साधी गोष्ट असते. एसआरअेला नवीन कर या प्रमाणे लागला. पहिली 5 वर्षे 20 टक्के, दुसरी 5 वर्षे 40 टक्के, तिसरी 5 वर्षे 60 टक्के आणि 20 वर्षानंतर पूर्ण कर द्यावयाचा आहे. झोपडपट्टीवासीयांना त्या घरात रहाता येईल अशी व्यवस्था केली. मेण्टेनन्ससाठी देखील काही तरी रक्कम त्यांना दिलेली आहे. ती रक्कम सोसायटीच्या ताब्यात असते. गरिबाला परवडेल अशी योजना आहे. परंतु येथे आलेल्यांनी बेकायदेशीर झोपड्या बांधल्या त्यांना तुम्ही ही योजना लागू केली, चाळीमध्ये भाड्याने राहिलेल्यांना ही योजना लागू नव्हती. मी या ठिकाणी हे अशासकीय विधेयक आणले आणि विधानसभेमध्ये ते श्री. विनायक राऊत आणि श्री.बाळा नांदगावकर यांनी आणले. जे 20 टक्के कर भरतात, त्यांचा कर 40 टक्के वाढला पाहिजे. अशा प्रकारची परिस्थिती विधेयकाच्या माध्यमातून होत असेल तर एसआरअे योजनेमध्ये झोपडपट्टीतील आणि जुने भाडेकरु राहातील आणि बाजूच्या टॉवरमध्ये कोण राहतील? मराठी माणूस टॉवरमध्ये गेला तर मला खूप आनंद होईल. मलाच काय आपणा सर्वांना आनंद होईल. परंतु ही आनंददायी बाब नाही. आणखीन 20 वर्षांनी या मुंबईचा सर्व्हे घेतल्यानंतर मुंबईत जे अधिकृतपणे भारतीय राहातात त्यामध्ये मराठी टक्का, आता जो 28 टक्के आहे आणि परप्रांतीय 72 टक्के आहे, तो मराठी टक्का 15-17वर आल्या शिवाय राहाणार नाही. या सरकारने 5 लाख घरे बांधण्याचा पण केलेला आहे. ही घरे कोणाला देणार आहात ? भाड्याची 50 हजार घरे बांधण्यात येणार आहेत. त्या घरांचे भाडे 300 ते 400 रु. असणार आहे. भाडे देखील आपण ठरवून टाकलेले आहे. एक वस्ती म्हणजे एक मतदारसंघ. म्हणजे त्या लोकांचे प्रतिनिधी असणार. आज कोणीही स्वत:ला भारतीय मानत नाही. प्रत्येक जण स्वत:ला स्वत:च्या जातीचा मानतो, मग शहराचा मानतो, मग गावाचा मानतो, तालुक्याचा मानतो, जिल्ह्याचा मानतो. मग उरलासुरला कोणी असेल तो भारतीय. अशी आजची दुर्दैवी परिस्थिती आहे. हे तुम्ही आम्ही थांबवू शकत नाही. मुंबईची अशा प्रकारची

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...

परिस्थिती या करप्रणालीमुळे होणार आहे. मी वर्कआऊट करीत होतो. मार्केट व्हॅल्यू गुणिले पर स्के.फू. भागिले 10 गुणिले 90 या सूत्राप्रमाणे येईल तो कराचा बोजा. या मंबई शहराची ही परिस्थिती होणार आहे. ठीक आहे.

सभापती महोदय, या विधेयकाच्या बारीकसारीक तपशीलामध्ये जाऊन विवेचन केले तर आणखीन विचित्र परिस्थिती पुढे येईल. त्यावेळी आणलेला कायदा असा नव्हता. तो फक्त मुंबई पुरता होता. मी त्यावेळी असे म्हणालो होतो की हा कायदा उद्या महाराष्ट्रावर लादतील आणि महाराष्ट्राची परिस्थिती अतिशय गंभीर होईल.

...नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

छोट्या शहरांमध्ये सुध्दा हा कायदा लागू होणार आहे. हा कायदा आता मुंबईपुरता मर्यादित राहिलेला नाही. हा जो कायदा होणार आहे तो नागपूर शहराबरोबर सर्व महानगरपालिका, नगरपालिका एवढेच नव्हे तर सभापती महोदय, आपण ज्या गावामध्ये राहता त्यादृष्टीने विचार करुन बघा. ही करप्रणाली लागू झाल्यानंतर मुंब्र्याला काय होईल? दोन-तीन महत्वाच्या गोष्टी आहेत. मध्य प्रांत आणि वऱ्हाड येथे वऱ्हाडचा कायदा लागू आहे. नागपूर आणि त्या परिसरात पूर्वीचे प्रॉव्हिन्स असल्यामुळे तेथे वेगळा कायदा लागू आहे. महाराष्ट्रातील काही भागामध्ये गुजराथचा रेंट ॲक्ट लागू आहे. मराठवाड्यामध्ये निजामशाहीचा त्यावेळचा कायदा आजही लागू आहे. त्या कायद्याच्या आधारे केसेस चालतात. मुंबईसारख्या शहरामध्ये एकदा घरामध्ये घुसलेल्या भाडेकरुला सहजासहजी बाहेर काढता येत नाही. त्या भागात असा संघर्ष नसल्यामुळे महत्व आले नाही. जूना कायदा चालू राहिला. त्या भागात केव्हाही गेलात तर घर भाड्याने मिळते. एका ठिकाणचा भाडेकरु दुसऱ्या ठिकाणी निघून जातो. परंतु जागेबाबत क्लेम करण्याच्या भानगडीत पडत नाही. मुंबईमध्ये तुमच्या घरात घुसलेला भाडेकरु बाहेर काढणे कठीण असते. वर्षानुवर्षे कोर्टात केसेस चालतात. मध्य आणि वऱ्हाड प्रांताच्या कायद्यात अधिनियमात म्हटले आहे त्याप्रमाणे त्या अंतर्गत बदल होणार आहे. मराठवाड्यामध्ये त्यावेळचा निजामाच्या काळातील कायदा आहे, तो हैद्राबादचा कायदा तेथे लागू आहे. त्या रेंट ॲक्टमध्ये बदल करुन महाराष्ट्राचा सर्वंकष कायदा तयार होईल आणि हे सर्व कायदे ॲबोलिश होतील. ही बाब चांगली आहे. बॉम्बेचे मुंबई करण्याकरिता एवढे कसब आमच्या अधिकाऱ्यांनी दाखविले नाही. महाराष्ट्रातील रहिवाशांचे वाटोळे करण्यासाठी कायदा आणला आहे. फार वाईट वाटते.

सभापती महोदय, परवा मी आपल्याला एक पत्र दिले. या सदनामध्ये विनंती केली आणि कायदा नंतर बदलू सांगितले म्हणून एक विधेयक आम्ही मंजूर करण्यास सहकार्य केले. बॉम्बेऐवजी मुंबई असा उल्लेख त्या विधेयकामध्ये नव्हता. मी पत्र दिले. सर्वच कायद्यात योग्य ते बदल करण्यासाठी आपल्या दालनामध्ये बैठक घ्यावी म्हणून विनंती केली. माननीय मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, संसदीय कार्यमंत्री, विधीमंडळाचे सचिव आणि मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तद्वत कायदा सचिव, महाराष्ट्र राज्य यांची संयुक्त बैठक घ्यावी. मागणी मी काय केली? महाराष्ट्राच्या

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये, मागील 50 वर्षात आपण जे करु शकलो नाही ते 1 मे, 2010 च्या आत करण्यासाठी, हे अधिवेशन सुरु आहे, या अधिवेशनामध्ये तरी एक सर्वंकष तारीख ठरवावी. एका झटक्यात चर्चा न करता सर्व कायदे मंजूर करु. महाराष्ट्राच्या सर्व कायद्यांमध्ये मुंबई आणि महाराष्ट्र असा बदल केला असता तर राज्य सन्मानित झाले असते. मला कळले नाही. हे सगळे करावयाचे असेल तर ताबडतोब निर्णय घेतला पाहिजे. या राज्याच्या प्रत्येक विभागाचे अनेक कायदे आहेत. मुख्य सचिव बैठकीला असतील तर ते सगळ्या सचिवांना सांगतील की, एका आठवड्यात मला हा बदल हवा आहे. कायदा विभागाचे सचिव असले तर ते त्याची दखल घेतील. प्रत्येक कायद्याचे पहिले पान हे कायदा विभागाच्या दृष्टीने महत्वाचे असते. बॉम्बेचे मुंबई करायचे तो एक कायदा आणि ज्याठिकाणी बॉम्बे असा उल्लेख आहे त्याऐवजी महाराष्ट्र असा बदल करायचा. हे सगळे कायदे या ठरावाने बदलले गेले पाहिजेत. बैठक झाली का? बैठक आयोजित करण्यात आली होती. कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीनंतर ही बैठक होणार होती. आमच्या दृष्टीने ही बैठक महत्वाची होती. मी अधिकृत बोलत आहे. माझ्याकडे मिनिट्स उपलब्ध आहे. आपण ते मिनिट्स वाचून पहा. माननीय उपमुख्यमंत्री काम आहे म्हणून निघून गेले. सचिव बाजूला बसले होते. मुख्य सचिव कुठे आहेत? हे तर श्री.डांगे दिसत नाहीत. मुख्य सचिव बदलले का हे मला कळले नाही. ते येऊन बसले. मुख्यमंत्र्यांबरोबर दुसरीच काही चर्चा चालली होती. ती बैठक म्हणजे कोण कुत्रं विचारतो तुमच्या बॉम्बेऐवजी मुंबईला? अत्यंत वाईट वाटते. अत्यंत निर्भत्सना अशा पध्दतीची बैठक घेतली गेली. तो कायदा येईल असा कोणताही शब्द नाही. सगळे उठले आणि लगेच निघून गेले. मी बसून राहिलो. सचिवांना विचारले, हे कोण आहेत? मुख्य सचिव कोण आहेत? ते म्हणाले, त्यांना बोलावलेच नव्हते. हे कोण आहेत याचे ते तरी काय उत्तर देणार? हे कोण आहेत? कायदा सचिव, विधी आणि कायदा सचिव.....

नंतर टी.1...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखी नोंद

श्री. दिवाकर रावते ....

आणि त्यांचे सहाय्यक होते. एवढी टिंगल-टवाळी या महाराष्ट्राच्या अस्मितेची चालली आहे याचेच वाईट वाटते. आता तर निजामाच्या काळातील कायदा, वऱ्हाड प्रांतासाठी असलेला कायदा या सर्व कायद्यांवर वरवंटा फिरविला जाणार आहे. पण दुर्दैवाने या राज्याच्या अस्मितेकरिता अशा प्रकारे अधिकाऱ्यांच्या मर्जीनुसार चालावे लागते, या अस्मितेकरिता अगतिक होऊन त्यांच्याकडेच बघावे लागते याचे जास्त वाईट वाटत आहे. हा कायदा झाल्यानंतर तो सर्व नगरांना लागू होणार आहे, असेही यामध्ये म्हटले आहे. या कायद्यात म्हटल्याप्रमाणे "अशा प्रकारे लादावयाचा जमीन मालमत्ता कर वगैरे लागू करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. करयोग्य मूल्याच्या विवक्षित टक्केवारीच्या आधारे हा कर लावण्यात येणार असून सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे मालमत्ता कर, पाणीपट्टी व पाणीपट्टी लाभ कर, मलनि:सारण कर व मलनि:सारण लाभ कर, सर्वसाधारण कर, शिक्षण कर, पथ कर एवढे कर यामध्ये आहेत. मी यासंबंधीचे असेसमेंट बिल आणले नाही. ते जर माझ्याकडे असते तर मंत्री महोदयांना ते दाखविले असते. हा कायदा झाल्यामुळे ग्रामीण भागात काय परिस्थिती होणार आहे याचाही विचार करणे आवश्यक आहे. कारण शहरांचा विचार केला तर ज्या रिकाम्या जागा असतात, ओपन लँड अथवा व्हेकंट लँड असते अशा जमिनींचा नुसता 10 वर्षे कर भरत राहिले तरी त्याचे कित्येक पटीने पैसे मिळतात, पण ग्रामीण भागात जे रिकामे प्लॉट्स आहेत त्यांच्या बाबतीत सुध्दा या कायद्यामुळे ही करप्रणाली लागू होणार आहे. म्हणजे रिकामी जमीन असेल तर तिचे बाजारमूल्य काढून त्यावर कर आकारणी करण्यात येणार आहे. यापूर्वी असे होते की, जोपर्यंत बांधकाम होत नाही तोपर्यंत कर आकारला जात नव्हता परंतु आता असा कर लागणार आहे. रिकाम्या जमिनीवरील जो कर आतापर्यंत होता तो अगदी नॉमिनल असायचा पण ग्रामीण भागात ज्यांच्याकडे रिकामे भूखंड आहेत त्यांच्यावरही भांडवली मूल्याप्रमाणे कर येणार, फक्त इमारतीला जो कर लागतो तोच त्याला लागणार आहे. म्हणजे पाणीपट्टी कर आणि पाणी लाभ कर, मलनि:सारण कर आणि मलनि:सारण लाभ कर, शिक्षण कर, पथ कर अशा प्रकारचे टॅक्सेस या रिकाम्या जागेवर लागणार नाहीत. आज जे कर अमलात आहेत त्याच्या टक्केवारीने हे कर लागणार आहेत. त्यात शिक्षण कर 2 टक्के, पथ कर 2 टक्के, मलनि:सारण आणि मलनि:सारण लाभ हे सर्व कर आहेत. पाणी पटटी आणि पाणी लाभ कर



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

यामध्ये जे जे कर येत असतील त्याच्या टक्क्यामध्ये हे कर भरावयाचे आहेत. हा विषय मी सभागृहात नियम 93 अन्वये सूचना देऊन उपस्थित केला होता. त्य क्षणाला माननीय राज्यमंत्री महोदयांच्या जागी बसलेले तत्कालीन राज्यमंत्री सभागृहात उपस्थित हाते. हा विषय निघाल्यानंतर अधिकारी गॅलरीत बसलेल्या आयुक्तांच्या ही चूक लक्षात आली की गेल्या 15 वर्षांपासून जवळपास 20 हजार कोटी रुपये जनतेकडून अशा करापोटी जास्तीचे घेण्यात आले. त्याच क्षणाला माननीय राज्यमंत्र्यांनी सभागृहात जाहीर करुन टाकले की, हे वेगवेगळ्या स्वरुपात जी कर आकारणी करण्यात येते त्या सर्व बाबी एकाच बिलात येईल अशी व्यवस्था करण्यात येईल. त्यावेळेस मी म्हणालो की, ठीक आहे आता एवढ्या वर्षांचा हिशेब कुठे करीत बसता, जाऊ द्या, एवढी रक्कम कधी परत देणार, ती राहू द्यावी. सध्या राज्यात एक चांगली पध्दत आहे ती म्हणजे बीओटीवर ठिकठिकाणी कामे होत असल्याने त्यावरील टॅक्सेस आम्हाला भरावे लागत नाहीत.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

सभापती महोदय, हा वेगळा विषय आहे परंतु मी तो दोन मिनिटात मांडणार आहे. रस्ते बांधण्याची या सरकारची जबाबदारी आहे की, नाही ? रस्ते दुरुस्त करण्याची जबाबदारी सरकारची आहे परंतु आता रस्ते सुध्दा बीओटीवर दुरुस्त केले जात आहेत व रस्ता दुरुस्त केला की, त्या ठिकाणी टोल नाके लावले जातात. रस्ते दुरुस्त करण्यासाठी या सरकारकडे काहीही पैसे नाहीत ? पूर्ण रस्ता तयार केल्यानंतरच त्यावर नियमानुसार टोल लावला जातो परंतु महाराष्ट्रात असे किती तरी नाके आहेत की, त्या ठिकाणी रस्ते दुरुस्त केल्यावर सुध्दा टोल नाके लावले आहेत. माझी सवय खराब आहे त्यामुळे मी प्रत्येक नाक्यावर टोल का लावला आहे यासंदर्भातील माहिती मागत असतो त्यामुळे आतापर्यंत कलेक्टरला सांगून 8-10 बोगस नाके मी रद्द करावयास लावले आहे. आपण जनतेचे प्रतिनिधी आहोत त्यामुळे प्रत्येक टोल नाक्यावर टोल का लावला आहे त्याची माहिती मागा, जी.आर.मागा. हे टोल नाकेवाले लोक जनतेला दाद देत नाहीत. महाराष्ट्रात कुठे काय चालले आहे ते लक्षातच येत नाही. लोकांना आता या टोल नाक्याची सवयच झालेली आहे. लोक गुपचुप टोल देऊन पुढे जात असतात. परंतु आपण टोल का देत आहोत याची माहिती झालीच पाहिजे. या पध्दतीला लोकांनी मनापासून स्वीकारले आहे त्यामुळे या पध्दतीचा चांगला फायदा करुन घ्या. ठेकेदार जनतेची लूट करीत आहे यामध्ये कोणाला 5-25 टक्के मिळत असतीलही. जनतेने तुमच्यावर विश्वास टाकून या ठिकाणी तुम्हाला आणलेले आहे. विश्वासाला पात्र होण्यासाठी जनता लुबाडली जाईल असे काही करु नका. मी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, तुम्ही जी.आर.तपासला तर तुम्हाला 2-4 बोगस टोल नाके सापडून येतीलच. हे टोल नाके कोणाचे असतात हे सुध्दा मी सांगावयास नको कारण याबाबतची माहिती तुम्हाला आहेच.

सभापती महोदय, कर प्रणालीमध्ये फक्त भांडवली मूल्यावरच करच वाढणार आहे काय ? परंतु त्या टक्केवारीमध्ये मल:निस्सारण कर, मल:निस्सारण लाभ कर,पाणी पट्टी कर, पाणी पट्टी लाभ कर, शिक्षण कर, पथ कर हे सर्व कर त्या टक्क्यामध्ये वाढणार आहेत. मी त्यावेळेस सांगत होतो की, यासंदर्भातील गणित सुध्दा ठरवून टाका म्हणजे त्या टक्क्यात ते वाढावयास नको. मी खात्रीने सांगतो की, तुमच्या नवीन कर प्रणालीमध्ये आज जर मुंबई महानगरपालिकेला 4000



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

कोटी रुपये येणार असतील, आता तर महानगरपालिकेला 1800 कोटी रुपये मिळत आहेतच किंवा जे काही कोटी रुपये मिळणार आहे तर आता यातून लोकांच्या खिशातून किती पैसे जाणार याची माहिती मिळाली पाहिजे. यासंदर्भातील गणित तुम्ही वेगळे केले नाही तर ते गणित सुध्दा तुम्ही यामध्येच टाकलेले आहे. कोणते अधिकारी काय करतात याची मला माहिती आहे. इमारत व जमीन यांच्या कर योग्य मुल्याच्या विवक्षित टक्केवारीच्या आधारे बसवणे योग्य असलेल्या मालमत्ता करात, पाणीपट्टी, पाणीपट्टी लाभकर, मल:निस्सारण कर, मल:निस्सारण लाभ कर यांचा यामध्ये समावेश असेल. खरे म्हणजे यांचा समावेश "नसेल" असा शब्द असावयास पाहिजे होता. त्यामुळे तुम्ही या विधेयकातून नेमके काय वाढविणार आहात ? आपण केवळ घरांचा कर वाढविणार आहात की त्याच्या प्रमाणात आपण हे सर्व वाढविणार आहात ? हे वाढवित असतांना महानगरपालिका हे विवक्षित कर वाढवतच राहणार आहे. मल:निस्सारण कर, मल:निस्सारण लाभ कर लावत असतांना मी मंत्रीमहोदयांना आदराने एक विचारतो की, आज या महाराष्ट्रात अशी किती शहरे आहेत की, ज्या ठिकाणी मल:निस्सारणाची सोय आहे ? सिव्हरेज डिस्पोजलची व्यवस्था किती शहरामध्ये आहे ? मला माहिती आहे ही माहिती सांगणे कठीण आहे. मला काल सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील म्हणाले की, अहो बुलढाण्यामध्ये असे असे आहे. मी त्यांना सांगितले की, तुम्ही आता बाहेर जावयास लागला आहात त्यामुळे तुम्हाला हळू हळू सर्व काही समजेल परंतु आम्हाला या सर्वांची आता सवय झालेली आहे.

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.

केंद्रीय अवजड उद्योग मंत्री व माजी मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांच्या लातूर मध्ये 15 दिवसातून एकदा पाणी येते. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील हे बुलढाण्याला गेले होते. त्यांना धक्का बसला. त्यांनी सांगितले तेथे 20 दिवसातून एकदा पाणी येते. म्हणजे ज्या शहरांना पाणी पुरवठा करीत नाही, मलनिस्सारणाची सोय केलेली नाही अशा शहरातील लोकांकडून कराचे नियोजन आपण केले आहे. ज्यांनी कोणी हे केलेले आहे ते चुकीचे आहे. मी मुंबई महानगरपालिकेचा सदस्य होतो. मुंबई महानगरपालिकेतील प्रत्येक डेव्हलपमेंट माझ्या नजरेसमोर झालेली आहे, हे सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांना देखील माहिती आहे. प्रत्येक कर माझ्या समोर बनले आहेत. जगामध्ये मल निस्सारणामध्ये जी 4 प्रमुख शहरे आहेत त्यात मुंबई शहराचा चौथा क्रमांक लागतो. मुंबई शहरामध्ये एक दिवसाचा जेवढा पाणी पुरवठा होतो, तेवढा पाणी पुरवठा महाराष्ट्रातील सर्व शहरांमध्ये होतो. म्हणजे किती ताकद आहे ते बघा. वरळी येथे 15 मलनिस्सारणासंबंधीचे पंप बसविले आहेत. यात समुद्र अडविण्याची ताकद आहे. मी सर्वांचे इरेक्शन पाहिले आहे. आता हाजीअली येथे पंप बसविले आहेत. लालबाग, एलफिन्स्टन, गिरगाव येथे पाण्याचा निचरा होत नव्हता तो आता होणार आहे. याचे डिझाईन 20वर्षापूर्वी तयार केले होते. ती लाईन आता तयार झाली असून या पावसाळ्यामध्ये सुरू होईल. जागतिक बँकेच्या माध्यमातून आपण सदर योजना निर्माण केलेली आहे. तरी सुद्धा मुंबईतील 40 टक्के मलनिस्सारण होत नाही. आपण राज्यकर्ते असल्यामुळे जनतेचा बारकाईने विचार करायला पाहिजे. मी मुंबई महानगरपालिकेच्या सर्व विविध समित्यांवर काम केलेले आहे. मुंबईत दर दिवशी 45 लाख माणसे रस्त्यावरून ये-जा करतात. मी येथे माझ्या भागातीलच उदाहरण देतो. मी नगरसेवक असताना दादर येथील झंडु फार्मासीच्या भिंतीचा वापर एकाच वेळी 25 लोक सतत लघवी करण्यासाठी करत होते, तर दादर चौपाटीचा वापर दररोज 300 लोक शौचासाठी बसत. त्यांना रोज कुठे हकलवत बसणार. हे पाहून मला धक्का बसला. सुरूवातीला मी या लोकांवर कारवाईचा बडगा उगारला. पण ही लोकांची गरज आहे, त्यामुळे मी यावर विचार करायला सुरूवात केली. त्यातून सुलभ शौचालयाची कल्पना माझ्या समोर आली. सुरूवातीला माझ्या या योजनेस विरोध करण्यात आला. पण आज 45 लाख लोकांना त्याचा उपयोग होत आहे. एवढचे नव्हे तर या शौचालयाद्वारे शौचालये व स्वच्छतागृह स्वच्छ करण्यासाठी रोजगार देखील मिळाला.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते .....

सुलभ शौचालयामुळे अनेक कुटुंबे पोसली गेली आहेत. शौचालये साफ करण्याचे काम या कुटुबियांकडून केले जाते आणि शौचालयाचा वापर करणा-याकडून ते चार आणे वा आठ आणे घेत असत. पैसे दिले तरी लोकांच्या दृष्टीने सोय होणे गरजेचे आहे. मुंबईमध्ये ही व्यवस्था निर्माण करण्यात आली होती. इंटरनॅशनल कॉनफरन्ससाठी मी परेदशात गेलो होतो व शौचालयाच्या विषयामुळे उत्कृष्ट मेअर म्हणून त्यावेळेला माझी निवड करण्यात आली होती, हे मला आजही आठवते. लंडन शहरामध्ये जी व्यवस्था निर्माण होऊ शकली नाही, ती व्यवस्था आपण निर्माण केलेली आहे. मुंबई शहरामध्ये जवळजववळ 40 टक्के लोकांना सिवरेज डिस्पोजल नाही असे मी मघाशी म्हटले होते. परंतु नक्की 30 टक्के लोकांना सिवरेज डिस्पोजलची सोय नाही. उपनगरात काही भागात सेफ्टी टॅक बसविण्यात आलेले आहेत. असे असले तरी कर लावण्यात येत आहेत. अशा प्रकारची कर प्रणाली आल्यानंतर मुंबई शहरात जे काही व्हावयाचे असेल ते होईल. परंतु या विधेयकान्वये राज्यातील इतर शहरांचा समावेश देखील या करामध्ये होणार आहे. सगळे रेंट ॲक्ट आता बाद होणार आहेत. सुप्रीम कोर्टात रेंट ॲक्टसंबंधीचे विधेयक प्रलंबित आहे. परंतु त्याचा काही परिणाम होणार नाही. तो विषय येणारही नाही. रेंट ॲक्ट आला असता तर बरे झाले असते परंतु तो ॲक्ट आता सुप्रीम कोर्टात प्रलंबित आहे. सभापती महोदय, या राज्यातील सर्व शहराचा या विधेयकान्वये या कर प्रणालीमध्ये समावेश होणार आहे.

सभापती महोदय, या विधेयकाचे उद्देश आणि कारणांमध्ये असे म्हटलेले आहे की, "सूत्राधारित सुलभ निर्धारण शक्य आहे. स्वयंनिर्धारण शक्य आहे. " मुंबईतील एखाद्या फ्लॅटचे भांडवली मूल्य किती आहे, यावर कर किती राहील हे काढता येईल हे सर्व ठीक आहे. परंतु ग्रामीण भागातील एखाद्या मोकळया प्लॉटसाठी देखील या प्रकारची करप्रणाली आणल्यानंतर सोलापूर, कोल्हापूर, नागपूर औरंगाबाद, नांदेड इत्यादी शहरांचे काय होणार आहे, याचा आपण सर्वांनी विचार केला पाहिजे .ही सर्व शहरे यामुळे बाधित होणार आहे. सर्व भागासाठी एक सारखी कर प्रणाली लावणे, हे अयोग्य नाही .सभापती महोदय या विधेयकावर पुष्कळ बोलण्यासारखे आहे परंतु या विधेयकामुळे जे काही परिणाम होतील असे मला वाटले आहे, त्यासबंधी मी अत्यंत थोडक्यात माझे मत मांडणार आहे. कदाचित ते चुकीचे देखील असू शकते. माननीय मंत्री महोदय

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते .....

माझे मुद्दे खोडून काढू शकतील. विधेयकातील प्रत्येक पानावरील मुद्यासबंधी चर्चा करण्याची माझी इच्छा देखील नाही. आता जे विधेयक मांडण्यात आलेले आहे, त्यामध्ये एक ऑप्शन ठेवण्यात आला आहे. हे मी सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो. ही पध्दत स्वीकारावयाची की नाही हे ठरविण्याचा अधिकार संबंधितांना आहे. महाराष्ट्र राज्य निर्माण झाल्यापासून हे एकमेव असे विधंयेक आहे की, त्या संदर्भात सरकारला विश्वासाने काही सांगता येत नाही. सरकारने कायदा केला आहे. परंतु तो स्वीकारावयाचा की नाही हे ठरविण्याचा अधिकार मात्र संबंधिताला राहणार आहे. अशा प्रकारचा कायदा असतो काय ? यावरुन असे दिसून येते की हा कायदा आत्मविश्वास नसलेला कायदा आहे. या ठिकाणी ज्याप्रमाणे कायदा मंजूर झाला त्याप्रमाणे मुंबई महानगरपालिकेनेसुध्दा ते मंजूर केले आहे. परंतु त्यामागे निश्चितपणे एक लॉबी आहे. मला त्या बाबतीत फारसे काही बोलावयाचे नाही जो कायदा सभागृहाने मंजूर केलेला आहे, तो कायदा आपल्याला स्वीकारावयाचा असतो. हा कायदा मुंबई महानगरपालिकेत मंजूर झाला. सभागृहाने एकदा कायदा मंजूर केल्यानंतर तो स्वीकारावयाचा किंवा नाही याचा अधिकार मुंबई महानगरपालिकेला होता. परंतु त्यानी तो कायदा स्वीकारला आहे. त्या संदर्भातील नियम तयार करण्यासाठी सुखटणकर समिती नेमण्यात आली होती. जे काही नियम बनतील ते स्थ्यांयी समितीने मंजूर केले पाहिजेत. कायदा झाला परंतु तो अंमलात कसा आणावयाचा ही चिंतेची बाब आहे. आजच मी या विभागाचे जे अतिरिक्त आयुक्त त्यांच्याशी चर्चा केली. मी त्यांना असे सांगितले की, यासबंधीचा कायदा आणला आहे. परंतु नियम तयार होत नाही. हे नियम तयार करण्यासाठी सुखटणकर समितीने सहा महिन्याची वेळ मागितली आहे. सुखटणकर समितीने नियम केल्यानंतर ते नियम स्थायी समितीपुढे जातील. स्थायी समितीमधील चर्चेत काही मुद्दे निघाले की, हे नियम पुन्हा सुखटणकर समितीकडे जातील. तेव्हा हे नियम तयार करण्यासाठी किती कालावधी लागेल, हे मला सांगता येणार नाही. पंरतु या सदनामध्ये मी पुन्हा एकदा सांगतो की, आपल्या खात्याचे कनव्हेयन्स करण्यासंबंधीचे एक विधेयक होते. सन्माननीय सदस्य श्री मधुकर चव्हाण त्या बिलावर अत्यंत तळमळीने बोलत होते. गरीबांचा कैवारी कसा असतो, हे त्यांच्या बोलण्यातून आम्हाला जाणवत होते. मी देखील त्या विधेंयकावर ठाम उभा होतो. ....

नंतर श्री.सरफरे

अशुद्धित प्रत / मुद्रितशोधनाची नाही

श्री. दिवाकर रावते...

मी त्यावेळी सहकार मंत्री होतो. त्यामुळे काय भानगड होणार आहे हे मला जाणवत होते. त्यावेळी कधी नव्हे त्या सत्ताधारी पक्षामधील आमच्या दादांनी त्यावेळी अमेंडमेंट आणली. माननीय मुख्यमंत्र्यांची आहे हे मी समजलो. माझे एवढेच म्हणणे आहे की, मालमत्तेचे हस्तांतरण करावयाचे असेल तर तो अधिकार महसूल खात्याला आहे. स्टँप ऑफिसर,रजिस्ट्रेशन ऑफिसर यांना आजही त्याचे मूल्यांकन ठरविता येत नाही, सहकार खात्याला ठरविता येत नाही. त्यांचे अमेंडमेंट सहकार खात्याने करावयाची आहे. तरमग हे कसे करणार? त्या मालमत्तेची व्हॅल्यू तो ठरवू शकत नाही, त्याला तो अधिकार नाही. या मालमत्तेसाठी किती स्टँप डयुटी लागणार आहे? हे तो कसे ठरविणार? हा गुंता अजूनही सुटलेला नाही. लोक वाट बघत आहेत, गरीबांचा सत्यानाश झाला आहे, असे माजी सदस्य श्री. मधुकर चव्हाण हे थरथरुन बोलायचे. हे विधेयक संमत होऊन तीन वर्षे झाली. मी स्वत: त्याकरिता महसूल सचिवांना भेटलो, गृहनिर्माण सचिवांना भेटलो, सहकार सचिवांना भेटलो आणि त्यांना सांगितले की, तुम्ही याचे नियम करा. चौथ्या वेळेला त्यांना पुन्हा सांगितले की, आमच्या विधानमंडळाची उपविधान समिती आहे. कायद्यातील तरतुदीनुसार एकदा विधेयक मंजूर झाल्यानंतर तीन महिन्याच्या आत ते नियम उपविधान समितीपुढे गेले पाहिजेत. या गोष्टीला 3 वर्षे होऊन गेली तरी अजून ते नियम आले नाहीत. हा विषय हक्कभंगाचा नाही काय? माझ्या सारखा माणूस सचिवांवर हक्कभंग देऊ शकत नाही. याचे कारण यामध्ये प्रचंड गोंधळ आहे. तिन्ही विभागाचे सचिव एकत्र आले आणि त्यांनी सांगितले की, आम्ही एकत्र बसू. दोन वेळा ते एकत्र बसले. नंतर काय झाले मला माहीत नाही. मी गृहनिर्माण सचिवांना सांगितले की, तुम्ही पुढाकार घ्या, आता ते काम होत आले आहे. हा तीन वर्षापासून गोंधळ आहे हे मी ओरडून सांगत होतो. हा कायदा करण्यासाठी सकाळी 11 वाजता संपूर्ण सभागृह भरले होते. एका बाजूला हा कायदा बनविण्यासाठी 25 लाख रुपये खाल्ले असा आरोप करणारे माजी सदस्य माननीय श्री. मधुकर चव्हाण आणि हा कायदा होऊ नये यासाठी सुप्रिम कोर्टामध्ये सर्व दाखले देणारा दिवाकर रावते उभा होता. मला कुणी 25 रुपये दाखविले नाहीत तरमग यांना 25 लाख रुपये कुठून आणि कसे दिसले? हा विषय गंभीर होता, त्यावेळी मी याठिकाणी जे मांडले तसेच आताही घडले आहे. अजूनही तो काय अस्तित्वात आला नाही व भविष्यातही तो येणार नाही. त्यावेळचे सहकार मंत्री माननीय श्री. पतंगराव कदम म्हणाले की, दिवाकर हा कायदा झाला पाहिजे हा आमच्या खात्याचा कायदा आहे. हा विषय तुमच्या किंवा आमच्या खात्याचा नाही. ज्यांना तो अधिकार आहे त्यांनीच ते



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ SBT/ ST/ D/

श्री. दिवाकर रावते...

केले पाहिजे. आता निबंधकांपुढे हे प्रश्न निर्माण होणार आहेत. How he is going to valuate the property for stamp? ॲडज्युडिकेशन करणार, त्या अधिकाऱ्यांकडे पाठविणार, काय करणार?

जुन्या इमारतींचे,सोसायटयांचे ट्रान्सफर करणे हा आता सोपा विषय राहिलेला नाही. 1985 अगोदर 5 रुपये स्टॅम्पची व्हॅल्यू होती, 5 रुपयांचे ॲग्रिमेंट होत होते. त्यावेळी स्टॅम्प डयुटी नव्हती. 1985 नंतर स्टॅम्प डयुटी आली. त्या ॲग्रिमेंटवर तुम्ही स्टँप डयुटी कशी मागणार? मी गेली 30/40 वर्षे रहात आहे. आता माझ्या ब्लॉकचे व्हॅल्युएशन करणार, आणि मार्केट रेटने मी स्टँप डयुटी भरायची, अशाप्रकारचे गणित निर्माण झाले आहे. हा संपूर्ण कायदा गुंतागुंतीचा आहे. आम्ही आमच्या पध्दतीने त्यातील गुंते सोडविण्याचा प्रयत्न करुन ते व्यवस्थितपणे याठिकाणी मांडण्याचा प्रयत्न करतो. ते गुंते सोडविण्याचे काम सरकारचे आहे. या संपूर्ण प्रक्रियेमध्ये हा कायदा निर्माण झाला, महानगरपालिकेने तो मंजूर केला, त्याचे नियम झाले नाही, कायदा अस्तित्वात आला नाही. दि.1.4. पासून तुमचे आदेश निघाले, राजपत्र निघाले. आजसुध्दा नोटिसेस जुन्या पध्दतीने देणे चालूच आहेत. एखादे घर भाडयाने दिले असेल तर आजही तुमचे घर भाडयाने दिलेले असल्यामुळे रेटेबल व्हॅल्यूप्रमाणे तुमच्या घराची रेटेबल व्हॅल्यू वाढली आहे. अशाप्रकारची आठ दिवसापूर्वी आलेली नोटिस माझ्या हातामध्ये आहे. म्हणून मी त्यांना विचारले की, कायदा अस्तित्वात आला आहे असे म्हणता तरमग हे काय चालविले आहे? म्हणून मी एकदा बैठक घेतली.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

माननीय महापौर यांच्याकडे गेलो. तेथे अधिकाऱ्यांना बोलाविले. तुम्ही हा फॉर्म्यूला बनवा की आता लमसम एवढे घ्यावयाचे. तुमचा पाच-सात, आठ-दहा महिन्यासाठी काही रेव्हेन्यू जाईल. पण भविष्यामध्ये पक्का रेव्हेन्यू मिळेल. तुम्ही अशा प्रकारचे काहीतरी सूत्र बनविणार आहात की नाही ? मला असे सांगितले होते की, याबाबतीत आठ दिवसामध्ये सूत्र तयार करु. पण अजूनही सूत्र बनविलेले नाही. मी स्वत:ची नैतिक जबाबदारी म्हणून सांगतो की, तुम्ही कायदा आणल्यानंतर मला त्याची ग्रॅव्हीटी काय असेल ते दिसत आहे, जाणवत आहे. जे जुने लोक आहेत ते या विषयावर अधिकृतपणे सांगतात की, यामुळे पारदर्शकता येईल म्हणजे अगोदरचा कायदा बदमाषीचा होता. लोक पैसे खात होते म्हणजे आमच्या महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना सरळ सरळ ते भ्रष्टाचारी आहेत म्हणून जाहीर केलेले आहे. त्याचे मी खंडन करतो. यामध्ये जाहीर केलेले आहे ना. त्यामध्ये पारदर्शकता नव्हती, त्यामुळे लोकांना कळत नव्हते. आमचे अधिकारी काय करतात हे मला माहिती आहे आणि ते स्वत: अगदी धुतल्या तांदूळासारखे आहेत असेही मी म्हणणार नाही. पण जेव्हा समोरचा माणूस महानगरपालिकेच्या कराची चोरी करण्याचा प्रयत्न करतो, त्यावेळी जर अधिकारीही त्यामध्ये सामील होणार असतील तर ते देखील आपले हात ओले करुनच इतरांना चोरी करावयास देणार आहेत. पण यामुळे महानगरपालिकेचे उत्पन्न बुडते. इमान तर कोणाचेच राहिलेले नाही. नोकरीशी इमान राहिलेले नाही, पक्षाशी इमान राहिलेले नाही, समाजाशी इमान राहिलेले नाही आणि आता इमान हा विषयच राहिलेला नाही. तो एक गंभीर असा चर्चेचा विषय आहे. म्हणून या विधेयकाला मंजूरी देत असताना 500 स्वे.फूटाच्या संदर्भात, माननीय मंत्री श्री.भास्करराव जाधव, मी तुम्हाला करेक्ट करतो. मला त्यावेळेला आनंद व्यक्त करणाऱ्या सन्माननीय सदस्यांच्या बाबतीत काय बोलावे ते कळेना. त्यांनी लगेच प्रेस समोर जाऊन सांगितले की, अशा-अशा प्रकारचा कायदा येत आहे आणि 500 स्वे.चौ.फू.घर असलेल्या लोकांच्या करामध्ये वाढ होणार नाही, आहे तेच रहाणार आहे. तरी मी भांडत होतो, पण मला प्रशासना बरोबर भांडू देखील दिले नाही. मी त्यांना सांगत होतो की, हे असे नाही, हे असे नाही, जरा थांबा आणि अशा-अशा प्रकारची ॲमेंडमेंट पाहिजे वगैरे. पण सांगण्यात आले की, नाही,नाही. ते झालेले आहे, ते झालेले आहे. 500 चौ.फूटाबाबत लगेच अधिकारी कानामध्ये बोलले, लगेच माननीय मंत्री श्री.राजेश टोपेसाहेब बोलले की, ठीक आहे. आपण करुन टाकले. पण काय केले ? कायदा ....

. . . .3 वाय-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

अस्तित्वात आल्यापासून पाच वर्षाकरता 500 चौ.फूटाच्या सदनिका असलेल्यांना आहे तेवढाच कर राहील, पाच वर्षे. मी त्यांना विचारले की, अहो,तुम्ही काय केले आहे ते तुम्हाला कळले काय ? आज माझ्या सदनिकेची तुमच्या रेकनरप्रमाणे जी किंमत आहे, त्या कायद्यामध्ये नक्कीच असेच आहे की, पाच वर्षाकरताच सूट आहे. . . . .

श्री.भास्कर जाधव (खाली बसून) : तसे नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी तेच तर सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. पाच वर्षाची सूट दिली. पाच वर्षांनी जी किंमत असेल, त्याच्यावर 40 टक्के. पण आज माझ्या सदनिकेची आजच्या रेकनरप्रमाणे जर दहा लाख किंमत असेल तर ती पाच वर्षानंतर 12 ते 13 लाख रुपये होणार आहे. आपण समजून घ्या. मग त्यावर 40 टक्के लागणार आहेत. पाच वर्षे मजा वाटेल. पण 500 चौ.फू.सदनिकेसाठी कायम स्वरुपात सूट दिलेली नाही. नाहीतर पहिला कायदा तुम्हाला अमेंड करावा लागेल. मी तुम्हाला 100 टक्के सांगतो की, तुम्हाला पहिला कायदा अमेंड करावा लागेल. पाहिजे तर तुम्ही अधिकाऱ्यांना परत एकदा विचारुन घ्यावे, नाहीतर माननीय मंत्री महोदयांनी आज याबाबतीत येथे अधिकृत स्टेटमेंट करावे की, 500 चौ.फूटाच्या सदनिकेसाठी ही कायम स्वरुपी सूट राहील. मला त्याचा आनंद होईल. परंतु पहिल्या कायद्यामध्ये पाच वर्षाचीच तरतूद आहे आणि पाच वर्षानंतर ते अमेंड होईल. म्हणून मुंबई शहरामध्ये तर कायदा अस्तित्वात आला आहे. पण यामुळे ग्रामीण शहरात काय परिस्थिती निर्माण होईल हे मी माझ्या परीने सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. पण मी म्हणतो तसे नसेल तर माननीय मंत्री श्री.भास्करराव जाधव, मला खूप आनंद होईल. पण तसे असणे शक्य नाही. रेडीरेकनर हे फक्त मुंबईपुरतेच आहे. सोलापूरला रेडीरेकनर आहे काय ? नाही. तसेच संभाजीनगर, नांदेड, नागपूर येथेही रेडीरेकनर नाही. रेडीरेकनर हे फक्त मुंबईपुरतेच आहे. आता महाराष्ट्रात अशा प्रकारे रेडीरेकनर तयार करण्यासाठी हा कायदा वापरला जाईल. ठाण्याला असेल ना. सध्या सगळया महाराष्ट्रात हा कायदा नाही. तेव्हा आता रेडीरेकनर हवा तर सर्व महाराष्ट्रामध्ये रेडीरेकनर तयार करण्याचे काम महसूल खात्याकडून होईल. त्यातून स्टॅम्प ड्युटीबाबतचे सर्व प्रश्न निर्माण होतील. म्हणून या कायद्यामध्ये ग्रामीण भागाच्या संबंधात देखील थोडे-थोडे बारकावे आहेत. हा कायदा मुंबईपुरता मर्यादित रहाणार होता, पण आता ग्रामीण भागामध्ये हळूच पाय पसरलेले आहेत आणि या पध्दतीने

. . . .3 वाय-3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

भविष्यामध्ये लोकांवर प्रचंड करवाढीचा बोजा पडणार आहे. मी माननीय मंत्री महोदयांना आकडेवारीनिशी माहिती देण्यास तयार आहे. तुम्ही याबाबत डेमो दाखविला असला तरी, तसा डेमो माझ्याकडे देखील आहे. मी हे सिध्द करु शकेन. तुम्ही जर असा शब्द दिला की, मी याबाबतीत सिध्द केले तर हा कायदा मागे घेईन.

**(सभापतीस्थानी - माननीय उप सभापती)**

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

मी तुम्हाला सांगेन पण माननीय मंत्रिमहोदयांनी त्यामध्ये जाऊ नये. माझ्याकडे ते सगळे कोष्टक आहे. ठीक आहे आता हा कायदा महाराष्ट्रा करिता आणण्यात येत आहे त्याबाबतीतील परिस्थिती मी याठिकाणी मांडण्याचा प्रयत्न केला. मुंबईचा कायदा दिनांक 1-4-2010 पासून अस्तित्वात आला असेल तर मुंबई महानगरपालिकेने यापुढे देण्या-घेण्याच्या नोटिसा थांबवाव्यात आणि या कायद्याप्रमाणे कामाला लागावे, अशी मी विनंती करतो. लवकरात लवकर यासंबंधीचे नियम तयार होतील हे पहावे. तसेच हे सगळे नियम कोण करणार? तेही सांगावे. मुंबई सोडून सगळीकडे समाईक नियम असले पाहिजेत. ते नियम कोण करणार?कसे करणार तेही बघावे. अन्यथा तिकडच्या स्थायी समित्या तिकडच्या पध्दतीने करायला गेलात तर आणखी गोंधळ निर्माण होईल याची मला खात्री आहे. या विधेयकावर मला जे सांगावयाचे होते ते मी याठिकाणी सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. 500 चौ. फुटाबद्दल माझा गैरसमज असेल तर मला खूप आनंद आहे. पण 100 टक्के तो माझा गैरसमज नाही, एवढेच मी अत्यंत नम्रपणे निवेदन करतो. धन्यवाद.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी ( महाराष्ट्र विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन 2009 चे विधानसभा विधेयक क्रमांक 66. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949,नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम,1948,महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965, महाराष्ट्र, (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम,1975 आणि महाराष्ट्र (मोठया निवासी जागा असलेल्या) इमारींवरील कर (पुन्हा अधिनियमित केलेला) अधिनियम,1979 यांत आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक. या विधेयकाचे मी समर्थन करतो आणि राज्य शासनाचे देखील अभिनंदन करतो. एक चांगले असे विधेयक शासनाने सभागृहासमोर आणलेले आहे.

सभापती महोदय, ,बजेट आल्यानंतर ज्या पध्दतीने आपण फायनान्स ॲक्ट आणतो. फायनान्स ॲक्ट आल्यानंतर प्रत्येक कायद्यामध्ये सुधारणा करावी लागते. एका फायनान्स ॲक्टच्या माध्यमातून दहा-बारा ॲक्टमध्ये सुधारणा करण्यात येते त्याप्रमाणे या एका ॲक्टच्या माध्यमातून चार कायद्यांमध्ये सुधारणा करणार आहोत. यापूर्वी मुंबई महानगरपालिकेच्या संदर्भात निर्णय घेतला आणि दिनांक 1 एप्रिल, 2010 पासून हा कायदा त्याठिकाणी आंमलात आणला. मुंबई महानगरपालिका, नागपूर शहर महानगरपालिका आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका असे तीन कायदे एकत्र करता येतील काय यासंदर्भात विचार झाला पाहिजे. आज आठ-दहा वर्षापासून यावर चर्चा होत आहे. एक मॉडेल ॲक्ट आम्ही महाराष्ट्राला देऊ इच्छितो. वेगवेगळया शहरांसाठी वेगवेगळे कायदे असणार नाहीत, यादृष्टिकोनातून देखील विचार करावा, अशी मी माननीय मंत्रिमहोदयांना या चर्चेच्या माध्यमातून विनंती करतो.

श्री. दिवाकर रावते : आता सर्व शहरांसाठी एकच कायदा रहाणार आहे.

श्री. भास्कर जाधव : या कर प्रणाली करिता चारही कायदे मिळून आता एकच कायदा होणार आहे.

श्री. अरुण गुजराथी : वेगवेगळे कायदे, वेगवेगळया शहरांसाठी केले होते त्यासंदर्भात मी माझा विचार व्यक्त केला. सभापती महोदय, ज्याला एक रॅशनल टॅक्स सिस्टिम म्हणतो तशा एका रॅशनल टॅक्स सिस्टिमच्या माध्यमातून हे विधेयक आलेले आहे. आधी किती कायदे होते? याचा सन्माननीय सदस्य श्री. रावते यांनी परामर्श घेतला आहे. मध्यप्रांत व वऱ्हाड निवास व्यवस्था

...3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी....

भाडेपट्टा अधिनियम 1946. त्यानंतर 1949 ला देखील तो कायदा आला. मुंबई भाडे नियंत्रण अधिनियम 1947, हैद्राबाद घरे नियंत्रण अधिनियम,1954 हे संबंध एकत्र करण्याच्या दृष्टिकोनातून राज्य शासनाने महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम,1999 या राज्यात आणला आणि महाराष्ट्रात जे वेगवेगळे भाग होते त्याच्यासाठी एक कायदा केला. आधी ज्याला आपण रेटेबल व्हॅल्यू म्हणत होतो आता त्याला आपण मराठीमध्ये करयोग्य मूल्य असे म्हणतो त्याच्या जागी आता आपण भांडवली मूल्यावर आधारित कर घेणार आहोत. प्रत्यक्ष मिळणारे भाडे आणि केवळ वार्षिक भाडे यामध्ये फार अंतर होते.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी ....

ही करप्रणाली आपण चांगल्या भावनेतून आणलेली आहे. पंधरा वीस वर्षापूर्वी भांडवली आधारावर कर आणला पाहिजे या गोष्टीचा जन्म झाला. याची सुरुवात प्रथम हैद्राबाद शहरामध्ये झाली. त्याला त्या ठिकाणी मालमत्ता कर असे न म्हणता संपत्ती कर म्हणावयाचे. संपत्ती कर म्हणजे प्रॉपर्टी टॅक्स नाही तर वेल्थ टॅक्स म्हणावयाचे. त्याची सुरुवात आंध्र प्रदेशमध्ये झाली. त्याच्या अगोदर देखील जगात इतर देशांमध्ये मालमत्ता कराऐवजी भांडवरील मूल्यावर कर आकारणी सुरु झाली. सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा मांडला तो अत्यंत महत्वाचा आहे. मुंबई उपनगर आणि मुंबई शहर यांची मला कल्पना आहे. आपापल्या भागातील लोकांचे इंस्ट्रेस्ट कसे गार्ड करावयाचे यादृष्टीने त्यांनी प्रयत्न केला. मुंबईत स्टॅम्प ड्युटी रेडीरेकनर आहे. परवा टी.व्ही.वर एक बातमी पाहिली.. वरळीच्या एका इमारतीमध्ये एका फ्लॅटचा दर प्रती चौरस फुटाला 99 हजार रुपये होता आणि त्या फ्लॅटची किंमत 36 कोटी रुपये सांगितली. म्हणजे 36 कोटी रुपयांचा फ्लॅट आणि त्यावर 1 टक्का म्हटले तरी 36 लाख रुपये होतात. आज जो फरक आयलँड आणि उपनगरामध्ये आहे ते अंतर भांडवली मूल्याच्या बाबतीत कमी होईल. आतापर्यंत आपण नरीमन पॉईन्टवरच्या इमारती बघत होतो. आता लोअर परेल, परेल, भायखळा या भागामध्ये उत्तुंग इमारती उभ्या राहात आहेत आणि मुंबई शहर आणि उपनगरामधील अंतर भांडवली मूल्याच्या संदर्भात कमी होईल असे माझे मत आहे.

सभापती महोदय, हा कायदा नागपूर शहरासाठी तसेच महाराष्ट्रातील इतर ज्या महानगरपालिका आहेत त्यांच्यासाठी आणलेला आहे तसेच ज्या 'अ' वर्ग, 'ब' वर्ग, 'क' वर्ग नगरपालिका आहेत त्यांच्यासाठी सुध्दा हा कायदा आहे. आपण यामध्ये डिस्क्रीशन ठेवले आहे की, आपल्याला हवा असेल तर हा कायदा लागू करा. म्हणजे आपण विधेयक मांडताना विरोधी पक्षाची भूमिका सुध्दा चांगल्या पध्दतीने मांडली. म्हणजे शासनाला अजूनही यामध्ये विश्वास वाटत नाही म्हणून आपण ते सांगितले. आपले म्हणणे आपल्या दृष्टीकोनातून बरोबर आहे परंतु ज्या नगरपालिकेला असे वाटत असेल की, आम्हाला भांडवली मूल्यावर कर आकारणी करावयाची नाही तर त्यांना आधीच्या करयोग्य मूल्याच्या आधारावर कर लावू शकता अशी सवलत दिलेली आहे. या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी .....

करामध्ये अनेक करांचा समावेश आहे. यामध्ये केवळ मालमत्ता करच नाही तर मलनिस्सारण कर यामध्ये आहे. यामध्ये शिक्षण उपकर आहे. मी माननीय मंत्रिमहोदयांना असे विचारु इच्छितो की, यानंतर परत आपण इतर कर लावणार काय ? आपण वृक्षकर लावणार काय किंवा शिक्षण उपकर लाणार काय ? ते कर लावण्याची जर शासनाची धारणा असेल तर कोणत्या दृष्टीकोनातून आपण हा कायदा आणला ? मग या कायद्यामध्ये आपल्याला जे काही कर घ्यावयाचे असतील त्या सर्वांचा समावेश एकाच करामध्ये व्हावा अशी मागणी मी या निमित्ताने करतो.

सभापती महोदय, ज्या शहरांमध्ये आपण आतापर्यंत रेडी रेकनर तयार करु शकलो नाही त्या शहरांमध्ये आपण काय करणार ? त्या ठिकाणी आपण हा अधिकार आयुक्तांना दिलेला आहे. नगरपालिकांमध्ये मुख्याधिकाऱ्यांना अधिकार दिलेला आहे. त्या ठिकाणी रेटेबल व्हॅल्यूवर कर ठेवावयाचा असेल तर मुख्याधिकाऱ्यांनी फिरावयाचे आणि त्यांनी रेटेबल व्हॅल्यू निश्चित करावयाची आहे. काही ठिकाणी आयुक्तांना आपण अधिकार दिलेला आहे. आयुक्त हा अधिकार वापरत असताना त्यांनी स्टॅम्प ड्युटी रेडी रेकनरमधील व्हल्यू विचारात घ्यावयाची आहे. स्टॅम्प ड्युटी रेडी रेकनर नसेल तर त्या इमारतीची रचना कशी आहे, स्ट्रक्चर कसे आहे,

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी...

त्या इमारतीचे वय किती आहे ? वापराचे स्वरुप कसे आहे ? हे सर्व तयार करुन स्थायी समितीसमोर जाणार. रेडिरेकनरच्या संदर्भात कोणाला अपीलमध्ये जायचे असेल तर कोणासमोर जाणार ? आधी स्थायी समिती होती त्यानंतर आपण कोर्टात जात होतो. रेडिरेकनर नसेल तर आयुक्तांनी करावे, आयुक्तांनी स्थायी समितीच्या माध्यमातून पुढे आणावे. रेडिरेकनरमध्येच व्हॅल्यू जास्त असेल तर त्यासाठी अपील करण्याची व्यवस्था कायद्यात दिसत नाही, नियमामध्ये करीत असाल तर त्याची मला माहिती नाही. परंतु अपीलचा जो अधिकार आहे तो कायम ठेवून किती लवकर न्याय देऊ शकू याचा कायद्याच्या दृष्टीकोनातून उत्तम राहील. कारण कर वसूल करीत असताना जो करदाता आहे त्यांना काय पाहिजे त्याचा विचार केला पाहिजे. एका तरतुदीबाबत मी मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. पान क्रमांक 17 वर खंड 46 (एक) मध्ये असे नमूद केले आहे की, "निवासी प्रयोजनांसाठी वापरण्यात येणा-या इमारतींच्या किंवा जमिनींच्या बाबतीत अशा दिनांकाच्या लगतपूर्वीच्या वर्षामध्ये त्यांच्याबाबतीत बसवावयाच्या मालमत्ता कराच्या रकमेच्या दुप्पट रकमेपेक्षा अधिक असणार नाही." म्हणजे एक मर्यादा घालण्यात आली आहे. त्याचप्रमाणे खंड 46 (दोन) मध्ये अनिवासी प्रयोजनासाठी तिप्पटची व्यवस्था केली आहे. यापुढे जाऊन शासनाला कर घेता येणार नाही म्हणजे एक मर्यादा टाकलेली आहे. याच खंडाच्या (दोन) मध्ये पुढे असे नमूद केले आहे की, "परंतु आणखी असे की, कलम 119 च्या पोट-कलम (2) अन्वये सुधारित केलेल्या कोणत्याही इमारतींच्या किंवा जमिनींच्या भांडवली मूल्याच्या आधारे बसवलेला मालमत्ता कर हा, काहीही झाले तरी, अशा सुधारणा केलेल्या वर्षाच्या लगतपूर्वीच्या वर्षामध्ये देय असलेल्या मालमत्ता कराव्या चाळीस टक्के इतक्या रकमेहून अधिक असणार नाही." 5 वर्षामध्ये 40 टक्के असे मी समजतो. दरवर्षी 8 टक्के वाढ होईल. त्यापेक्षा जास्त असणार नाही, ही एक चांगली बाब आहे. या कायद्यामध्ये आणखी एक अधिकार आयुक्तांना दिलेला आहे. 5 वर्षानंतर याचा आढावा घेतला जाणार आहे. पृष्ठ क्रमांक 19 वर खंड 49 पोट-कलम (पाच) च्या (ग) मध्ये असे नमूद केले आहे की, "परंतु, आयुक्तास, कारणे लेखी नमूद करुन, उक्त पाच वर्षांच्या कालावधीत, कोणत्याही वेळ, कोणत्याही इमारतींचे किंवा जमिनींचे भांडवली मूल्य सुधारित करता येईल आणि तद्नुसार तो,

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ SBT/

श्री.अरुण गुजराथी....

कलम 134 अन्वये, अशा इमारतींच्या किंवा जमिनींच्या संबंधात, निर्धारण यादीत सुधारणा करील." एकदा कर निर्धारित झाल्यानंतर ही तरततूद का केली आहे ते समजत नाही. रेडिरेकनर सुध्दा कर घेणार आहे, जेथे रेडिरेकनर नाही तेथे निकष लावले जाणार आहेत. स्थायी समितीसमोर निकष जाणार आहे. हे झाल्यानंतरही हा अधिकार आयुक्तांकडे ठेवलेला आहे. हा अधिकार कायद्याच्या चौकटीत बसतो असे मला वाटत नाही. कारण प्रत्येक कर भरणारा माणूस आहे त्याला असे वाटेल की, आयुक्त माझी केस रिओपन करणार की काय ? हा अधिकार आयुक्तांना देण्याची गरज होती काय ? 5 वर्षानंतर आढावा होणार आहे. परंतु 5 वर्षापूर्वीच जर आयुक्तांना वाटले की, नाही, येथे कोठे तरी कर कमी झालेला आहे. तो अधिकार यासाठी ठेवलेला आहे. त्याची का गरज आहे त्याबाबत समाधान करुन द्यावे. भांडवली मालमत्ता कर आहे तो 0.1 ते 1 टक्का घेतला जाणार. हे इतके अंतर का ठेवले आहे ? म्हणजे 100 पट, म्हणजे एक पैसा घेऊ शकता आणि एक रुपयाही घेऊ शकता. आधी मालमत्ता कराच्या संदर्भात जे नियम तयार केले होते त्याची रेंज किती होती ? त्यावेळी कमी जास्त करण्याची 4-5 टक्क्यांची रेंज होती.

यानंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरुण गुजराथी...)

1 पैशापासून 1 रुपयापर्यन्त ही रेंज ठेवण्याचे काय कारण आहे हे देखील या सभागृहाला सांगितले तर या कायद्याचे जास्त चांगल्या पध्दतीने स्वागत होऊ शकेल.

हा कायदा आणत असताना समितीच्या 11 बैठका झाल्या. म्हणजे फूलप्रूफ एनॅक्टमेण्ट, लेजिस्लेशन अशा प्रकारचा कायदा झालेला आहे. सर्वसाधारणपणे कायदा झाल्यानंतर त्याला किमान तीन वर्षे तरी सुधारणा येता कामा नये. वर्षभरात सुधारणा आली याचा अर्थ कायदा करताना काळजी घेतली नाही. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी पहिली 5 वर्षे हा कर 500 चौ.फूटावर असणार नाही असे सांगितले. तुमची इच्छा असेल तर तो कर काढून घेतो असे मंत्री महोदय सांगतील. त्यांचा तसा उद्देश नव्हता. पण 5 वर्षानंतर मात्र परत ती वाढ होऊ शकते. या विधेयकावर सन्माननीय सदस्यांनी राजकीय भाषण केलेले नाही. 500 चौ.फूटामध्ये राहाणा-या माणसाला कराचा बोजा पडणार नाही यादृष्टीने शासनाने प्रयत्न करावा अशी माझी विनंती आहे. या विधेयकामध्ये असे म्हटलेले आहे की, भारतात व भारता बाहेर उपलब्ध असलेल्या विविध पध्दतींचा अभ्यास केल्यामुळे वार्षिक भाडे पद्धती ऐवजी भांडवली मूल्यावर आपण हा कर घेत आहोत. टाटा सामाजिक विज्ञान संस्था यांची मदत घेतलेली आहे. या संस्थेने काही निकष लावले आहेत. त्यांचे म्हणणे असे की, सूत्राधारित सुलभ निर्धारण शक्य आहे, स्वयं निर्धारण शक्य आहे, कर प्रशासनामध्ये, महसुलावर नियंत्रण ठेवता येईल अशी अधिकाधिक लवचिकता आणणे शक्य आहे, स्थानविशिष्टता शक्य तेथवर दूर करण्यात आली आहे, यामध्ये परदर्शकता आहे व ती आकलन होण्यास सोपी आहे आणि कर महसूल हा चलनवाढ व राहणी खर्च यांच्या बरोबरीने राहणे शक्य आहे. हे निकष लावून हा कायदा केलेला आहे.

प्रॉपर्टीच्या व्हॅल्यूज ह्या कधीही कमी होणा-या नाहीत, त्या वाढतच राहाणार. मग अ वर्ग नगरपालिका असो, ब वर्ग नगरपालिका असो अथवा क वर्ग नगरपालिका असो किंवा नव्याने स्थापन केलेली नगर पंचायत असो, त्यांना ही गॅरण्टी असेल की, मालमत्ता कराचे उत्पन्न कमी होणार नाही. ज्या प्रमाणात महागाई वाढेल त्या प्रमाणात कर वाढेल. जागतिक मंदी आली त्यावेळी मुंबईमध्ये मंदी नव्हती. फ्लॅटचे भाव कमी झाले नाहीत. आहे तेथेच स्थिर राहिले. आता पुन्हा मुंबई, पुणे, नाशिक या शहरामध्ये सदनिकांचे भाव वाढू लागले आहेत. हा कर महागाईशी लिंक अप करत असल्यामुळे चांगल्या पध्दतीने नगरपालिकांना आणि महानगरपालिकांना उत्पन्न मिळणार

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी....

आहे. महानगरपालिका आणि नगरपालिकांचे यामुळे उत्पन्न वाढणार आहे. त्यामुळे त्यांच्या सेवा देखील त्या प्रमाणात नागरिकांना देण्याची गरज निर्माण होईल. ही सेवा कशा पध्दतीने देणार ? कारण आज गरजा वाढत आहेत. आज शहरे, मग ते कोणतेही शहर असो अगर कोणत्याही पक्षाचा महापौर असो, शहरे आणि गावे देखील बकाल झालेली आहेत. रस्ते नाहीत, सुविधा नाहीत, गार्डन नाही, मोकळया जागा नाहीत. कायदा आल्यानंतर, उत्पन्न वाढल्यानंतर त्याचा लाभ नागरिकांना देण्याच्या दृष्टीने आपण प्रयत्न करावा. माझी सूचना अशी आहे की, आधी वर्षाचे बिल यायचे, आता सहा महिन्यांनी दोन वेळा बिल येईल. जर पहिल्या महिन्यामध्ये अमूक इतके रुपये भरले तर इतके रिबेट मिळेल, दुस-या महिन्यामध्ये भरले तर इतके रिबेट मिळेल अशी काही तरी रिबेट देण्याची तरतूद असावयास पाहिजे. आता 1 एप्रिलला कर डयू होतो तो 31 मार्चला भरला जातो.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : आता सहा महिन्याचे बिल आल्यानंतर ते शेवटच्या महिन्यात भरले तरी चालते. यापुढे ठराविक मुदतीत बिल भरले नाही तर त्यावर व्याज आकारले जाणार आहे.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, अगोदर सहा-सहा महिन्यांसाठी एकत्र असलेले 12 महिन्याचे बिल यायचे. 1 एप्रिल डयू डेट होती तरी 31 मार्चपर्यंत बिल भरले जायचे. एक वर्ष करदाता नगरपरिषदेची सेवा घ्यायचा आणि शेवटच्या दिवशी बिलाचे पैसे भरायचा. वर्षातून दोन वेळा सहा-सहा महिन्याचे बिल यायचे. या बिलाच्या संदर्भात रिबेट देता आला तर अवश्य विचार व्हावा. अगोदर एप्रिल महिन्यातील बिल 31 मार्चला भरले तरी चालत होते, सप्टेंबरला भरले तरी चालत होते. या माध्यमातून विलंब होऊ शकतो. त्यादृष्टीने नियम करताना विचार व्हावा. पुनश्च एकदा आपले अभिनंदन करतो. राज्य शासनाचे अभिनंदन करतो. या बिलाला समर्थन देतो. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी देखील विरोध केलेला नाही. चांगल्या पध्दतीचा कायदा आणलेला आहे. मुंबई महापालिकेमध्ये 1 एप्रिल पासून हे बिल लागू झालेले आहे. विधेयकाचा अंमल केल्यानंतर 31 मार्च, 2011 ला काय होते हे आपल्या सर्वांच्या लक्षात येईल. हे बिल चांगले आहे. पुनश्च या बिलाला समर्थन देतो आणि माझे भाषण संपवितो.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949; नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948; महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965; महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, 1975 व महाराष्ट्र (मोठ्या निवासी जागा असलेल्या) इमारतींवरील कर (पुन्हा अधिनियमित केलेला) अधिनियम, 1979 यात आणखी सुधारणा करण्याकरिता म्हणून सन 2009 चे वि.स.वि.क्रमांक-66 हे विधेयक याठिकाणी मांडल्यानंतर या विधेयकावर या सदनाचे ज्येष्ठ सदस्य आणि ज्यांना कायदा हा नेहमी सर्वसामान्य माणसांच्या हिताचा व्हावा आणि तो कायदा आणि त्यामधील प्रत्येक शब्दाचा, प्रत्येक कलमाचा अर्थ अतिशय सोप्या भाषेत उलगडून जे स्वत: अभ्यास करतात आणि प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी देखील त्यावर विचार करावा आणि सरकारने देखील आपण आणत असलेला कायदा आणि त्या कायद्यामध्ये कोणत्याही उणिवा नाही याचे देखील स्वत: सरकारने आत्मचिंतन करावे, आत्मपरिक्षण करावे अशा प्रकारचे उत्तम विवेचन करुन नेहमीच सभागृहात भाषण करतात ते सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी या संदर्भात आपल्या भाषणाला सुरुवात केली. काही मुद्दे त्यांनी याठिकाणी उपस्थित केले आहेत.

सन्माननीय सभापती महोदय, मला याठिकाणी सांगितले पाहिजे की, आतापर्यंत आपल्या राज्यात ही कर वसुली करण्याची पध्दत जी होती ती रेटेबल व्हॅल्यू म्हणजे भाडेपट्टा योग्य पध्दतीने कर वसुली करण्याची पध्दत होती. स्थानिक स्वराज्य संस्थांपैकी महापालिका असतील, नगरपरिषदा किंवा नगरपंचायती असतील त्यांची प्रमुख उत्पन्नाची जी दोन साधने आहेत, त्यातील एक साधन म्हणजे जकात कर आणि दुसरे साधन म्हणजे प्रॉपर्टी टॅक्स हे आहे. गेल्या अनेक वर्षांचा अभ्यास केला आणि अनुभव लक्षात घेतला तर साधारणपणे ज्या ज्यावेळी कर आकारणी व्हायची त्या त्यावेळेला त्या कर आकारणीबद्दल खूप मोठा संभ्रम करदात्यामध्ये आणि कर वसूल करणाऱ्या यंत्रणांमध्ये सातत्याने असायचा. दोघांमध्ये या कर आकारणीबद्दल अनेक वेळा संघर्षाचे वातावरण आणि भूमिका सातत्याने निर्माण झालेली आपण सर्वांनी पाहिली आहे. त्या संदर्भातील दावे, निवाडे, कोर्टकचेऱ्या गेली अनेक वर्षे सुरु आहेत, सुरु राहिल्या आहेत. परंतु या संदर्भात जी अधिक आणि पारदर्शकता असावयास पाहिजे ती पारदर्शकता नाही. या संदर्भातील प्रत्येक करदाता आहे त्याला नक्की यावर्षी मला किती कर द्यावा लागणार आहे, माझ्या प्रॉपर्टीबद्दल किती कर द्यावा लागणार आहे हे यापूर्वी सांगता येत नव्हते. माझ्या शेजारच्या माणसाला, त्याच

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव.....

प्रकारच्या प्रॉपर्टीबद्दल वेगळा कर आणि माझी मात्र त्याच भागामध्ये त्याच प्रकारची प्रॉपर्टी आहे त्यासाठी वेगळा कर द्यावा लागतो. अशा प्रकारची अनेक वादाची प्रकरणे यापूर्वी निर्माण झाली होती.

नंतर 4इ.1...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव .....

महोदय, हा कायदा आपण बारकाईने वाचला तर सर्व शंका, सर्व संभ्रम या कायद्यातून पूर्णपणे दूर झालेल्या आहेत असे दिसून येईल. आता असे होईल की, "मला यावर्षी किती कर बसेल" हे सर्वसामान्य माणूस, जो करदाता आहे त्याला स्वत:चं गणित स्वत:च मांडता येईल आणि मला किती कर द्यावा लागणार आहे, माझ्यावर अन्याय झाला की नाही हे स्वत:च सांगता येईल, अशा प्रकारचे सूत्र, अशा प्रकारचे तत्व, अशा प्रकारची तरतूद या संपूर्ण कायद्यामध्ये आहे. या कायद्यात अशा प्रकारे छोट्या छोट्या गोष्टींच्या बाबतीतील शंका पूर्णपणे दूर करुन हा कायदा आणण्यात आला आहे. यासंदर्भात सर्वंकष चर्चा किंवा त्या संदर्भात एक एक कलम किंवा एक एक शब्द उलगडून पाहण्यासाठी यापूर्वी दोन वर्षे हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे होते म्हणून याबाबतच्या शंका सन्माननीय सदस्यांनी यापूर्वीच त्या समितीसमोर सांगितलेल्या आहेत. यापूर्वी दोन-चार शंका अतिशय महत्वाच्या आणि सातत्याने मांडल्या गेल्या त्यावर मी येणारच आहे परंतु हा कायदा यापूर्वीच आपल्या देशात आंध्रप्रदेश, गुजरात, कर्नाटक आणि बिहार या राज्यांनी सुध्दा लागू केला आहे. यासंदर्भातील अधिसूचना आपल्या राज्यात यापूर्वीच निघाली असून त्याची अमलबजावणी मुंबई महानगरपालिकेत दि. 1 एप्रिल, 2010 पासून सुरु झालेली आहे. परंतु सन्माननीय सदस्यांनी काही विसंगती आहेत असे सांगितले व ही बाब लक्षात आणून दिली. परंतु कोणताही नवीन कायदा, कोणतेही नवीन धोरण अथवा कोणतेही नवीन नियम तयार केल्यानंतर त्यात काही दोष असतात, उणिवा असतात पण अशा उणिवा व अशा त्रुटी नजिकच्या काळात दूर केल्या जातात त्याप्रमाणे यातील उणिवा सुध्दा दूर होतील. यामध्ये सर्वात महत्वाचा विषय पाहिला तर सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी अतिशय महत्वाचा मुद्दा मांडला की मुंबई महानगरपालिका, पुणे महानगरपालिका, नागपूर महानगरपालिका आणि इतर नगरपालिका व नगर पंचायती यांच्यासाठी सध्या जे वेगवेगळे कायदे आहेत हे सर्व कायदे आमच्या राज्यात देखील एकसारखेच असावेत अशीही त्यांनी सूचना केली आहे. या सुचनेच्या बाबतीत देखील भविष्यात विचार करावा लागेल. परंतु आजच्या या कर प्रणालीमध्ये ॲक्चुअल व्हॅल्यू, कर बेसिस मात्र ज्या शहरात वेगवेगळ्या स्वरुपाचे कायदे आहेत ते मात्र एक झाले आणि त्याची सुरुवात या करप्रणालीपासून सुरु झाली. हे खरे असेल तर या कर प्रणालीमध्ये महानगरपालिका



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव .....

व नगरपालिका अधिनियमात सुधारणा करीत असताना खालील अधिनियमांमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. त्यात प्रामुख्याने The Maharashtra Housing and Area Development Act, The Maharashtra Education and Employment Guarantee Act, The Maharashtra (Urban Areas) Protection and Preservation of Trees Act and The Maharashtra Tax on Buildings (with larger residential premises) (re-enacted) Act and The Bombay Port Trust Act. या कायद्यांमध्ये सुध्दा काही अंशी सुधारणा करावी लागणार आहे. ही सुधारणा करीत असताना दोन-चार मुद्दे उपस्थित केले तेवढ्यापुरताच मी खुलासा करणार आहे की, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आपल्या भावना व्यक्त करीत असताना बोलताना ते थोडेसे भावूक झाले होते .....अडथळा.....

श्री. दिवाकर रावते : महोदय, या कायद्यामुळे कर प्रणालीचा कायदा एक होईल पण रेंट ॲक्टची जी पध्दती आहे ती तशीच चालू राहणार आहे. हा कायदा गेल्या एप्रिल महिन्यापासून लागू झाल्यानंतर या अनुषंगाने म्हाडा वगैरे जे कायदे आहेत ते मधल्या एक वर्षात तसेच आहेत, त्यांच्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक होते, पण तसा बदल करण्यात आला नाही. म्हणजे शासनाला फक्त कायदा अमलात आणण्याची घाई असते परंतु त्या अनुषंगाने इतर कायद्यांमध्ये आवश्यक ते बदल जे अपरिहार्य असतात ते मात्र अजूनही केलेले नाहीत....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : आदरणीय सभापती महोदय, आदरणीय रावते साहेब या बिलावर विचार मांडत असतांना अतिशय भावूक झाले होते. माननीय रावते साहेब यासाठी भावूक झाले होते की, ते त्यांच्या विचाराशी, त्यांच्या भूमिकेशी, त्यांच्या सगळया गोष्टीत ते समरस झालेले असतात हे मी येथे वेगळे सांगावयास नको कारण ते माझे एकेकाळचे नेते होते, आजही माझ्या मनात त्यांच्या बद्दल तोच आदर कायम आहे. परंतु त्यांनी मघाशी सांगितले की, सर्वसामान्य माणसांचे तुम्ही काय करणार आहात? या करातून तुम्ही सर्वसामान्य माणसांना उध्वस्त करणार आहात. मी असे बोललो होतो की, 500 चौरस फूटापर्यंत ज्यांची घरे आहेत त्यांच्या घरांचा टॅक्स वाढणार नाही असे मी बोललो होतो. मी आपल्याला पुन्हा एकदा सांगतो की, या बिलातील पृष्ठ क्रमांक 17 व कलम 30 मधील स्पष्टीकरण वाचले तर त्यामध्ये सुध्दा पूर्णपणे खुलासा करण्यात आलेला आहे. 500 चौरस फूटापर्यत ज्यांची घरे आहेत किंवा बांधकाम आहे त्या 500 चौरस फूटाच्या मालकाला एकही पैसा कर वाढणार नाही. हा अत्यंत महत्वपूर्ण निर्णय शासनाने घेतलेला आहे. 5 वर्षानंतर काय ? असा आपला सवाल होता. मी आपल्याला उदाहरण देतो की, मुंबईतील नरीमन पॉईंट मध्ये सर्वात महागडा दर आहे. येथे काही वर्षापूर्वी बांधलेल्या ज्या इमारती आहेत त्यांना भाडयाने आकारलेला जो कर होता तो मात्र 100 असेल 200 असेल किंवा 300 असेल तो तेवढाच आहे. कारण हा कर वाढविता येत नाही. जर या बांधकामात बदल केला, सुधारणा केल्या तर तो कर वाढतो किंवा भाडे वाढत असते. त्यातील 10 टक्के राखून सरसकट जो कर ठरेल तो लागत असतो. परंतु बांधकामामध्ये बदलच केला नाही तर वर्षानुवर्षे या इमारतीचे भाडेच वाढत नाही व करही वाढत नाही. या जुन्या इमारतीच्या बाजूला नवीन इमारत झाली तर मात्र त्या इमारतीला वेगळया प्रकारचा कर लागतो. त्यामुळे यामध्ये काही तरी समानता आणण्याची गरज असल्यामुळे 500 चौरस फूटापर्यंतच्या बांधकामाला आज असलेला जो टॅक्स आहे किंवा कर आहे त्यामध्ये यत्किंचितही वाढ होणार नाही आणि पाच वर्षाच्या नंतर त्या ठिकाणचा असलेला रेडी रेकनरचा दर विचारात न घेता 5 वर्षापूर्वी जे भाडे देत होतो त्याच्या 40 टक्के दर वाढेल व त्यापेक्षा दर वाढणार नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आता जो रेटेबल व्हॅल्यू प्रमाणे कर भरतो तो कर तोच राहणार आहे की, नवीन रेकनरप्रमाणे कर वाढणार आहे यासंदर्भातील माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी देण्याची आवश्यकता आहे.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, आपण आता जो कर भरतो तो रेटेबल व्हॅल्यू प्रमाणे भरतो. मी आपल्याला यासंदर्भात एक उदाहरण देतो. आपण जर 1000 रुपये कर भरत असाल तर पाच वर्षानंतर त्यामध्ये 40 टक्के वाढ होईल म्हणजे तो 1400 रुपये होईल. ती वाढ रेडीरेकनरच्या दराप्रमाणे होणार नाही. हा दर 1400 रुपये होईल असेही नाही कारण आता कॅपीटल व्हॅल्यू 0.1 टक्के ते 1 टक्क्यापर्यंत वाढविण्याचे अधिकार स्थायी समितीला आहेत. परंतु 0.1 टक्क्यापेक्षा त्यांना खाली येता येणार नाही किंवा 1 टक्क्यापेक्षा पुढेही जाता येणार नाही, वाढविता येणार नाही. शेवटी ती स्थानिक स्वराज्य संस्था त्यांनाच चालवावयाची आहे. आपल्या संस्थेअंतर्गत आपल्याला मिळणारा कर वाढवून लोकांच्या ज्या सोयी सुविधा आहेत त्या वाढवावयाच्या की, न वाढवावयाच्या हा निर्णय त्यांनी घ्यावयाचा आहे. त्यामुळे हा निर्णय स्थायी समितीच्या हातामध्ये ठेवलेला आहे. मात्र या स्थायी समितीला 0.1 टक्क्यापेक्षा खाली येता येणार नाही किंवा 1 टक्क्यापेक्षा पुढेही जाता येणार नाही, वाढविता येणार नाही अशा प्रकारचे बंधन बिलामध्ये घालण्यात आलेले आहे.

या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी दुसरा जो मुद्दा मांडला त्याचा मी खुलासा केलेलाच आहे. आपण तिसरा मुद्दा 1940,1950 च्या पूर्वीच्या इमारतींच्या संदर्भात मांडला आहे. मी यासंदर्भात सांगू इच्छितो की, स्लॅब ठरविण्याचा अधिकार स्थायी समितीला दिलेला आहे. कर ठरविण्याचे सूत्र सुध्दा स्थायी समितीला सांगण्यात आलेले आहे.

यानंतर श्री.भारवि.....

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव....

त्यांना पूर्णपणे मुभा देण्यात आलेली आहे व सूत्र कसे ठरावयाचे हे देखील सांगण्यात आले आहे. त्यांना मालमत्तेचे चटई क्षेत्र X मुद्रांक शुल्क X बांधकाम घटकाशी जोडण्यात आलेले भारांक X उपयोग घटकाकरिता जोडण्यात आलेले भारांक X वयोमानानुसार ठरविण्यात आलेल्या घटकांशी जोडण्यात आलेले भारांक = कराचा दर. मी मघाशी म्हणाल्याप्रमाणे हे सूत्र सर्वांना समान लागणार आहे. आपण मघाशी म्हणालात तसे होणार नाही. हे सगळे आयुक्तांच्या हातामध्ये जाणार आहे काय, हे सगळे आयुक्त ठरविणार आहेत काय ? आयुक्तांना आता वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारचा निर्णय घेता येणार नाही. हे सूत्र ठरविल्यानंतर माझ्यावर अन्याय झाला, मला न्याय मिळाला हे ठरविण्याचा पूर्णपणे अधिकार करदात्याला आहे, म्हणून ही सुधारणा निश्चितपणे केली आहे.

सन्माननीय सदस्य श्री.अरूण गुजराथी साहेबांनी असे विचारले की, बाकीचे कर आहेत ते राहणार की जाणार. यामध्ये विविध प्रकारचे 9 प्रचलित कर होते. त्याऐवजी राज्य शिक्षण उप कर व रोजगार हमी उपकर शासन करासहित आता एकच एकत्रित कर आकारला जाईल. हे करदात्यांना साहजिकच सोयी-सुविधेचे होणार आहे. त्यामुळे यासंबंधी देखील स्पष्टपणे खुलासा येथे करण्यात आलेला आहे.

सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचा प्रत्येक वर्षाला 40 टक्के कर यासंबंधीचा मुद्दा होता. प्रत्येक वर्षाला 40 टक्के वाढला म्हणजे साधारणपण 8 टक्के कर वाढला. 1000 ऐवजी 1080 झाला. दुसऱ्या वर्षाला 1060 होईल. मी येथे उदाहरण देत आहे. यापेक्षा ते फार काही वाढणार नाही. 1 एप्रिल 2010 रोजी नोटीस निघाली. मात्र नोटीसा जुन्याच पद्धतीने निघतील असे देखील सांगितले. यासंबंधी मी माझा खुलासा केलेला आहे.

रेडिरेकनरसंबंधी सन्माननीय सदस्य श्री.अरूण गुजराथी यांनी मुद्दा उपस्थित केला होता. त्यासंबंधी देखील मी खुलासा केलेला आहे. पाच वर्षानंतर यासंबंधी पूर्वी लावलेल्या कराचे रिव्हीजन आयुक्त पुन्हा करणार की काय अशा प्रकारची भीती त्यांनी व्यक्त केली. एकदा ठरल्यानंतर पुन्हा रिव्हीजन करण्याचा अधिकार त्यांना देण्याचे कारण असणार नाही. कारण शेवटी तो कर ठरविण्याचे काम जेथे रेडिरेकनर नाही तेथे आहे. ठरवून दिलेल्या दराप्रमाणे कर भरला नाही तर ते आयुक्त बघू शकतात. त्यांना तशा प्रकारचा अधिकार असण्याचे कारण नाही. अशा प्रकारचे चुकीचे अधिकार आयुक्तांना देऊन पुढच्या काळामध्ये त्रास होणार



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव.....

नाही या संदर्भातील काळजी निश्चितपणे घेता येईल. रेडिरेकनर जाहीर नाही तेथे आयुक्तांना अधिकार का दिले अशा प्रकारचा प्रश्न विचारला आहे. आजही आपण रेटेबल व्हॅल्यूनुसार कर आकारणी करतो. त्याबाबत देखील त्यांना पूर्वीपासून अधिकार देण्यात आलेले आहेत. हा सगळा विषय शेवटी स्थायी समितीसमोर जाणार आहे. म्हणून यासंबंधातील निर्णय सुद्धा स्थायी समितीने घ्यायचा अशा प्रकारचा विषय मांडला आहे. आपण दुसरा विषय मांडला की, सहा महिन्यांनी बिल देणार आहात. त्याऐवजी एक-एक महिन्यांनी बिल दिले तर त्यांना आपण रिबेट देणार काय ? मला असे वाटते की, अशा पद्धतीने लवचितकता ठेवणे अडचणीचे होईल. ते एवढयाकरिता आता आपण या सगळ्या विषयामध्ये पारदर्शकता आणत आहोत. न पेक्षा या बिलावरच्या तारखा बदलायच्या आणि कर वसुली करणारे अधिकारी असतील त्यांच्या हातामध्ये नवीन आणखी मागे पुढे करण्याचे अधिकार देण्यापेक्षा एकदा कोठे तरी बंधन आणि शिस्त असावी असे माझे मत आहे. म्हणून त्यांना एक महिना कर वसुलीसाठी पुरेपूर संधी द्यावी असे मला वाटत नाही. याबाबत अनेक मुद्दे चर्चिले गेले नाहीत ते सुद्धा येऊ शकतात. हे करीत असताना कोणावरही जबरदस्ती नाही. हा कायदा आपण एवढ्याकरिता करतो की, नगरपालिका, नगरपंचायती ह्या छोट्या-छोट्या असतात. त्यावर निवडून जाणाऱ्या नगरसेवकांना कळते की, आपला आस्थापनेवरचा खर्च खूप आहे. त्यामुळे आपल्याला विकासाकरिता पैसे नाहीत. राज्याच्या अनुदानावर किती काळ अवलंबून रहायचे, स्वात:चे निर्णय स्वत: घेता येत नाही, स्वत:च्या भागाचा विकास करता येत नाही. विकास करावयाचा म्हटले तर पैसे नसतात.

यानंतर श्री.गायकवाड...

अशुद्धारित प्रत / अशुद्धीपत्रक नाही

श्री.भास्कर जाधव ...

पैसे मिळवावयाचे असतील तर जकात किंवा प्रॉपर्टी टॅक्स हे पर्याय शिल्लक राहतात. प्रॉपर्टी टॅक्स वाढविण्याचा सबंधित नगरसेवकांनी प्रयत्न केला तर व तसा निर्णय घेतला तर शहरातील लोक नाराज होतात. त्यामुळे तेथील नगरसेवकांना अशी भिती वाटते की, दरवर्षी निवडणुका असल्यामुळे प्रॉपर्टी टॅक्स वाढविण्याचा वाईटपणा कोणी घ्यावयाचा ? म्हणून कर आकारणी वाढवली जात नाही. अपेक्षित असलेले उत्पन्न सुध्दा स्थानिक संस्थांना मिळत नाही. त्यामुळे वाईटपणा घेण्याचे ओझे शासनाने आपल्या खांद्यावर घेतले आहे. आता शासनाकडे बोट दाखवून त्यांना कर आकारणी वाढवून देण्याचा अधिकार कायद्याने मिळवून देण्याचे काम शासनाने केलेले आहे त्याचा उपयोग करावयाचा किंवा नाही हे स्थानिक संस्थेने ठरवावयाचे आहे. म्हणून कर आकारणी करण्याचे त्यांच्यावर बंधनकारक न करता ऐच्छिक ठेवलेले आहे. निर्णय घ्यावयाचा किंवा नाही हे त्यांनीच ठरवावयाचे आहे. या विधेयकामध्ये अनेक तरतुदींचा अंतर्भाव करण्यात आलेला आह. विशेष करुन मुंबईतील चाळीत साधारणपणे 500 स्क्वेअर फूट जागेमध्ये राहणारी अनेक सर्वसामान्य माणसे आहेत. सन्माननीय सदस्य श्री रावते यांनी सांगितल्याप्रमाणे ग्रामीण भागातसुध्दा 500 स्क्वेअर फूट जागेत राहणारी माणसे आहेत. त्यांचा देखील विचार या विधेयकात करण्यात आलेला आहे सन्माननीय सदस्यांच्या वेदना मी जरुर समजू शकतो.. अडथळा .. या ठिकाणी जे विधेयक आणलेले आहे, त्याला सर्व सन्माननीय सादस्यांनी पाठिंबा द्यावा आणि एकमताने मंजूर करावे, अशी विनती करुन मी माझे भाषण संपवितो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या विधेयकातील पान नंबर 17 वरील तरतुदी मी वाचल्या आहेत . माननीय मंत्री महोदयांना मी एवढेच सांगू इच्छितो की, आपण जे निवेदन केलेले आहे ते रेकॉर्डवर आलेले असल्यामुळे मला आनंद झाला आहे. फक्त त्या संदर्भातील सुधारणा पुढच्या अधिवेशनात आणली जावी.

श्री.भास्कर जाधव (बसून) : मी जरुर प्रयत्न करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

खंड 2 ते 116 ( दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधान सभेने संमत केल्याप्रमाणे, सन 2009 चे वि.स.वि.क्रमांक 66-मुंबई प्रांतिक महानगरपालिका, नागपूर शहर महानगरपालिका, महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औद्योगिक नगरी, महाराष्ट्र ( नागरी क्षेत्रे ) झाडांचे संरक्षण व जतन आणि महाराष्ट्र ( मोठया निवासी जागा असालेल्या ) इमारतीवरील कर ( पुन्हा अधिनियमित केलेला ) (सुधारणा ) विधेयक संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : सन 2009 चे वि.स.वि.क्रमांक 66 संमत झाले आहे.

यानंतर अर्धा तास चर्चा घेण्यात येतील. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी अर्धा तास चर्चा मांडावी.

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. रमेश शेंडगे)**

पृ.शी.: मराठी भाषेचा विकास व मराठीविषयी सरकारचे धोरण राबविण्याबाबत

मु.शी.: मराठी भाषेचा विकास व मराठीविषयी सरकारचे धोरण राबविण्याबाबत या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 1330 ला दिनांक 9 डिसेंबर, 2009 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, "मराठी भाषेचा विकास व मराठीविषयी सरकारचे धोरण राबविण्याबाबत" या विषयावरील तारंकित प्रश्न क्रमांक 1330 ला दिनांक 9 डिसेंबर, 2009 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, डिसेंबरच्या अधिवेशनामध्ये मराठी भाषेचा विकास आणि त्याबाबत सरकारचे असलेले धोरण यावर प्रश्न विचारला होता. त्याबाबत मराठी अभ्यास केंद्राने 27 ऑक्टोबर 2009 रोजी जो निष्कर्ष मांडला होता, त्यावर मिळालेले उत्तर वाचून मला खूप धक्का बसला, मी संतप्त झाले. यामध्ये मराठी भाषा संचालकाचे पद रिक्त आहे अशी माहिती राज्य सरकारकडून आम्हाला मिळाली. आज याठिकाणी ही चर्चा गुंडाळून मी घरी जाण्याची घाई केलीतर मला इतिहास माफ करणार नाही. संबंधित मंत्रिमहोदया सभागृहामध्ये उत्तर देण्याकरिता थांबल्या आहेत त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे. मराठी भाषिक कार्यकर्ते,मराठी भाषिक आमदार यांच्यावर सरकार कां सूड उगवते हे मला समजत नाही? मला कुणाचाही वैयक्तिक उपमर्द अजिबात करावयाचा नाही. ज्या व्यक्तिंना मराठी भाषेविषयी असलेल्या प्रश्नांची त्यांना स्वत:ला किती माहिती आहे याबद्दल माझ्या मनामध्ये नेहमी शंका असते, त्यावेळी आम्हाला तेच प्रश्न पुन्हा पुन्हा मांडावे लागत असतात. माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी मांडलेल्या या लक्षवेधी सूचनेवरील निवेदन मी वाचले आहे. मला वाईट वाटते की, मराठी भाषेबाबत हे लोक जास्त गंभीर नाहीत हा त्यांचा दोष नाही. याठिकाणी लोकप्रतिनिधी निवडत असतांना मराठी भाषेचा इतिहास, भूगोल, परंपरा व त्यातील गुंतागुंत माहीत असणारे उत्तर देणारे याठिकाणी असते तर समाधान वाटले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

असते. परंतु अशी व्यक्ती नाही म्हणून आम्ही प्रश्नच विचारायचे नाही असे म्हणणे म्हणजे इतिहासामध्ये आमची नावे "करंटे" म्हणून लिहिली जातील. म्हणून मी याठिकाणी आग्रहाने ही चर्चा उपस्थित करीत आहे हे मला याठिकाणी मुद्दाम सांगावेसे वाटते.

विविध मराठी विषयांमध्ये, मराठी विज्ञान व मराठी अभ्यास केंद्राबाबत मला पहिला प्रश्न विचारावयाचा आहे की, भाषा संचालकाचे रिक्त पद आहे तेवढे पुरेसे नाही. ज्या सामान्य प्रशासन विभागाकडून भाषा संचालनालयाचे कामकाज पाहिले जाते, त्याच्या सचिव श्रीमती लीना मेहेंदळे आहेत. मुंबई विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागाचे प्रमुख श्री. संजय रानडे यांनी दिनांक 20 एप्रिल 2009 रोजी पत्र क्र. सीएनजे/395/9 या नुसार 7 परिभाषा कोषांच्या 500 प्रतींची मागणी भाषा संचालनालयाकडे केली होती. आणि त्यांनी संचालनालयाला असे कळविले की, या 500 प्रती तुम्हाला छापता येत नसतील तर "युनिकोड" पध्दतीने सर्व ठिकाणी मराठी भाषेची लिपी सारखी वापरुन संकेत स्थळावरुन ते उपलब्ध करता येईल. मला आपल्याला विचारावयाचे आहे की, भाषा संचालनालयातील पदे रिक्त असली तरी कामे सुध्दा ठप्प आहेत. त्यामुळे मुंबई विद्यापीठाला भाषा संचालनालयामार्फत काहीच उत्तर दिले नाही आणि त्यावर काहीही कार्यवाही झाली नाही. दुसरे असे की, अनेक पुस्तकांचे पुन्हा मुद्रण करणे आवश्यक आहे. मराठी आणि इतर भाषांबद्दल वेगळया प्रकारे बोलले जाते. उदा. इंग्लीशला हिंग्लीश अशाप्रकारे अनेक ठिकाणी बोलले जाते. त्याप्रमाणे मराठीला हिन्हाटी, इंग्लाटी, तन्हाटी अशा वेगवेगळया पध्दतीच्या मराठी भाषा सर्वत्र लोकप्रिय होत चालल्या आहेत. माझ्याकडे या बाबत एक संदर्भ आहे. त्यानुसार भाषा संचालनालय यामध्ये नीटपणे काम करीत नसल्यामुळे खासकरुन शाळेच्या पुस्तकातील मराठी कशाप्रकारचे असावे? यासाठी त्यांनी एक कोष द्यावयास हवा होता. तो दिलेला नसल्यामुळे इंग्रजी माध्यमांच्या शाळेमध्ये "सुलभ भारती" पुस्तकामध्ये "विलक्षण पैज" म्हणून एक कथा आहे.

(यांनंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यामध्ये कायम हा शब्द वापरला आहे की, मी तुमच्या त्या लालजीकडून "खाली हात" परत फिरणार. तसेच मला जर "खाली हात" परत यावे लागले तर वगैरे,मी आपल्याला सांगू इच्छिते की, मराठीमधील "खाली" या शब्दाचा अर्थ आणि हिंदी मधील "खाली" या शब्दाचा अर्थ वेगळा आहे. पण अशा चुका वारंवार होत आहेत आणि याला कारण असे की, आपण एक कोष तयार करावयास हवा होता आणि बालभारती, विद्यापीठ आणि आपली ग्रंथ मंडळे, विश्वकोष निर्मिती मंडळ, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ आणि प्रसार माध्यमे यांनी कोणती मराठी भाषा वापरणे योग्य आहे याचे भाषा संचालनालया कडून मार्गदर्शन व्हावयास हवे होते. पण ते न झाल्यामुळे आज मराठी भाषा ही पाहिजे त्या शब्दांमध्ये वापरा आणि मग अशा वेळी अर्थाचा अनर्थ झाला तरी चालेल अशी लोकांची वृत्ती झाली आहे. आपण कुठेही जात असताना रस्त्यावरील दुकानांच्या पाट्या पहाव्यात. अनेक वेळा मराठीचे इंग्रजीमध्ये किंवा इंग्रजीचे मराठीमध्ये भाषांतर होत असताना, आज आपल्याला असे चित्र दिसते की, भाषा संचालनालयाचे साधे संकेत स्थळ सुध्दा नाही. या संदर्भात मराठी अभ्यास केंद्रांनी, मान्यवर अनेक पत्रकार आणि कार्यकर्ते,ज्याच्या मध्ये श्री.प्रसाद मोकाशी, मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष, ई-टीव्ही मराठीचे श्री.राजेंद्र साठ्ये, सकाळ फ्युचर्स्चे श्री. हेमंत जुवेकर, स्टार-माझा चे श्री.राजीव खांडेकर तसेच शेफाली साधू, तसेच डीएनए च्या श्रीमती नीला कोल्हटकर इ. या सगळयांबरोबर बैठक घेऊन त्यामध्ये 11 मागण्या केल्या आहेत आणि ते स्वत: ऑन रेकॉर्ड सांगत आहेत की, आम्हाला माहितीच्या अधिकारामध्ये सांगण्यात आले की, मराठीचे संकेत स्थळ आहे. मला असा प्रश्न विचारावयाचा आहे की, ही सगळी पुस्तके,ही माहिती तुम्ही अजूनही संकेतस्थळावर टाकलेली आहे की नाही ? मराठी संकेतस्थळावर जर अगोदरची पुस्तके टाकावयाची असतील तर सध्या आमच्याकडे पुरेसे कर्मचारी नाहीत. म्हणून संकेतस्थळ उपलब्ध नाही अशा प्रकारची उत्तरे देण्याची माननीय मंत्री महोदयांना गरज भासणार नाही. परंतु दि.5 ऑक्टोबर 2009 रोजी माहितीच्या अधिकारामध्ये जे उत्तर पाठविलेले आहे, त्यामध्ये तुम्ही सांगितले की, आमचे अधिकृत असे संकेतस्थळ आहे. परंतु प्रत्यक्षात मात्र अजूनही या भाषा संचालनालयाचे संकेतस्थळ नाही ही अतिशय गंभीर बाब आहे. याखेरीज आमच्याकडे मराठी अभ्यास केंद्राच्या मार्फत माहिती आलेली आहे, त्यानुसार भाषा संचालनालयामध्ये जे उप सचिव पदावर असतात, त्यांना लाल दिव्याची गाडी मिळते.म्हणून कायम-

. . . .4 जे-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्वरुपी कोणी याची जबाबदारी घेण्यापेक्षा प्रत्येकाला सहा-सहा महिने लाल दिव्याची गाडी मिळावी म्हणून उप सचिव आळीपाळीने ही जबाबदारी वाटून घेतात. त्यामुळे याठिकाणी कामाच्या जबाबदारीला महत्व असण्यापेक्षा लाल दिव्याच्या गाडीचे सहा महिन्याचे वेळापत्रक पाळणे हा यातील हेतू आहे.

सभापती महोदय, खरा मुलभूत प्रश्न असा आहे की, भाषा संचालनालयाची जबाबदारी सामान्य प्रशासन विभागावर का आहे ? शासनाने खरेतर यासाठी स्वतंत्र विभाग करावयास हवा होता आणि सामान्य प्रशासन विभागाच्या मंत्री महोदयांचेही तसेच आहे. जर एखाद्या माननीय राज्यमंत्र्यांकडे जर सहा विभाग असतील किंवा आठ विभाग असतील तर मग विभागाचे सचिव जे काही लिहून देतात, त्यानुसार बोलले जाते. यामध्ये स्वत:अभ्यास करणे किंवा त्याची मांडणी करणे किंवा त्याबाबत माहिती घेणे यासाठी अधिकाऱ्यांना वेळ नाही आणि माननीय मंत्री महोदयांनाही वेळ नाही. याहीपुढे जाऊन मला असे सांगावेसे वाटते की, 3 कोटी 95 लाख रुपयांपैकी 3 कोटी रुपये वेतनावर खर्च होतात. मग असा प्रश्न निर्माण होतो की, या निधीचा आपण साहित्यासाठी किती उपयोग करतो ? मराठी भाषा लोकप्रिय होण्यासाठी कोणत्या पध्दतीने प्रचार केला जात आहे ? आज मराठी भाषेची दुरवस्था झालेली आहे. मला अतिशय वाईट वाटते की, अजूनही आपल्याला पद भरण्यासाठी माणसे मिळत नाही अशी उत्तरे देत आहोत. पण खरे म्हटले तर बाहेरचा एखादा साहित्यिक, ज्यांना या विषयाबद्दल आस्था आहे. ज्याप्रमाणे श्रीमती सरोजिनी वैद्य यांनी मराठी भाषेसाठी काम केले आहे अशी अनेक माणसे मदतीला येत असताना मला अशी मागणी करावयाची आहे की, तुम्ही तुमच्या कामकाजामध्ये बरोबरीचे सहकार्य, मराठी अभ्यास केंद्र आणि इतर जे अनेक साहित्यिक आहेत, त्यांची मदत घेतली पाहिजे. आज तुम्ही सल्लागार मंडळाला सल्लागार समिती असे म्हणत आहात. खरे म्हणजे मंडळ हे कायम स्वरुपी देखरेखीसाठी असते आणि समितीला तसा कोणताही अधिकार नसतो. अशा वेळेला सल्लागार मंडळाला समिती असे नाव देण्याचे अधिकार तुम्हाला कोणी दिले.? कै.यशवंतराव चव्हाण यांनी सल्लागार मंडळाच्या संकल्पनेतून भाषा संचालनालय नेमले आहे.पण सध्या अशी स्थिती आहे की, कोणाचाच सल्ला घ्यावयाचा नाही. सल्ला दिला जर तो धाब्यावर बसवावयाचा आणि सहा-सहा महिने गाड्या इकडून-तिकडे फिरवावयाच्या आणि दुसरीकडे लोक रस्त्यावर आंदोलने करीत आहेत, लोकांचे

. . . .4 जे-3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

रक्त सांडत आहे. त्यांना नाराज केले जात आहे आणि हे सगळे होत असताना परत मराठी भाषेची अवहेलना होत आहे आणि आम्हाला तीच छापील उत्तरे दिली जात आहेत, म्हणजे खरोखर या विधीमंडळामध्ये कोणीतरी आत्मदहन केल्यानंतर आमच्या मंत्रालयाला जाग येणार आहे काय ? किंवा दुसरा मार्ग असा आहे की, जो अधिकारी वर्ग आहे, त्यांना सक्षम करावयाचे असेल तर तुम्ही बाहेरुन मदत घ्यावी, नाहीतर सरळ सांगावे की, आमची दानत नाही. आमची इच्छा नाही आणि आम्हाला मराठीच्या ऐवजी हिंग्लीशसारखे हिऱ्हाटी किंवा तऱ्हाठी अशा कुठल्या तरी वेगळ्याच भाषा येथे लोकप्रिय करावयाच्या आहेत काय ? आपण यासंबंधात स्पष्टीकरण द्यावे हे मला सांगावेसे वाटते.

(माननीय मंत्री श्री.भास्कर जाधव व माननीय राज्य मंत्री श्री.प्रकाश सोळंके आपसात बोलतात.)

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशा पध्दतीने माननीय मंत्रिमहोदयांनी यासंदर्भात स्पष्टीकरण द्यावे. सभापती महोदय, गेल्यावेळेला या सभागृहात चर्चा झाली की, माननीय मंत्रिमहोदय, खाली बसून बोलतात. ज्यांचा या विषयाशी संबंध आहे, ज्यांची जबाबदारी आहे त्यांनी बोलावे अन्यथा त्यांनी परत परत बोलून केवळ राजकीय भूमिका यामध्ये आणू नये. सभापती महोदय, संयुक्त महाराष्ट्राला 50 वर्षे पूर्ण होत असताना आम्हाला याबाबतीत संतप्त होऊन बालायला लागणे हे शासनाला शोभा देणारे नाही, याची खंत बाळगण्याऐवजी आम्हाला कुठे तरी परत परत थांबवण्याचा आणि अडथळा आणण्याचा प्रयत्न करणे हे त्या व्यक्तीचा करंटेपणा दाखवते हे मला याठिकाणी मुद्दाम नमूद करायचे आहे.

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, आपण आपसात बोलत नाही काय? यामध्ये काय करंटेपणा आहे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, आम्ही आपसात बोलायचे नाही काय? सभापती महोदय, परवाच्या दिवशी मी सहज उभे राहून बोललो तर माझ्या ताई खूप हळव्या झाल्या. आणि आपण सगळयांनी बघितले की, त्या मिडियासमोर गेल्या. पत्रक काढले. मला माननीय सभापतींसमोर दिलगिरी व्यक्त करावी लागली आणि आता सन्माननीय सदस्या याठिकाणी उभे राहून काय बोलत आहेत? सभापती महोदय, कसला करंटेपणा आहे? सन्माननीय सदस्या नेमके कोणाबद्दल बोलत आहेत? सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती की, सन्माननीय सदस्यांना अशा पध्दतीने वारंवार बोलण्याचा अधिकार दिलेला नाही. आपण त्यांना समज द्यावी. आम्ही एकमेकांना विचारवयाचे नाही काय? आम्ही दोघांनी एकमेकांना बोलायचे नाही काय?

**तालिका सभापती** (श्री. रमेश शेंडगे) : रेकॉर्डवरुन ते काढून टाकण्यात यावे.

( काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान (शालेय शिक्षण विभाग ) : सभापती महोदय, या अर्धा-तास चर्चेच्या विषयावर या सभागृहात दोन दिवसापूर्वीच विस्तृत स्वरुपाची चर्चा झालेली आहे. त्याअनुषंगाने मी काही मुद्दे देखील येथे मांडलेले आहेत. भाषा संचालकांचे पद रिक्त आहे हे खरे आहे. पण मी दोन दिवसापूर्वीच सांगितल्याप्रमाणे सेवाप्रवेश नियमात काही अशा अटी व शर्ती आहेत की, ज्यामुळे आपल्याला या पदासाठी पात्र उमेदवार मिळू शकले नाहीत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे यासंदर्भात दोन वेळा जाहीरात देण्यात आली तरी सुध्दा संचालक पदासाठी उमेदवार मिळालेले नाहीत. दुसऱ्या रिक्त पदांच्या बाबतीत देखील अशीच परिस्थिती आहे. या सेवाप्रवेश नियमामध्ये बदल करण्यास सुरुवात केलेली आहे. परंतु ही खूप दीर्घ अशी प्रक्रिया आहे. डायरेक्टरेटकडून, सामान्य प्रशासन विभाग, विधी व न्याय विभाग, एम.पी.एस.सी. मग पुन्हा विधी व न्याय विभाग, पुन्हा सामान्य प्रशासन विभाग त्यानंतर माननीय राज्यपालांकडे जाऊन हे सगळे सेवाप्रवेश नियम बदलण्याचे काम होणार आहे आणि त्याची सुरुवात केलेली आहे.

यानंतर..श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान ....

पण सभागृहामध्ये चर्चा झाल्यानंतर आज माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यावर आढावा बैठक घेतली आणि त्या बैठकीमध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी असे सांगितले की, या रिक्रुटमेंट रुल्समध्ये बदल करण्याची प्रक्रिया करीत असताना जर आपल्याला आवश्यकता वाटली आणि तोपर्यंत पात्र उमेदवार पदोन्नतीने भरणे शक्य झाले नाही तर आपल्याला तोपर्यंत कॉन्ट्रॅक्टवर पात्र उमेदवार भरता येईल. असा निर्णय आढावा बैठकीमध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी घेतलेला आहे. अनुवादक, सहसंचालक, सहाय्यक संचालक वगैरे बाकीची जी पदे आहेत ती भरण्यासाठी हे तत्व लागू करु शकतो असा निर्णय माननीय मुख्यमंत्र्यांनी आढावा बैठकीमध्ये दिलेला आहे. त्याशिवाय सन्माननीय सदस्यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, आपल्याला पुनर्मुद्रण करता आले नाही. त्याचे कारण असे आहे की, जी भाषा सल्लागार समिती आहे त्या समितीचे दहा वर्षापासून पुनर्गठन झालेले नाही. आज या समितीचे गठन करण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांकडे फाईल मूव्ह झालेली आहे मी परवा या सभागृहामध्ये सांगितले होते की, हे लवकर करुन घेण्याची प्रक्रिया सुरु केलेली आहे. तसेच अनुवादक पदांबद्दल सुध्दा सांगितले होते की, 10 पदांची मागणी एमपीएससीकडे पाठविलेली आहे. बाकीच्या बाबतीत एका आठवड्यात मागणी पाठवून लवकरात लवकर ही पदे भरण्याचे काम करु.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी निधीबाबत सांगितले. परवा मी सांगितले की, निधी कमी पडू देणार नाही. आपल्याला जितका निधी लागेल त्याबाबत पुरवणी मागण्यांमध्ये निधीचा प्रस्ताव देऊन मराठीसाठी निधी कमी पडू देणार नाही असे मी त्या दिवशी सांगितले होते. पण मुख्य मुद्दा असा आहे की, मराठीसंबंधी आपली जी कामे असतात त्यासाठी वेगवेगळ्या खात्यामध्ये वेगवेगळी मंडळे, वेगवेगळ्या समित्या आहेत. सगळ्यांना एका छत्रीखाली आणून इंटेग्रेटेड पध्दतीने ते काम व्हावे ही बाब सुध्दा शासनाच्या विचाराधीन आहे आणि लवकरात लवकर शासन त्याबाबतीत निर्णय घेणार आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभागामध्ये ग्रंथालय संचालनालय आहे. भाषा संचालनालय, राज्य मराठी विकास संस्था हे सामान्य प्रशासन विभागामध्ये आहे. लोकसाहित्य समिती शालेय शिक्षण विभागामध्ये आहे. साहित्य अकादमी, पु. ल. देशपांडे अकादमी सांस्कृतिक



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान .....

कार्य विभागामध्ये आहे. हे सर्व जर एका खात्याखाली आपण आणू शकलो तर त्यामध्ये अधिक गती येईल आणि आणखी चांगल्या प्रकारे परिणामकारक काम त्या माध्यमातून होऊ शकेल. हे उत्तर परवा सुध्दा मी दिलेले आहे आणि आज या अर्धा-तास चर्चेच्या निमित्ताने तेच मी या ठिकाणी सांगू इच्छिते.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, दोन मुद्दे आहेत. एक मुद्दा असा की, सायबर कॅफेमधून मराठी संगणकावर काम करण्यासाठी भित्तीपत्रके करावयास पाहिजेत जेणेकरुन कोणालाही सायबर कॅफेमध्ये मराठी संगणकावर काम करता येईल. दुसरा मुद्दा असा की, भाषा संचालनालयाचे स्वत:चे संकेतस्थळ किंवा वेबसाईट तयार करणे जेणेकरुन ज्यांच्याकडे आधीचा साहित्य ठेवा आहे तो सगळा त्या संकेत स्थळावर असेल. या कामाला केव्हा सुरुवात होणार आहे.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, या सर्व कामांच्या बाबतीत आढावा बैठकीमध्ये निदेश देण्यात आलेले आहेत.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नदीपात्राचा नैसर्गिक स्त्रोत बदलल्याने झालेले नुकसान

**मु. शी.** : नदीपात्राचा नैसर्गिक स्त्रोत बदलल्याने झालेले नुकसान या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 3472 ला दिनांक 19 मार्च, 2010 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री. संजय केळकर, वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, "नदीपात्राचा नैसर्गिक स्त्रोत बदलल्याने झालेले नुकसान" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 3472 ला दिनांक 19 मार्च, 2010 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, राजापूर येथे 30 सप्टेंबर आणि 1 ऑक्टोबर, 2009 रोजी अतिवृष्टी झाली, ढगफुटी झाली. कोकणामध्ये बदलते हवामान ही नव्याने निर्माण होणारी बाब नाही.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर....

त्याठिकाणी दरवर्षी वेळोवेळी अशी परिस्थिती उद्भवते. ही अतिवृष्टी फयानपूर्वी झालेली आहे. मी त्या भागामध्ये स्वत: दिवसभर फिरुन आलो आहे. भू पंचक्रोशीतील भाग आहे. तेथे पेणकर, भू तेरवण, खिणगीणी, कोतापूर अशी अनेक गावे आहेत. त्या गावामध्ये बागायती शेती आहे. सुपारी, नारळ, भातशेती अशी तेथील मुख्य शेती आहे. या शेतीचे प्रचंड नुकसान झाल्याचे पहावयास मिळाले. कधी भरुन येणार नाही अशा प्रकारचे नुकसान दिसत होते. जमीन नापिक झाली होती. त्याठिकाणी पेणकर बंधारा आहे. वास्तविक ती नदीच आहे, तिचा प्रवाह बदललेला दिसत होता. बारमाही वाहणारी ती नदी होती. जनावरांच्या चा-याचा प्रश्न निर्माण झाला होता. नारळी, पोफळीचे झाड पिकावर येण्यासाठी 10-15 वर्षांचा काळ जावा लागतो. त्यामुळे हे बागायतदार शेतकरी दु:खी कष्टी झाले होते. त्याच्यावर मीठ चोळण्याचे काम शासनाने केले होते. त्याठिकाणच्या बागायतदार शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे झालेले नाहीत. मी फयाननंतर गेल्यावर सुध्दा झालेले नव्हते. त्यामुळे शासकीय दरबारी नुकसानीची नोंद झालेली नाही. ही नैसर्गिक आपत्ती असून सुध्दा शासनाच्या उदासीन भूमिकेमुळे त्याठिकाणचे शेतकरी चिंतेमध्ये होते. नुकसानीमुळे भरडले होते. आम्हाला कोण आधार देईल अशा मन:स्थितीत होते. फयानच्या वेळी शासनाने धाऊन मदतीचा हात दिला, काही ठिकाणी पचरांबी झाली, काही ठिकाणी झाली नसेल परंतु त्यापूर्वी जी ढगफूटी झाली आता अशा परिस्थितीत त्याठिकाणी बंधारा बांधलेला नाही. नदीचा प्रवाह बदललेला आहे. हा बंधारा बांधण्यासाठी निधी उपलब्ध करुन दिला नाही तर पंचक्रोशीचा भाग उद्ध्वस्त होईल. आधीच उद्ध्वस्त झालेला आहे, तो पुन्हा उद्ध्वस्त होण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. त्या गावक-यांनी मागण्यांचे निवेदन दिलेले आहे. त्यांच्या मागण्या काय आहेत ते सांगू इच्छितो. त्याठिकाणी सरकारी निधीतून तातडीने बंधारा बांधून देण्यात यावा. हा बंधारा सिमेंटचा बांधण्यात यावा. कोकणाची भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता सिमेंटचा बंधारा जास्त टिकाऊ होऊ शकतो. त्याचप्रमाणे अद्याप पंचनामे झालेले नाहीत ते तातडीने पूर्ण करावेत. इतके दिवस उलटून गेल्यामुळे कदाचित झाले असतील, पण झाले नसतील तर तातडीने करुन त्यांना मदतीचा हात द्यावा. त्या लोकांनी असेही म्हटले आहे की, त्याठिकाणी जे लाभार्थी आहेत

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्री.संजय केळकर....

ते लोकवर्गणी देण्यास तयार आहेत. आम्ही लोकवर्गणी देतो, पण हे काम तातडीने होणे आवश्यक आहे असे त्यांचे म्हणणे आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे मुंबई-राजापूर भू मार्गावर हर्डी येथे पडलेला पूल आहे. तो त्वरित दुरुस्त करण्याची आवश्यकता आहे. तो फार जूना पूल होता. तो त्वरित दुरुस्त करण्याची त्यांची मागणी आहे. पंचक्रोशीतील शेतकरी शासनाकडे आशेने पहात आहेत. त्यांना आता दिलासा देऊ शकलो नाही तर तो भाग पुन्हा उद्ध्वस्त होईल. पावसाळयाच्या तोंडावर पुन्हा अतिवृष्टी झाली तर जे काही उरले सुरले आहे ते नष्ट होईल. त्यामुळे ही परिस्थिती लक्षात घेऊन शासनाने नियोजन केले पाहिजे, त्याबाबत शासनाची काय भूमिका आहे, शासनाने काय मदत केली आहे यासंबंधीची माहिती द्यावी आणि ज्यांना मदत देण्याचे राहिले आहे त्यांना कशा पध्दतीने मदत दिली जाणार आहे त्याची देखील माहिती द्यावी, अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद.

---

यानंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके ( पुनर्वसन व मदत कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील भू पंचक्रोशीमध्ये दिनांक 30.9.2009 ला 52 मिमी आणि दिनांक 1.102009ला 279 मिमी पाऊस पडला. या अतिवृष्टीमुळे तेरवण, केतापूर, भालावली, कोंडवाडी, खिंणगिणी इत्यादी गावामधील शेतक-यांच्या पिकाचे निश्चितपणे नुकसान झालेले आहे. शेतक-यांच्या घरामध्ये पाणी शिरल्यामुळे घरांचे नुकसान झाले. त्याबाबतीत शासन नियमाप्रमाणे त्यांना तातडीने मदत करण्यात आली. 8579 रुपयाचे तातडीने वाटप करण्यात आले. राजापूर या ठिकाणी 7 गावामध्ये आंबा, कोकम, नारळ, सुपारी, फणस, काजू, केळी इत्यादी फळपिकांचे नुकसान झाले. 318 शेतक-यांचे नुकसान झाले. नुकसान झालेले क्षेत्र 12.67 हेक्टर इतके आहे. भात, नागली इत्यादी पिकाचे नुकसान झालेल्या लाभार्थ्यांची संख्या 204 असून नुकसान झालेले क्षेत्र 22.75 हेक्टर इतके आहे. सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्या संदर्भात मग रत्नागिरी जिल्हा असेल, सिंधुदुर्ग जिल्हा असेल किंवा महाराष्ट्रातील इतर जिल्हे असतील, या कालावधीमध्ये जे जे नुकसान झाले त्याचे पीक पंचनामे निश्चितपणे झालेले आहेत आणि त्याबाबतचा संपूर्ण अहवाल कृषी आयुक्तामार्फत कृषी विभागाकडे आणि त्यानंतर आमच्या विभागाला प्राप्त झालेला आहे. सॅटेलाईट इमॅजनरीद्वारे तपासणी करण्याचे काम चालू आहे. ते काम पूर्ण झाल्यानंतर ज्यांचे 50 टक्क्याच्या वर नुकसान झालेले आहे त्यांना शासकीय निकषाप्रमाणे अनुदानाचे वाटप केले जाणार आहे. सन्माननीय सदस्यांना गावक-यांनी जे निवेदन दिलेले आहे ते त्यांनी कृपया शासनाला द्यावे. सिमेंट बंधारा आणि हर्डी गावचा पूल दुरुस्त करुन मिळावा अशा दोन प्रमुख मागण्या या चर्चेच्या निमित्ताने उपस्थित केलेल्या आहेत. संबंधित विभागाकडून त्याबाबत माहिती घेऊन हा प्रश्न तातडीने सोडविण्याची शासनाची भूमिका राहील. अजूनही जेथे पंचनामे करायचे राहिले असतील तर त्याबाबतची माहिती माननीय सदस्यांनी उपलब्ध करुन दिली तर त्याही बाबतीत तातडीने कारवाई करण्यात येईल.

श्री. संजय केळकर : अजूनही नुकसान भरपाई मिळालेली नाही हे मी माननीय मंत्री महोदयांना सांगितलेले आहे. मी त्या गावामध्ये गेल्यानंतर कृषी विभागाचे आणि अन्य विभागाचे अधिकारी त्या ठिकाणी गेले व त्यानंतर पंचनामे सुरु झाले. मी संबंधित प्रशासनाशी पत्रव्यवहार

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. संजय केळकर....

केला, त्यांना सर्व वस्तुस्थिती कळविली. 30 सप्टेंबर 2009 आणि 1ऑक्टोबर 2010 ला नुकसान झाले. आज 2010 मधील एप्रिल महिना संपत आलेला आहे. या शेतक-यांनी काय करायचे ? एवढी शासकीय उदासीनता आणि दिरंगाई असेल तर मग कसे व्हायचे ? अजून रिपोर्ट यावयाचा आहे. बागायत शेतक-यांना अजून काही मिळालेले नाही. माझी विनंती आहे की, ही मदत 15 दिवसात देऊ, 1 महिन्यात देऊ असे शासनाने टाईम बाऊण्ड सांगावे.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर.....

अगोदरच एवढे दिवस निघून गेले आहेत. पुन्हा अतिवृष्टी यायची वेळ येणार आहे.

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मला यानिमित्ताने सांगितले पाहिजे की, शेती पिकाच्या नुकसान भरपाईसाठी डिसेंबर, 2009 मध्ये शासनाने संपूर्ण फयानग्रस्त असतील, नंतरच्या अतिवृष्टीच्या केसेस असतील या सर्व आपद्ग्रस्तांना नुकसान भरपाई द्यावी म्हणून डिसेंबर महिन्यामध्येच 246 कोटी रुपयांचा निधी कृषि आयुक्तांकडे दिलेला आहे. पैशाची उपलब्धता नाही असा प्रश्न नाही. निश्चितपणाने मी मघाशी सांगितल्याप्रमाणे सॅटेलाईट इमेजद्वारे त्या त्यावेळीची छायाचित्रे काढली जातात त्यावरुन नुकसानीचा अंदाज येऊ शकतो. त्याची पडताळणी करण्याची सोय आपल्याकडे उपलब्ध आहे. ते पडताळून पाहण्याची प्रक्रिया सुरु आहे. मला यानिमित्ताने ग्वाही द्यावयाची आहे की, पुढील एक महिन्याच्या आत कोणत्याही परिस्थितीत ही नुकसान भरपाईची रक्कम आपद्ग्रस्तांपर्यंत पोहोचविली जाईल.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : गिरणी कामगारांच्या विविध समस्यांकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष

**मु. शी.** : गिरणी कामगारांच्या विविध समस्यांकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष यासंबंधी श्री.किरण पावसकर, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"मुंबईतील गिरण्या बंद करुन त्या जागेवर गिरणी मालकांनी उभारलेले गगनचुंबी इमारती व मॉल्स, गिरणीच्या जमिनी विक्रीतून गिरणी मालकांनी केलेली प्रचंड कोट्यावधी रुपयांची कमाई शासनाच्या निर्णयानुसार गिरण्यांकडील काही भाग शासनाला, म्हाडाला व मुंबई महानगरपलिकेला देण्याबाबत काही गिरणी मालकांनी केलेली अक्षम्य टाळाटाळ, मॉल्समध्ये गिरणी कामगारांच्या मुलांना नोकऱ्या न देणे, गिरणी कामगारांसाठी मोफत घरे योजनेचा वाजलेला बोजबारा, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा करावयाची उपाययोजना"

सभापती महोदय, मुंबईतील गिरणी कामगार, मुंबईचा कापड गिरणी उद्योग म्हणजे मुंबईचे नव्हे तर देशाचे वैभव होते. मुंबईत 58 कापड गिरण्यात अडीच ते तीन लाख कामगार काम करीत होते. या उद्योगामुळे अन्य हजारो कामगारांना चांगल्याप्रकारे रोजगार मिळत होता. 7.5 ते 8 लाख कामगार या गिरण्यांमधून वेगवेगळया माध्यमातून काम करीत होते. गिरणी कामगार जागरुक होते. त्यावेळी गिरणी कामगारांनी संघर्षाची भूमिका घेत कॉ.एस.ए.डांगे, जी.डी.आंबेकर, एस.एम.जोशी यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्यांचे लढे आणि संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात सहभाग घेतला होता. मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी करुन केंद्रशासित ठेवण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला त्यावेळी प्राणपणाने लढणारे गिरणी कामगार होते. संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात 106 हुतात्मे झाले, त्यातील 60 हून अधिक हुतात्मे हे गिरणी कामगार झालेले आहेत. या कापड गिरण्यांना खऱ्या अर्थाने ग्रहण लागले ते 18 जानेवारी, 1982 रोजी. डॉ.दत्ता सामंत यांच्या नेतृत्वाखाली संप सुरु झाला आणि तो प्रदीर्घ काळ चालला. कापड गिरणी उद्योगास 2002

..3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर.....

साली ग्रहण लागले. मुंबईतील कापड गिरणी उद्योगच संपुष्टात आला. गिरणी कामगार संपुष्टात आला. गिरणी कामगार आणि गिरणगाव उद्ध्वस्त झाला. गेल्या 28 वर्षात गिरण्यांच्या जागेवर टोलेगंज इमारती उभ्या राहिल्या. गिरण्यांचे अवशेष भग्न आणि भंगार अवस्थेत उभे आहेत. लोअर परळ विभाग आता अप्पर वरळीमध्ये रुपांतरित झाला. परंतु गिरणी कामगार उभा राहिला नाही. गिरणी कामगार 28 वर्षे अन्यायाविरुध्द लढतो आहे. सरकारने गिरण्यांच्या जमिनी ताब्यात घेतल्या, जमिनी विकल्या. परंतु लाखो गिरणी कामगारांना त्यांची कोट्यवधी रुपयांची थकबाकी अद्याप मिळालेली नाही. ज्या कामगारांनी कठोर परिश्रमाने मुंबईचे वैभव जपत घाम गाळला, हौतात्म्य पत्करले त्या गिरणी कामगारांवर सरकारने फक्त आश्वासनांचा वर्षाव केला. त्यांना देशोधडीला लावले असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही.

या गिरणी कामगारांची एक समस्या ही घरांची आहे. त्या गिरणी कामगारांच्या घरांचे बांधकाम तात्काळ सुरु करावे अशा प्रकारची मागणी वारंवार करण्यात आली. गिरण्यांच्या जमिनी विकून राष्ट्रीय वस्त्रोद्योग मंडळाकडे, म्हणजे एनटीसीकडे 2020 कोटी रुपयांचा निधी जमा झाला. 12 हजार गिरणी कामगारांची 1982 पूर्वीपासूनची प्रलंबित असलेली थकबाकी लवकरात लवकर मिळावी यासाठी विविध मार्गांनी आंदोलने करण्यात आली. परंतु 2020 कोटी रुपये कमाई करुन सुध्दा त्या रक्कमेतून त्यांची थकबाकी देण्यात आलेली नाही. गिरण्यांच्या आवारात असलेल्या रहिवाशांना बेघर करणारा कामगार कायदा मंजूर करु नये अशी मागणी करण्यात आली. खरे म्हणजे मुंबईतील 58 गिरण्यांपैकी फक्त 23 गिरणी मालकांनी कामगारांना घरासाठी जागा देऊ असे सांगितले.....

नंतर 4पी.1...

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर .....

पण अजुन कुठलीही व्यवस्था झालेली नाही. 1 जानेवारी, 1982 रोजी मिलमधील कामगारांच्या संपाला सुरुवात झाली त्यावेळेस पटावर जेवढे कामगार आहेत त्यांच्या घरांची समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला तर 68 हजार घरांची आवश्यकता असताना फक्त 9563 एवढीच घरे बांधण्याचे काम सुरु आहे. एनटीसीकडे जे 20 हजार कोटी रुपये जमा झालेले आहेत त्यातून कामगारांना काही मिळाले असे चित्र अद्याप तरी स्पष्ट दिसत नाही. एनटीसीला उच्च न्यायालयाने फटकारले असून गिरण्यांच्या जमिनी विकून किती कामगारांची देणी फेडाल असा अहवाल दोन आठवड्यात प्रतिज्ञापत्राद्वारे न्यायालयात सादर करावा अन्यथा त्यावर टाच आणू असा सज्जड दम न्यायालयाने दिला. असे असतानाही वस्त्रोद्योग विभागाचे अधिकारी केवळ एनटीसीकडे बोट दाखवितात आणि अशा प्रकारे बोट दाखवून त्यांना या जबाबदारीपासून दूर होता येणार नाही. कारण राज्य वस्त्रोद्योग मंडळाकडून जे अपेक्षित आहे त्यात प्रताप मिल अमळनगर, देवगिरी मिल, संभाजीनगर, युनायटेड वेस्टर्न मिल या मिल्समधील कामगारांना त्यांची देणी मिळावी अशी मागणी वारंवार होत आहे परंतु राज्यसरकार सुध्दा त्याकडे दुर्लक्ष करीत आहे. या तिन्ही ठिकाणचे प्रश्न सोडविण्यासारखे आहेत परंतु तो प्रश्न अद्यापही सुटलेला नाही. तसेच आजही एनटीसीच्या 9 गिरण्यांची 45 एकर जमीन विकून 2352 कोटी रुपये एनटीसीला मिळणार आहेत त्यात राष्ट्रीय वस्त्रोद्योग मंडळ येत्या सहा महिन्यात फिनले मिल, मधुसुदन मिल, इंडिया युनायटेड मिल, भारत मिल, सिताराम मिल, पोद्दार (दोन गिरण्या) कोहिनूर व जाम अशा 9 मिलची जागा 12 हजार रुपये चौरस फुटाने विकणार आणि त्यातून 2352 कोटी रुपये मिळणार व त्यातून सन 1982 पासून जी देणी थकित आहे ती देण्याबाबत फक्त एनटीसीकडे बोट दाखवून चालणार नाही.

ज्याप्रमाणे दि. 19 जानेवारी, 2010 रोजी टाटा, पोद्दार, व इंडिया युनायटेड मिल (क्र.5) या तीन गिरण्या आधुनिकीकरणानंतर केंद्रीय वत्रोद्योग मंत्री श्री. दयानिधी मारन तसेच मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण व उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत "गिरणोदय" झाला. गिरण्यांचे भोंगे पुन्हा वाजू लागले, अशी सरकारने जाहिरातबाजी केली पण हे सगळे गिरणी कामगारांच्या जखमेवर मीठ चोळणारे आहे. प्रत्यक्षात या गिरण्या कधीच बंद नव्हत्या आणि सध्या या गिरण्यात फक्त कमाईच

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर ....

चालणार असून फारच थोड्या जणांना रोजगार मिळणार ही वस्तुस्थिती सरकारने लपवून ठेवली व सर्वांची दिशाभूल केली आहे.

गोल्ड मोहर मिलची आग यांसबंधी मी असे निदर्शनास आणून देत आहे की, दि. 20 जानेवारी 2010 रोजी दादर येथे दुपारी 12.30 वाजताच्या सुमारास या मिलला आग लागली. पहिल्यांदा याचा रिपोर्ट असा होता की, या मिलला आग लागलीच नाही. मी हा विषय लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून सभागृहात उपस्थित केला होता. त्यावेळेस उत्तर देतांना मंत्री महोदयांनी सांगितले होते की, यापूर्वी मिलला कधीच आग लागली नाही. परंतु मी यापूर्वी 9 मिल्सना आग लागल्याचे निदर्शनास आणून दिले हाते व त्यांची यादी सुध्दा त्यांच्याकडे दिलेली आहे. गोल्ड मोहोर मिल हा एक हेरिटेजचा भाग आहे आहे व तेच या गिरणीच्या विक्रीआड येत असल्याने अडचण निर्माण झाली होती म्हणून हा आग लावण्याचा प्रकार झाला. मुळात ही आग मिलला लागली नसून त्या ठिकाणी काम करणाऱ्या कामगारांच्या घरांना या आगी लागल्या होत्या. अशा प्रकारे 9 मिल्सना यापूर्वी आगी लागल्या आहेत. या मिल्सच्या ठिकाणी जे मल्टिप्लेक्स व मॉल्स उभे राहिले त्यात निदान कामगारांच्या मुलांना त्यांच्या क्षमता व क्वॉलिफिकेशन नसले तरी त्या ठिकाणी ज्या नोकऱ्या उपलब्ध आहेत त्या नोकऱ्या या मुलांना मिळाव्यात. जर अशा नोकऱ्या देता येत नसतील तर सर्विस इंडस्ट्रीजमध्ये ट्रेनिंग तरी त्यांना देता येईल काय याचा विचार करावा. जेणेकरुन प्रत्येक कामगाराचा एका तरी मुलाला अशा ठिकाणी नोकरी लागू शकेल...

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखाची नाही

श्री. किरण पावसकर ....

गिरणी कामगारांच्या प्रश्नाच्या संदर्भात गिरणी कामगारांनी रस्त्यावर उतरुन आंदोलने करण्यापेक्षा त्या ठिकाणच्या मिलमध्ये कामगार 1982 मध्ये संप सुरु असतांना जे पटावर काम करीत होते त्या सर्व गिरणी कामगारांना त्या ठिकाणी घरे मिळावीत आणि होणा-या उद्योगामध्ये रिझर्व्हेशन नुसार घेतले जावे. ज्या पध्दतीने सरकारी आस्थापनेवर जातीप्रमाणे रिझर्वेशन ठेवतो तसेच रिझर्वेशन या ठिकाणच्या गिरणी कामगारांच्या मुलांनाही मिळावे अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

---

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, या सदनाचे सन्माननीय सदस्य माझे मित्र श्री. किरण पावसकर यांनी नियम 92 अन्वये अर्धातासाची चर्चा या सभागृहात घडवून आणली आहे. या चर्चेमध्ये त्यांनी प्रामुख्याने 3 गोष्टींकडे शासनाचे लक्ष वेधण्याचे काम केलेले आहे. मुंबई महानगरपालिकेला जमीन देण्याच्या संदर्भात गिरणी मालकांनी केलेली अक्षम्य टाळाटाळ, मॉल्स मध्ये गिरणी कामगारांच्या मुलांना नोक-या न देणे तसेच गिरणी कामगारांना घरे देण्याच्या संदर्भातील योजनेचा वाजलेला बोजवारा व याबाबत शासनाने केलेली कार्यवाही असा त्यांच्या अर्धा तास चर्चेचा सार आहे.

मुंबई महानगरपालिकेला गिरणी मालकांनी जी जमीन द्यावयाची होती त्यासंदर्भातील, नोक-यांच्या संदर्भातील तसेच गिरणी कामगारांना देण्यात येणा-या घराच्या संदर्भात त्यांनी शासनाचे लक्ष या ठिकाणी वेधलेले आहे. तसेच सन्माननीय सदस्यांनी मुंबईच्या बाहेरच्या कामगारांच्या बाबत सुध्दा या ठिकाणी प्रश्न उपस्थित केलेले आहेत. मुंबईतील गिरणी कामगारांची जी शोकांतिका आहे त्या शोकांतिकेला जबाबदार कोण आहे ? यामध्ये न जाता गिरणी कामगारांना आधार द्यावा, दिलासा द्यावा याकरिता वेळोवेळी जे निर्णय घेण्यात आले ते सातत्याने घेण्यात आलेले आहेत. 1991 मध्ये विकास नियंत्रण नियमावली तयार करण्यात आली होती त्यामध्ये गिरणी भागाचा किंवा कापड गिरण्यांचा विकास हा त्यामध्ये अनुज्ञेय होता. परंतु नंतरच्या काळात कोरिया समितीच्या शिफारसीनुसार त्या वेळचे तत्कालीन मंत्री श्री. लीलाधर डाके साहेब यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती निर्माण करण्यात आली होती व त्यानंतर तत्कालीन मंत्री श्री. रणजित देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने मंत्रिमंडळाच्या मान्यतेने एक शिफारस केली व 20 मार्च, 2001 मध्ये कलम 58 मध्ये त्यांनी काही बदल सुचवले होते. त्या कलमानुसार 22.2.1991 नुसार एकूण क्षेत्रफळाच्या 1/3 क्षेत्रफळ महानगरपालिकेसाठी, 1/3 क्षेत्रफळ म्हाडासाठी व 1/3 क्षेत्रफळ हे गिरणीच्या मालकांसाठी राखून ठेवण्यात आले होते. जी जागा ठेवण्यात आली होती ती जागा कँपसाठी ठेवण्यात आली होती. नंतरच्या काळात जे गिरणी कामगार होते ते त्या मिलच्या आवारात राहतात त्यांना सुध्दा यामध्ये सामावून घ्यावे अशा प्रकारचा विचार पुढे आला होता व शासनाने याला सुध्दा मान्यता दिली होती. या कामगारांना 300 चौ. फूटाची सदनिका मोफत बांधून द्यावी अशा प्रकारचा शासनाने निर्णय केला होता. नंतर पुन्हा एक निर्णय आला व



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव....

त्यांसदर्भात मी अगोदर सांगितले होते की, गिरणी कामगारांच्या वारसांना वारसा हक्काने हक्क दिलेला आहे. या निर्णयाच्याही पुढे जाऊन आपण निर्णय घेतलेले आहेत. जे लोक या मिलच्या आवारात राहत होते त्यांना आपण सदनिका देणार आहोत परंतु जे लोक या मिलचे कामगार होते परंतु ते या मिलच्या बाहेर राहत होते त्यांचा आपण विचार करणार का असा प्रश्न उपस्थित झाला होता त्यावेळी या राज्याच्या मुख्यसचिवांच्या अध्यक्षतेखाली यासंदर्भात एक समिती स्थापन करण्यात आली. यामध्ये कामगार कोणाला संबोधावे, कामगाराची व्याख्या काय असावी ? किती वेतनापर्यंत कामगाराला गृहीत धरले जावे ? अशा प्रकारचा अहवाल तयार करण्याचे काम मुख्यसचिवांच्या अध्यक्षतेखालील समिती करीत आहे.

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव...

त्यांनी एक उप समिती नेमली आहे. या राज्याचे मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली आहे. सन 2007 साली पगाराची मर्यादा विचारात घेण्यात येणार आहे. या संबंधी मी परवाच खुलासेवार उत्तर दिलेले आहे याची आपणा सर्वांना कल्पना आहे. त्यानंतर एक विषय आला की, गिरणी कामगारांची मुले आहेत त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करून द्यावी. मला सांगितले पाहिजे या संदर्भात गिरणी कामगारांच्या मुलांचे अर्ज मागविले होते. त्यापैकी 16512 पात्र अर्ज आले आहेत. त्यांना वेगवेगळे प्रशिक्षण देऊन प्रशिक्षित करून नोकरी देण्याच्या दृष्टीने शासन उचित असे पाऊल उचलत आहे. मुंबईत 58 गिरण्या होत्या. त्यापैकी 25 गिरण्या ह्या एनटीसीच्या होत्या. 1 गिरणी वस्त्रोद्योग महामंडळाची आहे. बाकीच्या 32 गिरण्या खाजगी आहेत. यातील काही गिरण्या सुरू आहेत, तर काही बंद पडलेल्या आहेत. 58 गिरण्यांपैकी 33 गिरण्यांचे विकासाचे प्रस्ताव महागनरपालिकेने मंजूर केलेल्या आहेत. या 33 गिरण्यांपैकी 19 प्रस्तावांमध्ये 14 ठिकाणी 70589 चौरस मीटर जागा म्हाडासाठी मिळालेली आहे. त्यामध्ये 10156 सदनिकांचे बांधकाम सुरू आहे. या 10156 सदनिकांपैकी 6948 सदनिका गिरणी कामगारांसाठी आहेत. 3208 सदनिका संक्रमण शिबिरांसाठी उपलब्ध करून द्याव्या लागणार आहेत. कारण तशा पद्धतीचा रेशा ठरलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी कामगारांना सदनिका देणे, मुलांना रोजगार देणे आणि गिरणीचे मालक आपल्याला जमिनी देत नाहीत या तीन गोष्टींकडे शासनाचे लक्ष वेधले आहे. परंतु, आता त्यांना कायद्याने सर्व बंधनकारक झाले आहे. सुरूवातीच्या काळात काही गिरणीमालकांनी फायदा उठविला. नाही अशातला भाग नाही. परंतु, नंतरच्या काळात ही बाब शासनाच्या लक्षात आली. त्या त्या वेळी शासनाने कायद्यात बदल केला. विशेष करून 1982 साली कामगार गिरण्या बंद पडल्यामुळे कामगार रस्त्यावर आला. त्यानंतर सुद्धा अनेक वर्ष लढा देणाऱ्या कामगारांच्या वारसांना न्याय देण्याची शासनाची भूमिका आहे व ही भूमिका कायम राहील हे मला सन्माननीय सदस्यांना सांगितले पाहिजे.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील विशेषत: जळगाव जिल्ह्यातील चोपडा,यावल,अमळनेर तालुक्यातील तसेच सोलापूर व धुळे जिल्ह्यात गारपीटीमुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान

**मु. शी.** : राज्यातील विशेषत: जळगाव जिल्ह्यातील चोपडा,यावल,अमळनेर तालुक्यातील तसेच सोलापूर व धुळे जिल्ह्यात गारपीटीमुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 2662 ला दिनांक 19 मार्च 2010 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री.दिलीपराव कुलकर्णी,श्री.भगवान साळुंखे,श्री.नितीन गडकरी, श्री.संजय केळकर, श्री.रामनाथ मोते, श्री.पांडुरंग फुंडकर, श्री.अरूण गुजराथी,श्री.गुरुमुख जगवानी,श्री.विनोद तावडे, श्री.विक्रम काळे, श्रीमती उषाताई दराडे,वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.अरूण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, राज्यातील विशेषत: जळगाव जिल्ह्यातील चोपडा,यावल,अमळनेर तालुक्यातील तसेच सोलापूर व धुळे जिल्ह्यात गारपीटीमुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 2662 ला दिनांक 10 मार्च 2010 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

माननीय सभापती महोदय, सध्या वसुंधरेच्या तापमानामध्ये वाढ होते. याला आपण ग्लोबल वॉर्मिंग म्हणतो ते दृश्य स्वरूपात दिसते की काय अशी भीती वाटते. पूर्वी कधी तरी 3-4 वर्षामध्ये गार पडायची पण आता 2-3 महिन्यांनी गार पडते. पूर्वी कुठे दर वर्षातून वादळ यायचे ते आता दर दोन-तीन महिन्यांनी येते. आमच्या जळगाव जिल्ह्यात रावेर तालुक्यात एका वर्षात पाच वादळे झाली. आमचा चोपडा, यावल हा जो भाग आहे तेथे तीन वादळे झाली. मी आपल्याकडे तारांकित प्रश्न आणि अन्य आयुधांच्या माध्यमातून मदतीची मागणी केल्यानंतर देखील अजून एक वादळ झाले.

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरूण गुजराथी....

तेव्हा माझी आपल्याला विनंती आहे की, नैसर्गिक आपत्तीतून शेतकऱ्याला बाहेर काढले पाहिजे. यासाठी शासनाची मदत आम्ही मागत आहोत. कितीही वादळे झाली, गारपीट झाली तरी शासन वर्षातून एकदाच अर्थ सहाय्य देते. म्हणजे शेतकऱ्याला फक्त एकदाच आर्थिक सहाय्य मिळणार. निधी दोन वेळा मिळणार नाही. आर्थिक सहाय्य आपण किती देतो. हेक्टरी पाच हजार रूपये. जास्तीतजास्त दोन हेक्टरला दहा हजार रूपये. केळीच्या संदर्भात एक हेक्टरला दहा हजार रूपये मदत दिली जाते, तर दोन हेक्टरला जास्तीतजास्त वीस हजार रूपये मदत दिली जाते. मी केळीचे गणित सांगतो. एका एकरामध्ये 1600 झाडे लावण्यात येतात. हेक्टरमध्ये साधारणपणे 4 हजार झाडे लागतात. चार हजार झाडांना आपण दहा हजार रूपये देता.

यानंतर श्री.गायकवाड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी...

एका केळीच्या झाडाला शासनाकडून फक्त अडीच रुपये अर्थसहाय्य देण्यात येते.शेतात पडलेले झाड बांधावर आणण्यासाठी तीन रुपये मजुरी द्यावी लागत असते. तेव्हा ही आर्थिक मदत वाढवून देण्यात यावी अशी मी या निमित्ताने शासनाला विनंती करतो. केळीच्या एका झाडाला 25 ते 30 रुपये खर्च येत असतो आणि त्या झाडापासून 80 ते 100 रुपये उत्पन्न मिळते. केळीला फळाचा दर्जा देखील दिला गेला नाही. केळीला फळाचा दर्जा द्यावा अशी मी सभागृहाच्या माध्यमातून माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो. केळीच्या बाबतीत शासन विमा योजना लागू करीत नाही वा अन्य कोणतीही कंपनी विमा योजना लागू करीत नाही. केळीच्या पिकाला जर विमा योजना सुरु करण्यात आली तर सरकारचे दोन रुपये वा अडीच रुपये अर्थसहाय्य घेण्याची वा ती मागण्याची गरज राहणार नाही तेव्हा केळीला फळाचा दर्जा देणे आणि केळीला पीक विमा योजना सुरु करण्याच्या बाबतीत शासनाने प्रयत्न करावा असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, जून महिन्यात पेरणी करावयाची असते परंतु अजूनही निधी उपलब्ध होत नाही. तीन ते साडे तीन महिन्याचा कालावधी होऊन गेलेला आहे विशेष बाब म्हणूंन कोकणाला जादा निधी दिला आहे. कोकणासाठी जादा निधी देण्याची गरज होती त्यामुळे कोकणाला न्याय देण्याचा प्रयत्न करण्यात आला होता त्याचबरोबर नाशिक जिल्हयातील द्राक्षासाठी सुध्दा आर्थिक सहाय्य वाढवून दिलेले आहे त्याच पध्दतीने केळीला 20 हजार रुपये हेक्टरी आर्थिक अनुदान द्यावे अशी विनंती आहे. त्याचबरोबर धान्याच्या नुकसानीसाठी पाच हजार रुपये अनुदान शासन देत असते पंरतु तीन चार वेळा वादळे झालेली असल्यामुळे धान्याच्या नुकसानीसाठी दहा हजार रुपये हेक्टरी याप्रमाणे विशेष बाब म्हणून आर्थिक मदत लवकरात लवकर देण्यात यावी अशी मागणी मी या निमित्ताने करतो. तसेच केळीला फळाचा दर्जा द्यावा आणि विमा योजना केळीसाठी सुरु करावी अशा प्रमुख मागण्या या चर्चेच्या माध्यमातून करतो आणि माझे भाषण संपवितो.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री ) : सभापती महोदय सन्माननीय सदस्य श्री अरुण गुजराथी यांनी राज्यातील विशेषत: जळगाव जिल्हयातील चोपडा, यावल, अमळनेर या तालुक्यात अतिवृष्टी, वादळी वारा आणि गारपीटमुळे जानेवारी महिन्यात जे नुकसान झालेले आहे त्याकडे अर्धा तास चर्चाच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे.

सभापती महोदय जळगाव जिल्हयातील नुकसानीच्या संदर्भात शासनाला जो अहवाल प्राप्त झालेला आहे त्यानुसार 50 टक्क्याच्या वरील बाधित क्षेत्र 8 हजार 985 हेक्टर्स आहे त्यामध्ये केळी धरुन इतर फळ पिकाचे क्षेत्र 2389.28 हेक्टर्स असून त्यामध्ये केळीचे क्षेत्र 229.12 हेक्टर्स एवढे आहे. शेती पिकाचे 6 हजार 594.14 हेक्टर्स एवढे नुकसान झालेले आहे. जळगाव जिल्हयात शेत पिकाचे आणि फळ पिकाचे नुकसान होऊन तीन महिने झालेले असून सबंधित शेतक-यांना लवकरात लवकर मदत मिळावी अशी सन्माननीय सदस्यांची रास्त मागणी आहे. मी देखील त्यांच्या मागणीशी सहमत आहे. पिकाची नुकसान भरपाई मिळविण्यासाठी जी प्रक्रिया ठरविण्यात आलेली आहे त्यामध्ये निश्चितपणे विलंब लागतो ही गोष्ट शासनाच्या दृष्टीनेही निश्चितपणे विचार करण्यासारखी आहे. मला सन्माननीय सदस्यांना या निमित्ताने सांगावयाचे आहे की शेतीच्या पिकाचे नुकसान झाल्यानंतर तलाठी आणि कृषी सहाय्यकांनी पंचनामे करावयाचे असतात व जिल्हाधिकारी आणि कृषी अधिकारी यांच्या संयुक्त साक्षरीने तो अहवाल विभागीय आयुक्तांकडे पाठवावयाचा असतो आणि त्यांनी तपासणी करुन हा अहवाल कृषी विभागाकडे पाठवावयाचा असतो त्यानंतर कृषी विभागाने सॅटेलाईट इमेजनरी व्दारे पुन्हा तपासणी करावयाची असते. ही सर्व प्रर्किया अत्यंत क्लिष्ट आणि वेळेचा अपव्यय करणारी आहे त्यामुळे बाधित शेतक-यांना जास्तीत जास्त लवकर मदतीचा हात आपण देऊ शकत नाही ही वस्तुस्थिती शासनाला माहीत आहे त्यामुळे लवकरता लवकर कशी मदत देता येईल या दृष्टीने प्रचलित पध्दत बदलण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

नतर श्री.सरफरे ....

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके...

आणि म्हणून निश्चितपणे येणारा पावसाळा लक्षात घेता पेरणीच्या हंगामामध्ये, जूनच्या पहिल्या, दुसऱ्या आठवडयामध्ये पेरणीला सुरुवात होईल त्यापूर्वी कोणत्याही परिस्थितीत त्यांना नुकसान भरपाई निश्चितपणे दिली जाईल. म्हणजेच आजपासून एक महिन्याच्या आत ही नुकसान भरपाई शेतकऱ्यांपर्यंत निश्चितपणे पोहोचविली जाईल याची मी ग्वाही माननीय सदस्यांना देऊ इच्छितो.

सभापती महोदय, केळीचा समावेश फळ पिकामध्ये करण्याबाबत माननीय सदस्यांनी मागणी केली आहे. केळीचे होणारे नुकसान लक्षात घेता त्यांचा समावेश आपण फळ पिकांमध्ये करीत आहोत.परंतु त्यांनी केळीच्या पिकाबाबत आकडेवारी सांगितली. जवळ जवळ 1 हेक्टरमध्ये 4 हजार झाडांची लागवड केली जाते. याचा विचार केला तर प्रति झाड अडीच रुपये नुकसान भरपाई अत्यंत नगण्य पडते. यामधून केळी उत्पादक शेतकऱ्यांना कोणतेही सहाय्य मिळत नाही ही बाब निश्चितपणे महत्वाची आहे. त्या दृष्टीकोनातून प्रति झाड 5 रुपये याप्रमाणे 10 हजार रुपयांवरुन 20 हजार रुपयांपर्यंत द्यावेत अशाप्रकारची मागणी त्यांनी केली आहे. माननीय सदस्यांच्या या मागणीबाबत निश्चितपणे विचार केला जाईल. माननीय सदस्यांबरोबर या संदर्भात चर्चा करुन लवकरात लवकर केळी पिकाच्या बाबतीत नुकसानीचे दर वाढवून देण्याची राज्य सरकारची भूमिका राहील.

सभापती महोदय, त्यानंतर माननीय सदस्यांनी विम्यासंदर्भात मुद्दा उपस्थित केला. त्याबाबत हे राज्य सरकार केंद्र सरकारकडे सातत्याने 2004 सालापासून पाठपुरावा करीत आहे. तरीपण अद्यापि केंद्र सरकारकडून केळी पिकाला विम्याचे संरक्षण देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आलेला नाही. आणि म्हणून केळीच नव्हेतर सर्वच पिकांकरिता पिक विमा योजना लागू करण्याबाबत नव्याने विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे ग्लोबल वॉर्मिंगमुळे म्हणा किंवा वारंवार अतिवृष्टी, गारपीटीमुळे म्हणा, नैसर्गिक आपत्तीच्या माध्यमातून तडाखे बसत असतात. त्यामुळे पिक विमा योजनेमध्ये अंतर्भाव करुन पिकांना संरक्षण देण्याची पध्दत या देशात उभी राहिली तर तिचा भार शासनावर पडणार नाही. या गोष्टींचा विचार करुन निश्चितपणे केंद्र सरकारकडे पिक विमा योजनेच्या बाबतीत सर्वंकष योजना लागू करण्यात यावी, आणि त्यामध्ये केळीचा समावेश व्हावा यासाठी राज्य सरकारकडून पाठपुरावा करण्यात येईल याची मी आपणास ग्वाही देतो आणि माझे भाषण संपवितो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: वसई तालुक्यातील पाणजू बेटावर प्राथमिक आरोग्य पथकाच्या इमारतीच्या बांधकामासाठी जागा उपलब्ध न होणे

मु.शी.: वसई तालुक्यातील पाणजू बेटावर प्राथमिक आरोग्य पथकाच्या इमारतीच्या बांधकामासाठी जागा उपलब्ध न होणे यासंबंधी श्री. संजय केळकर, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा तास चर्चा उपस्थित करतो.

"वसई तालुक्यात प्राथमिक आरोग्य पथक पाणजू मंजूर असून ते कार्यरत आहे. सदर पथकाची मुख्य इमारत व निवासस्थाने बांधकामाचे अंदाजपत्रक जिल्हा परिषदेस सादर करण्यात आले. त्यानुसार जिल्हा परिषदेने सन 2007-2008 साली रु.10.17 लाख अनुदान मंजूर केले, परंतु पथकाची इमारत व निवासी बांधकामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु.75.96 लाख इतकी असणे, बांधकामासाठी पुरेशी तरतूद नसल्याने जिल्हा परिषदेने बांधकाम हाती घेतले नाही. सन 2008-2009 मध्ये डि.एस.आर. रेटनुसार सदर बांधकामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु.154.75 लाख इतकी झाली. जिल्हा परिषदेने त्यासही मंजूरी दिली. मंजूरी देताना उपलब्ध कागदपत्रे जिल्हा परिषदेने नीट पाहिली नाहीत. इमारत बांधकाम करण्यासाठी जागा जिल्हा परिषदेच्या नावावर असणे गरजेचे आहे व सद्यःस्थितीत सदरची जागा वन विभागाच्या ताब्यात आहे. त्यामुळे अनुदान उपलब्ध असूनही बांधकाम करता येत नाही व इमारत नसल्याने बेटावरील लोकांना आरोग्य सेवा मिळत नाहीत. शासनाने पाणजू बेटावरील वन विभागाच्या ताब्यात असलेली जागा जिल्हा परिषदेच्या नावावर वर्ग करुन त्या जागेवर आरोग्य पथकाची इमारत व निवासी इमारत बांधण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना".

सभापती महोदय, वसई तालुक्यामध्ये पाणजू नावाचे गाव आहे. अतिशय दुर्गम भाग असलेले, अतिशय मागसलेलेले 4 हजार लोकवस्तीचे गाव आहे. हे गाव अनेक प्राथमिक सुविधांपासून वंचित आहे. या संदर्भात गेल्या दोन वर्षापासून मी डी.पी.डी.सी. च्या माध्यमातून पाठपुरावा करीत आहे. परंतु त्याला अजून निर्णायक स्वरुप आलेले नाही. त्याठिकाणी 1992 सालापासून आरोग्य पथक होते. सन 2005 मध्ये त्याठिकाणी आरोग्य केंद्र मंजूर करण्यात आले. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या यादीमध्ये पाणजू गावाचा समावेश आहे. सन 2007-08 मध्ये जिल्हा परिषदेमार्फत इमारतीचे बांधकाम करण्याकरिता 10.17 लाखाचे अनुदान मंजूर करण्यात आले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ D/

श्री.संजय केळकर...

परंतु हे अनुदान फारच कमी असल्यामुळे त्या वर्षामध्ये त्या अनुदानाचा काहीही उपयोग झाला नाही. त्यानंतर सन 2008-09 मध्ये 154.75 लाखाचे अनुदान मंजूर करण्यात आल्याचे दि.16.3.2009 रोजीच्या पत्राव्दारे मला कळविण्यात आले. त्यानंतर असे लक्षात आले की, एका बाजूला शासन अनुदान मंजूर करते, जिल्हा परिषद आरोग्य केंद्र मंजूर करते. त्यानंतर जिल्हा परिषदेच्या नावावर सदरची जागाच नाही हे लक्षात येते.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर . . . .

त्यामुळे ही एक प्रकारची तेथील ग्रामस्थांनी फसवणूक आहे की, तुम्ही एका बाजूला आश्वासन देता, निधी मंजूर केला जातो. पण जेव्हा प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर केले जाते, तेव्हाच तुम्ही यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व गोष्टींचा तपशील घ्यावयास पाहिजे. पण नंतर असे लक्षात आले की, ही वन विभागाच्या नावावर जागा आहे. मग या कामासाठी आणखी दिरंगाई झाली. तेथे प्राथमिक आरोग्य पथकाची मुख्य इमारत न झाल्यामुळे, तेथे निवासाची व्यवस्था न झाल्यामुळे पाणजू बेटातील लोक सर्व सुविधांपासून वंचित आहेत. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या नावावर ही जागा करावयास पाहिजे. तसेच तेथील काम कधी पूर्ण होणार आहे ? पाणजू बेटावरील लोकांनी याबाबतीत आशा सोडूनच द्यावयाची काय ? ते समुद्रातील वेगळे बेट आहे, त्यामुळे त्यांना काही मिळणारच नाही असे शासन त्यांना या माध्यमातून सांगू इच्छिते काय ? त्यामुळे याबाबतीत तातडीने कारवाई होण्याची गरज आहे. येथील माणसे गरीब आहेत, मागासलेली आहेत, दुर्गम भागामध्ये रहाणारी आहेत. या कामासाठी जेवढी वर्षे लागतील, तेवढा यासाठी लागणारा निधी वाढत जाणार आहे. त्याचे एस्टीमेट वाढत जाणार आहे. त्यामुळे यासंबंधातील विषय मी चर्चेच्या माध्यमातून उपस्थित केलेला आहे. याला योग्य प्रकारचा न्याय देण्याचे काम शासनाचे आहे. त्यामुळे याबाबत माननीय मंत्री महोदयांनी माहिती द्यावी अशी मी मागणी करतो.

---

. . . .4 यु-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान (सामान्य प्रशासन विभाग) : सभापती महोदय, वसई तालुक्यात पाणजू गावात 1992 पासून प्राथमिक आरोग्य पथक मंजूर आहे आणि समाज मंदिराच्या इमारतीमध्ये हे पथक कार्यरत आहे. नवीन बांधकामासाठी एक हेक्टर जमिनीची आवश्यकता आहे. मुख्य मुद्दा असा आहे की,जोपर्यंत जिल्हा परिषदेच्या नावावर जमीन होत नाही, तोपर्यंत आपण हे बांधकाम करु शकणार नाही. ही सरकारी खाजांची जमीन आहे. सदरहू प्रस्ताव महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट, मुंबई येथे पाठविला असून त्यांची एन.ओ.सी.घेतली असून, ही जमीन वन विभागाची नसून महसूल विभागाची आहे आणि महसूल विभागाबरोबर आरोग्य विभाग सतत पत्रव्यवहार करीत आहे. दि.29-09-2008, दि.15-12-2008, दि.04-08-2009 रोजी देखील पत्रव्यवहार केलेला आहे. पण अद्याप त्यांच्याकडून मंजूरी मिळालेली नाही. याठिकाणी 154 कोटी रुपयांचा उल्लेख करण्यात आला. पण या बांधकामासाठी 1 कोटीचे एस्टीमेट आवश्यक आहे. डी.पी.डी.सी.मध्ये 154 कोटी रुपयांचा निधी आरोग्य विभागासाठी मंजूर आहे आणि त्यातून टप्प्याटप्प्याने एक वर्षासाठी 25 लाख रुपये, दुसऱ्या वर्षासाठी 25 लाख रुपये देण्यात येणार आहेत. पण मुख्य म्हणजे जोपर्यंत त्यांच्या नावावर जागा होत नाही, तोपर्यंत या निधीचा काही उपयोग नाही.पण एकदा जागा जिल्हा परिषदेच्या नावावर झाल्यावर निधीची कमतरता येणार नाही. यामध्ये निधीचा प्रश्नच नाही. तसेच सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणामध्ये रिक्त पदांचा उल्लेख केला आहे. पण येथे फक्त सफाई कामगाराचे 1 पद रिक्त असून बाकीची सर्व पदे भरण्यात आलेली आहेत. धन्यवाद.

---

. . . .4 यु-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले की, ही जमीन जोपर्यंत नावावर होत नाही. तोपर्यंत आम्ही काही करु शकणार नाही. परंतु शासनाकडून असे उत्तर अपेक्षित नाही. महसूल खात्याची जमीन जिल्हा परिषदेच्या नावावर करण्यासाठी काय अडचण आहे ? याठिकाणी महसूल विभागाचे माननीय राज्यमंत्री उपस्थित आहेत. वन विभागाची जमीन असेल तर त्यासाठी दिल्लीला जाऊन परवानगी घ्यावी लागते. त्यामुळे दिरंगाई होते.पण येथे तसे नाही. ठाणे जिल्ह्यात मुंबईसाठी धरण बांधण्याचे काम चालू आहे. त्याकरता वन विभागाची एका चुटकीसारखी परवानगी घेऊन तेथे मध्य वैतरणा धरणाचे काम सुरु देखील करण्यात आले आहे. जर इच्छा असेल तर मार्ग सापडेल. पण वसई तालुक्यातील पाणजू बेटावरील लोक मागासलेले आहेत, सोयींपासून वंचित आहेत, त्यांच्यासाठी जागेची परवानगी घ्यावयाची आहे. यासाठी केवळ पत्रव्यवहार करुन प्रश्न सुटणार नाही. यासाठी प्रत्यक्ष महसूल विभागाबरोबर चर्चा करावी लागेल. याबाबतीत महसूल विभागाच्या माननीय राज्यमंत्री महोदयांनी देखील निवेदन केले तर निश्चितपणे त्याचा उपयोग होईल.

श्रीमती फौजिया खान : महसूल विभागाने ग्रामविकास विभागाकडे कन्करन्ससाठी पत्र पाठविले असून, ते त्यांना मिळालेले आहे.तसेच ग्रामविकास विभागाने पयार्वरण विभागाकडे दि.13-08-2009 रोजी पत्र पाठविले आहे. तेव्हा पासून ही बाब पर्यावरण विभागाकडे आहे. ही बाब आपण आरोग्य विभागाकडून पाठवू.

यानंतर कु.थोरात . . .

.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान...

सभापती महोदय, जर महसूल विभागाचे माननीय मंत्रिमहोदय याबाबतीत काही उत्तर देऊ इच्छित असतील तर त्यांनी ते द्यावे.

श्री. प्रकाश सोळंके ( महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे महसूल विभागाचा या प्रश्नाशी संबंध आहे. पुढच्या एका महिन्याच्या अवधीत जिल्हा परिषदेमार्फत आरोग्य विभागाला जमीन उपलब्ध करुन दिली जाईल.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: धूतपापेश्वर (ता.राजापूर,जि.रत्नागिरी) मंदिरातील अमूल्य अशा पुरातन वस्तूंची झालेली चोरी.

**मु.शी.**: धूतपापेशवर (ता.राजापूर,जि.रत्नागिरी मंदिरातील अमूल्य अशा पुरातन वंस्तूंची झालेली चोरी यासंबंधी श्री. संजय केळकर वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो.

"धूतपापेश्वर (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) मंदिराचे दरवाजे तोडून दिनांक 6 सप्टेंबर,2009 च्या पहाटे चोरटयांनी मंदिरातील अमूल्य अशा पुरातन वस्तूंची चोरी केली. याबाबत पोलिसांकडे तक्रार करुनही व आरोपी मिळनही पोलिसांनी फिर्यादीनुसार जप्त मुद्दे मालाचे वर्णन न करता, केवळ किंमतीनुसार अत्यंत त्रोटक मुद्देमालाचे वर्णन करुन अत्यंत दुर्मिळ,प्राचीन,पुरातन व ऐतिहासिक वारसा व महत्व असलेल्या मूर्ती, मुखवटे व वस्तू याबाबत उदासिनता दाखविणे, जप्त केलेल्या मुद्देमालाचे वर्णन संशयास्पद असणे, याबाबत शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, मी हा जो अर्धा-तास चर्चेचा विषय उपस्थित केलेला आहे यामध्ये पोलिसांना काही प्रमाणात यश मिळालेले आहे अशी मला माहिती मिळालेली आहे.

सभापती महोदय, कोकणामध्ये असा एक हंगाम आला होता की, सगळया मंदिरांमध्ये चोऱ्या होत होत्या. दरोडे पडत होते. पुरातन वस्तुंची चोरी होत होती पण मुद्देमाल सापडायचा नाही. धूतपापेश्वर हे राजपूर तालुक्यातील अतिशय लोकप्रिय मंदिर आहे या मंदिराच्या संबंधातील चर्चा मी उपस्थित केलेली आहे.

सभापती महोदय, चोरी झालेल्या मुद्देमालाचे वर्णन नीटपणे न करता केवळ किंमतीनुसार त्याचे त्रोटक वर्णन करण्यात आलेले आहे. या सगळया प्राचीन, दुर्मिळ आणि ऐतिहासिक महत्व असलेल्या मूर्ती आहेत. त्या मूर्तींचे मुखवटे आणि वस्तू बद्दलचा तपशील मिळत नाही. आरोपीने ज्या सोनाराकडे माल विकला त्या सोनाराने सांगितले की, आम्ही चोरीचा माल वितळून टाकलेला आहे.

...3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर...

पोलिसांनी त्यावर विश्वास ठेवला आणि चोरीच्या माला इतक्या किंमतीचा इतर माल जप्त केला. वास्तविक दुर्मिळ,पुरातन वस्तुंची आंतरराष्ट्रीय बाजारात कोटयवधीची किंमत असताना काही हजारांचा तो माल असल्याचे दर्शविले. चोरीचा माल विकत घेणाऱ्या व्यापाऱ्यास अद्यापही अटक झालेली नाही अशा प्रकारची माझी माहिती आहे. त्यामुळे यामागे पुरातन वस्तुंच्या चोरीचे एखादे आंतरराष्ट्रीय रॅक्ट तर नाही ना? कारण केवळ धूतपापेश्वरातच अशा प्रकारची चोरी झालेली नाही तर इतर अनेक मंदिरात अशा प्रकारची चोरी झालेली आहे.अगदी गुजरातपर्यंत अशा प्रकारचे रॅकेट कार्यरत असण्याचा संशय येतो. त्यामुळे असे रॅकेट असण्याची देखील शक्यता आहे. ही भुरटी चोरी नसून यामाध्ये मोठया रॅकेटचा हात असावा. ग्रामस्थानी या तपास कामामाबाबत अविश्वासच दाखविला आहे. लोकांमध्ये घबराहट आहे किंवा लोकांमध्ये अविश्वासाचे वातावरण आहे.

सभापती महोदय, याबाबतीत श्री देवधूतपापेश्वर मंदिर देवस्थानच्या विश्वस्तांनी किंवा लोकांनी पत्राद्वारे मागणी केलेली आहे. ते पत्र माझ्याकडे आहे.या पत्रात असे म्हटले आहे की, चोरटयांना जर पैशासाठी चोरी करायची होती तर त्यांनी चांदीचे ताट व तांब्या वगळून चोरी कां केली? तेवढे बाजूला ठेवले आणि पुरातन वस्तूंची चोरी केली. पोलीस खाते चांदीच्या बदल चांदी आणि सोन्याच्या बदली सोने हस्तगत केल्याचे सांगून चूकीच्या पध्दतीने या प्रकारणाच्या तपासाचे काम घाईगडबडीने पूर्ण करत आहे. अशा प्रकारचा त्यांचा संशय आहे. ज्या व्यापाऱ्याकडे हा सर्व मौल्यवान ऐवज विकला असे ते सांगतात त्या व्यापाऱ्याला अद्याप अटक झालेली नाही काय? किंवा त्याला अद्याप आरोपी केलेले नाही काय? पुरातन मूर्ती व मुखवटे व मौल्यवान दागिने यांची पोलिसांच्या म्हणण्याप्रमाणे तेवढया वजना इतकी भरपाई देऊ करणे म्हणजे भाविकांच्या भावनेची क्रुर चेष्टा आहे. अशा प्रकारची सर्व विश्वस्तांची भावना आहे त्यामुळे या तपास कामात विसंगती आहे की काय? अशा प्रकारचा संशय आहे. म्हणून या अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून मी हा विषय उपस्थित केला आहे, जर हा तपास योग्य पध्दतीने झाला नसेल तर सीआयडी मार्फत चौकशी करण्यात येईल काय? आणि तपास झालेला असेल तर हे जे विषय उपस्थित केलेले आहेत त्यांच्या संबंधी निवेदन करण्यात यावे. तसेच आणखी काही मंदिरांमध्ये चोरी झालेली आहे आणि दोन-चार महिन्यापासून चोर सापडत नाहीत तेव्हा त्या चोरीच्या तपास कामाबद्दलची काय प्रगती आहे याबद्दल देखील माननीय मंत्रिमहोदयांनी निवेदन करावे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले): सभापती महोदय, कोकणातील अनेक मंदिरांत चोरी झालेली आहे. तसेच पोलिसांना चोर सापडलेले आहेत. तसेच काही मुद्देमालही सापडलेला आहे. पण या मुद्देमालामध्ये काही ठिकाणच्या मूर्त्या मिळालेल्या नाहीत. देवगड तालुक्यातील विजयदुर्ग येथील 25 किलो रामेश्वराची मूर्ती अद्याप हस्तगत झालेली नाही. त्याचा तपासही लागलेला नाही.

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर ....

या सर्व चोरांची लिंक गुजरातपर्यंत गेलेली आहे. या मौल्यवान मूर्त्या दुर्मिळ असल्यामुळे त्यांची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये मोठी किंमत असल्यामुळे या मूर्त्या आणि मुखवटे चोरीला गेलेले आहेत. या मूर्त्यांचे काय झाले याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी निवेदन करावे.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश बागवे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी या अर्धा-तास चर्चेच्या अनुषंगाने जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याबाबत सांगू इच्छितो की, धूतपापेश्वर या पुरातन मंदिरामध्ये 6.9.2009 रोजी जो चोरीचा गुन्हा घडला त्या अनुषंगाने राजापूर पोलीस स्टेशनमध्ये त्याची नोंद केलेली आहे. या गुन्ह्यातील एकूण 12 आरोपी होते. त्यापैकी जो मुख्य आरोपी होता तो मयत झालेला आहे. इतर आरोपीपैकी संजय नावाचा एक आरोपी, ज्याचे गाव माहीत नाही, तो फरारी आहे. बाकीच्या 10 आरोपींना अटक केलेली आहे. हे दहा आरोपी मुंबई, नाशिक, गुजरात या ठिकाणचे आहेत. मंदिरामधून देवीच्या सोन्याच्या मूर्त्या चोरीला गेल्या त्यापैकी मूळ 18 पितळी सोंगट्या पोलिसांनी हस्तगत केलेल्या आहेत. 2 पितळी नाग हस्तगत केलेले आहेत. असे धूतपापेश्वर मंदिरातून चोरीला गेलेले मूळ दागिने हस्तगत केलेले आहेत. चोरट्यांनी जे दागिने तोडून मोडून विकले त्यापैकी 21 तोळे सोने, 13.5 किलो चांदी, 15 किलो पितळ आणि 1 किलो चांदी असा एकूण 6 लाख 50 हजार 327 रुपयांचा माल रिकव्हर झालेला आहे. या गुन्ह्यातील जे आरोपी आहेत त्यातील जो मुख्य आरोपी होता तो मयत झालेला आहे. त्याच्या मिसेसला देखील आरोपी करण्यात आलेले आहे. या गुन्ह्याची सखोल चौकशी व्हावी यासाठी त्याच्या मिसेसची नार्को टेस्ट करण्यासाठी न्यायालयामध्ये अर्ज केला आणि त्याला मान्यता सुध्दा मिळाली आहे. या चौकशीत आणखी माल निष्पन्न होईल.

**तालिका सभापती** ( श्री. रमेश शेंडगे ) : मुख्य आरोपीचे नाव काय आहे ?

श्री. रमेश बागवे : मुख्य आरोपीचे नाव दिनेश जैन कुटिया असून तो मयत झाला आहे. संजय नावाचा आरोपी फरार आहे. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी सांगितले की, अनेक मंदिरांमध्ये चोऱ्या झाल्या. ही गोष्ट खरी आहे. या आरोपींनी धूतपापेश्वर मंदिराव्यतिरिक्त इतर ठिकाणी केलेले 20 गुन्हे देखील पोलिसांनी उघडकीस आणलेले आहेत. त्या 20 गुन्ह्यातील संपूर्ण 7 लाख 92 हजार 977 रुपयांचा माल तसेच त्यांनी वापरलेली तीन वाहने हस्तगत करुन साडेबारा लाख असे सर्व मिळून एकूण 26 लाख 93 हजार रुपये या 20 गुन्ह्यातून निष्पन्न झाले. सिंधुदुर्ग, सातारा, रत्नागिरी या भागामध्ये ज्या चोऱ्या झाल्या त्यापेकी 20 चोरीचे गुन्हे उघडकीस आलेले आहेत. त्याची आणखी सखोल चौकशी करण्यासाठी मयत झालेल्या मुख्य आरोपीच्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ D/ KTG/ ST

श्री. रमेश बागवे .....

मिसेसला आरोपी केलेले आहे. पोलिसांचे असे म्हणणे आहे की यातून आणखी काही निष्पन्न होण्याची शक्यता आहे. हा गुन्हा स्थानिक क्राईम खात्याकडे दिलेला असल्यामुळे अनेक मुद्देमाल हस्तगत केलेला आहे. मंदिरातील सर्व मूर्त्या आणि सोने आणि इतर सामान मिळून 26 लाखाचा माल हस्तगत केलेला आहे. आरोपींना अटक केलेली आहे आणि त्यातून आणखी काही निष्पन्न होण्याची शक्यता आहे आणि त्यादृष्टीने तपास चालू आहे.

---

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : माध्यमिक शाळांमधील शिक्षकांची विना अनुदानित सेवा वरिष्ठ/निवड श्रेणीसाठी ग्राहय धरण्याच्या निर्णयातून प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळातील शिक्षकेतर कर्मचा-यांना वगळण्यात येणे

**मु. शी.** : माध्यमिक शाळांमधील शिक्षकांची विना अनुदानित सेवा वरिष्ठ/निवड श्रेणीसाठी ग्राहय धरण्याच्या निर्णयातून प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळातील शिक्षकेतर कर्मचा-यांना वगळण्यात येणे यासंबंधी श्री.रामनाथ मोते, वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"राज्यातील माध्यमिक, प्राथमिक व उच्च माध्यमिक खाजगी अनुदानित व विनाअनुदानित शाळांना 1981 ची नियमावली लागू असणे, कर्मचारी या संज्ञेत प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक शिक्षकेतरांचा समावेश असणे, माध्यमिक शाळांमधील शिक्षकांची विनाअनुदानित सेवा वरिष्ठ / निवड श्रेणीसाठी ग्राह्य धरण्याचा धोरणात्मक निर्णय घेऊन शासन निर्णय काढला असणे, या शासन निर्णयातून प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळांचे शिक्षक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व प्राथमिक शाळांमधील शिक्षकेतर कर्मचारी वगळण्यांत आले असून प्राथमिक व उच्च माध्यमिक शिक्षक तसेच सर्व विभागीय शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवर अन्याय झालेला असणे, शासन निर्णयाचा लाभ सर्वांना देण्याचे मान्य करुनही सुधारित शासन निर्णय अद्यापही काढलेला नसणे, सर्व विभागातील शिक्षकेतरांना व प्राथमिक आणि उच्च माध्यमिक विभागातील शिक्षकांना वंचित ठेवले असणे याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, विना अनुदानित शाळेतील सेवा आहे ती सेवा वरिष्ठ वेतनश्रेणी व निवडश्रेणीसाठी ग्राहय धरण्याबाबतचा हा प्रश्न आहे. या राज्यामध्ये दोन प्रकारच्या शाळा आहेत. एक म्हणजे अनुदान न मिळणा-या शाळा आणि दुस-या अनुदान मिळणाऱ्या शाळा आहेत. काही

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

शाळा विना अनुदानित तत्वावरील असतात. शासनाच्या प्रचलित नियमानुसार त्या अनुदानावर येतात. अनुदानित व विना अनुदानित शाळांमध्ये काम करणारे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना 1977 चा कायदा व 1981 ची नियमावली लागू आहे. ही नियमावली व कायदा अनुदानित शाळांमध्ये, विना अनुदानित शाळांमध्ये व सर्व प्रकारच्या शाळांमध्ये लागू आहे. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची संपूर्ण कालावधीत केलेली एकूण सेवा किंवा विना अनुदानित कालावधीतील असली तरी सुध्दा, कायम विना अनुदानित शाळेतील असली तरी सुध्दा आणि अनुदानित शाळेतील सेवा असली तरी सुध्दा ही सर्व सेवा पेन्शनसाठी ग्राहय धरली जाते, ग्रॅच्यूईटीसाठी, वेतनवाढीसाठी, वेतन निश्चितीसाठी ग्राहय धरली जाते, फक्त ती सेवा वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी ग्राहय धरली जात नव्हती. यासंदर्भात सभागृहात व सभागृहाच्या बाहेर अनेक वेळा आंदोलने झाली होती. शासनाने ते मान्य केले नाही. म्हणून हे प्रकरण हायकोर्टामध्ये गेले. हायकोर्टामध्ये याचिका क्र.4346/2000 यासंदर्भात 14.9.2000 रोजी निर्णय दिला की, विना अनुदानित सेवा वरिष्ठ वेतनश्रेणीसाठी ग्राहय धरणे बंधनकारक आहे, ते नाकारु शकत नाही. हा निकाल 2000 साली लागला, पण त्यानंतरही आम्हाला सभागृहामध्ये व सभागृहाच्या बाहेर सुध्दा 6 वर्षे संघर्ष करावा लागला. त्यानंतर शासनाने दि.28.11.2006 रोजी जी.आर.काढला. त्या जी.आर.नुसार विना अनुदानित सेवा वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी ग्राहय धरण्यात आल्या. पण हा आदेश फक्त माध्यमिक शाळासाठी, माध्यमिक शिक्षकांसाठी लागू केला. या राज्यामध्ये माध्यमिक शाळांबरोबरच उच्च माध्यमिकचे शिक्षक आहेत. माध्यमिक शाळांबरोबरच प्राथमिक शाळा आहेत, उच्च माध्यमिक शाळा आहेत. या शाळांमध्ये काम करणारे जे शिक्षकेतर कर्मचारी आहेत त्यांना 12 व 24 वर्षानंतर कालबध्द पदोन्नती लागू होते. प्राथमिक शिक्षकांना 12 वर्षानंतर वरिष्ठ श्रेणी मिळते, 24 वर्षानंतर निवड श्रेणी आहे. परंतु दि.28.11.06 च्या जी.आर.मध्ये या सगळयांना वगळण्यात आले आहे. फक्त माध्यमिकच्या शिक्षकांनाच हा जी.आर.लागू केला आहे. हे जे घटक वगळले आहेत त्यांना सुध्दा तो लागू करावा, यांच्यासाठी तरतूद करावी अशी मागणी आहे. या जी.आर.मध्ये अनेक त्रुटी आहेत. त्या त्रुटी शासनाच्या

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

निदर्शनास आणून दिल्या आहेत, परंतु त्या दुरुस्त झाल्या नाहीत. हा जी.आर.प्राथमिक शिक्षकांसाठी, उच्च माध्यमिक शिक्षकांसाठी, सर्वात महत्वाचे म्हणजे गरीब शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी, चतुर्थश्रेणी कर्मचा-यांसाठी लागू केला नाही. हा निर्णय 2006 चा आहे, आता 2010 चालू आहे. प्रत्येक वेळी हा विषय उपस्थित केल्यावर हा प्रश्न विचाराधीन आहे असे आम्हाला उत्तर मिळते. जसे आम्हाला निर्णय मिळण्यासाठी न्यायालयात जावे लागले, त्याप्रमाणे हा निर्णय लागू करण्यासाठी आम्हाला न्यायालयामध्येच जावे लागेल काय ? शासनाला न्यायालयाची भाषा समजते काय ?

यानंतर श्री.शिगम...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. रामनाथ मोते...

लोकप्रतिनिधींनी विनंती करुन, पत्रव्यवहार करुन, वारंवार याचना करुनही शासनाच्या हे लक्षात का येत नाही ? म्हणून माझे या निमित्ताने दोन तीन प्रश्न आहेत. एक म्हणजे 28 फेब्रुवारी 2006चा शासन निर्णय जो उच्च माध्यमिक शिक्षकांसाठी लागू केलेला आहे तो प्राथमिक, उच्च माध्यमिक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांसाठी तातडीने लागू करणार आहात काय ? दुसरे म्हणजे मागील 5 वर्षापासून प्रयत्न करीत असूनही हे प्रकरण मार्गी लागलेले नाही. या प्रकरणी एवढा विलंब का झालेला आहे ? विलंबाची कारणे माननीय मंत्री महोदयांनी द्यावीत. तसेच कोणत्या अधिका-याकडे हे प्रकरण प्रलंबित राहिलेले आहे हे या चर्चेच्या निमित्ताने सांगावे.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मूळ प्रश्न हा आहे की, 28 नोव्हेंबर 2006मध्ये माध्यमिक शिक्षकांच्या प्रतिनिधींनी हायकोर्टामध्ये रिट पिटीशन दाखल केले होते. त्याबाबतीत कोर्टाने असे आदेश दिले की, ज्या विनाअनुदानित शाळा आहेत त्यांना सुध्दा त्रिस्तरीय वेतनश्रेणीचा लाभ मिळावा. त्यानुसार खाजगी विनाअनुदानित शाळांच्या बाबतीत शासनाने सर्क्युलर काढले. त्यानंतर प्राथमिक शिक्षक, उच्च माध्यमिक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांचा प्रश्न राहिला. यांना देखील हा लाभ मिळावा यासाठी संचालकांनी शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. यामुळे दरवर्षी शासनाला 27 कोटी 41 लाख 40 हजार एवढा खर्च येणार आहे. वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. सदर प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे गेलेला आहे. मंत्रिमंडळामध्ये यावर चर्चा झाल्यानंतर त्यावर निर्णय होईल.

श्री. रामनाथ मोते : आम्ही 5 वर्षे संघर्ष करीत आहोत. यानंतर आम्ही प्रश्न विचारणार नाही किंवा चर्चा घडवून आणणार नाही, संबंधित अधिका-यांना भेटणार नाही किंवा कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार करणार नाही. किती वेळा आम्ही शासनाकडे याचना करायची ? किती वेळा आम्ही शासनाकडे भीक मागायची ? तेव्हा हा प्रश्न 15 दिवसामध्ये, महिन्यामध्ये किंवा दोन महिन्यामध्ये सोडविला जाईल असे शासनाने स्पेसिफिक सांगावे.

प्रा. फौजिया खान : मंत्रिमंडळ यावर लवकरात लवकर निर्णय घेईल, इतकेच मी सांगू शकते.

---

....नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील प्राथमिक शिक्षकांना 1.1.1995 पासून निवडश्रेणीचा लाभ न मिळणे

**मु. शी.** : राज्यातील प्राथमिक शिक्षकांना 1.1.1995 पासून निवडश्रेणीचा लाभ न मिळणे यासंबंधी श्री.रामनाथ मोते, वि.प.स. यां□ उपस्थित □लेली अर्धा-तास चर्चा.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अ□मती□ □□म 92 अ□ये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित □रतो :-

"राज्यातील खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक तसेच अध्यापक विद्यालयातील शिक्षक व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील शिक्षकांना १.१.८६ पासून चट्टोपाध्याय आयोगाच्या शिफारशीनुसार त्रिस्तरीय वेतनश्रेणी लागू करण्याचा शासन निर्णय निर्गमित होणे, माध्यमिक शिक्षकांना प्रत्यक्ष लाभ १.१.९५ पासून देण्याचा निर्णय होणे, प्राथमिक शिक्षकांना निवडश्रेणीचा लाभ १.४.२००४ पासून देण्याचा निर्णय होणे, प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांमध्ये भेदभाव निर्माण करणे, प्राथमिक शिक्षकांना १.१.९५ पासून लाभ न देऊन त्यांचे ९ वर्षांचे आर्थिक नुकसान करणे, प्राथमिक शिक्षकांनाही १.१.९५ पासूनच निवडश्रेणीचा लाभ देण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सन्माननीय सभापती महोदय, प्राथमिक शिक्षकांच्या निवडश्रेणीच्या संदर्भातील ही अर्धातास चर्चा आहे. दिनांक 2 सप्टेंबर, 1989 रोजी शासनाने एक धोरणात्मक निर्णय घेतला आणि 1.1.1986 पासून या राज्यातील राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणेच या राज्यातील सर्व प्रकारच्या शाळांसाठी म्हणजे प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांमध्ये काम करणाऱ्या पूर्णवेळ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी त्रिस्तरीय वेतनश्रेणी किंवा चट्टोपाध्याय आयोग लागू झाला. दिनांक 2 सप्टेंबर, 1989 रोजी त्या संदर्भातील शासन निर्णय निघाला. या शासन निर्णयामध्ये स्पष्ट तरतूद आहे. प्राथमिक, माध्यमिक शिक्षकांना 12 वर्षानंतर वरिष्ठ वेतनश्रेणी आणि 24 वर्षानंतर निवडश्रेणी लागू केली. त्या संदर्भात काही अटी आणि निकष ठरवून दिले. सेवांतर्गत प्रशिक्षण पूर्ण करणे, कामकाज समाधानकारक असणे अशी अट होती. 24 वर्षानंतर निवडश्रेणी लागू

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते.....

करताना उच्च अर्हता प्राप्त करणे, समाधानकारक काम करणे, सेवांतर्गत प्रशिक्षण पूर्ण करणे या सर्व अटींच्या आधारे 12 वर्षानंतर वरिष्ठ वेतनश्रेणी आणि 24 वर्षानंतर निवडश्रेणी देण्याचा शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला. हा निर्णय प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षकांना लागू झाला. परंतु शासनाच्या 8 डिसेंबर, 1995 च्या शासन निर्णयानुसार माध्यमिक शिक्षकांसाठी 1.1.1986 पासून लाभ न देता 12 वर्षानंतर वरिष्ठ वेतनश्रेणी आणि 24 वर्षानंतर निवडश्रेणी 1.1.1995 पासून लागू केली आहे. ज्या मूळ जी.आर.मध्ये म्हणजे 2 सप्टेंबर, 1989 च्या जी.आर.मध्ये प्राथमिक शिक्षकांसाठी माध्यमिक शिक्षकांप्रमाणे 1.1.1995 पासून निवडश्रेणी लागू व्हावयास हवी होती, ती त्याप्रमाणे लागू झाली नाही. माध्यमिक शिक्षकांना मानीव वेतनवाढ देऊन 1.1.1995 पासून लाभ देण्यात आला. त्याच पध्दतीने प्राथमिक शिक्षकांना हा निर्णय लागू होणे आवश्यक होते. या राज्यातील प्राथमिक शिक्षकांना मात्र शासनाने जाणीवपूर्वक डावलले आहे. त्यांच्यासाठी जी.आर. निघाला तो 20 जुलै, 2004 रोजी. त्यांना निवडश्रेणी 1 एप्रिल, 2004 पासून लागू केली. म्हणजे या राज्यामध्ये प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षकांना 1981 चा कायदा लागू आहे. या कायद्याच्या कक्षेमध्ये प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी येतात. माध्यमिक शिक्षकांना 1.1.1995 पासून व प्राथमिक शिक्षकांना 1.4.2004 पासून निवडश्रेणी द्यायचा निर्णय घेतला. हा जो भेदभाव निर्माण केला, ही जी तफावत शासनाने माध्यमिक व प्राथमिक शिक्षकांमध्ये ठेवली आहे याबद्दल आमचा आक्षेप आहे. म्हणून ज्या पध्दतीने माध्यमिक शिक्षकांसाठी 1.1.1995 पासून 24 वर्षानंतरची निवडश्रेणी लागू केली, 1986 पासून मानीव वेतनवाढ दिली, प्रत्यक्ष आर्थिक फायदा दिला. तोच फायदा प्राथमिक शिक्षकांना सुध्दा 1.4.2004 पासून लागू केला असला तरी मागचा लाभ, मानीव वेतनवाढ माध्यमिक शिक्षकांप्रमाणे देऊन 1.1.1995 पासून देऊन त्यांच्यावरील अन्याय दूर करण्यासंदर्भात शासनाने निश्चितपणे विचार करावा अशी विनंती करतो.

नंतर 5ए.1...

अशुद्धीत मत / शुद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

म्हणून हा जी.आर. जो 20 जुलै, 2004 रोजी काढलेला आहे त्या जी.आर.मध्ये दि. 1.4.2004 पासून प्राथमिक शिक्षकांना निवडश्रेणी लागू केली आहे. त्यात बदल करुन दि. 8 सप्टेबर, 1995 रोजी काढलेल्या जी.आर. नुसार फायदा देणार काय ?

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान ( शालेय शिंक्षण राज्यमंत्री) : महोदय, चटोपाध्याय आयोगानुसार तीन प्रकारच्या वेतनश्रेण्या शिक्षकांना लागू केल्या आहेत. त्यात मूळ वेतनश्रेणी, वरिष्ठ वेतनश्रेणी आणि तिसरी निवडश्रेणी वेतनश्रेणी. या वेतनश्रेण्या प्रामुख्याने 12 वर्षांनी एक वरिष्ठ आणि त्यानंतर पुन्हा 12 वर्षांनी निवडश्रेणी वेतनश्रेणी शिक्षक आणि बाकीच्या कर्मचाऱ्यांना पात्रतेनुसार लागू करण्यात येते. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे माध्यमिक शिक्षकांच्या बाबतीत दि. 1.1.1995 रोजी जो निर्णय शासनाने घेतला तो निर्णय प्राथमिक शिक्षकांना लागू करण्यासंबंधी त्यांनी मागणी केली आहे. पण हा निर्णय झाल्यानंतर काही काळ शिक्षकांनी निदर्शने केली व शासनाकडे अशा प्रकारच्या वेतनश्रेणीची मागणी केली व त्यानुसार प्राथमिक शिक्षकांना हे तत्व लागू झाले. पण यामध्ये परिस्थिती अशी आहे की, ज्यावेळी सन 2002 मध्ये प्राथमिक शिक्षक कोर्टात गेले आणि त्यानंतर सन 2004 मध्ये आदेश निर्गमित झाले त्यामध्ये असा स्पष्ट उल्लेख आहे की हा फायदा रिट्रास्पेक्टीव्ह इफेक्ट स्वरुपात मिळणार नाही व अशा प्रकारे प्राथमिक शिक्षकांना हा निर्णय सन 2004 पासून लागू होईल. त्यानंतर सुध्दा मागणी करण्यात आली, निदर्शने झाली व नंतर पुन्हा यासंबंधीचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर गेला. यामध्ये जिल्हा परिषदा, नगरपरिषदा, महानगरपालिका आणि विनाअनुदानित संस्था अशा सर्व ठिकाणच्या शिक्षकांबाबतची मागणी होती व त्यांना दि. 1 एप्रिल, 2004 पासून हा निर्णय लागू करण्यासंबंधीचा निर्णय घेण्याबाबत जो प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर गेला तो प्रस्ताव मंत्रिमंडळाने रद्द केला. त्यानंतर यासंबंधी कोणताही निर्णय घेणे उचित होणार नाही, कारण यासंबंधी शासनाचे अगोदरच निर्णय घेतलेला आहे.

श्री. रामनाथ मोते : महोदय, मंत्री महोदयांच्या बोलण्यातून मला असे जाणवले की, न्यायालयाने सन 2004 पासून माध्यमिक शिक्षकांप्रमाणे प्राथमिक शिक्षकांना सुध्दा ही वेतनश्रेणी लागू करावी असे आदेश दिलेले आहेत. न्यायालयाने निदेश दिले त्यात असे स्पष्ट म्हटले काय ?

प्रा. फौजिया खान : महोदय, शासनाने न्यायालयाच्या आदेशानुसार निर्णय घेतला आहे.

श्री. रामनाथ मोते : महोदय, मंत्री महोदयांनी न्यायालयाने निर्णय दिला की रिट्रॉस्पेक्टी इफेक्ट देता येणार नाही असे म्हटले आहे. म्हणून मी प्रश्न विचारला आहे की, असे न्यायालयाचे आदेश आहेत काय ?

प्रा. फौजिया खान (बसून) : नाही.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील सर्व स्तराच्या शालेय शिक्षकांना सहावा वेतन आयोग लागू करताना वेतन सुधारणा समितीने केलेल्या विसंगत शिफारशी

**मु. शी.** : राज्यातील सर्व स्तराच्या शालेय शिक्षकांना सहावा वेतन आयोग लागू करताना वेतन सुधारणा समितीने केलेल्या विसंगत शिफारशी या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 18 ला दिनांक 11 डिसेंबर, 2009 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात प्रा.बी.टी.देशमुख, सर्वश्री. वसंतराव खोटरे, दिलीपराव सोनवणे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, "राज्यातील सर्व स्तराच्या शालेय शिक्षकांना सहावा वेतन आयोग लागू करताना वेतन सुधारणा समितीने केलेल्या विसंगत शिफारशी" या विषयावरील प्रा.बी.टी.देशमुख, श्री. वसंतराव खोटरे, श्री. दिलीपराव सोनवणे, वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक 18 ला दिनांक 11 डिसेंबर, 2009 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

महोदय, सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्यांमध्ये कशा पध्दतीने शिक्षकांवर अन्याय झाला हे निदर्शनास आणण्यासाठी मी ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे. दर दहा वर्षांनी केंद्रशासन आपल्या कर्मचाऱ्यांना वेतन आयोग लागू करते त्यानुसार देशातील इतर राज्ये सुध्दा आपापल्या परीने वेतन आयोग लागू करीत असतात. तत्कालीन मुख्यमंत्री श्री. शरदचंद्र पवार यांच्या कारकिर्दीत मंत्रिमंडळाने असा निर्णय घेतला होता की, ज्या ज्या वेळेस केंद्रशासन वेतन आयोग आणि वेतन संरचनेत बदल करील त्या त्या वेळेस

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुद्धारित प्रत / शीघ्रलेखाची नाही

श्री. विक्रम काळे....

केंद्रसरकारचीच वेतन संरचना राज्यातील कर्मचा-यांनाही लागू केली जाईल त्या निर्णयाचे प्रोसिडींग सुध्दा माझ्याकडे उपलब्ध आहे. त्यानुसार 1 एप्रिल,1976 रोजी भोळे आयोग आला व त्यानुसार चवथा वेतन आयोग या राज्यातील कर्मचा-यांना लागू झाला त्याच पध्दतीने शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांनाही हा चवथा वेतन आयोग जसाच्या तसा लागू झाला होता. 1 जानेवारी,1996 पासून केंद्रसरकारने पाचवा वेतन आयोग लागू केला होता व त्यानुसार आपल्या राज्याने सुध्दा 1 जानेवारी, 1996 पासून पाचवा वेतन आयोग जसाच्या तसा लागू केला व त्याच पध्दतीने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांनाही हा पाचवा वेतन आयोग जसाच्या तसा लागू केला. परंतु सहाव्या वेतनाच्या वेळेस काय माशी शिंकली ते कळत नाही. 1 जानेवारी, 2006 पासून केंद्रसरकारने सहावा वेतन आयोग लागू केला त्यानंतर हा सहावा वेतन आयोग आपल्या राज्यात लागू करण्याबाबत या सरकारला कोणती बुध्दी सुचली ते माहिती नाही यासंदर्भात माननीय हकीम साहेबांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली. वास्तविक पहाता केंद्रसरकारने वेतनाच्या ज्या काही संरचना आणल्या त्या संरचना जशाच्या तशा राज्यातील कर्मचा-यांना देणे भाग होते. परंतु 1 लाख रुपयांचे मानधन देऊन ते काम अधिक पणाने चांगले व्हावयास पाहिजे होते परंतु कोठे माशी शिंकली ते माहीत नाही. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांच्या वेतन संरचनेमध्ये बदल करण्याचे काम हकीम साहेबांनी केले. वास्तविक पाहता हा निर्णय मंत्रिमंडळाचा आहे परंतु मत्रीमंडळाच्या निर्णयावर गदा आणण्याचे काम हकीम साहेबांनी व त्यांच्या समितीने केलेले आहे. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या वेतनश्रेण्या जशाच्या तशा ठेवल्या परंतु शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांचे जे काही पे बँड आहेत, ग्रेड पे आहेत त्यावर या हकीम समितीने कु-हाड चालवली आहे. 28 मे, 2009 रोजी आपल्या मंत्रिमंडळाने सहावा वेतन आयोग स्वीकारला होता. परंतु या सहाव्या वेतनाच्या अगोदर 15 दिवस आम्हाला अशी माहिती मिळाली होती की, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांवर अन्याय होणार आहे त्यामुळे मी आणि माझे सहकारी प्रा. बी.टी.देशमुख व

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे....

श्री. वसंतराव खोटरे आम्ही तिघांनी तातडीने माननीय मुख्यमंत्री महोदय श्री.अशोक चव्हाण व तत्कालीन अर्थमंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील यांची भेट घेऊन विनंती केली की, सहाव्या वेतन आयोगामध्ये आमच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांवर अन्याय झाल्याची माहिती मिळालेली असल्यामुळे तो अहवाल आम्हाला दाखविण्यात यावा. तसेच माहितीच्या अधिकाराखाली सुध्दा आम्ही यासंदर्भात मागणी केली परंतु ही बाब गोपनीय असल्यामुळे अहवाल उपलब्ध करुन देता येत नाही असे आम्हाला सांगण्यात आले, परंतु जर आपल्या कर्मचा-यांवर अन्याय झाला असेल तर तो अन्याय दूर करु असे आश्वासन आम्हाला माननीय मुख्यमंत्री तसेच तत्कालीन अर्थमंत्र्यांनी दिले होते. 28 मे रोजी हा सहावा वेतन आयोग आपल्या राज्याने स्वीकारला तेव्हा त्याची प्रत आम्हाला मिळाली व तेव्हा आम्हाला दिसून आले की, आमच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांवर या हकीम समितीने कु-हाड चालवण्याचे काम केलेले आहे. केंद्रातील प्रायमरी शिक्षकांना 4200 रुपयांचा पे बँड दिलेला आहे व दुसरा पे बँड 4,600 रुपयांचा दिलेला आहे आणि तिसरा पे बँड 4,800 रुपयांचा दिलेला आहे परंतु आपल्या राज्यातील प्रायमरी शिक्षकांना मात्र 2800 रुपये पे बँड दिलेला आहे, दुसरा 4200 रुपये पे बँड दिलेला आहे व तिसरा पे बँड 4300 रुपये दिलेला आहे. आपल्या राज्यातील प्रायमरी शिक्षकांच्या पे बँड मध्ये कटोती करण्यास यांना कोणी सांगितले होते ? 400 ते 700 रुपयांची कटोती करण्याचे सामर्थ्य हकीम समितीने दाखवले आहे. केंद्रसरकारच्या माध्यमिक शिक्षकांना 4600 रुपये पे बँड दिलेला आहे व राज्य शासनाने 4300 रुपयांचा पे बँड दिलेला आहे. केंद्रसरकारने माध्यमिक शिक्षकांना दुसरा ग्रेड पे 4800 रुपयांचा दिला आहे व आपल्या राज्य सरकारने 4400 रुपये ग्रेड पे दिलेला आहे. केंद्राने माध्यमिक शिक्षकांना तिसरा ग्रेड पे 5400 रुपयांचा दिला असून आपल्या राज्य सरकारने 4800 रुपयांचा दिला आहे. उच्च माध्यमिक शाळांमध्ये पोस्ट ग्रॅज्युएट शिक्षक काम करतात त्यांना केंद्रसरकारने 4,800 रुपये पे बँड दिलेला असून राज्य शासनाने 4,600 रुपये पे बँड दिलेला आहे. केंद्राने दुसरा पे बँड 5,400 रुपये पे बँड दिलेला असून आपल्या शासनाने 5,400 रुपये पे बँड दिलेला असून या मध्ये हकीम समितीने काहीही कटोती केलेली नाही. परंतु तिसरा पे बँड केंद्रसरकारने 6700 रुपयांचा दिलेला आहे परंतु राज्य शासनाच्या हकमी समितीने 5700 रुपयांचा पे बँड दिलेला आहे.

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे....

हे करण्याचे कारण काय ? त्यांना एक लाख रूपये मानधन कर्मचाऱ्यांचे वेतन कमी करण्यासाठी दिले होते का? यामुळे शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला. याच पद्धतीने महसूल विभागात देखील वेतनाच्या त्रुटी राहिल्या. मंत्रालयीन कर्मचाऱ्यांच्याबाबतीत देखील त्रुटी राहिल्या. म्हणून त्यांनी आंदोलन केले. त्यावेळी संपूर्ण मंत्रालय बंद होते. राज्यामध्ये 4 ऑगस्ट 2009 रोजी सर्व शासकीय कर्मचाऱ्यांनी लाक्षणिक संप केला. आम्ही विचारले तर आम्हाला तोंडी सांगितले जाते की, केंद्रामध्ये शिक्षकांची संख्या 1 टक्का आहे. राज्यामध्ये शिक्षकांची संख्या जास्त आहे. राज्य शिक्षकांची संख्या जास्त असली तरी आमचे शिक्षक केंद्र शासनाच्या शिक्षकांपेक्षा कमी काम करतात काय ? म्हणून आम्हाला शासन कमी पेबॅण्ड देते काय ? असे जर विचारले ते चुकीचे होईल. जेवढे केंद्राचे शिक्षक काम करतात तेवढचे राज्यातील शिक्षक काम करतात. तेव्हा शासनाने केंद्रातील शिक्षक जास्त काम करतात आणि राज्यातील शिक्षक कमी काम करतात याला कुठला मापदंड लावला. येथे आपल्याला वेगळा मापदंड लावता येणार नाही. येथे माननीय उच्च शिक्षण मंत्री बसलेले आहेत. वरिष्ठ महाविद्यालयात अध्यापक काम करतात त्यांना केंद्राने जी वेतनश्रेणी दिली ती त्यांनी बाणेदारपणाने आपल्या राज्यातील प्राध्यापकांना लागू करण्याचे काम केले. त्यांनी दोन पैशाचीसुद्धा कपात केली नाही. प्राथमिक, माध्यमिक शिक्षकांना कसेही दामटले तरी चालते असे समजून त्यांच्यावर कुऱ्हाड चालविली जाते. त्यांच्यावर फार मोठा अन्याय राज्य शासनाने आणि हकिम समितीने केला आहे. मंत्रिमहोदय काय उत्तर देणार आहेत याची मला कल्पना आहे. त्यांनी एका ओळीत उत्तर लिहून आणले आहे. आम्ही वेतनत्रुटी समिती नेमली आहे. आमचे काम सुरू आहे. हे काम वषानुवर्षे सुरू राहणार आहे हे आम्हाला माहिती आहे. वेतनत्रुटी समितीमध्ये आमचा अन्याय दूर झाला पाहिजे. तरच त्या समितीला काही तरी अर्थ राहील. मंत्रिमहोदय, आपण महाराष्ट्रातील नागपूर सारख्या कोपऱ्यातून आलेला आहात. म्हणून आपण न्याय दिला पाहिजे. वेतन त्रुटी समितीने काय काम चालविले आहे, कशा पद्धतीने विविध कर्मचाऱ्यांनी म्हणणे मांडले आहे, त्यावर काय सुधारणा वेतन त्रुटी समिती करते आहे, हे बघितले पाहिजे. या समितीने सुधारणा केली की नाही हे मंत्रिमंडळापुढे आले पाहिजे.

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे...

सभापती महोदय, आदर्श शिक्षक पुरस्कार राज्यामध्ये दिला जातो. चांगले काम करणाऱ्या शिक्षकांच्या पाठीवर शाबासकी मिळावी, प्रोत्साहन मिळावे म्हणून राज्य व जिल्हा स्तरावर आदर्श शिक्षक पुरस्कार दिला जातो. त्यांना हा पुरस्कार मिळतो त्यांना दोन वेतन वाढी दिल्या जातात. पण सहाव्या वेतन आयोगामध्ये ही तरतूद वगळण्यात आली आहे. सहाव्या वेतन आयोगामध्ये वेतनवाढ देण्यात येणार आहे की, नाही याचा कुठेही उल्लेख नाही. जसा मागच्या वेळेस आपण बाणेदारपणा दाखवला तसा आपण पुन्हा दाखवावा. त्यामुळेच आपण पुन्हा मंत्रिमंडळामध्ये आलात ते चांगले काम करण्यासाठी. आपण नागपूरचे आहात म्हणून पुन्हा बाणेदारपणा दाखवावा आणि शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवर जो काही अन्याय झालेला आहे, तो दूर करावा. येथे एका ओळीचे उत्तर वाचून आपण थांबू नका. शाहू,फुले,आंबेडकरांचे राज्य जेव्हा आम्ही म्हणतो तेव्हा शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना न्याय मिळाला पाहिजे ही महत्त्वाची भूमिका माझी आहे. आपण त्रुटी समिती नेमली आहे, तिला मे अखेर पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. या समितीने ज्या वेतनश्रेणीवर अन्याय केलेला आहे त्याबाबत विचार करणे आवश्यक आहे. त्यामुळे राज्यातील जेवढे म्हणून कर्मचारी असतील, ज्यांच्या ज्यांच्यावर अन्याय झालेला आहे, ज्या ज्या कर्मचारी संघटने आपले म्हणणे वेतन त्रुटीसमोर मांडलेले आहे, या सगळ्यांचे म्हणणे विचारात घेतले पाहिजे आणि त्यानुसार वेतन श्रेणी आणि पे बँडमध्ये पुढील शैक्षणिक वर्ष सुरू होण्याच्या अगोदर दुरूस्ती करावी अशी विनंती मी येथे करतो. धन्यवाद.

.....

यानंतर श्री.गायकवाड...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपी नाही

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक ) :सभापती महोदय, मला एकच मुद्दा मांडावयाचा आहे.वेतन त्रृटीसमितीसमोर आमची बैठक झाली होती त्यावेळी चर्चा झाली होती. त्यावेळी शालेय शिक्षण विभागातील जे पदवीधर ग्रंथपाल आहेत त्यांना वेतनश्रेणीच देण्यात आली नाही . ही बाब जेव्हा त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आली होती त्यावेळी वेतन त्रृटी समितीचे अध्यक्ष सन्माननीय श्री बक्षी यांनी आम्हाला असे सागितले की, आमच्याकडून त्रृटी राहून गेलेली आहे. हकीम समितीच्या मूळ अहवालामध्ये यासंबंधीची तरतूद करण्यात आली आहे.शालेय शिक्षण विभागाला तातडीने यासबधीचे आदेश तातडीने देण्यात येतील असे आम्हाला सागण्यात आले होते तेव्हा शालेय शिक्षण विभागाला माननीय मंत्री महोदय तातडीने आदेश देऊन पदवीधर ग्रंथपालाना वेतनश्रेणी देण्यात येणार आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2..

श्री.विजय वडेट्टीवार (वित्त राज्यमंत्री): सभापती महोदय सन्माननीय सदस्य श्री विक्रम काळे यांनी अत्यंत पोटतिडकीने , तडफेने आणि आवाज वाढवून बाणेदारपणाने शिक्षकांच्या वेतनश्रेणींसबंधी अर्धा तास चर्चा उपस्थित केलेली आहे.त्यानासुध्दा यातील काही गोष्टी माहीत आहेत. सन्माननीय सदस्य विरोधी पक्षात नव्हे तर सत्ताधारी पक्षात बसलेले आहेत ही गोष्ट देखील सन्माननीय सदस्यांनी लक्षात ठेवली पाहिजे. सत्ताधारी पक्षाचे सदस्य म्हणून शासनाच्या निर्णयामध्ये त्यांचा देखील सहभाग असतो.राज्य सरकारकडे जो काही निधी उपलब्ध असतो त्यातून राज्य सरकारला विकासासाठी आणि कर्मचा-याच्या पगारासाठी तरतूद करावी लागते. आज राज्य सरकारी कर्मचा-यांवर 41 हजार कोटी रुपये खर्च होत आहेत. केन्द्र सरकारच्या कर्मचा-यांच्या तुलनेने केन्द्र सरकारचे शिक्षक एक टक्के आहेत आणि आपले शिक्षक 31 टक्के आहेत त्यामुळे जवळपास 16 हजार 538 कोटी रुपये दर वर्षी शिक्षकांच्या वेतनावर खर्च होत असतात .केन्द्र सरकाराने एक टक्का शिक्षकांसाठी जो काही निर्णय घेतला होता तो निर्णय राज्याच्या विकासासाठी जो निधी लागतो त्याचा विचार करता राज्य सरकारने जशाच्या तसा लागू करणे सध्या तरी शक्य नाही. देशातील अनेक राज्यांनी शिक्षकांच्या किंवा इतर कर्मचा-यांच्या संदर्भात केन्द्राप्रमाणे निर्णय घेतलेला नाही .सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भाषणातच एक ओळीत उत्तर दिलेले असल्यामुळे मला पुन्हा उत्तर देण्याची आवश्यकता नाही. हकीम समिती का नेमण्यात आली होती या प्रश्नाचे उत्तर देखील सन्माननीय सदस्यांनीच दिलेले आहे.हकीम समिती नेमण्याचा उद्देश असा होता की, एखाद्या शिक्षकाला केन्द्राप्रमाणे वेतनश्रेणी दिल्यानंतर एखाद्या वर्ग एक अधिका-याचा देखील विचार केला गेला पाहिजे शिक्षकाच्या वेतनापेक्षा त्याचे वेतन कमी असता कामा नये जर त्याला कमी वेतन दिले तर ते अधिक वेतनाची मागणी करतील . या सगळया गोष्टीचा विचार करीत असतांना सर्वाना न्याय मिळावा यादृष्टीने हकीम समितीचे गठन करण्यात आले होते. मी पुन्हा आपल्याला सांगतो की, दिनांक 31.1.2010 रोजी सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे, श्री.व्ही.यु.डायगव्हाणे यांच्या उपस्थितीमध्ये वेतन त्रृटी समितीची बैठक झाली होती .त्यांना दिनाक 31 मे 2010 पर्यत अहवाल सादर करण्याची मुदत वाढवून देण्यात आलेली आहे. वेतन त्रृटी समिती समोर दिनांक 31.8.2009 पर्यत संबंधित विभागाकडून जे प्रस्ताव

3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय वडेट्टीवार ....

आलेले आहेत त्याच प्रस्तावावर चर्चा होणार आहे व तेवढयाच प्रस्तावावर सुनावणी होणार आहे.दिनांक 31 मे 2010 पर्यत वेतन त्रृटी समितीचा अहवाल शासनाला प्राप्त होणें अपेक्षित आहे. सामितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या शिफारशीच्या अनुषंगाने आवश्यक तो निर्णय शासन नक्की घेईल आणि त्यांच्या भावनाशी शासन निश्चित सहमत होईल असे मी सन्माननीय सदस्यांच्या भावनांना अनुसरुन सांगू इच्छितो. त्यामुळे त्यांच्यावर अन्याय होणार नाही याची दक्षता शासन घेईल.एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

---

नंतर श्री.सरफरे s.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, पदवीधर ग्रंथपालांच्या संदर्भात हकीम समितीच्या अहवालामध्ये नोंद आहे काय?

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी पदवीधर ग्रंथपालांच्या संदर्भात प्रश्न विचारला आहे. त्याबाबत अहवालात करण्यात आलेल्या शिफारशीनुसार निश्चितपणे निर्णय घेतला जाईल.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, अधिकाऱ्यांच्यापुढे शिक्षकांची वेतनश्रेणी जाऊ नये म्हणून आपण शिक्षकांची वेतनश्रेणी कमी केली काय? अशी शंका आमच्या मनामध्ये निर्माण झाली आहे. केंद्र सरकारने अधिकाऱ्यांचे पदनाम पाहून वेतनश्रेणी निश्चित केली, त्याचप्रमाणे शिक्षकांचे पदनाम पाहून त्यांची वेतनश्रेणी निश्चित केली. त्यामुळे शिक्षक आणि राज्य सरकारी कर्मचारी यांच्यामध्ये भांडण लावण्याचा केंद्रसरकारचा उद्देश होता काय? केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी देण्याचे धोरण आपल्या राज्य सरकारने स्वीकारले. देशामध्ये विकासाच्या बाबतीत आपले राज्य पहिल्या क्रमांकावर आहे. यावर्षी आपण महाराष्ट्राचा सुवर्ण महोत्सव साजरा करीत आहोत, या राज्याचा गौरव साजरा करीत आहोत. असे असतांना इतर राज्यांनी काय केले हे पहाण्यापेक्षा आपले राज्य काय करणार आहे हे पहाणे महत्वाचे आहे. त्यामुळे सुवर्ण महोत्सवाचे औचित्य साधून आपण काही चांगले निर्णय घेणार आहात काय? तशाप्रकारची पावले आपण उचलणार आहात काय?

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, हकीम समितीचे गठण करीत असतांना कोणत्याही कर्मचाऱ्यांवर भविष्यामध्ये अन्याय होता कामा नये सर्वांना न्याय दिला पाहिजे हा उद्देश होता. एखाद्या कर्मचाऱ्याला पगार जास्त मिळतो आणि दुसऱ्या कर्मचाऱ्याला पगार कमी मिळतो. यामध्ये वर्ग 1 श्रेणीच्या अधिकाऱ्यांवर अन्याय होऊ नये हे पाहिले गेले. त्याचप्रमाणे राज्यातील उपलब्ध रिसोर्सेसचा विचार करणे महत्वाचे आहे. राज्यामध्ये कोणत्याही वस्तूंवरील करामध्ये वाढ करण्यात आली तर सर्व ठिकाणाहून टिका होते. कर वाढवितांना सर्वांच्या भावना विचारात घ्याव्या लागतात. राज्याच्या एकूण उत्पन्नामध्ये कर्मचाऱ्यांच्य वेतनावर किती टक्के खर्च करता? याबाबत सभागृहाच्या बाहेर चर्चा होत असते. त्यामुळे आपल्या या संदर्भातील भावना मी समजू शकतो. म्हणून या सर्व परिस्थितीचा विचार करता हकीम समितीचा अहवाल येईपर्यंत या संदर्भात काहीही निर्णय घेता येणार नाही.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती बँकेने वैज्ञानिक लेखा परिक्षण व नाबार्डला आढळेल्या आर्थिक घोटाळयांच्या दोषांची पूर्तता न करणे

मु.शी.: सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती बँकेने वैज्ञानिक लेखा परिक्षण व नाबार्डला आढळेल्या आर्थिक घोटाळयांच्या दोषांची पूर्तता न करणे यासंबंधी श्री. परशुराम उपरकर,वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो.

"सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती बँकेने वैज्ञानिक लेखा परिक्षण व नाबार्डला आढळलेल्या आर्थिक घोटाळ्याच्या दोषांबाबत पूर्तता न करणे, त्यामुळे बँकेच्या बॅलन्सशिटमध्ये फायदा दाखवून ठेवीदारांची दिशाभूल करणे, तसेच जिल्हा बँकेला कोअर बँकिंग संगणकीकरण करण्याकरिता आलेल्या निविदांपैकी कमी दराच्या अनुभवी व जागतिक पातळीवर काम करण्याचा अनुभव असलेल्या इन्फ्रासॉप्ट लिमिटेड, निलीरो प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला डावलून कोअर बँकीगच्या संगणकीकरणाचा अनुभव नसलेल्या विद्या ऑनलाइन प्रा.लि. यांच्या जादा दराच्या ३ कोटी ९२ लाख रुपयांच्या निविदेला दिलेला ठेका, मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या निकालांचे व शासन निर्णयाचे उल्लंघन झाल्याचे राज्यमंत्री यांनी दिनांक २१/१२/२००९ रोजी नागपूर अधिवेशनात विधानपरिषद सभागृहात मान्य करुनही कारवाई न होणे, अशा प्रकारच्या गैरकारभाराबाबत कारवाई करण्याचे आदेश होवूनही कोणतीच कारवाई न होणे, यामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बॅकेतील ठेवीदारांचा विश्वास ढळल्याने याबाबत शासनाने बँकेवर प्रशासक नेमणूक करुन चौकशी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती बॅकेच्या बाबतीत या सभागृहामध्ये अनेक वेळा प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. मी या संदर्भात दोन-तीन प्रश्न विचारणार आहे त्याचे मंत्रिमहोदयांनी उत्तर द्यावे. मागील वेळी मी प्रश्न विचारला होता की, बॅकेने वैज्ञानिक लेखा परिक्षण व नाबार्डला आढळलेल्या आर्थिक घोटाळयाच्या दोषांबाबत पूर्तता करण्यासंबंधी उत्तर दिले होते. याठिकाणी संचालक मंडळाने 30.3.2010 रोजी मंजूरी घेतली आणि नाबार्डकडे दुरुस्ती अहवाल सादर करण्याची प्रक्रिया सुरु केली. ही प्रक्रिया किती कालावधीत पूर्ण होईल? आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री.परशुराम उपरकर...

त्याबाबत तातडीने निकाल लागेल काय? त्याबाबत सहकार विभागाकडून चौकशी केली जाईल काय? तसेच, त्याठिकाणी 148 कर्मचारी रोजंदारीवर भरले गेले. त्या संदर्भात जुन्या संचालक मंडळामार्फत भरण्यात आलेल्या लोकांना काढण्यात आले आणि नवीन संचालक मंडळाने आपली माणसे नेमली. त्याठिकाणी रोजंदारी पध्दतीने माणसे भरल्याचे दि.13.3. रोजी झालेल्या चर्चेच्या वेळी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर दिले आहे. वैद्यनाथन समिती आणि मित्रा समिती गठीत करण्यात आली, तिच्या माध्यमातून जिल्हा मध्यवर्ती बँकेमध्ये नोकर भरतीबाबत आणि बँकींगबाबत गाईडलाईन्स ठरवून दिल्या आहेत. त्यावेळी त्या प्रश्नाला उत्तर देतांना अशाप्रकारे रोजंदारीवर भरती केलेल्या कर्मचाऱ्यांना तातडीने काढले जाईल अशाप्रकारचे आदेश दिले आहेत. परंतु त्याठिकाणी बॅकेने कर्मचाऱ्यांना कोर्टामध्ये जाण्याची संधी दिली. आणि कोर्टामध्ये आपली बाजू न मांडल्यामुळे कोर्टाने स्थगिती दिली. त्याठिकाणी जी नियमबाह्य भरती झाली, त्याबाबत सहकार विभाग काय कारवाई करणार आहे? बॅकेला जो आर्थिक भुर्दंड पडत आहे त्याबाबत काय कारवाई करणार आहे? तसेच, मागासवर्गीयांच्या जागेवर खुल्या प्रवर्गातील लोकांना पदोन्नती देण्यात आली आहे.

(अपूर्ण - यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ही पदोन्नती देत असताना दि.29-04-2009 रोजी माननीय सेवक समितीने जो ठराव केलेला आहे, तो नियमबाह्य आहे.शासन या ठरावाची चौकशी करुन सेवक समितीवर कारवाई करणार आहे काय ? कारण दि.5 नोव्हेंबर 2009 चा जो शासन निर्णय आहे,त्यामध्ये स्पष्टपणे म्हटलेले आहे की,मागासवर्गीयांसाठी जी पदोन्नतीची पदे आहेत, त्यावर मागासवर्गीय लोकांनाच घ्यावे. पण याठिकाणी खुल्या प्रवर्गातील लोकांना पदोन्नती दिलेली आहे. त्यामुळे बँकेने शासनाच्या निर्णयाचे उल्लंघन केलेले आहे हे आपण सदनामध्ये मान्य केलेले असून याबाबतीत संबंधितांना शो-कॉज नोटीस देण्याचे काम सह-आयुक्तांच्या मार्फत सुरु आहे. बँकेने काल-परवाच मागासवर्गीय सदस्यांच्या संदर्भात जो ठराव केलेला आहे आणि तो नियमबाह्य असून शासनाच्या निर्णयाला, नियमाला बगल दिलेली आहे. याबद्दल बँकेवर कारवाई करणार आहात काय ?

सभापती महोदय, भाई सावंत पतसंस्था यांनी 2006 मध्ये बँकेकडून पाच कोटी रुपयांचे कर्ज उचलले आहेत आणि आजपर्यंत त्यापैकी फक्त 10 ते 20 लाख रुपयेच भरलेले आहेत. या बँकेचे चेअरमन हेच या बँकेचे संचालक आहेत. त्यामुळे त्यांच्यावर कोणतीही कारवाई होत नाही, वसुली होत नाही. तेथे प्रशासक नेमलेला आहे, पण त्यांना दप्तर उपलब्ध करुन दिले जात नाही. त्यामुळे त्यांना पोलिसांच्या माध्यमातून दप्तर उपलब्ध करुन दिले जाईल काय ? तसेच संबंधित संचालकांवर कारवाई केली जाईल काय ? तसेच जी वसुल करावयाची आहे, ती 5 कोटी वरुन 9 कोटीपर्यंत गेली आहे. तर ही वसुली ताबडतोब केली जाणार आहे काय ? त्याचप्रमाणे बँकेमध्ये एक वर्षापासून मुख्य कार्यकारी अधिकारी नाही. यासाठी सातत्याने जाहिरात दिल्याचे दाखविले जाते. अशा वेळी या बँकेतील श्री.प्रमोद गावडे हा कर्मचारी या पदाच्या बाबतीत सर्व निकषामध्ये बसत असताना, त्यांनी यासाठी इंटरव्ह्यु दिलेला असतानाही त्याला सातत्याने नाकारले जात आहे. त्याला या पदावर घेणार आहात काय ? तसेच याबाबतीत चौकशी करणार आहात काय ? कारण श्री.प्रमोद गावडे सर्व निकषामध्ये बसत असताना देखील बँकेने प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी नेमलेला आहे आणि त्यांच्या माध्यमातून कारभार सुरु आहे. याबाबतीत कोणती उपाययोजना करणार आहात ? या बँकेच्या सर्व कारभाराबाबत शासन चौकशी करणार आहे काय ? या तीन-चार प्रश्नांची माननीय मंत्री महोदयांनी उत्तरे द्यावीत. धन्यवाद.

---

. . . .5 एफ-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे की, एकच प्रश्न किंवा एकच विषय सदनामध्ये किती वेळा मांडला जाणार आहे ? डिसेंबरमधील हिवाळी अधिवेशनामध्ये नियम 93 अन्वये या विषयावर सूचना देण्यात आली होती. त्यानंतर या विषयाच्या संबंधात तारांकित प्रश्न देण्यात आला होता. त्यावेळी राज्य शासनाने दिलेले जे उत्तर दिले होते. त्यानुसार या राज्यातील ज्या काही पाच बँका आहेत, त्यामध्ये सिंधुदुर्ग जिल्हा बँकेचे नाव आहे, एवढे या बँकेने चांगले काम केले आहे. त्याबद्दल राज्य शासनाने त्यांना पारितोषिकही दिलेले आहे. राष्ट्रीय बँकेने त्यांना खाते उघडण्यासाठी परवानगी दिलेली आहे. तेव्हा अशा प्रकारचा विषय वर्तमानपत्रामध्ये आल्यानंतर बँकेची जी बदनामी होते, त्याची जबाबदारी कोण घेणार आहे? शासन याबाबत जबाबदारी घेणार आहे काय ? असा माझा प्रश्न आहे. माननीय मंत्री महोदय आपण याठिकाणी उत्तर देणार आहात, पण सदनामध्ये एकच प्रश्न, एकच उत्तर किती वेळा येणार आहे ?

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी पॉईंट ऑफ इंन्फर्मेशन मांडलेला आहे. मला असे वाटते की, सन्माननीय सदस्यांनी एखाद्या विषयाच्या संदर्भात कोणता प्रश्न विचारावा, कोणते आयुध वापरावे यासाठी दुसऱ्यांना सांगण्यापेक्षा विचारलेल्या प्रश्नाला माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, बँकेच्या बाबतीत तुम्हाला सांगितलेले आहे. माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे. प्रश्न कोणी विचारावे याबद्दल माझा अधिकार नाही. तो प्रत्येकाचा अधिकार आहे. पण एकच विषय ...

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, यामधून बँकेची कोणतीही बदनामी होणार नाही. जोपर्यंत सन्माननीय सदस्यांना उत्तर मिळत नाही, तोपर्यंत वेगवेगळया आयुधांचा वापर करुन त्यांना माहिती विचारण्याचा अधिकार आहे. त्यामुळे या विषयाच्या बाबतीत शासनाने स्पष्टीकरण द्यावे.

यानंतर कु.थोरात . . ..

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.परशुरामजी उपरकर यांनी सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संदर्भातील काही प्रश्न याठिकाणी उपस्थित केलेले आहेत. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. तेली साहेबांनी त्यांच्या भावना व्यक्त केलेल्या आहेत आणि एका अर्थाने मी त्यांच्या मताशी सहमत आहे. एखाद्या संस्थेबद्दल वारंवार अशा पध्दतीने सभागृहामध्ये प्रश्न उपस्थित केलेला आहे. ही एक सहकारी संस्था आहे. याबाबतीत वर्तमानपत्रात आपापल्या परीने प्रतिक्रया छापून येत असतात. त्यामुळे निश्चितपणाने त्याचा परिणाम या बँकेवर होणे सहाजिक आहे. सभापती महोदय, हा प्रश्न अनेक वेळा वेगवेगळी आयुधे वापरुन विचारण्याचा सन्माननीय सदस्यांना जरी हक्क असला तरी निश्चितपणाने सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती बॅंक ही महाराष्ट्रातील एक चांगली बँक म्हणून गणली जाते. आरबीआयने ज्या मोजक्या बँकाना परवाना दिलेला आहे त्यामध्ये या बँकेचा समावेश आहे. म्हणून ही गोष्ट निश्चितपणाने आपल्याला विसरता येणार नाही, हे मला याठिकाणी सांगावयाचे आहे.

सभापती महोदय,सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी मुद्दा उपस्थित केला की, नाबार्डने दिनांक 1-4-2007 ते दिनांक 31-3-2009 या कालावधीची तपासणी केली त्या तपासणीचा अहवाल दिनांक 29-12-2009 रोजी बँकेस प्राप्त झाला. या अहवालातील दोषांची पूर्तता करण्याचा अहवाल बँकेने तयार केला, तो संचालक मंडळाने दिनांक 20-3-2010 रोजी मंजूर केला आणि दिनांक 24-3-2010 रोजी तो अहवाल नाबार्डकडे पाठविण्यात आला आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत काही तक्रारी झ ाल्या होत्या याबाबतचा प्रश्न याठिकाणी उपस्थित केला आहे. सभापती महोदय, मला या निमित्ताने एक गोष्ट सांगावयची आहे की, मागासवर्गीयांच्या बाबतीत बँकेला जी प्रमुख अडचण होती ती अशी की, पदोन्नती दिल्यानंतर दिला जाणारा परीविक्षाधीन कालावधी हा दोन वर्षे आहे तरी सुध्दा तो " खास बाब" म्हणून सहा महिने करण्याच्या संदर्भात बँकेने दिलेला प्रस्ताव मंजूर करण्यात आलेला आहे. त्यामुळे दिनांक 30-3-2000 रोजी बँकेच्या संचालक मंडळाची जी सभा
झाली त्या ठरावानुसार आता 24 कर्मचारी पदोन्नतीस पात्र होत आहेत आणि त्यापैकी 14 मागासवर्गीय उमेदवारांना पदोन्नती देण्यात आलेली आहे. बाकीचे कर्मचारी त्यांची शैक्षणिक पात्रता नसल्यामुळे नेमता येत नाहीत म्हणून हा दहा जागांचा अनुशेष राहिलेला आहे. परंतु निश्चितपणाने

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके...

पात्र कर्मचारी उपलब्ध झाल्यानंतर अर्थात त्या त्या प्रवर्गातील कर्मचारी उपलब्ध झाले पाहिजेत. ज्या जातीसाठी ती पदे आरक्षित आहेत त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध झाल्यानंतर तो बॅकलॉग निश्चितपणाने भरला जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सी.ओ.च्या बाबतीत प्रश्न उपस्थित केलेला आहे. फिट ॲण्ड प्रॉपर सी.ओ. बँकेकडे नाहीत परंतु बँकेने निश्चितपणे याबाबतीत महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडे विचारणा केलेली आहे. त्यांची यादी त्यांच्याकडून मागविण्याचा प्रयत्न केलेला आहे. महाराष्ट्र टाईम्स सारख्या दैनिकात दोन वेळा जाहिराती दिलेल्या आहेत. परंतु जोपर्यंत तो उपलब्ध होत नाही तोपर्यंत बँकेचा कारभार करण्यासाठी त्यांनी त्यांच्या कर्मचाऱ्यापैकी एका कर्मचाऱ्याची नेमणूक केलेली आहे म्हणून याबाबतची कार्यवाही बँकेच्या माध्यमातून चालू आहे.

त्यानंतर सन्माननीय सदस्यांनी भाई सावंत पतसंस्थेच्या संदर्भात याठिकाणी प्रश्न विचारलेला आहे. या पतसंस्थेवर प्रशासक नियुक्त केलेला आहे. दप्तर मिळण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था कलम 80 अन्वये कारवाई केलेली आहे आणि ते दप्तर मिळण्याच्या बाबतीत पाठपुरावा केलेला आहे.

सभापती महोदय, कंत्राटी पध्दतीच्या कर्मचाऱ्यांच्या भरतीला महाराष्ट्र शासनाने स्थगिती दिलेली आहे. परंतु सहकार न्यायालय कोल्हापूर येथे हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके ....

त्यांनी त्यांना नोकरीमधून दूर करण्यापासून स्थगिती दिलेली आहे. त्यामुळे बँकेला काही कारवाई करता आलेली नाही. या ठिकाणी जे प्रश्न उपस्थित करण्यात आले त्याबाबत समाधान करण्याचा प्रयत्न मी केलेला आहे. म्हणून निश्चितपणाने या ठिकाणी कोणत्याही चौकशीची गरज नाही. जी काही कार्यवाही चालू आहे तो दोष पूर्ततेचा अहवाल नाबार्डकडे गेलेला आहे. त्याबाबतीत पुढची कार्यवाही नाबार्डने करावयाची आहे. त्यातून जर काही गंभीर स्वरुपाच्या त्रुटी आढळून आल्या तर निश्चितपणाने शासनाच्या वतीने पुढची कारवाई केली जाईल.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, माझ्याकडे बँकेच्या 19.12.2009 रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त आहे. त्यामध्ये विषय क्रमांक 21 मध्ये म्हटल्याप्रमाणे तीन मुलाखती झाल्या. त्यातील श्री. प्रमोद गावडे हा त्यांच्या सर्व निकषामध्ये बसणारा आहे. त्या ठिकाणी दोन तीन मुलाखती झालेल्या आहेत. ते पूर्ण् प्रोसिडींग माझ्याकडे आहे. तरीही माननीय मंत्रिमहोदय चुकीचे उत्तर रेकॉर्डवर आणत आहेत. शासनाचा जो निर्णय आहे त्याप्रमाणे मागासवर्गीयाच्या जागेवर खुल्या प्रवर्गातील व्यक्तीला पदोन्नती देता येते काय याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावे. 148 च्या बाबतीत जे प्रकरण न्यायालयामध्ये प्रलंबित आहे त्यासाठी बँकेकडून कोणती कार्यवाही केली जाणार आहे ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी सर्व प्रश्नांचे सविस्तर उत्तर दिलेले आहे. सन्माननीय सदस्यांना पाहिजे तसेच उत्तर मंत्र्यांनी द्यावे अशी अपेक्षा त्यांना करता येणार नाही.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, 5 नोव्हेंबरचा शासन निर्णय आहे. त्यामध्ये शासनाने पदोन्नतीच्या संदर्भात निर्णय घेतलेला आहे. त्यामध्ये असे नमूद केले आहे की, मागासवर्गीयांच्या जागेवर मागासवर्गीय लोकांना पदोन्नती द्यावी. त्या ठिकाणी मागासवर्गीयांच्या जागेवर खुल्या प्रवर्गातील लोकांना पदोन्नती दिलेली आहे. त्यामध्ये शासनाच्या निर्णयाचे उल्लंघन झाले आहे काय ? तशी पदोन्नती देता येते काय ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, पात्र मागासवर्गीय उमेदवारांना पदोन्नती दिलेली आहे. 14 जागा पदोन्नतीने भरलेल्या आहेत. बाकीचे उमेदवार पात्र नाहीत. जे ग्रॅज्युएट नाहीत त्यांना पदोन्नती कशी देता येईल ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर : ठीक आहे. मी कोर्टात जाईन.

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी आता उभे राहून जे वक्तव्य केले त्याला माझी हरकत आहे. त्यांनी आता सांगितले की मी आता कोर्टात खेचतो. या ठिकाणी जी चर्चा झाली ती कोर्टात नेता येते काय ? सन्माननीय सदस्यांना असे धमकीवजा बोलणे शोभत नाही. आपण त्यांना समज द्यावी.

श्री. परशुराम उपरकर : मी बँकेविरुध्द कोर्टात जाईन असे म्हणालो.

**तालिका सभापती** ( श्री. रमेश शेंडगे ) : ठीक आहे. अर्धा-तास चर्चा संपलेल्या आहेत.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. उद्या मंगळवार, दिनांक 20 एप्रिल, 1010 रोजी सकाळी 10.30 ते दुपारी 12.00 वाजेपर्यंत सभागृहाची विशेष बैठक होईल. या बैठकीत नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा घेण्यात येईल. त्यानंतर सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.15 वाजता भरेल.

( सभागृहाची बैठक रात्री 9 वाजून 59 मिनिटांनी, मंगळवार, दिनांक 20 एप्रिल, 2010 रोजीच्या सकाळी 10.30 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही